# लोकलेखा समिती

## (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ चा नागरी अहवालामधील ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.४, ३.२.६),**

**गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.१),**

**उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, ३.३.२),**

**सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५ व ३.३.४)**

# बारावा अहवाल

सत्यमेव जयते

( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास

दिनांक ऑगस्ट, २०१६ रोजी सादर करण्यात आला )


महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई/नागपूर.

ऑगस्ट, २०१६

# लोकलेखा समिती

## २०१५-२०१६

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ चा नागरी अहवालामधील**
**ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण)**
**विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.४, ३.२.६),**
**गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.१),**
**उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, ३.३.२),**
**सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५ व ३.३.४)**

# बारावा अहवाल

## लोकलेखा समिती

## २०१५-२०१६

**समिती प्रमुख**

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री.हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री.शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री.वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री.जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(२०) श्री.भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(२२) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२४) श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२५) श्री.संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे, २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.

(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(५) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(६) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(७) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(८) श्री.रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ चा नागरी अहवालामधील २०१०-२०११ चा नागरी अहवालामधील ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.४, ३.२.६), उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, ३.३.२), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.१), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२.४, ३.२.५ व ३.३.४) यावर विचार करून लोकलेखा समितीचा बारावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २५ व २६ ऑगस्ट, २०१६, दिनांक १६ व २३ सप्टेंबर, २०१६, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी अपर मुख्य सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण), उच्च व तंत्रशिक्षण तसेच सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक, महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट “ अ ” मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “ ब ” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीच्या उप समिती-१ ने दिनांक २९ जुलै २०१६ रोजी प्रारूप अहवाल तयार करून विचारात घेतला.

समितीने दिनांक सोमवार दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : १ ऑगस्ट २०१६.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना | (पाच) |
| **(१)** | **ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग** | १ |
| | (परिच्छेद क्र. २.४ ) | |
| | (परिच्छेद क्र. ३.२.६ ) | |
| **(२)** | **गृह विभाग** | **५४** |
| | (परिच्छेद क्र. ३.३.१) | |
| **(३)** | **उच्च व तंत्रशिक्षण विभाग** | **६५** |
| | (परिच्छेद क्र.२.५) | |
| | (परिच्छेद क्र.३.३.२) | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | **७१** |
| | (परिच्छेद क्र. ३.२.४) | |
| | (परिच्छेद क्र. ३.२.५) | |
| | (परिच्छेद क्र. ३.३.४) | |

## जलसंधारण विभाग

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-११ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. २.४ " मृद व जलसंधारण कार्यक्रमाचे कार्यान्वयन " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यात ३०७.५८ लाख हेक्टर्सचे क्षेत्र आहे,ज्यापैकी १५९ लाख हेक्टर क्षेत्र अल्प पर्जन्यमान व जमिनीच्या पृष्ठभागातून जलांश निघून गेल्याने अवर्षण प्रवण आहे.पाण्याची कमतरता आणि जमिनीची धूप,ही,जास्त धूप घडविणारा पाऊस,वाऱ्याचा जास्त वेग व सर्वसाधारण उथळ माती यामुळे होते.परिणामी,माती शेती करिता नापीक होते.या समस्यांची सोडवणूक करण्याकरिता,शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी व शेतीविषयक अर्थव्यवहाराला उत्तेजन देण्यासाठी,जमिनीचे आणि पावसाच्या पाण्याचे संधारण महाराष्ट्र शासनाने १९९२ पासून १४ योजना/ कार्यक्रमाद्वारे सुरू केले (परिशिष्ट २.४.१)४४,१८४ पाणलोटांपैकी जल संपदा विभागाशी समन्वय करून कृषी विभागाने कार्यान्वित केलेल्या पाणलोट व्यवस्थापन द्वारा ३३,४६७ पाणलोट मध्ये मृद् व जलसंधारण कार्यक्रम हाती घेण्याचा शासनाने प्रस्ताव केला (१९९२).३३,४६७ पाणलोटांपैकी २६,८९७ पाणलोटांमध्ये कामे घेतली गेली.तथापि,फक्त १०,८८७ पाणलोट पूर्ण होऊ शकले (मार्च २०११).

मृद् व जल संधारणाच्या कार्यक्रमात, Continuous contour Trenches (CCT), Compartment Bunding(CB), Loose Boulder Structure (LBS) माती नाला बांध (MNB), सिमेंट नाला बांध (NB) शेततळी (FP) इत्यादी उपचारांचा समावेश होतो.मृद् व जलसंधारणा करिता योग्य क्षेत्र २४१ लाख हेक्टर वर पसरले होते.संधारण कार्यक्रम १४ योजनांच्या ९७ खाली १११.२४ लाख हेक्टर व्यापणाऱ्या २६,८९७ पाणलोटांमध्ये घेतल्या गेले आहेत.उर्वरित १२९.७६ लाख हेक्टर क्षेत्र अद्याप समाविष्ट केल्या गेले नाही.कार्यक्रमांच्या कार्यान्वयनात दिसलेल्या उणीवा,पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्या आहेत

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सद्यस्थितीत मृद् व जलसंधारणाकरिता योग्य क्षेत्र २४१ लाख हेक्टर क्षेत्रापैकी १२६.०० लाख हे.क्षेत्र मार्च २०१२ अखेर उपचारित करण्यात आले असून ११,६२९ सुक्ष्म पाणलोट पूर्ण करण्यात आलेले आहेत.उर्वरित १५,३८७ अपूर्ण पाणलोट विविध योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून पूर्ण करण्याचे नियोजन आहे,परंतु प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये प्राप्त होणारा निधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने अपूर्ण पाणलोट पूर्ण करणेकामी मर्यादा येत आहेत.त्यामुळे आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करून जास्तीत जास्त पाणलोट पूर्ण करण्यात येत आहेत.

स्पष्टीकरण मान्य करण्यात येऊन परिच्छेद वगळण्यात यावा.

**२.४.६**

**नियोजन**

ग्रामीण विकास व जलसंधारण खात्याकडून कृषी विभागाशी विचार-विनिमय करून सर्व योजनाचे (केंद्र तसेच राज्य पुरस्कृत) नियोजन केल्या जाते. सुक्ष्म पाणलोटाच्या विकासाकरिता तालुका कृषी अधिकारी योजना तयार करतात आणि त्या जिल्हा पातळी समिती कडे मंजुरी करिता सादर करतात. जिल्हा पातळी समिती मंजुरी देते आणि शासनाकडे निधीची मागणी करते.असे दिसून आले की राज्याच्या सर्व भागात कार्यान्वित होत असणाऱ्या सर्व योजनांचा अंर्तभाव असणारे व्यापक एकात्मीकृत नियोजन विभागाकडून केल्या जात नव्हते.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मृद् संधारणाच्या केंद्र शासनाच्या निधीतून राबविल्या जाणाऱ्या योजना हया राज्याच्या सर्व विभागात राबविल्या जात नाहीत.उदा.नदीखोरे विकास प्रकल्प हा राज्यातील ९ जिल्ह्यासाठी राबविला जातो.पश्चिम घाट विकास प्रकल्प हा १२ जिल्ह्यामध्ये राबविला जातो.तथापि एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम हा राज्यातील सर्व जिल्ह्यातून राबविला जात असून,त्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जातो.जिल्हास्तरावर मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट समिती कार्यरत असून प्रतिवर्षी मृद् संधारणाची विविध निधी स्त्रोतातून (केंद्र,राज्य,जिल्हा वार्षिक योजना)जिल्ह्यामध्ये किती क्षेत्रावर पाणलोट विकासाचा कार्यक्रम घ्यावयाचा याचे नियोजन केले जाते.सन १९९२ मध्ये जलसंधारण विभागाच्या निर्मितीनंतर २४१.०० लाख हेक्टर क्षेत्रापैकी मार्च २०१२ अखेर १२६.०० लक्ष हेक्टर उपचारित झालेले आहे व उर्वरित शिल्लक क्षेत्र ११५ लाख हेक्टर उपचारित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.राज्यामध्ये मृद् संधारणाच्या विविध योजना राबविण्यात येत असून सदर योजनेच्या निधीतून प्रतिवर्षी रु.५०० कोटी निधी उपलब्ध झाल्यास उर्वरित ११५ लाख हेक्टर क्षेत्र सुमारे २७ वर्षामध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती.

जलसंधारण विभागाची निर्मिती सन १९९२ मध्ये झाली. तेव्हापासून एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. सन २००६-०७ पासून हा कार्यक्रम गतिमान व प्रकल्पाधारित पद्धतीने माथा ते पायथा राबविण्यास सुरुवात झाली. या कार्यक्रमाकरिता TSP,OTSP,SCp,राज्यस्तर व जिल्हास्तर सर्वसाधारण या योजनांचा निधी वापरण्याचे नियोजन प्रत्येक आर्थिक वर्षात करण्यात येते. आता एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, RIDF अंतर्गत मेगा पाणलोट विकास कार्यक्रम, मराठवाडा पाणलोट मिशन, विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम या योजना मेगा पाणलोट आधारावर राबविण्यात येत आहेत.या योजनांतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजुरी घेऊन मगच योजना राबविण्यात येते. त्यामुळे आता एकात्मि पद्धतीने मेगा पाणलोट निहाय सर्वकष नियोजन करण्यात येते. तसेच पाणलोट कार्यक्रमांचे जिल्हानिहाय यथार्थदर्शी आराखडे तयार करण्याचे काम चालू आहे.

**२.४.७/२.४.७.१**

**वित्तीय व्यवस्थापन / निधीची पद्धती**

प्रत्येक आर्थिक वर्षात, सर्व योजनांकरता, अर्थसंकल्पीय प्रस्ताव, संचालकांकडून ग्रामीण विकास व जलसंधारण विभागाकडे छाननीकरिता पाठविल्या जातात. वित्त विभाग अर्थसंकल्पीय वाटणीला अंतिम रूप देते आणि ती कृषी आयुक्त, पुणे यांचेकडे पाठविते. महाराष्ट्र शासनाने निधीच्या वितरणाकरीता ऑनलाईन अर्थसंकल्पीय वितरण पद्धती स्थापन केली आहे. या पद्धतीमध्ये, अनुदानाचे वाटप महिना -निहाय केले जाते.

**ज्ञापन :—**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर माहिती वस्तुस्थितीवर आधारित आहे.

**२.४.७.२**

**अंदाजपत्रक व खर्च**

लेखापरीक्षेकरिता निवडलेल्या, मृद व जल संधारणाच्या सहा योजनांवर २००६-११ दरम्यान झालेला खर्च रु १३४२.४८ कोटी होता. याचा तपशील परिशिष्ट २.४.५ मध्ये दिला आहे. असे दिसून आले की पुरेसा निधी असतानाही, राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमा अंतर्गत २०१०-११ या वर्षात, नदी खोरे प्रकल्पावर २००६-०७, व २००९-१० या वर्षात, मराठवाडा पाणलोट विकास मिशनवर २००६-०७,२००७-०८ व २००९-१० या वर्षात आणि विदर्भ पाणलोट विकास मिशनवर २००७-०८ व २००९-१० या वर्षात फारच कमी खर्च झाला. परिणामी, लक्ष्यांच्या साध्यात पुढील परिच्छेदांत चर्चिल्या प्रमाणे तूट होती.

**(i) वर्षाच्या अगदी शेवटी निधीचे वितरण**

सर्वसाधारण वित्तीय नियमांच्या नियम ५६ (३) मध्ये असे करारनिविष्ट केले आहे की घाईने केलेला खर्च, विशेषतः आर्थिक वर्षाच्या शेवटच्या काही महिन्यांत असेल तर तो वित्तीय औचित्य भंग मानला पाहिजे आणि तो टाळला पाहिजे.

संचालकांच्या अभिलेखांच्या छाननीत (मे २०११) असे उघडकीस आले की, परिशिष्ट २.४.६ मध्ये दाखविल्याप्रमाणे, राज्याकरिता निवडलेल्या योजनांतर्गत दिलेला निधी मार्च महिन्यात अधिकतम होता. निवडलेल्या योजनांकरिता वर्षाच्या अगदी शेवटी मार्च महिन्यात दिलेल्या निधीची टक्केवारी २००६ ते ११ या कालावधीत ३४ ते १०० या दरम्यान होती. अभिलेखांच्या चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की अमरावती व नाशिक जिल्ह्यांना दिलेल्या रु.३२४.६२ लाखाच्या एकूण निधीपैकी आणि वेग वर्धित पाणलोट विकास कार्यक्रमावरील रु.२३०.२६ लाखाच्या निधीपैकी अनुक्रमे रु. २१९.४२ लाख (५८ टक्के) आणि रु. ८१.०२ लाख (३५ टक्के) निधी मार्च महिन्यात दिल्या गेला. त्याच प्रमाणे, याच जिल्ह्यांत राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत २००६-११ या काळात दिलेल्या एकूण रु. ५४.६१ लाख व रु. ११४.५७ लाख निधीपैकी रु. १३.०२ लाख (२४ टक्के) व रु.४४.६६ लाख (३९ टक्के) निधी मार्च महिन्यात दिला गेला. शासनाने मान्य केले (ऑक्टोबर २०११) की वर्षाच्या अगदी शेवटी निधीचे वितरण केले गेले.

**(ii) योजनांच्या निधीचे वळविणे**

सर्वसाधारण वित्तीय नियमांच्या नियम २६(ii) मध्ये असे म्हटले आहे की,ज्या हेतु करीता निधीची तरतूद केली आहे त्या करीताच खर्च होतो आहे याची खात्री करून घेणे हे नियंत्रक अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.असे आढळून आले की निवडलेल्या नऊ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांपैकी दोघांच्या बाबतीत राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमाकरिता असलेला निधी खाली दर्शविल्याप्रमाणे वळविला गेला.

- २००९-१० या वर्षात बुलढाणा जिल्ह्याकरिता एन ए डी पी अंतर्गत शेततळ्यांसाठी एकूण लक्ष्य २,३०० होते जेव्हा की जानेवारी २०११ पर्यंत फक्त १८८ शेततळी पूर्ण केली गेली आणि शिल्लक २,११२ होती. पुढे असे आढळून आले की एन ए डी पी खाली

रु.३.७८ कोटी हा केंद्राचा निधी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मगांराग्रारोहयो) कडे वळविला, जेव्हा की एन ए डी पी चे शेततळ्यांचे काम अजून अपूर्ण होते. जिअकृअ, बुलढाणा यांनी नमूद केले (मे २०११) की जिल्हा पातळी समितीने निधी वळविणे मंजूर केले होते.

- त्याच प्रमाणे, एन ए डी पी चा रु. १.८७ कोटी इतका निधी जिअकृतअ, नाशिकने मगांराग्रारोहयो अंतर्गत घेतलेल्या २८७ शेततळ्यांच्या प्रदानासाठी वळविला. मगांराग्रारोहयो खाली मंजूर झालेल्या कामाच्या प्रदानासाठी एन ए डी पी साठी दिलेला निधी वापरणे अनियमीत होते.

जिअकृअ, नाशिक यांनी नमूद केले (जून २०११) की मगांराग्रारोहयो खालील साध्य करावयाची भौतिक लक्ष्ये जास्त होती आणि देय असणाऱ्या अनुदानापासून लाभार्थी वंचित होते, म्हणून कृषि सहसंचालक, नाशिक यांच्या आदेशाप्रमाणे निधी वळविल्या गेला. ही उत्तरे मान्य करण्यायोग्य नाही कारण एन ए डी पी चा निधी मगांराग्रारोहयो च्या लक्ष्याच्या साध्यासाठी वळविणे समर्थनीय नाही, विशेषतः जेव्हा एन ए डी पीच्या लक्ष्यांच्या साध्यामध्ये तूट होती.

**(iii) उपार्जित व्याजाच्या उपचाराबद्दल मार्गदर्शक तत्वे नसणे.**

पाणलोट कामाकरिता दिलेला निधी, ग्राम पातळीवरील कामांच्या कार्यान्वयनाकरता पाणलोट समितीकडे दिल्या जातो. हा निधी पाणलोट समित्यांच्या बचत खात्यांमध्ये ठेवला जातो. पण, अर्जित व्याजाच्या वापराच्या पद्धतीबद्दल मार्गदर्शक तत्वांमध्ये काहीही अनुदेश नव्हते.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की सक्षम प्राधिकाऱ्याला या बाबतीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्याची विनंती केली पाहिजे.

**(iv) प्रशिक्षणा करता नेमून दिलेल्या निधीचे वळविणे**

एन डब्ल्यू डी पी च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे शेतकऱ्यांमध्ये मृद व जलसंधारण योजनांसंबंधी जागृती निर्माण करण्यासाठी, प्रकल्पाखाली स्थापित सुक्ष्म पाणलोट पातळीवरील नोंदणीकृत संस्थाच्या मानसेवी पदाधिकाऱ्यांसाठी, कमी कालावधीच्या स्थितीज्ञान पाठक्रमाची व्यवस्था केली पाहिजे.

नऊ पाणलोटांच्या बाबतीत पाणलोट विकास चमू सदस्यांच्या प्रशिक्षणाकरता तालुका कृषी अधिकारी संगमनेर यांना रु.४.७६ लाख दिले होते (जून २००८), तथापि प्रशिक्षणाकरिता फक्त रु. ५६ हजार वापरले गेले आणि उर्वरित रक्कम, वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरी शिवाय मृद व जलसंधारण कामासाठी वळविली. परिणामी मृद व जलसंधारण योजनासंबंधी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्मितीचा हेतू विफल झाला, जो या योजनेच्या यशस्वी कार्यान्वयासाठी महत्त्वाचा घटक होता. तालुका कृषि अधिकारी, संगमनेर यांनी नमूद केले (जुलै २०११) की रक्कम प्रशिक्षणाकरिता होती व इतर कारणांकरिता वापरली गेली, त्याकरिता कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव पाठविला जाईल. हे उत्तर स्वीकार्य नाही कारण प्रशिक्षणाकरिता नेमून दिलेल्या निधीचे वळविणे अनियमित होते.

**(v) खर्चाची अचूक माहिती देणे**

तालूका कृषि कार्यालय, अंजनगांव सुर्जी येथे असे दिसून आले की विदर्भ पाणलोट विकास मिशनच्या कामांवर झालेला रु.२.९९ कोटीचा खर्च हा रु. २३.४६ लाख (रु. ६.३० लाख व्याजासहित) धरुन होता जो बँक खात्यांत विनाखर्च पडून आहे.

तालुका कृषी अधिकारी यांनी नमूद केले (जून २०११) की तालुका स्तरावरील पाणलोटाच्या शेतकऱ्यांच्या अभ्यास दौऱ्यासाठी रु. १४.५६ लाख चा निधी प्राप्त झाला होता. तथापि, अभ्यास दौऱ्यासाठी सविस्तर योजना पाणलोट समित्यांकडून प्राप्त झाली नाही व त्यामुळे ही रक्कम खर्च होऊ शकली नाही.

हे उत्तर स्वीकारण्या सारखे नाही कारण विनाखर्च राहिलेली रक्कम खर्च झाली म्हणून दाखविणे हे चूक होते.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यामध्ये भूपर्जन्यमान आधारित एकूण ९ विभाग असून खरीप व रब्बी हंगामात प्रमुख पिके घेतली जातात.चांगले पर्जन्यमान लाभलेल्या जिल्ह्यात व ऊशिरा पर्जन्यमान प्राप्त जिल्ह्यात (परतीचा मान्सुन) चांगले पर्जन्यमान झाल्यास रब्बी हंगमातील पिके घेतली जातात. सदर पिके माहे फेब्रुवारी अखेर शेतात उभी असतात.त्यामुळे अशा क्षेत्रात मृद संधारणाची कामे करता येत नाहीत. अशा भागातून मृद संधारणाच्या कामासाठी मार्च, एप्रिल व मे व जूनचा पहिला पंधरवडा मिळतो. त्यामुळे मार्च महिन्यात प्राप्त झालेला निधी त्याच महिन्यात १०० टक्के खर्च करण्यास मर्यादा येतात. त्यामुळे त्या-त्या वित्तीय वर्षात कमी खर्च झाल्यास दिसून येतो. याच बरोबर परिच्छेदात नमूद केले प्रमाणे शासन स्तरावरुन वर्षाच्या शेवटी निधीचे वितरण झाल्याने प्राप्त झालेला निधी संबंधित जिल्ह्यांना त्याप्रमाणे वितरित करण्यात आलेला आहे.

स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**आरव्हीपी व एनडब्ल्यूडीपी :** या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता सन २००६-११ या कालावधीत केंद्र शासनाकडून आर्थिक वर्षाच्या शेवटी निधी प्राप्त झाल्याने निधीचे वितरण उशीरा झाल्याचे दिसते.

**एमडब्ल्यूडीएम, व्हीडब्ल्यूडीएम व एडब्ल्यूडीपी :** या राज्यस्तरिय योजनांकरिता अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधी मंजूर झाल्यानंतर नियोजनास वेळ लागतो. तद्‌नंतर पावसाळा सुरू होतो. त्यामुळे डिसेंबर नंतरच मृद् व जलसंधारणाची कामे शेतात घेणे शक्य होते. त्यामुळे निधी वितरण व खर्च वर्षाच्या शेवटी होतो. यापुढे निधी वितरित व खर्च वर्ष अखेरीस होणार नाही. याची दक्षता घेतली जाईल.

**जिअकृअ - नाशिक**

सन २००९-१० साठी रोजगार हमी योजनेंतर्गत प्रती तालुका २०० प्रमाणे लक्षांक शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांचे एकूण ३००० शेततळ्यांचे लक्षांक निर्धारीत करण्यात आले. त्यासाठी रु.५००.०० लक्ष निधीतून ७१४ शेततळी पूर्ण करण्यात येऊन उर्वरीत २८७ लाभार्थी अनुदानापासून वंचित राहणार होते. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे पत्र क्र. २१८३ दि. २९ मार्च २०११ अन्वये रोहयो अंतर्गत निधी अभावी देय अनुदानापासून वंचीत राहिलेल्या लाभार्थींना तुर्तास राकृवियो अंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीतून अनुदान वितरित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. व भविष्यात पूर्ण झालेल्या शेततळ्यांचे अनुदान न दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारी उद्‌भवू नये व लोकप्रतिनिधींनी तक्रारी करू नयेत, यासाठी जिअकृअ, नाशिक यांनी रु. १८७.०९ लाख अनुदान राकृवियोतून अदा केले आहे.

शासन निर्णय क्र. राकृवि.-२००९/प्र.क्र.१८/जल-८, दि. १ जानेवारी २०१० मधील परिच्छेद ९ नुसार दोन्ही योजनांतर्गत अर्ज एकच असल्याने लाभार्थीची पात्रता निश्चित झाल्यावर त्याला लाभ कोणत्या योजनेतून द्यावयाचा याचा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हास्तरिय समितीस आहे. त्यानुसार संबंधित लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. त्यास जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीच्या दि. २३ जून २०११ च्या सभेत रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या शेततळ्याचे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत रुपांतरीत करून शेततळे पूर्ण केलेल्या लाभार्थींचे यादीस मान्यता घेण्यात आलेली आहे. सोबत टिप्पणी व यादीची झेरॉक्स प्रत सहपत्रीत केलेली आहे.

स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**जिल्हा बुलढाणा-**

सन २००९-१० या वर्षाकरिता एनडीपी अंतर्गत बुलढाणा जिल्ह्याकरिता शेततळ्यासाठी २३०० लक्षांक प्राप्त झाला होता. रोजगार हमी योजनेमध्ये लाभार्थी निहाय मंजूर झालेले शेततळ्यांची कामे जॉब कार्ड ची अट शिथिल झाल्यामुळे रोजगार हमी योजनेमधून ५०१ शेततळ्यांच्या कामाची रक्कम रु. ३७८.४३ लाख राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून अदा करण्यात आली. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे अध्यक्षतेखाली दि. ४ जानेवारी २०११ रोजी झालेल्या सभेत त्यास मान्यता घेण्यात आली. सदर रक्कम रोजगार हमी योजनेच्या निधीमधून खर्च करण्यात आली नाही.

रोजगार हमी योजनेमधून रु. ४३०.०० लाख निधी प्राप्त झाला. मार्च २०१२ अखेर ६१८ शेततळ्यांची कामे रक्कम रु. ४३०.०० लाख पूर्ण खर्च करून करण्यात आली. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून रु. ८९२.०० लाख निधी प्राप्त झाला. मार्च २०१२ अखेर १२११ शेततळ्यांची कामे रु. ८९२.०० लाख पूर्ण खर्च करून करण्यात आली.

शासन निर्णय क्र.राकृवि-२००९/प्र.क्र.१८/जल-१२, दिनांक १ जानेवारी २०१० मधील परिच्छेद ९ नुसार दोन्ही योजनांतर्गत अर्ज एकच असल्याने लाभार्थ्याची पात्रता निश्चित झाल्यावर त्याला लाभ कोणत्या योजनेतून द्यावयाचा याचा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा समितीस आहे. त्यानुसार संबंधित लाभार्थीना लाभ देण्यात आलेला आहे. सोबत जिल्हाधिकारी यांचे सभेचे इतिवृत्त व दोन्ही योजनेतंर्गत साध्याचा अहवाल जोडला आहे.

पाणलोट कामाकरिता दिलेला निधी, ग्राम पातळीवरील कामांच्या कार्यान्वयनाकरता पाणलोट समितीकडे दिला जातो. हा निधी पाणलोट समित्यांच्या बचत खात्यांमध्ये ठेवला जातो.

सदर बचत खात्यांमध्ये जमा होणाऱ्या अर्जित व्याजाच्या तसेच अखर्चित निधी वापराच्या पद्धतीबद्दल केंद्र शासनाकडून दि. १९ जानेवारी २०१२ चे पत्र प्राप्त झाले असून सदरपत्रामध्ये “As regard unspent balance and amount earned as interest, a decision has already been taken in this Department that these amounts would be adjusted against further releases against approved activities of any particular scheme/programme ”. असे नमूद केलेले आहे.

तरी मार्गदर्शक तत्वे उपलब्ध असून सदरचा परिच्छेद निकाली काढण्यात यावा ही. विनंती.

तालुका कृषि अधिकारी, संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांना नऊ पाणलोटांच्या बाबतीत पाणलोट विकास चमू सदस्यांच्या प्रशिक्षणाकरता जूलै, २००८ मध्ये रुपये ४.७६ लाख दिले होते. त्यापैकी तालुका कृषि अधिकारी, संगमनेर, या कार्यालयाने शेतकरी प्रशिक्षणांसाठी रुपये ५६.०० हजार वापरले. उर्वरित रक्कम रुपये ४,१०,००० (अक्षरी चार लाख, दहा हजार मात्र) तालुका कृषि अधिकारी, संगमनेर यांनी धनादेशाव्दारे

(धनादेश क्रंमाक ००५९२९ दिनांक १९ ऑक्टोबर २०१२) शेतकरी प्रशिक्षणांसाठी, कृषि विज्ञान केंद्र बाभळेश्वर(पायरेन्स) यांना अदा केले होते. सदर रकमेमधून पाणलोट विकास चमू सदस्यांना प्रशिक्षण दिल्याबाबत कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर तालुका राहता, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचे पत्र जा क्र/केव्हीके/(पायरेन्स) ५७६अे/दिनांक २६ डिसेंबर २०१२ अन्वये कळविले आहे (सोबत. पत्राची छायांकित प्रत सहपत्रीत केली आहे.)

कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर तालुका राहता येथे राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत खालीलप्रमाणे प्रशिक्षणे घेण्यांत आली आहेत.

(१) प्रशिक्षण कालावधी - दिनांक १८ डिसेंबर २०१२ ते १९ डिसेंबर २०१२
समाविष्ठ गावे - पानोडी व शिबलापूर.
एकूण पाणलोट संख्या - ५, एकूण शेतकरी संख्या - १२५

(२) प्रशिक्षण कालावधी - दिनांक २० डिसेंबर २०१२ ते २१ डिसेंबर २०१२
समाविष्ठ गावे - वरवंडी व मालुंजे.
एकूण पाणलोट संख्या – ४, एकूण शेतकरी संख्या - १००

लेखा परीक्षणा पूर्वी खर्च झालेले रुपये ५६,००० व कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर केंद्राकडे प्रशिक्षणाकरता उपलब्ध करून दिलेले रुपये ४,१०,००० तसेच प्रशिक्षण स्टेशनरी करिता रुपये १०,००० असे एकूण रुपये ४.७६ लाख निधी पाणलोट विकास चमू सदस्यांच्या प्रशिक्षणांकरिता खर्च करण्यांत आला आहे.

परीणामी मृद व जल संधारण योजनासंबंधी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्मीतीचा हेतू सफल झाला आहे, जो या योजनेच्या यशस्वी कार्यान्वयनासाठी महत्त्वाचा घटक होता.

**ताकृअ, अंजनगाव सुजी**

ताकृअ अंजनगांव सुर्जी व १२ पाणलोट समिती खात्यामधील शिल्लक रक्कम रु. १७.१५ लाख पैकी ५ पाणलोट समित्यांनी महाराष्ट्र स्टेट.को.ऑप. मार्केटींग फेडरेशन, अमरावती यांना नवीन दुर्बिण खरेदीची रक्कम रु. १४०६ प्रमाणे रु. ०.७० लाख अदा केलली आहे.तसेच कार्ड संस्था अंजनगाव सुर्जी यांना त्याच्या मागणीप्रमाणे शेतकरी अभ्यास दौरा कार्यक्रम राबविण्याकरिता रु. २.४७ लाख अदा करण्यात आलेले आहेत. अखर्चित रक्कम रु. १३.८० लाख जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अमरावती यांना ताकृअ, अंजनगांव सुर्जी कार्यालयाचें पत्र क्र.ताकृअ/सअ/विपामि/१०५, दि. १६ जानेवारी २०१२ अन्वये परत करण्यात आलेली आहे.

तसेच ताकृअ व पाणलोट समिती खात्यातील व्याजाची रक्कम रु. ५.३२ लाख ( ३.६५ + १.६७) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांना वर्ग करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे सद्यःस्थितीत विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत ताकृ अ, अंजनगाव सुर्जी यांच्या खात्यात रु. २४०२१ व्याज जमा असून सदर रक्कम जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,अमरावती यांना वर्ग करण्यात येणार आहे. या प्रमाणे खर्चाची माहिती सादर. सदरचे स्पष्टीकरण कृपया मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा.

**२.४.८/२.४.८.१**

**कार्यक्रमाचे कार्यान्वयन**

**राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रम (एन ए डी पी)**

- **शेततळ्यांचा साठवण तलाव असा मर्यादित वापर**

शेततळी ही, भूजल पातळी वाढविणे, पावसाच्या पाण्याचा साठा वाढविणे, विहीरीचे पुनर्भरण सुधारणे आणि संरक्षक सिंचनाची तरतूद करणे या हेतूंनी बांधली जातात. लाभार्थी त्यांच्या स्वतःच्या साधन संपत्तीने तळी बांधतात आणि प्राधिकाऱ्यांकडून योग्य निरीक्षणानंतर अर्थसहाय्य दिले जाते. २००७-११ या कालावधीत एन ए डी पी खाली ७९,००० शेततळी बांधण्याचे लक्ष्य असतांना भूजलची पातळी वाढविणे तसेच पिकांना वाचविणाऱ्या सिंचन देणे याकरता पावसाचे पाणी साठविण्यासाठी ६२,०१८ शेततळी बांधल्या गेली. असे आढळून आले की निवडलेल्या ३९ ताकृअ पैकी, चाचणी तपासणी केलेल्या दोन ताकृअ मध्ये (मिरज व संगमनेर), शेतकरी/लाभार्थी शेततळ्यांचा उपयोग साठवण तलाव म्हणून करतांना झरण रोखण्यासाठी तळ्याला प्लॅस्टिकचे अस्तर करत होते ज्यामुळे विहीरीचे पुर्नभरण करणे व भूजल पातळी वाढविणे हे उद्दिष्टे विफल झाली. ताकृअ, मिरज यांनी नमूद केले (जून २०११) की केलेल्या कामांची प्रदाने, कामाच्या जागांची योग्य पाहणी केल्या नंतर आणि तांत्रिक गरजा पूर्ण केल्यानंतर केल्या गेले व त्यानंतर शेतकऱ्यांनी प्लॅस्टिकच्या आवरणाचा वापर केला.हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण शेततळ्यांमधील प्लॅस्टिक आवरणाचा उपयोग ते निदर्शनास आल्याबरोबर थांबविला पाहिजे होता. ताकृअ,संगमनेर यांनी नमूद केले (जून २०११) की विभागाने प्लॅस्टिकच्या आवरणाचा उपयोग करण्यास परवानगी दिली होती (ऑगस्ट २०१०) आणि असेही नमूद केले की शेततळ्याला जरी प्लॅस्टिकचे आवरण केल्या गेले, तरी, त्यामुळे पावसाचे पाणी साठविणे आणि संरक्षक सिंचन करणे यांना बाधा होणार नाही. हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण शासनाच्या आदेशानुसार (ऑगस्ट २०१०) प्लॅस्टिक आवरणांच्या उपयोगास परवानगी नव्हती.

- **शेततळ्यांमध्ये प्रवेशमार्ग व निर्गममार्ग यांची तरतूद केली नाही**

एन ए डी पी च्या मार्गदर्शक तत्वांमध्ये दिलेल्या तांत्रिक विनिर्देशांप्रमाणे शेततळ्याला एक प्रवेशमार्ग व एक निर्गम मार्ग असावयास हवा आणि शेततळ्यांचा आतल्या भागात दगडाचे पिचिंग केले पाहिजे.शेततळ्यातील प्रवेशमार्गाची उंची,पाणलोट क्षेत्रातील भूपातळी पेक्षा जास्त नसली पाहिजे.लेखा परिक्षेतील अभिलेखांची छाननी आणि मुलाखती व लाभार्थी बरोबर परस्पर संवाद यावरुन असे उघडकीस आले की वरील विनिर्देशांविना,शेततळी बांधल्या गेली.निवडलेल्या ३९ ताकृअ पैकी,चाचणी तपासणी केलेल्या चार ताकृअ मध्ये एन ए डी पी ची मार्गदर्शक तत्वे पाळली गेली नाहीत. ही प्रकरणे परिशिष्ट २.४.७ मध्ये दिली आहेत.शिवाय,उविकृअ,मालेगांव(ताकृअ,नांदगांव) व ताकृअ देवळा यांनी जी कामे तांत्रिक विनिर्देशांनुसार कार्यान्वित केल्या गेली नव्हती,त्या कामाकरिता प्रत्येकी रु.८२,००० चे प्रदान केले,जे अनियमीत होते.

- **गाळ साचणे आणि जमिनीची धूप न थांबविणे**

एन ए डी पी च्या मार्गदर्शक तत्त्वांत प्रवेश व निर्गमद्वाराजवळ,जिथे पाण्याचा प्रवाह जास्त असतो तिथे काही शाकीय गवत लागवडीची तरतुद आहे.हे लाभार्थीना त्यांच्या स्वतःच्या पैशाने करणे अनिवार्य होते.तांत्रिक विनिर्देशांत सुद्धा जमिनीची धूप व गाळ जमा होणे टाळण्यासाठी पिचिंग करण्याची तरतूद होती.३७ ताकृअ पैकी,असे आढळून आले की लागवड किंवा पिचिंग यांची तरतूद ताकृअ,श्रीरामपूर मधील शेतकऱ्यांनी अशी लागवड केल्याचे दर्शविणारा कुठलाही अभिलेख ताकृअ धर्माबाद जवळ नव्हता.लेखा परीक्षेतील अभीक्षणे शासनाने मान्य केली (ऑक्टोबर २०११)

- **शेततळ्यांचा आकार ठरविण्यासाठी प्रमाणकांचा विचार न करणे**

मार्गदर्शक तत्वांप्रमाणे,लाभार्थी होण्याच्या पात्रतेकरता एका शेतकऱ्याची किमान भूधारणा ०.६० हेक्टर होती आणि त्यांच्या भूधारणे नुसार अर्थसहाय्य देण्याची कोणतीही तरतूद त्यात नव्हती. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या शेततळ्यांची तरतूद होती आणि अर्थसहाय्याचे प्रदान त्यांच्या आकारावर आधारित होते.याचा तपशील तक्ता १ मध्ये दिला आहे.

**तक्ता १ : शेततळ्यांचे आकारमान व अनुज्ञेय अर्थसहाय्य**

| अ.क्र. | शेततळ्यांचे आकारमान | अनुज्ञेय अर्थसहाय्य (रु) (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| १ | १५×१५×३ | १६,५१५ |
| २ | २०×१५×३ | २३,२६० |
| ३ | २०×२०×३ | ३२,८१० |
| ४ | २५×२०×३ | ४२,३६० |
| ५ | २५×२५×३ | ५४,७१५ |
| ६ | ३०×२५×३ | ६७,०७५ |
| ७ | ३०×३०×३ | ८२,२४० |

३९ ताकृअ च्या लेखा परिक्षणात असे दिसून आले की ३७ ताकृआ मध्ये एन ए डी पी कार्यान्वित झाला आहे.लेखा परिक्षण छाननीत असे उघडकीस आले की

- ताकृअ, जथ मध्ये लाभार्थीची पसंती अल्प भूधारणा असतांनाही बऱ्याच मोठया आकाराच्या शेततळ्यांना होती.लाभार्थीच्या सूची प्रमाणे,४२ शेतकरी ज्यांची भूधारणा ०.६० ते १.५ हेक्टर होती,त्यांनी मोठयात मोठया आकारमानाच्या शेततळ्यांची निवड केली होती ज्याकरिता प्रतिशेततळी अनुज्ञेय अर्थसहाय्य रु.८२,२४० होते.

- ताकृअ,धर्माबाद मध्ये १२१ प्रकरणांपैकी ९४ प्रकरणांमध्ये (७८ टक्के) ,लाभार्थीना निवडलेल्या शेततळ्यांचे आकारमान मोठयात मोठे होते आणि शासनाने शेततळ्यांच्या आकारमाना प्रमाणे १२१ शेततळ्यांसाठी रु.९८.११ लाख अर्थसहाय्य प्रदान केले.शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की विहीत सात आकारमानांच्या शेततळ्यांपैकी शेतकरी त्यांच्या पसंतीचे कुठल्याही आकाराचे शेततळे निवडू शकत होते. हे उत्तर स्वीकारण्यासारखे नाही कारण अल्प भूधारणा असणाऱ्या शेतकऱ्यांना मोठयात मोठया आकारमानाच्या शेततळे देण्यामुळे लागवडी खालील क्षेत्र कमी होईल, बऱ्याच मोठया संख्येचे शेतकरी लाभा पासून वंचित राहतील आणि परिणामी उत्तपन्न कमी होईल.

**घेतलेली व पूर्ण केलेली कामे यातील तूट**

एन ए डी पी अंतर्गत शेततळ्यांचा कार्यक्रम २००७-०८ पासून कार्यान्वित होत होता. २०० शेततळी प्रति तालुका हे भौतिक लक्ष्य २००७-०८ मध्ये ठरविले होते आणि त्यानंतर भारत सरकार कडून मिळालेल्या अनुदानाच्या आधारावर लक्ष्ये निश्चित केल्या गेली.

जिल्हाधिकारी प्रमुख असलेल्या एका समितिकडुन लार्भार्थीची निवड केल्या जाते आणि लार्भार्थीना कार्यादेश निर्गमित केल्या जातात. विनिर्देशांप्रमाणे शेततळी पूर्ण झाल्यानंतर लाभार्थीना प्रदान केले जाते. वर्षनिहाय माहिती तक्ता २ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता २: एन ए डी पी ची स्थिती**

| बाब | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कार्यक्रम कार्यान्वित करणाऱ्या जिल्ह्याची संख्या | १६ | २१ | २५ | | २५ |
| निवडलेले लाभार्थी | १७,५०० | ४७,०३७ | ४०,७०३ | | १,०५,२४० |
| शेततळ्यांचे भौतिक लक्ष्य (संख्या) | १७,५०० | २१,५०० | ४०,००० | | ७९,००० |
| साध्य(संख्या) | १७,५०० | २१,६२० | २२,८९८ | | ६२,०१८ |
| तूट (संख्या) | ० | + १२० | -१७,१०२ | | -१६,९८२ |
| अर्थसंकल्पिय तरतूद (रु.कोटी मध्ये) | ८०.०० | १३६.५२ | २२४.०० | | ४४०.५२ |
| ३१ मार्च २०११ पर्यंत खर्च (रु.कोटी मध्ये) | ८०.०० | १३६.४८ | २०२.०७ | | ४१८.५५ |
| विनावापर निधी (रु.कोटी मध्ये) | ० | ००.०४ | २१.९३ | | २१.९७ |

या प्रकारे, पुरेसा निधी (रु. २१.९७ कोटी) उपलब्ध असतानांही १६,९८२ शेततळ्यांची तुट होती. शासनाने नमुद केले (ऑक्टोबर २०११) की भारत सरकार कडून निधी उशीरा आल्याने कामे वेळेत पूर्ण होऊ शकली नाहीत.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण, शेततळी पूर्ण करण्यासाठी शासनाने निधीच्या वेळेवर उपलब्धतेची निश्चिती करावयास हवी होती.

**ज्ञापन :—**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**तालुका कृषि अधिकारी, संगमनेर/मिरज**

संगमनेर/मिरज तालुक्यातील लाभार्थीना काही शेततळ्यांचा उपयोग स्वखर्चाने प्लॅस्टिक आच्छादन टाकून पाणी साठवणुकीसाठी केलेला आहे.शासन निर्णय क्र.जलसंधारण-२००९/प्र.क्र.१३०/जल-७, दि.७ ऑगस्ट २०१० अन्वये शेततळ्यांची कामे इनलेट व आऊटलेट विरहीत मशिनद्वारे करण्यासाठी मापदंड निश्चित करण्यात आलेले आहे.त्यामुळे काही शेतकऱ्यांनी पाणी जिरविणे या उद्देशासाठी न करता पाणी साठविण्यासाठी शेततळ्यांचा वापर केलेला आहे व ते करत असताना पावसाळ्यात जादाचे पाणी साठवून ठेवून जानेवारीनंतर पाणी टंचाईच्या काळात पिकांना संरक्षित पाणी देण्यासाठी म्हणून सदर साठवलेल्या पाण्याचा वापर केलेला आहे.सोबत शासन निर्णय जोडला आहे.स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती.

**तालुका कृषि अधिकारी,मिरज**

१. सन २००९-१० व २०१०-११ अखेर ३५६ इतके राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेततळे करून घेणेसाठी एकूण ३५६ इतके अर्ज प्राप्त झालेले होते.त्यापैकी २७१ लाभार्थ्याना मंजुरी देण्यात आलेली होती.त्यापैकी ५३ लाभार्थ्याना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आलेले होते.पैकी ३२ लाभार्थ्याचे अर्ज तांत्रिक दृष्ट्या अपूर्ण होते त्यामुळे रद्द करण्यात आलेले होते.अनुसूचित जाती व दारिद्रय रेषेखालील २ लाभार्थ्यानी कामे पूर्ण केलेली आहे.

२. पात्र लाभार्थ्यापैकी काही लाभार्थ्यानी अनुदान पूर्ण घेतले नंतर शेततळ्यातील पाणी झिरपून बागायत क्षेत्रात वाढ करण्याऐवजी पाणी साठवून त्याचे स्वतः बागेमधील लागवडी क्षेत्रात वाढ केलेली आहे.

३. लाभार्थ्यानी कामे पूर्ण मापदंडानुसार केलेनंतरच आवश्यक त्या तपासण्या करून मगच अनुदान वाटप केलेले आहे.त्यानंतर सदर कामाचे हस्तांतरण संबंधित लाभार्थ्याना देऊन पुढील जाबाबदारी संबंधित लाभार्थ्यांवर सोपविण्यात आलेली होती.त्यानंतर संबंधित लाभार्थ्यानी परस्पर प्लॅस्टीकच्या कागदाचा वापर करून पाणी साठविले आहे.कारण या क्षेत्रामध्ये कमी पावसाचे क्षेत्रफळामूळे पावसाचे पाणी साठवून ठेवून

बागायत क्षेत्रामध्ये वाढ होण्यासाठी करण्यात आलेला आहे. ज्यावेळी पाऊस होऊन जातो त्यावेळी वाहून जाणारे पाणी साठवून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यासाठी उपयोग केला जातो.जागेची निवड करण्यासाठी केवळ पाणलोट क्षेत्राचा फक्त विचार केला जातो.त्यामुळे शेततळ्याची जागा योग्य आहे.

४. ज्यावेळी शेततळे बांधण्यात आले त्यावेळी संबंधित लाभार्थ्यांना नोटीसा देऊन शेजारी असणाऱ्या विहीरी, बोअर नदीच्या पाण्याचा वापर साठविणेसाठी करणेबाबत सुचित केलेले होते. तसेच शेततळ्यातील पाणी साठवून पाणलोट क्षेत्रातील भूगर्भात वाढ होणेसाठी वापर करण्यात येत आहे. त्याप्रमाणे आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. कृपया स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**ताकृअ श्रीरामपूर-**

श्रीरामपुर तालुक्यात लाभार्थ्यांनी डिपीडिसी योजनेतंर्गत मार्गदर्शक सुचनाप्रमाणे शेततळ्याचे काम सन २००९-१० या वर्षात पूर्ण केले आहे. शेततळ्याचे इनलेट व आऊटलेट सह काम पूर्ण करून त्याची नोंद मापन पुस्तकेत घेण्यात आली आहे. व त्या प्रमाणे पेमेंट अदा करण्यात आले आहे. सदरील शेततळे पूर्ण झाल्यावर शेतकऱ्यास हस्तांतरीत केल्यानंतर शेतकऱ्याने स्वजबाबदारीवर शेततळ्याची पाणीसाठा क्षमता वाढण्यासाठी इनलेट व आऊटलेट बंद केलेले आहेत.सोबत मापन पुस्तकेतील नोंदीची छायांकीत प्रत,शेतकऱ्याचा जबाब सहपत्रित केलेला आहे.

स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती.

**उविकृअ, मालेगाव व ताकृअ, नांदगाव**

तालुका कृषि अधिकारी,नांदगाव यांचे कार्यक्षेत्रात सन २००८-२००९ व २००९-१० मध्ये बांधलेल्या शेततळ्यांना प्रवेशद्वार निर्गम मार्ग होते. त्यानुसारच संबंधित लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यात आलेले होते.प्रवेश मार्गास व निर्गम मार्गास दगडी पिचिंग केलेले होते व त्याची तालुकास्तरीय समितीने पडताळणी केल्यानंतरच अनुदान अदायगीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.तथापी, अनुदान अदायगी झाल्यानंतर एक वर्षानंतर संबंधित लाभार्थीनी स्वतःच प्रवेशद्वार व निर्गम मार्ग बंद केले.त्याबाबत दोन्ही लाभार्थीचे फोटोग्राफ्स सोबत जोडले आहे.स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा.

**ताकृअ, देवळा-**

ताकृअ, देवळा यांचे कार्यक्षेत्रांतर्गत शेततळे तपासणी केलेल्या श्री. लाला महिपत पगार रा., खडकतळे या शेतकऱ्यांची तपासणी करताना लेखा परिक्षक यांना प्रवेश मार्गाची लांबी, रुंदी व खोली मार्गदर्शक सूचनेप्रमाणे नसल्याचे तसेच गाळ साचणे टाळण्यासाठी आवश्यक पिचिंग केलेले नसल्याचे दिसून आल्याचे परिशिष्ट २.४.७ नमूद केलेले आहे. याबाबत खुलासा करण्यात येतो की, संबंधित लाभार्थ्याने प्रवेश मार्ग खात्याच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व तांत्रिक निकषानुसारच बांधले होते व त्यास दगडी पिचिंगसुद्धा करण्यात आले होते, याची पडताळणी तालुका स्तरीय समितीने केलेली होती. तथापी, शेततळे पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यास फळझाडे (डाळींब) लावावयाची होती. त्यामुळे प्रथम फळझाडे लावण्यापूर्वी शेतीची लेव्हलिंग करून घेतली. त्यामुळे शेततळ्यामध्ये पाणी घेण्याच्या मार्गापेक्षा जमिनीची पातळी खाली गेली व या शेततळ्यावर प्लास्टिक कागद आच्छादन करावयाचा असल्याने केलेल्या पिचिंगचे कामाचे दगड शेततळ्यात पडले त्यामुळे पिचिंग कमी प्रमाणात केल्याचे दिसून आले.सध्या शेततळ्याचा उपयोग शेतकरी डाळींब पिकासाठी संरक्षित पाणी देण्यासाठी करणार असल्याचे त्याने जबाबात नमूद केले आहे.याबाबतचे फोटोग्राफस सोबत जोडले आहेत. स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**तालुका कृषि अधिकारी, मिरज**

या गावामध्ये म्हैसाळ योजनेअंतर्गत सदर योजनेमध्ये मुख्य कालव्याला पोट कालवे नसल्यामुळे व ज्या भागात कामे घेतलेली आहेत. त्या भागात म्हैसाळ योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नाही.सरासरी गेली दहा वर्षाचे पर्जन्यमान पाहून प्राप्त गावांमधील लोकप्रतिनिधी स्थानिक पदाधिकारी यांचेकडून गावातील विकास कामासाठी मागणी या सर्व बाबींचा विचार करून सदरची कामे घेतलेली आहेत.

शेततळ्यांना प्रवेशमार्ग व निगममार्ग न ठेवता इतर ठिकाणाहून पाईपलाईनने शेततळ्यात पाणी साठवून भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण केलेले आहे.त्याचप्रमाणे त्या पाण्याचा संरक्षित सिंचनासाठी उपयोग केला आहे.प्रवेशमार्ग व निर्गममागासाठी ची देय रक्कम शेतकऱ्यांना अदा केलेली नाही.सबब स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती.

**तालुका कृषी अधिकारी,श्रीरामपूर**

शासन निर्गमित मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शेततळ्याचे काम ईनलेट व आऊटलेट दगडी पिचिंगसह पूर्ण झाल्यावर शाकीय गवत लावण्यात आले होते. परंतु शेततळे शेतकऱ्यास हस्तांतरीत केल्यानंतर शेतकऱ्यांने स्वजबाबदरीवर इनलेट व आऊटलेट बंद केल्याने दगड पिचिंगची कामे बुजविली असून पावसाळ्यात जादाचे पाणी साठवून ठेऊन जानेवारी नंतर पाणी टंचाईच्या काळात पिकांना संरक्षित पाणी देण्यासाठी सदर साठवलेल्या पाण्याचा वापर केलेला आहे.

सोबत मापनपुस्तकातील नोंदीची छायांकीत प्रत,पूर्णत्वाचा अहवाल, शेतकऱ्याचा जबाब व शेततळ्याचा फोटो सहपत्रित केलेली आहे.

**तालुका कृषी अधिकारी, धर्माबाद**

राष्ट्रीय कृषि विकास योजनातंर्गत सन २००७-०८ ते २००९-१० मध्ये एकूण ३८९ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून या सर्व शेतकऱ्यानी /लाभार्थ्यांनी दगडी पिचिंग स्वखर्चाने केली आहे.

मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रवेश व निर्गम दाराजवळ जिथे पाण्याचा प्रवाह जास्त असतो तिथे शाकीय गवत लागवडीची तरतूद लाभार्थीनी स्वखर्चाने केली आहे. ही बाब अंदाजपत्रकात नसल्यामुळे मापन पुस्तिकेत नोंदी दर्शविण्यात आलेल्या नाहीत व शाकीय गवत लागवड ही बाब दिर्घ काळ टिकणारी नसल्यामुळे गवत वाळल्यानंतर त्याची लागवड पुन्हा पावसाळी हंगामात लाभार्थी करून घेतात. त्यामुळे त्यांचे अभिलेख ठेवण्यात आलेले नाहीत. जमिनीची धूप व गाळ जमा होणे टाळण्यासाठी शेततळ्यास दगडी पिचिंग शेतकऱ्यांनी स्वखर्चाने केलेली असून पिचिंग काही शेततळ्यांचे फोटो सादर करण्यात येत आहेत. कृपया स्पष्टीकरण मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**तालुका कृषि अधिकारी धर्माबाद**

शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांनुसार लाभार्थीना मागणी केल्यानुसार त्यांच्या अर्जाची छाननी करून शेततळ्यांस मान्यता देण्यात आली . त्याप्रमाणे काम करण्यात आली.

लाभार्थी अल्पभूधारक असला तरी मोठया आकाराचे शेततळे असले तरी त्या शेततळ्यातील पाण्याचा वापर त्याच्या उर्वरित क्षेत्रावर पिकास खरीप व रब्बी हंगामात संरक्षित पाणी म्हणून वापर करतो.त्यामुळे त्याच्या उत्पन्नात भर पडते.

याच बरोबर राज्याचा पर्जन्यमानाचा विचार केला तर पावसाचे दिवस कमी झाले असून कमी दिवसात जास्त तीव्रतेचा पाऊस पडतो. पर्यायाने कमी दिवसात पडलेल्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी साठविणेसाठी क्षेत्रीय स्तरावर शेतकऱ्याकडून मोठया आकाराच्या शेततळ्यांची मागणीत वाढ होत आहे. सदरचे साठविलेले पाणी पिकास पावसाच्या उघडीच्या कालावधीमध्ये संरक्षित पाणी म्हणून वापर केल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढीस मदत होत आहे.

**तालुका कृषी अधिकारी जत**

शासन निर्णय क्र.शेतत-२००९/प्र.क्र.२७१/रोहयो-५,दि.०१.०१.२०१० अन्वये शेततळ्यांसाठी लाभार्थीची निवड करणेसाठी त्याच्या नावावर कमीत कमी ०.६० हे. जमीन उपलब्ध असावी,अशा लाभार्थीना शेततळे मंजूर करण्यात यावे असे आदेशित केले आहे.तथापि शेततळे कोणत्या आकारमानाचे दयावे.तसे आकारमान ठरवून देणेत आलेले नाही.त्यामुळे ०.६० हे. लाभार्थीच्या मागणीनुसार मोठया आकारमानाचे शेततळ्याचा लाभ देण्यात आलेला आहे.

लाभार्थी अल्पभूधारक असला तरी मोठया आकाराचे शेततळे घेतल्याने त्या शेततळ्यातील असले तरी त्या शेततळ्यातील पाण्याचा वापर त्यांच्या कूटुंबातील सदस्याच्या उर्वरित क्षेत्रावर पिकास खरीप व रब्बी हंगामात संरक्षित पाणी म्हणून वापर करतो . त्यामुळे त्याच्या उत्पन्नात भर पडते.

याचबरोबर राज्याचा पर्जन्यमानाचा विचार केला तर पावसाचे दिवस कमी झाले असून कमी दिवसात जास्त तीव्रतेचा पाऊस पडतो.पर्यायाने कमी दिवसात पडलेला पावसाचे जास्तीत जास्त पाणी साठविणेसाठी क्षेत्रीय स्तरावरुन शेतकऱ्यांकडून मोठया आकाराच्या शेततळ्यांची मागणीत वाढ होत आहे.सदरचे साठविलेले पाणी पिकास पावसाच्या उघडीच्या कालावधीमध्ये संरक्षित पाणी म्हणून वापर केल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढीस मदत होत आहे.

कृपया स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गंत प्रती तालुका २०० शेततळी लक्षांक देण्यात आलेला नाही.महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत निधीतून प्रती तालुका २०० शेततळ्याचे लक्षांक देण्यात आले होते.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शेततळे कार्यक्रम हा हमखास पावसाच्या क्षेत्रात व अवर्षण प्रवण क्षेत्रात प्रामुख्याने राबविला गेला आहे.जागतिक तापमान वाढीमुळे पावसाळी हंगामात पाऊस जिल्हानिहाय सरासरी इतका होत असला तरी पावसाचे दिवस कमी झाले आहेत.कमी कालावधीत जास्त तीव्रतेचा पाऊस पडत असल्याने मोठया आकारमानाचे शेततळे खोदून जास्तीत जास्त पाणी साठविण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे.यामुळे पीक वाढीच्या कालावधीमध्ये पावसाने ओढ दिल्यास शेततळ्यामध्ये साठविलेले पाणी जास्तीत जास्त क्षेत्रावर देता येणे शक्य होत आहे.राकृवियो अंतर्गत सन २००७-०८ते २०११-१२ या कालावधीतील अनुदान खर्च व प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या शेततळ्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

**तक्ता २. सुधारित स्थिती**

| बाब | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० ते २०१०-११ | एकूण |
|---|---|---|---|---|
| कार्यक्रम कार्यान्वित करणाऱ्या जिल्ह्यांची संख्या | १६ | २१ | २५ | २५ |
| निवडलेले लाभार्थी | १७,५०० | ४७,०३७ | ४०,७०३ | १,०५,२४० |
| शेततळ्यांचे भौतिक लक्ष्य (संख्या) | १७,५०० | २१,५०० | ३४,५०० | ७३,५०० |
| साध्य(संख्या) | १७,५०० | २१,८७६ | ३३,९४९ | ७३,३२५ |
| तूट(संख्या) | ० | + ३७६ | –५५१ | –१७५ |
| अर्थसंकल्पिय तरतूद (रु. कोटीमध्ये) | ८०.०० | १३६.५२ | २२४.०० | ४४०.५२ |
| ३१ मार्च २०११ | ८०.०० | १३६.५२ | २२४.०० | ४४०.५२ |
| साध्य(संख्या) | १७,५०० | २१,८७६ | ३३,९४९ | ७३,३२५ |
| तूट संख्या | ० | +३७६ | –५५१ | –१७५ |
| अर्थसंकल्पीय तरतूद (रु.कोटीमध्ये) | ८०.०० | १३६.५२ | २२४.०० | ४४०.५२ |
| ३१ मार्च २०११ पर्यंत खर्च (रु.कोटीमध्ये) | ८०.०० | १३६.५२ | २२४.०० | ४४०.५२ |
| विनावापर निधी (रु.कोटीमध्ये) | ० | ० | ० | ० |

सदर कार्यक्रमासाठी सन २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीत एकूण रु.४४०.५२ कोटी निधी प्राप्त झाला होता.संपूर्ण निधी खर्च होऊन यामधून ७३,३२५ शेततळी पूर्ण झालेली आहेत.सदरचा कार्यक्रम माहे मे २०१२ पूर्ण झालेला आहे.

**२.४.८.२**

**नदी खोरे प्रकल्प (आरव्हीपी)**

- **प्रकल्प अहवाल तयार करण्यातील उणीवा**

शेगांव व बनाली गांवाकरिता रू २.२८ कोटीचा एक प्रकल्प, तालूका कृषी अधिकारी, जथ यांनी २००३-०४ ते२०१०-११ या आठ वर्षासाठी नदी खोरे प्रकल्प अंर्तगत हाती घेतला होता. कृषी-वनशास्त्र, फलोद्याने विकास, गायरान विकास आणि वरच्या, मधल्या व खालच्या भागांत जल नि:सारण उपचार हे होते. या प्रकल्पावर मार्च, २०११ पर्यत झालेला एकूण खर्च रू ३.९७ कोटी होता. तथापि, तक्ता ३ मधील तपशीलाप्रमाणे प्रकल्प कामांच्या काही घटकाच्या मंद प्रगतीमुळे, तो पूर्ण झाला नाही.

**तक्ता ३: योग्य नियोजना विना कामाचे कार्यान्वयन (मार्च, २०११)**

| घटक | लक्ष्य | | साध्य | | तुटीची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भौतिक (सख्या) | आर्थिक (रु.लाखमध्ये) | भौतिक (सख्या) | आर्थिक (रु.लाख मध्ये) | भौतिक | आर्थिक |
| मातीचे LBS | १,३८२ | ५५.९४ | ८५ | २.४१ | ९४ | ९६ |
| कृषि-वनशास्त्र | ८३१ | ८.३१ | ४१६ | ४.१६ | ५० | ५० |
| Contour trench | ९३५ | १२.९० | १२५ | १.४७ | ८७ | ८९ |
| पेरणी व लावणी | ६२५ | १५.४३ | ० | ० | १०० | १०० |
| Drainage line treatment, upper reaches | ३३१ | ५.९६ | १५ | ०.२४ | ९५ | ९५ |
| Check bunds | ७७ | ६.७५ | ६ | ०.७९ | ७१ | ८८ |
| एकूण | ४,१८१ | १०५.२९ | ६४७ | ९.०७ | ८५ | ९१ |

तालुका कृषी अधिकारी, जथ यांनी नमूद केले (जून२०११) की २००२-०३ या वर्षात जेव्हा प्रकल्प मंजूर झाला, तेव्हा, Loose Boulder बांधकामासाठी जवळ पासच्या क्षेत्रात आवश्यक बोल्डर्सच्या अनुपलब्धतेमुळे वरच्या व मधल्या भागांतील कार्यक्रम रद्द केले. अनिश्चित व लहरी पर्जन्यमानामुळे कृषी-वनशास्त्र, पेरणी व लावणी, गायरान विकास आणि शाकीय कुंपणाची कामे रद्द केल्या गेली.

तालुका कृषी आधिकाऱ्यांचे उत्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याआधी पुरेशा सर्वेक्षणचा व अन्वेषणचा अभाव दर्शविते. कामे हाती घेण्याआधी बोल्डर्सच्या उपलब्धतेची निश्चिती करून घेतल्या गेली नाही.

- **गाळ संनियंत्रण स्थानके न उभारणे**

नदी खोरे प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे, सात वर्षासाठी पाणलोटाचा जलविद्या व गाळ यांचेबद्दलचा प्रतिसाद मोजण्यासाठी, पाच पाणलोटांपैकी कमित कमी एका पाणलोटाची गाळ संनियत्रण केंद्र (गासंकें) स्थापन करण्यासाठी निवड करणे अनिवार्य होते.

चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी पाच मध्ये आरव्हीपी कार्यान्वित होत होता. चार ताकृअ मध्ये तक्ता ४ मधील तपशीलाप्रमाणे असे दिसून आले की गाळ संनियंत्रयण केंद्रे स्थापन केली नव्हती/ काम करत नव्हती.

**तक्ता ४: गासंके ची स्थापना**

| जिल्हा/तालुक्याचे नाव | सुरवात झाल्याचे वर्ष | प्रकल्पातील गासंकेची किंमत | सध्याची स्थिती |
|---|---|---|---|
| अहमदनगर | २००२-०३२००९-१० | ०.१६०.४० | स्थापन केलेले नाही |
| नांदेड/नायगांव | २०००-०१ | ०.०३ | स्थापन केले पण वाहून गेले. |
| सांगली/कडेगांव | २००२-०३ | ०.०५ | स्थापन केले नाही |
| सांगली/जथ | २०१०-११ | ०.५३ | स्थापन केले नाही |
| एकूण | | १.१७ | |

या प्रकारे, गासंके स्थापन न केल्यामुळे पाणलोटांचा जलविद्या व गाळ यांचेबद्दलचा प्रतिसाद मोजता आला नाही. हा मुद्दा मान्य करताना शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की गासंकें प्रमाणकां प्रमाणे स्थापन केल्या जातील.

**कंत्राटदारांना व खंड कामकऱ्यांना रोख प्रदान**

महाराष्ट्र कोषागार नियमांच्या (मकोनि) नियम ३५५ (२) अनुसार, कंत्राटदारांना/पुरवठादारांना धनादेशाद्वारे प्रदान केले पाहिजे. चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी, ताकृअ, कडेगांव यांचेकडे असे दिसून आले की,२००६-०८ या कालावधीत,विविध मंडळ कृषी अधिकाऱ्यांना (मंकृअ) रु.५५.८२ लाखची एकूण रक्कम शासकीय नियमांचे उल्लंघन करून रोखीने प्रदान करण्यात आली.त्यानंतर मंकृअ नी सुद्धा कंत्राटदारांना/ खंड कामकऱ्यांना रोख प्रदान केले जे अनियमीत होते व ज्यामध्ये कपटपूर्ण प्रदानांचा धोका होता.

शासनाने नमूद केलेले (ऑक्टोबर २०११) की रोख प्रदान केल्या गेले कारण त्या भागात बँकाचे जाळे फार विखुरलेले होते.हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण ताकृअ व मंकृअ ना बँकाच्या सर्वात जवळच्या शाखांमध्ये खाते उघडावयास सांगितले पाहिजे होते.

- **घेतलेल्या व पूर्ण केलेल्या पाणलोट कामांमध्ये तूट**

१,२३५ अग्रक्रमाच्या पाणलोटांपैकी २७१ पाणलोट कामे मंजूर करण्यात आली (१९९३-२०११) व पाच जलग्रहण क्षेत्रात फक्त १७३ कामे पूर्ण करण्यात आली व ९८ कामे तक्ता ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अपूर्ण व चालू स्वरुपात राहिली.

**तक्ता ५ : नदी खोरे प्रकल्पांची स्थिती**

| जलग्रहण क्षेत्राचे नांव | प्रकल्प कार्यान्वित करणाऱ्या जिल्ह्यांची नांवे | अग्रक्रमाच्या पाणलोटांची एकूण संख्या | मंजूर पाणलोट | पूर्ण झालेले पाणलोट | अपूर्ण पाणलोट |
|---|---|---|---|---|---|
| दमणगंगा | ठाणे, नाशिक | ११० | ४७ | २१ | २६ |
| उकई | धुळे, जळगांव, नंदुरबार | १७४ | २७ | २७ | ० |
| सरदार सरोवर | नंदुरबार | ५४ | २६ | २६ | ० |
| नागार्जुन सागर | पुणे, सोलापूर, उस्मानाबाद, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर | ४३४ | ८८ | ४९ | ३९ |
| पोचमपाड | नांदेड, औरंगाबाद, नाशिक, जालना, बीड | ४६३ | ८३ | ५० | ३३ |
| एकूण | | १,२३५ | २७१ | १७३ | ९८ |

९८ अपुर्ण पाणलोटांपैकी ५८ मध्ये, पाच वर्षाचा कराररनिविष्ट कालावधी संपल्यानंतरही कामे सुरू होती.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की भारत सरकार कडून निधी मिळण्यास विलंब झाल्याने कामे वेळेवर पूर्ण होऊ शकली नाहीत

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

तालुका कृषि अधिकारी, जत कार्यालयांअंतर्गत नदी खोरे प्रकल्प योजनेतून Am - ५h या पाणलोटाचा प्रकल्प अहवाल हा खात्याच्या मार्गदर्शन सुचनेनुसारच तयार करण्यात आला आहे. तसेच, पाणलोटाचा व भौगोलिक क्षेत्राचा विचार करून प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. पाणलोटातील वरच्या भागामध्ये (Upper reaches) खालीलप्रमाणे कामाच्या बाबी भौगोलिक परिस्थितीनुसार प्रस्तावित करण्यात आल्या होत्या.

| बाब | मूळ प्रकल्प अहवाला नूसार | | सुधारित आराखडयानुसार | | झालेली कामे | | तुटीची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भौतिक (संख्या) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (संख्या) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (संख्या) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक | आर्थिक |
| मातीचे अनघड दगडी बांध | १३८२ | ५५.९४ | १६० | ४.६८ | १६० | ४.६८ | ०.०० | ०.०० |
| कृषि वनशास्त्र | ८३१ | ८.३१ | ४१६ | ४.१६ | ४१६ | ४.१६ | ०.०० | ०.०० |
| Contour trench | ९३५ | १२.९० | १२५ | १.४७ | १२५ | १.४७ | ०.०० | ०.०० |
| पेरणी व लावणी | ६२५ | १५.४३ | ० | ०.०० | ० | ० | - - | - - |
| Drainage Line treatment upper reaches | ३३१ | ५.९६ | १५ | ०.२४ | १५ | ०.२४ | ०.०० | ०.०० |
| Check Binds | ७७ | ६.७५ | ६ | ०.७९ | ६ | ०.७९ | ०.०० | ०.०० |
| एकूण | ४१८१ | १०५.२९ | ७२२ | ११.३४ | ७२२ | ११.३४ | | |

प्रत्यक्ष काम करतेवेळी काही शेतकऱ्यांनी वृक्ष लागवड, सी.सी.टी., चेक बंड, लूज बोल्डर या कामांना संमती दिल्याने त्याच्या शेतात काम केले आहे. परंतु बऱ्याच शेतकऱ्यांनी सी.सी.टी., चेक बंड, लूज बोल्डर स्ट्रक्चरचे काम करण्यास परवानगी दिली नाही.काही शेतकऱ्यांनी नवीन बोअरवेल व विहीरी झाल्यामुळे फळबाग लागवड केली. त्यामुळे त्यांच्या शेतात काम करणेस परवानगी नाकारली.

बरेच शेतकरी पाणी साठणाऱ्या नाला बांधाचे व कंपार्टमेंट बंडीगचे कामाचे मोठया प्रमाणात मागणी करत होते.त्याप्रमाणे तेथे नाला बांधाचे व कंपार्टमेंट बंडीगचे काम केले आहे. लूज बोल्डरचे काम ओघळीच्या परिसरात उपलब्ध असलेल्या अनघड दगडापासून काम करावयाचे असते,परंतु काही शेतकऱ्यांकडून फळबागेचे कंपाऊंड करणे, कच्चे घरे व जनावरांचे गोठे यासाठी दगडाचा वापर करण्यात आला, म्हणून लूज बोल्डरचे काम कार्यक्रमाप्रमाणे होऊ शकले नाही.

त्यामुळे मूळ मंजूर प्रकल्प अहवाल सुधारित करण्यात आला व या सुधारीत अहवालास केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ क्र.४-१९/२००७-एनआरएम-१, दि. १५ मार्च २०१० अन्वये मान्यता प्राप्त करून घेण्यात आली. सदर पत्राची प्रत परिशिष्ट सोबत जोडली आहे. सुधारित अहवालानूसार व शेतकऱ्यांचे संमंतीप्रमाणे माथा व मध्यभागातील बाबनिहाय कामे १०० टक्के पूर्ण करण्यात आलेली आहेत.

मृद् संधारण कामाचा उद्देश पाणी साठविणे व मातीची धूप थांबविणे हा आहे वरील केलेल्या उपचारामुळे मृद् संधारण कामाचा उद्देश साध्य झालेला आहे.

१. अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालूक्यामध्ये सन २००२-०३ या वर्षामध्ये केवळ An-९y, An -९w व An - ९v या तीनच पाणलोट प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झाली. योजनेच्या कार्यान्वयन मार्गदर्शक सुचनेनूसार ५ पाणलोट प्रकल्पातील शेवटच्या पाणलोट प्रकल्पांमध्ये निर्गमन बिंदूला गाळ निरीक्षण केंद्र उभारणे अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे केवळ ३ प्रकल्प कार्यान्वित झाले असून गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करण्यासाठी पाणलोटातील संबंधित ग्रामपंचायत तसेच शेतकरी यांनी जमीन उपलब्ध करून न दिल्याने गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करणे शक्य झाले नाही. सद्यःस्थितीत सन २००९-१० मध्ये याच तालुक्यात नवीन An-९m व An-११ a हे दोन पाणलोट प्रकल्प मंजूर होऊन कार्यान्वित

करण्यात आलेले आहेत. हे प्रकल्प जून्या पाणलोटांजवळ आहेत. यापैकी An-९m या पाणलोट प्रकल्पामध्ये गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करण्यात येईल. या पाणलोटातील शेतकरी श्री. विलास बाबासाहेब वारस्कर रा. वाघा, ता. जामखेड, यांनी गाळ निरीक्षण केंद्रासाठी जागा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यानुसार गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करण्यात येईल.

२. सांगली जिल्ह्यातील कडेगांव तालुक्यातील Ap-३x हा केवळ एकच पाणलोट प्रकल्प सन २००२-०३ या वर्षामध्ये मंजूर होऊन कार्यान्वीत करण्यात आला. योजनेच्या कार्यान्वयन मार्गदर्शक सूचनेनुसार लगतच्या ५ पाणलोट प्रकल्पांपैकी निर्गमन बिंदूला एक गाळ निरीक्षण केंद्र स्थापन करावयाचे आहे.सद्यःस्थितीत या तालूक्यातील अन्य कोणतेही पाणलोट प्रकल्प मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आलेले नाहीत. Ap - ३x या प्रकल्पालगतचे अन्य पाणलोट प्रकल्प मंजूर व कार्यान्वीत झाल्यानंतर त्या प्रकल्पांमध्ये गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याकडे सन २०१०-११ या वर्षात Am-१h, Am-२g, Am-५n, Am - १f या सलग्न पाणलोट क्षेत्रातील प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजूरी प्राप्त झाली असून प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत.या पैकी Am - ५n. या प्रकल्पामध्ये गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करण्यात येईल.

योजनेअंतर्गत सन २०११-१२ अखेर कार्यान्वीत पाणलोटांचा एकूण शिल्लक कार्यक्रम ६,६३७.०२ लाख रकमेचा असून त्या तुलनेत सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये रु. ५८८.५८ लाख व २०१३ -१४ या वित्तीय वर्षामध्ये रु.५००.०० लाख इतका अत्यल्प निधी प्राप्त झालेला आहे. केंद्र शासनाकडील पत्र क्र. F. No.४-१/२०१२-NRM-१, dated-१० July २०१२ अन्वये सद्यःस्थितीत कार्यान्वीत असलेल्या पाणलोटांचा शिल्लक कार्यक्रम पूर्ण होणेकामी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन या बाबीव्यतिरिक्त अन्य बाबींवरील खर्च कमीत कमी करण्यात यावा असे सुचित केले आहे. त्यानुसार राज्य शासनाकडून या योजनेकरिता सन २०१२-१३ व २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मंजूर अल्प निधी नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन या बाबींवर खर्च करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे गाळ निरीक्षण केंद्र स्थापित करण्यात आलेले नाहीत.तरी कृपया सदरी परिच्छेद वगळण्यात यावा.

तालूका कृषि अधिकारी, कडेगांव हे कार्यालय दि. ५ ऑगस्ट २००४ रोजी नवनिर्मित झालेले आहे. सदर नवनिर्मित तालुक्यामध्ये उपकोषागार अधिकारी, कडेगांव यांचेकडून या कार्यातील सर्व देयके ऑगस्ट २००४ ते सप्टेंबर २००६ अखेर पारीत करून उपकोषागारातून रोखीने रक्कम अदा केली जात होती. सदर रोखीने उपकोषागार अधिकारी, कडेगांव यांचेकडून प्राप्त झालेली रक्कम जतन करणेकरिता या कार्यालयाच्या शासकीय तिजोरीचा वापर करणेत येत होता.

तालुका कृषि अधिकारी, कडेगांव कार्यालयाकडून शासन निर्णय क्र. वेतन/१००२/प्र.क्र.११८/०४/कोषा.-प्र.-५, मुंबई दि. २४ सप्टेंबर २००४ अन्वये फक्त मासिक वेतन व भत्ते बँकेमार्फत प्रदान करणेची कार्यपद्धत सुरू करणेत आली. त्यामुळे ऑक्टोबर - २००६ ते मार्च - २००८ अखेर उपकोषागार अधिकारी, कडेगांव मधून फक्त वेतन व भत्ते देयकेच बँकमार्फत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा खातेवर जमा केली जात होती. कडेगांव येथील उपकोषागार कार्यालय हे नॉन बँकींग कोषागार असल्याने देयकाची अदायगी रोखीने होत असलेने मुकादमांना/मजूरांना त्यांची मजूरी रोखीने/चेकने उपकोषागार अधिकारी, कडेगांव मधून पारीत केलेली रक्कम मंडळ कृषि अधिकारी, कडेगांव/चिंचणी अं. यांना त्यांचेकडून शासकीय पावती घेऊन त्यांचे मार्फत कृषि पर्यवेक्षकाद्वारे मुकादमांना/मजूरांना अदा करणेत येत होती.

सन २००६-०७ व २००७-०८ मध्ये मंडळ कृषि अधिकारी, कडेगांव/चिंचणी अं. यांचे बॅकेंत खाते उघडणेबाबत कोणतीही तरतूद अथवा सुचना नसलेने मंडळ कृषि अधिकारी, कडेगांव/चिंचणी अं.यांना रोखीने/चेकने रक्कम अदा करणेत आलेली आहे.

१. शा.नि.वित्त विभाग क्र.डीडीओ १००७/प्र.क्र.६३/कोष-प्रशा-५, दि.७ एप्रिल ०८ अन्वये उपकोषागार कार्यालय कडेगांव यांनी सर्व देयके पारीत करून ता.कृ.अ.कार्यालयाचे, खात्यामध्ये रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही केली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत परिशिष्ट सोबत जोडली आहे. तसेच

२. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. जलसं.२००८/प्र.क्र.१६१/जल-७,दि.१० ऑक्टो ०८ अन्वये सर्व मृ.स योजना अंतर्गत फुटकळ ठेकेदार मजूर/खंड कामकऱ्यांना धनादेशाद्वारे मजूरीचे प्रदान करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयाची प्रत परिशिष्ट सोबत जोडली आहे.

सन १९९३-९४ मध्ये नदी खोरे प्रकल्प योजना सुरू झाल्या पासून अद्याप २७१ पाणलोट प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मान्यता मिळाली आहे. या पैकी २१४ पाणलोट प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. सद्या कार्यान्वित ५७ पाणलोट प्रकल्पा पैकी २२ प्रकल्प सन २००२-०३ पासून कार्यान्वित असून उर्वरित ४५ प्रकल्प सन २०१०-११ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. केंद्रशासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने पाणलोट प्रकल्प वेळेत पूर्ण होऊ शकले नाही.

**२.४.८.३**

**राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम (एनडब्ल्यूडीपी)**

- **निधीच्या अपुऱ्या तरतुदीमुळे मंद प्रगती**

राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे पाणलोट प्रकल्पांकरिता २००७-०८ ते २०११-१२ या पाच वर्षात टप्प्याटप्प्याने निधी दिला पाहिजे.

अमरावती जिल्ह्यातील तालुका कृषी अधिकारी,मोर्शी,वरुड व अंजनगांव सुर्जी येथे आणि नाशिक जिल्ह्यात मालेगांव व दिंडोरी येथे असे आढळून आले की,रु.९.६८ कोटी अंदाजित किंमत असलेल्या १३ निवडक पाणालोटांकरिता भारत सरकारने फक्त रु.१.१० कोटीचा निधी दिला आणि परिशिष्ट २.४.८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे (मार्च, २०११ पर्यत) झालेला खर्च रु.६९.३९ लाख होता.दोन टक्के ते ५३ टक्के पर्यंत निधीची तरतूद केली गेली आणि कार्यान्वयनाच्या चौथ्या वर्षाच्या अखेरीस दोन टक्के ते ३७ टक्के खर्च झालेला होता.असे अपेक्षीत होते की प्रकल्पाच्या किंमतीच्या ८० टक्के इतका निधी दिला जाईल आणि प्रकल्प अहवालात दृष्टीसमोर ठेवल्याप्रमाणे ८० टक्के कामे पूर्ण केल्या जातील.असे दिसून आले की भारत सरकार ने सर्व प्रकल्पांकरिता दिलेल्या अपूऱ्या निधीचा परिणाम कामांच्या अति मंद प्रगती मध्ये झाला.शिवाय, ताकृअ सुद्धा निधीचा पूर्ण पणे वापर करु शकले नाहित आणि उर्वरित निधी बँकामध्ये ठेवला गेला. हे निदर्शनास आणून दिल्यावर शासनाने वस्तुस्थिती मान्य केली (ऑक्टोंबर २०११)

- **व्यवस्थापन व पूर्वतयारी टप्प्यावरील निष्फळ खर्च**

प्रकल्प अहवाल व एन डब्लू डी पी अंतर्गत रु.८.६३ कोटी किंमतीच्या १५ पाणलोट प्रकल्पांच्या त्रैमासिक प्रगती अहवालावरुन असे उघडकीस आले की सर्व प्रकल्प अहमदपूर व निलंगा तालुक्यांच्या वेगवेगळ्या गांवांमध्ये कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव होता. प्रकल्प अहवाला प्रमाणे, ही कामे अकराव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत २००७-२००८ मध्ये,२०११-१२ पर्यंत पूर्ण करण्यासाठी निवडलेली होती.त्यांच्या प्रारंभापासून मार्च, २००९ पर्यंत रु.७४.७४ लाख दिले गेले ज्या पैकी रु.७४.७२ लाख व्यवस्थापन व पूर्वतयारी कार्यक्रमांवर खर्च झाले. त्यांनतर, मार्च, २०११ पर्यंत काहीही निधी दिला गेला नाही. याप्रकारे ,२००९-११ या कालावधीत निधी न दिल्याने प्रकल्प अपूर्ण राहिले. जिअकृअ,लातूर यांनी नमूद केले (जुलै, २०११) की हि कामे एन ए डी पी आणि इतर निधी मधून केल्या जातील.

तथापि, वस्तुस्थिती कायम आहे की व्यवस्थापन व पूर्वतयारी कार्यक्रमांकावर केलेला खर्च, कालावधी लोटल्यामुळे निष्फळ ठरला.

- **लोकांच्या सहभाग निधीचा वापर न होणे**

एन डब्ल्यू डी पी मार्गदर्शक तत्वांत असे कराररनिविष्ट केले आहे की प्रत्येक प्रकल्पात शेतकऱ्यांमध्ये योजनांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी लोकांच्या सहभागाकरिता निधी पृथक रक्षित करून ठेवला पाहिजे. ताकृअ, संगमनेर मध्ये असे दिसून आले कि, २००७-११ या कालावधीत लोकांच्या सहभागाकरिता दिलेल्या एकूण रु.१.२२ कोटी निधीपैकी रु.१.०९ कोटी विनावापर राहिला. ताकृअ, संगमनेर यांनी नमूद केले (जुलै, २०११) की एन डब्ल्यु डी पी अंतर्गत प्रस्ताव वरिष्ठ प्राधिकाऱ्यांनी मंजूर केले नाहीत.

या प्रकारे, लोकांच्या सहभागाला उत्तेजन देण्यासाठी दिलेला निधी कुठल्याही समर्थनीय कारणाशिवाय विनावापर राहिला. यामुळे शेतकऱ्यांमध्ये योजनांबद्दल जागृतीचा अभाव राहिला असेल.

- **घेतलेली व पूर्ण केलेली कामे यातील तुट.**

अकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७-१२),१.८१ लाख हेक्टर जमीन, रु २१० कोटी प्रक्षेपित किंमत असणाऱ्या संधारण कामांखाली आणण्याचे ठरविले होते. मार्च २०११ पर्यत फक्त ४० हजार हेक्टर जमिनिवर रु ४०.६२ लाखाची कामे घेतली होती आणि १.४१ लाख हेक्टर जमीन कामांशिवाय राहिली.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की भारत सरकार कडून निधी मिळण्यात विलंब झाल्याने कामे वेळेवर पूर्ण होऊ शकली नाहीत.

- **एन डब्लु डी पी चा प्रभाव**

कृषी वित्त महामंडळाने सप्टेंबर, २००८ मध्ये तयार केलेल्या एन डब्लु डी पी च्या पाणलोटा संबंधी मुल्यमापन अहवालाप्रमाणे प्रवेश बिंदुचे कार्यक्रम प्रत्येक पाणलोटा मध्ये कार्यान्वित केले होते आणि स्वयंसहाय्य गट, उपयोगाकर्ता गट व पाणलोट संघटना तसेच पाणलोट समित्या स्थापन करण्याकरिता प्रयत्न केले गेले होते.तथापि या समाज संघटना त्यांची रोजची कामे कार्यान्वित करण्यात कमजोर दिसून आल्या. सप्टेंबर, २००८ नंतर शासनाने किंवा शासनाने मान्यता दिलेल्या अभिकरणानें प्रभाव मूल्यमापन केले नाही.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११)की अंतिम मुल्यमापन अहवाल सादर केल्या जातील. जो प्रतिक्षित होता. (नोव्हेंबर, २०११)

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनासाठी ३२४ लघूपाणलोटांमधील १८१४०३ हेक्टर क्षेत्र उपचारीत करणेसाठी राज्याने रु. २१०१३.५५ लाख निधीचा सुधारीत प्रकल्प अहवाल सादर केला होता. राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमासाठी कृती आराखड्याअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या वार्षिक निधीचा विचार करता, भारत सरकारने ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये निर्धारीत केलेले लक्ष पूर्ण होणार नाही असे विदित केले होते. भारत सरकारच्या अर्ध शासकीय पत्र क्र.२-८/२००७-आरएफएस-III, दि.८ जुलै २००९ नुसार, मापदंडामध्ये वाढ झाल्यामुळे ज्या पाणलोटांमध्ये मागिल दोन वर्षात जास्तीत जास्त काम झाले आहे, असे पाणलोट, कृति आराखड्यांतर्गत प्राप्त निधीमधून पूर्ण करावेत, तसेच ज्या पाणलोटांमध्ये कमी काम झाले आहे अशा पाणलोटांसाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत सादर करावा, असा पर्याय सुचविला होता.

भारत सरकारने सुचविलेल्या पर्यायानुसार ३२४ लघूपाणलोटांपैकी १५३ लघूपाणलोटांवर कृति आराखड्यांतर्गत उपलब्ध झालेल्या निधीमधून उपचार घेण्यात आले. उर्वरीत १४६ लघूपाणलोटांमधील उपचार, पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत रु.८९.३१ कोटी निधीचा प्रस्ताव दि. २७ ऑक्टोबर २०१० रोजी झालेल्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला. सदर बैठकीत १४६ लघूपाणलोटाकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत रु. ४५.०० कोटी इतक्या निधीस मंजूरी देण्यात आली.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून सन २०१०-११ साठी प्रत्यक्षात रु. ६.०४ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, सदरचा निधी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना वितरीत करण्यात आलेला आहे. वितरीत केलेला निधी क्षेत्रीय स्तरावर संपूर्ण खर्च झाला असून खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे.

परिच्छेदात दर्शविल्यानुसार ४५ कोटी रुपये राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी मंजुर करण्यात आले त्यापैकी ६.०४ काटी रुपये महाराष्ट्र शासनाकडून वितरीत करण्यात आले. अतिरिक्त निधी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. असेही काही पाणलोट क्षेत्रे ही या योजनेतून IWMP & RIDF या योजनेत वगळण्यात येत आहे. लातुर जिल्ह्यातील नियोजित पाणलोट क्षेत्राच्या कामाच्या पुर्ततेसाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून दिला जाईल.

लेखा परीक्षणात दर्शविल्यानुसार १८.७९ लाख रुपये निधी हा गावाच्या Entry Point Activites (EPA) साठी राखून ठेवला होता. (पानोडी-७.९० लाख, वरवंडी-५.०४५ लाख, माळुंजे-२.०९७ लाख, आणि शिबलापूर २.५७) EPA साठी राखीव ठेवलेला निधी स्थानिक तक्रारीमुळे खर्च होऊ शकला नाही तक्रारीचे निराकरण स्थानिक पातळीवर करण्यात आले.

लेखा परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे वरवंडीच्या गावामध्ये ३ SHGS साठी ३६००० पानोडी गावाच्या ४ SHG साठी ४८००० माळुंजे गावाच्या १ SHG साठी १२००० निधी शालेय पोषण आहार भांडी खरेदीसाठी देण्यात आला तसेच शिबलापूर गावाच्या ३ SHG साठी २४००० रुपये घरगुती उत्पादने जसे की, पापड बनविणे, गांडूळ खत युनिट यासाठी देण्यात आले. आणि उरलेली ९.६३ लाख रुपये नविन तंत्रज्ञान वापरणाच्या गटासाठी खर्च करण्यात आले. खर्च झाल्याची SHG व UGS प्रती लेखापरीक्षणात दाखविण्यात आल्या आहेत.

अकराव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान केंद्रशासनाकडून प्राप्त अ.शा.पत्र No-2-8/2007-RFS-III, dt. ८ जुलै २००९ नुसार क्षेत्रीय कामासाठीचे आर्थिक मापदंड वाढल्याने नियोजीत कार्यक्रम पुर्ण होण्यासाठी निधीचा तुटवडा होणार आहे. त्यामुळे विशिष्ट पाणलोट पुर्ण करण्याच्या दृष्टीने निधी मागणी प्रस्ताव पाठविण्यात यावे त्या अनुषंगाने केंद्रशासनास कळविण्यात यावे.

कृषिवित्त महामंडळाने सप्टेंबर, २००८ मध्ये तयार केलेल्या रापाविकाच्या पाणलोटासंबंधी मुल्यमापन अहवालाप्रमाणे प्रवेशबिंदुचे कार्यक्रम प्रत्येक पाणलोटामध्ये कार्यान्वित केले होते आणि स्वयंसहाय्यतागट, उपयोक्तागट व पाणलोट संघटना, पाणलोट समित्या स्थापन करण्याकरिता प्रयत्न केले गेले होते. तथापि या समाजसंघटना त्यांची रोजची कामे करण्यात कमजोर दिसुन आल्या.

आकराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमात अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या लघुपाणलोटाचे मध्यावधी मुल्यमापन करण्यासाठी सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष कृषि आयुक्तालय पुणे यांना पत्र जा.क्र.मृदस/सनिमु/रापाविता/२२८/१० संचालक मृद संधारण व पाक्षेव्य कार्यालय दि. ५ ऑगस्ट २०१० रोजी कळविण्यात आले आहे. तरी सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा.

**२.४.८.४**

**मराठवाडा पाणलोट विकास मिशन (एमडब्लूडीएम)**

- **लोकांच्या सहभागाकरिता पृथकरक्षित योजना निधीचा वापर न होणे**

एमडब्लुडी एम च्या मार्गदर्शक तत्वांमध्ये असे करारनिविष्ट केलेले आहे की, प्रत्येक प्रकल्पात शेतकऱ्यांमध्ये योजनांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी लोकांच्या सहभागासाठी निधी पृथकरक्षित केला पाहिजे.दोन तालुक्यांच्या (किनवट व लातूर) चाचणी तपासणीत असे आढळून आले की २००५-१० या कालावधीत लोकांच्या सहभागासाठी दिलेल्या एकूण रु.६६ लाख निधी पैकी रु.६० लाख विनावापर राहिले. लेखा परिक्षेत हे निदर्शनास आणल्यावर ताकृअ, किनवट व लातुर यांनी काही विनिर्दिष्ट कारण दिले नाही.

- **घेतलेली व पूर्ण केलेली कामे यातील तुट**

आठ (१०१) जिल्ह्यांकरिता आठ मेगा पाणलोट निवडल्या गेले आणि या पाणलोटांचे समावेश करण्याचे भौगोलिक क्षेत्र २१८ गांवामध्ये १,८२,८४० हेक्टर होते. या पाणलोटांतर्गत २८५ मिनी पाणलोट निर्माण केले होते.आणि रु.१३१.४३ कोटी खर्चाने (मार्च, २०११ पर्यंत) १,७७,९४४ हेक्टर कामासाठी व्यापले व ४,५३६ हेक्टर परिशिष्ट २.४.९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विना कामाचे राहिले.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की मागणी प्रमाणे निधी उपलब्ध न झाल्याने तूट झाली.तथापि मागितलेला निधी व मिळाल्याची तारीख यांचा तपशील प्रतीक्षित होता.(नोव्हेंबर, २०११)

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**तालुका कृषि अधिकारी, किनवट**

पाणलोट क्षेत्रात समूह संघटन मेळावे व शिबीर दि. ८ सप्टेंबर २००५ ते दि. १४ एप्रिल २००९ या कालावधीत घेण्यात आले असून त्याकरिता खर्चाची मागणी ताकृअ, किनवट यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांच्याकडे दि. ३० जुलै २०११ रोजी केली. त्याप्रमाणे दि. ६ ऑगस्ट २०११ रोजी अनुदान तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आले. दि. २ सप्टेंबर २०११ रोजी प्राप्त समुह संघटनाचे अनुज्ञेय खर्च पूर्णपणे शासनाच्या मापदंडाच्या अधिन राहून झालेला आहे.तसेच प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेकडे शिल्लक असलेला रु.२६.०० लक्ष निधी संपूर्ण खर्च झालेला असून खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रशीक्षण शिबीर व मेळावे इ.चा कालावधी | ताकृअ यांची देयके पारित केल्याचे दिनांक | देयकाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ८/९/२००५ ते १०/४/२००९ | २/९/२०११ | ३,०१,६६२ |
| २ | १२/८/२००५ तें ९/१०/२००८ | २/९/२०११ | ३,१२,३२५ |
| ३ | १०/९/२००५ ते १४/४/२००९ | ३/९/२०११ | ३,१२,५०० |
| ४ | २०/८/२००५ ते १६/१०/२००८ | ३/९/२०११ | ३,०५,५८५ |
| | | एकूण समूह संघटन | १२,३२,०७२ |

सर्वेक्षण व प्राजेक्टायझेशन (सविस्तर अंदाजपत्रक सर्वेक्षण, रिमोट सेसींग नकाशा, प्रकल्प आराखडे तयार करणे, माहिती तयार करणे)

| अ.क्र. | सुक्ष्म पाणलोटाची संख्या | ताकृअ यांची देयके पारित केल्याचे दिनांक | देयकाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६ | २६/८/२०११ | ३,०७,८३३ |
| २ | ६ | २६/८/२०११ | १,९१,२४३ |
| ३ | ६ | २६/८/२०११ | २,४१,३२२ |
| ४ | ६ | २७/८/२०११ | ३,०८,५१६ |
| ५ | ६ | २७/८/२०११ | ३,२०,००८ |
| | | एकूण | १३,६८,९३२ |
| | | एकूण बेरीज | २६,०१,००४ |

**तालुका कृषी अधिकारी, लातूर**

लातूर तालुक्यातील मराठवाडा पाणलोट मिशन अंतर्गत लोकसहभाग/समूह संघटन या घटकांसाठी मूळ आराखड्याप्रमाणे ५ टक्के रु. ३६.६१ लाख मंजूर होता. सुधारित अंतिम कार्यक्रमानुसार दि. २३ एप्रिल २०१० चे विभागीय समितीमध्ये रु. २.४५ लाख रकमेस सदरील कार्यक्रमासाठी सुधारित मान्यता घेण्यात आली आहे. सदरील रक्कम ही शेतकरी सहल, प्रक्षेत्र भेटी, शेतकरी प्रशिक्षण, पशु चिकित्सा शिबीरे, ग्रामविकास समितीचे पदाधिकारी यांचे प्रशिक्षणे, शेतकरी गट प्रशिक्षण इ. बाबींसाठी खर्च करण्यात आलेली आहे. त्यामुळे लोकसहभागासाठी मंजूर रक्कम रु.२.४५ लाख ही विनावापर राहीलेली नाही. याबाबतचे दि. २३ एप्रिल २०१० चे विभागीय समितीचे सुधारित मान्यतेचे इतिवृत्त परिशिष्ट येथे सोबत जोडले आहे.

मराठवाडा पाणलोट विकास मिशनकरिता सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत एकूण रु. १३८.५० कोटी निधी उपलब्ध होता. माहे जून, २०१२ अखेर यापैकी रु.१३६.३४ कोटी खर्च झाला आहे. या कार्यक्रमांतर्गत २१८ गावातील २८५ सुक्ष्म पाणलोटातील १.७७ लाख हेक्टर क्षेत्र उपचारित करावयाचे आहे. यापैकी १.५२ लाख हेक्टर क्षेत्र उपचारित झालेले आहे. उर्वरित कामे प्रगतीत आहेत.

याबाबत लेखापरिक्षण कालावधीत (सन २००६-०७ ते २००९-१०) मागितलेला निधी व मिळाल्याची तारीख यांचा तपशील खालीलप्रमाणे.

(रु. कोटीत)

| अ.क्र. | वर्ष | निधी मागणी | निधी | | विभागस्तरावरील वितरीत निधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिळाल्याची तारीख | रक्कम रु. | तारीख | रक्कम |
| १ | २००६-०७ | ५/१०/२००५ | १४/२/२००७ | २५.०० | १/३/२००७ | २५.०० |
| २ | २००७-०८ | १/१२/२००६ | ७/७/२००७ | ५.०० | १०/७/२००७ | ५.०० |
| | | | २१/१२/२००७ | ३२.०० | २/१/२००८ | ३२.०० |
| | | | एकूण | ६२.०० | | ६२.०० |
| ३ | २००८-०९ | १०/११/२००७ | १७/७/२००८ | १०.०० | २०/७/२००८ | १०.०० |
| | | | ४/२/२००९ | ३०.०० | १०/२/२००९ | ३०.०० |
| | | | एकूण | ४०.०० | | ४०.०० |
| ४ | २००९-१० | २३/९/२००८ | १५/३/२०१० | ३५.०० | २०/३/२०१० | ३५.०० |

**२.४.८.५**

**विदर्भ पाणलोट विकास मिशन (व्ही डब्लू डी एम)**

- **पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा नसणे**

विदर्भ पाणलोट विकास मिशनचे एक उद्दिष्ट पिकांच्या अपयशामुळे विदर्भ भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची प्रकरणे नियंत्रित करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेतील सुधारणाद्वारा उत्पादकता वाढविणे हा होता.लेखा परिक्षा छाननीत असे उघडकीस आले की व्ही डब्लू डी एम ने तक्ता ६ मध्ये दाखविल्याप्रमाणे रु.१६.४४ कोटीचा खर्च झाल्यावरही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची प्रकरणे नियंत्रित करण्याचे मूळ उद्दिष्ट साध्य केले नाही.

**तक्ता ६ : शेतकऱ्यांची आत्महत्या प्रकरणे**

| अ.क्र. | ताकुअचे नाव | खर्च (रु.कोटी मध्ये) | आत्महत्या प्रकरणांची संख्या (२००८-११) |
|---|---|---|---|
| १ | आर्णी | ४.८८ | १७ |
| २ | उमरखेड | ५.०५ | ५७ |
| ३ | सिंदखेड राजा | ६.५१ | १५ |
| | एकूण | १६.४४ | ८९ |

(स्त्रोत : विभागाचे आकडे)

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११ )की कमी पर्जन्यमानामुळे उद्दिष्ट संपादन करणे शक्य झाले नाही.जास्त पाणलोट कामे हाती घेऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

**पाणलोटाची कामे पूर्ण करण्यातील तूट**

मृद् व जल संधारण उपचारासाठी निवडलेल्या ७०३ पाणलोटांपैकी मार्च, २०११ पर्यंत ६६७ पाणलोट पूर्ण झाले व बाकी ३६ पाणलोट अपूर्ण राहीले. शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की ही तूट मागणी केलेल्या निधीच्या अनुउपलब्धतेमुळे होती. तथापि, मागितलेला निधी व निधी मिळाल्याची तारीख यांचा तपशील प्रतीक्षित होता. (नोव्हेंबर, २०११).

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

तालुका कृषि अधिकारी, आणि जि. यवतमाळ

विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत आणि तालुक्यामध्ये १७ गावांची पाणलोटाची कामे करण्याकरिता निवड करण्यात आली होती. सदर प्रकल्पावर रु.४.८८ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

आणि तालुक्यामध्ये सन २००७-२००८ ते २०१०-११ या कालावधीमध्ये १७ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहे. यापैकी ११ आत्महत्या या पात्र ठरलेल्या आहे. त्यामधून ४ शेतकरी आत्महत्या ह्या विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत निवडलेल्या गावामधील आहे. शेतकरी आत्महत्या व पाणलोटात झालेली कामे सरळ अर्थी संबंध दिसून येत नाही. आत्महत्येमागे इतर कारणे असल्याचे दिसून येते, त्यापैकी मुख्य म्हणजे दुष्काळ सदृश स्थिती व पीकाची कमी उत्पादकता हे होय. पीकाच्या कमी उत्पादकतेमागे कारण म्हणजे कमी पर्जन्यवृष्टी हे आहे. आणि तालुक्यामध्ये सन २००८-०९ या वर्षात ४६९ मी.मी इतका पाऊस पडला जो तालुक्याच्या ८१६ मी.मी. सरीच्या ५७% इतका आहे. त्याप्रमाणे सन २००९-१० मध्ये ४७५ मी.मी इतका पाऊस पडलेला आहे तो सरासरीच्या ५८% इतका आहे.

सदर तालुक्यामध्ये पेरणीचे क्षेत्र ४५१०० हेक्टर इतके आहे. प्राप्त पेरणी अहवालानुसार सन २००७-०८ ते २०१०-११ या कालावधीत खरीप पेरणी क्षेत्रामध्ये ११७ ते १२९% इतकी वाढ झालेली दिसून येते. त्याप्रमाणे रब्बी क्षेत्रामध्ये १३६ ते १९३% इतकी वाढ झालेली दिसून येते. सदर तालुक्याचे सरासरी रब्बी पेरणी क्षेत्र ५३०० हेक्टर इतके आहे.२००७-२००८ मध्ये १०२२४ हेक्टर २००८-०९ मध्ये ८३५६ हेक्टर क्षेत्रावर रब्बी पीकाची पेरणी करण्यात आलेली आहे.

आणि तालुक्यात सन २००९-१० मध्ये पेरणी केलेले क्षेत्र २२७२.०० हेक्टर ते सरासरी पेरणी क्षेत्राच्या ४३% इतके आहे. सन २००९-१० मध्ये दुष्काळ हे त्यामागचे मुख्य कारण होते. सन २००९-१० मध्ये आणि तालुक्यात ४७५ मि.मि इतका पाऊस पडला तो सरासरी पर्जन्यमान ८१६ मि. मि. च्या तुलनेत ५८.१६% इतका होता. वरील आकडेवारीनुसार हे स्पष्ट होते की,सन २००७-०८ ते २०१० - ११ खरीप व रब्बी हंगामामध्ये पेरणीतील क्षेत्र वाढलेले दिसून येते.

जरी सन २००७-०८ ते २०१०-११ या कालावधीत पेरणीचे क्षेत्र वाढलेले असले तरी सन २००८-०९ व २००९-१० या वर्षात कमी पर्जन्यमानामुळे पीकाची वाढ खुंटून शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले.

सदर दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबाना वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन योजनेअंतर्गत प्रती शेतकरी रु.२५०००/- याप्रमाणे आर्थिक मदत देण्याकरिता ७५१ शेतकऱ्यांची तालुक्यामध्ये निवड करण्यात आली आहे. त्याप्रमाणे १००० सिंचन विहीरी मंजूर करण्यात आल्या होत्या,त्यापैकी ८५४ विहीरीची कामे सुरू करण्यात आली असून ते ४५९ पूर्ण झालेले आहे. संबंधित कागदाच्या प्रती लेखापरीक्षणाच्या वेळेस तालुक्यास्तरावर दाखविण्यात आलेल्या आहेत.

**तालूका कृषि अधिकारी, उमरखेड जि. यवतमाळ**

उमरखेड तालुक्यात विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत तालुक्यात १३५ गावांपैकी १४ गावे निवडण्यात आली. सदर गावामधील मृद् संधारणाची कामे करण्याकरिता २० पाणलोट निवडण्यात आले. मार्च - २०११ अखेर हे पाणलोट करण्यात आले असून त्यावर रु.७.०४ कोटी इतका खर्च करण्यात आला. सदर तालुक्यामध्ये सन २००८-१० या कालावधीत ५७ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. त्यापैकी १७ आत्महत्या हया पात्र ठरलेल्या आहे. त्यामधून ४ आत्महत्या विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत निवडलेल्या गावामधून आहेत.

सदर तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान हे ९०६ मी.मी. आहे. सन २००८-०९ मध्ये सदर तालुक्यात ६८१ मी.मी पर्जन्यवृष्टी झालेली आहे. ती सरासरी ७५% इतकी आहे.सन २००९-१० मध्ये ५४२ मी.मी इतका पाऊस पडलेला आहे. तो सरासरीच्या ५९% इतका आहे. सन २०१०-११ मध्ये ७८९ मी.मी इतकी पर्जन्यवृष्टी झालेली आहे. तो सरासरीच्या ८७% इतका आहे. सदर कमी पर्जन्यवृष्टीमुळे तालुक्यामध्ये दुष्काळ सदृश्य स्थिती दिसून येते. कमी पर्जन्यमानामुळे खरीपाच्या पीकाच्या उत्पन्नात घट झालेली दिसून येते. शेतकरी आत्महत्याचे हेच खरे कारण आहे. विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत झालेली कामे व शेतकऱ्यांची आत्महत्या याचा काहीच संबंध नाही. सदर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने सदर तालुक्यामध्ये पी.एम पॅकेज अंतर्गत ८० सिमेंट बंधाऱ्यांची कामे घेण्यात आली. त्यामुळे रब्बी हंगामामध्ये ९० शेतकऱ्यांना संरक्षित ओलीत देण्याकरिता यांचा फायदा झाला. त्याप्रमाणे सदर तालुक्यामध्ये १००० सिंचन विहीरी मंजूर केलेल्या असून ६६५ विहीरींची कामे सुरू करण्यात आली त्यापैकी ४०२ विहीरी पूर्ण झालेल्या आहेत.

**तालुका सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यामध्ये विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत १६ पाणलोटामध्ये सन २००६-०७ ते २००८-०९ मध्ये जलसंधारणाची कामे करण्यात आली.अहवालामधील परिच्छेद (Appendex ०२,८.४) iii) त्यामध्ये सुजलगाव, मलकापूर पांग्रा, साखरखेर्डा व सोनोषी या गावामध्ये सन २००७ ते २००९-१० या कालावधीमध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला. असे म्हटले आहे. परंतु विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत सदर गावामध्ये पाणलोटाची कामे करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेमध्यें सुधारणा झालेली नाही.

सिंदखेडराजा तालूक्याचे सरासरी पर्जन्यमान ७५० ते ८०० मि.मि. असून सन २००७-०८,२००८-०९ व २००९-१० मध्ये अनुक्रमे ६९६ मि.मि,५८५ मि.मि व ५८९ मि.मि पाऊस झालेला आहे.

सन २००७-०८ ते २००९-१० या तीन वर्षामध्ये सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्यामुळे तसेच पाण्याचा उपसा जास्त प्रमाणात होत असल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खोल गेलेली आहे. वरील तीन वर्षामध्ये रब्बी पिकांचे पेरणी क्षेत्र ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्ये पडलेल्या पावसावर अवलंबून असल्यामुळे पेरणी क्षेत्रात चढउतार दिसून येत आहे. ज्या वर्षी ऑक्टोंबर, नोव्हेंबर मध्ये जमिनीत ओलावा होता त्यावेळी पेरणी क्षेत्रात वाढ झालेली आहे. तसेच कापूस पिकाच्या क्षेत्रात ज्या वर्षी वाढ झाली त्या वर्षी रब्बीचे क्षेत्र कमी झालेले आहे. याबाबतचा तपशिल परिशिष्ट २ सोबत जोडला आहे.

विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत १६ पाणलोटात (राताळी, पोफळी, शिवणी, वरोडी, वर्दडी खु., ढोरवी, केशव शिवणी, लिंगा(राजेगाव) कंडारी, भंडारी, चिंचोली जहांगीर, वाघजाई, अंचल, धानोरा, सोयदेव, ताडशिवणी, पांगरखेड व बुट्टानिमखेड) कामे झालेली आहेत. या पाणलोटामध्ये कमी पाऊस पडूनसुद्धा पिकांच्या उत्पादकतेमध्ये वाढ झालेली असून शेतकरी आत्महत्येस अनेक कारणे कारणीभूत आहेत. सिंदखेडराजा तालुक्यात झालेल्या आत्महत्या व त्याची कारणे याचा तपशिल परिशिष्ट ३ सोबत जोडला आहे.

विदर्भ पाणलोट विकास मिशन करिता सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत एकूण रुपये ३७१.०० कोटी निधी उपलब्ध होता.माहे मार्च २०१२ अखेर यापैकी रु.३५०.६६ कोटी खर्च झालेला आहे.या कार्यक्रमातंर्गत उपचारासाठी निवडलेल्या ११५७ पाणालोटापैकी १०५२ पाणलोट पूर्ण झाले आहेत, उर्वरीत कामे प्रगतीत आहेत. याबाबतचा लेखा परिक्षण कालावधीतील (सन २००६-०७ ते २००९-१०) मागितलेला निधी व मिळाल्याची तारीख यांचा प्रतिक्षीत तपशील खालीलप्रमाणे.

(रु.कोटीत)

| अ. क्र. | वर्ष | मागितलेला निधी तारीख | निधी | | विभागस्तर निधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिळाल्याची तारीख | रक्कम | तारीख | रक्कम |
| १ | २००६-०७ | ५/१०/२००५ | २३/६/२००६ | १०.०० | ३०/६/२००६ | १०.०० |
| | | | २९/९/२००६ | ५.०० | ५/१०/२००६ | ५.०० |
| | | | ५/२/२००७ | ८०.०० | १०/२/२००७ | ८०.०० |
| | **एकूण** | | | **९५.००** | | **९५.००** |
| २ | २००७-०८ | १/१२/२००६ | ३१/८/२००७ | ५.०० | ४/९/२००७ | ५.०० |
| | | | २/१/२००८ | १२०.०० | १०/१/२००८ | १२०.०० |
| | **एकूण** | | | **१२५.००** | | **१२५.००** |
| ३ | २००८-०९ | ११/११/२००७ | १९/१२/२००८ | ५.०० | २५/१२/२००८ | ५.०० |
| | | | ४/२/२००९ | ६७.०० | १०/२/२००९ | ६७.०० |
| | **एकूण** | | | **७२.००** | | **७२.००** |
| ४ | २००९-१० | २३/९/२००८ | २/५/२००९ | २४.०० | २५/५/२००९ | २४.०० |
| | | | २६/३/२०१० | ४८.०० | २९/९/२०१० | ४८.०० |
| | **एकूण** | | | **७२.००** | | **७२.००** |

**सदरचे स्पष्टीकरण मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा.**

**२.४.८.६**

**वेगवर्धित पाणलोट विकास कार्यक्रम (ए डब्लू डी पी)**

- **कामाच्या कार्यान्वयनादरम्यान प्रमाणके न पाळणे**

उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार मंडळ यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने घेतलेल्या निर्णयानुसार (जानेवारी २००८) ए डब्लू डी पी अंतर्गत, कंपार्टमेंट बंडींगची कामे अग्रक्रमाने हाती घ्यावयाची होती. एका बैठकीत असे अनुदेश दिले गेले होते (जानेवारी २००८) की कंपार्टमेंट बंडींगमध्ये एका नलीका निर्गम मार्गाची तरतूद केली पाहिजे, म्हणजे, जर पाण्याचा साठा एक फुटापेक्षा जास्त असेल तर पाणी जवळच्या शेतात वळविल्या जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यास व जमीन संधारणास मदत होईल.

चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी, ३७ ताकृअ मध्ये ए डब्लू डी पी कार्यान्वित केला होता व दोन ताकृअ मध्ये कंपार्टमेंट बंडींगला निर्गम मार्गाची तरतूद न केल्याचे दिसून आले.

- ताकृअ, कडेगांव मध्ये असे दिसून आले (ऑगस्ट २०११) की, निर्गम मार्गाची तरतूद न करता २,६७९.२९ हेक्टर क्षेत्र व्यापणारे, रु.१.६७ कोटी खर्चाचे कंपार्टमेट बंडीग कार्यान्वित केले गेले. त्यामुळे जवळच्या जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे तसेच जमिनीचे संधारण करण्याचा हेतू विफल झाला. ताकृअ, कडेगांव यांनी नमूद केले (ऑगस्ट २०११) की, याला उविकृअ विटा यांनी तांत्रिक मंजुरी दिली होती व एकाही अंदाजपत्रकात निर्गम मार्गाची तरतूद नव्हती.

- संगमनेर तालुक्यात असे आढळून आले (जुलै २०११) की २००८-११ दरम्यान ४,६०६ हेक्टर्स मध्ये कंपार्टमेंट बंडींगची कामे घेतली गेली होती ज्यासाठी प्रति हेक्टर चार पाईप्स या प्रमाणकाप्रमाणे १८,४२४ आरसीसी पाईप्सची आवश्यकता होती. तथापि, रु.३७.२७ लाख किंमतीचे फक्त ६,२११ पाईप्स विकत घेतले गेले आणि मंडळ कृषी अधिकारी यांच्याद्वारे गांवांमध्ये वितरित केले गेले.

- लेखापरीक्षा चमू व विभागीय अधिकारी यांच्या संगमनेर तालुक्यातील मेंढेवन व वेल्हारे गावांच्या संयुक्त क्षेत्र भेटीच्या वेळी असे दिसून आले की कंपार्टमेंट बंडीगकरिता फक्त पाच पाईप्स वापरले गेले होते व बाकीचे पाईप्स गावांमध्ये विखुरलेल्या अवस्थेत पडलेले होते.ताकृअ यांनी वस्तुस्थिती मान्य केली (जुलै २०११) आणि नमुद केले की, पाईप्स बसविण्यासाठी शेतकऱ्यांना पटविल्या जाईल.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की एक सविस्तर उत्तर सादर केले जाईल, जे प्रतीक्षित होते. (नोव्हेंबर २०११)

- **कंत्राटदारांना खंड कामकऱ्यांना रोख प्रदान**

महाराष्ट्र कोषागार नियमांच्या (मकोनि) च्या नियम ३५५(२) अनुसार, कंत्राटदारांना /पुरवठादारांना, धनादेशा द्वारे प्रदान केले पाहिजे.

चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी, दोन ताकृअ (कडेगांव व अकोले) मध्ये असे दिसून आले की, २००६-११ या कालावधीत,विविध मंडळ कृषी अधिकाऱ्यांना(मंकृअ) रु.१.९९ कोटींची रक्कम शासकीय नियमांचे उल्लघंन करून रोखीने प्रदान करण्यात आली. त्यानंतर, मंकृअ नी सुद्धा कंत्राटदारांना व खंड कामकऱ्यांना रोख प्रदान केले जे अनियमीत होते आणि ज्यामध्ये कपटपूर्ण प्रदानाचा धोका होता.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की त्या भागात बँकेचे जाळे फार विखुरलेले होते म्हणून रोख प्रदान केले गेले. हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण ताकृअ व मकृअ ना बँकाच्या सर्वात जवळच्या शाखांमध्ये खाते उघडावयास सांगितले पाहिजे होते.

- **घेतलेली व पूर्ण केलेली कामे यातील तूट**

या योजने खाली २००७-११ या कालावधीत घेतलेल्या २,००२ पाणलोटांपैकी १,९६१ पाणलोट पूर्ण झाले व ४१ पाणलोट अपूर्ण राहिले.

शासनाने नमुद केले (ऑक्टोबर २०११) की ही तूट मागणी केलेल्या निधीच्या अनुपलब्धतेमुळे होती. तथापि, मागणी केलेला निधी व मिळाल्याच्या तारखा यांचा तपशील प्रतिक्षित होता (नोव्हेंबर २०११).

यामुळे दिसून येते की निधीच्या तुटवडयामुळे लक्ष्ये साध्य होऊ शकले नाहीत. शासनाने निधीच्या उपलब्धतेची निश्चिती करावयास हवी होती.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**तालुका कृषि अधिकारी आणि जि. यवतमाळ**

विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत आणि तालुक्यामध्ये १७ गावांची पाणलोटाची कामे करण्याकरिता निवड करण्यात आली होती. सदर प्रकल्पावर रु. ४.८८ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

आणि तालुक्यामध्ये सन २००७-२००८ ते २०१०-११ या कालावधीमध्ये १७ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यापैकी ११ आत्महत्या या पात्र ठरलेल्या आहेत. त्यामधून ४ शेतकरी आत्महत्या हया विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत निवडलेल्या गावामधील आहेत. शेतकरी आत्महत्या व पाणलोटात झालेली कामे सरळ अर्थी संबंध दिसून येत नाही. आत्महत्येमागे इतर कारणे असल्याचे दिसून येते, त्यापैकी मुख्य म्हणजे दुष्काळ सदृश स्थिती व पीकाची कमी उत्पादकता हे होय. पीकाच्या कमी उत्पादकतेमागे कारण म्हणजे कमी पर्जन्यवृष्टी हे आहे. आणि तालुक्यामध्ये सन २००८-०९ या वर्षात ४६९ मी.मी इतका पाऊस पडला जो तालुक्याच्या ८१६ मी.मी. सरीच्या ५७% इतका आहे. त्याप्रमाणे सन २००९-१० मध्ये ४७५ मी.मी इतका पाऊस पडलेला आहे तो सरासरीच्या ५८% इतका आहे.

सदर तालुक्यामध्ये पेरणीचे क्षेत्र ४५१०० हेक्टर इतके आहे. प्राप्त पेरणी अहवालानुसार सन २००७-०८ ते २०१०-११ या कालावधीत खरीप पेरणी क्षेत्रामध्ये ११७ ते १२९% इतकी वाढ झालेली दिसून येते. त्याप्रमाणे रब्बी क्षेत्रामध्ये १३६ ते १९३% इतकी वाढ झालेली दिसून येते. सदर तालुक्याचे सरासरी रब्बी पेरणी क्षेत्र ५३०० हेक्टर इतके आहे. २००७-२००८ मध्ये १०२२४ हेक्टर २००८-०९ मध्ये ८३५६ हेक्टर क्षेत्रावर रब्बी पीकाची पेरणी करण्यात आलेली आहे.

आणि तालुक्यात सन २००९-१० मध्ये पेरणी केलेले क्षेत्र २२७२.०० हेक्टर ते सरासरी पेरणी क्षेत्राच्या ४३% इतके आहे. सन २००९-१० मध्ये दुष्काळ हे त्यामागचे मुख्य कारण होते. सन २००९-१० मध्ये आणि तालुक्यात ४७५ मि.मि इतका पाऊस पडला तो सरासरी पर्जन्यमान ८१६ मि.मि. च्या तुलनेत ५८.१६% इतका होता. वरील आकडेवारीनुसार हे स्पष्ट होते की, सन २००७-०८ ते २०१०-११ खरीप व रब्बी हंगामामध्ये पेरणीतील क्षेत्र वाढलेले दिसून येते.

जरी सन २००७-०८ ते २०१०-११ या कालावधीत पेरणीचे क्षेत्र वाढलेले असले तरी सन २००८-०९ व २००९-१० या वर्षात कमी पर्जन्यमानामुळे पीकाची वाढ खुंटून शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले.

सदर दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबाना वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन योजनेअंतर्गत प्रती शेतकरी रु.२५०००/- याप्रमाणे आर्थिक मदत देण्याकरिता ७५१ शेतकऱ्यांची तालुक्यामध्ये निवड करण्यात आली आहे. त्याप्रमाणे १००० सिंचन विहीरी मंजूर करण्यात आल्या होत्या, त्यापैकी ८५४ विहीरीची कामे सुरू करण्यात आली असून ते ४५९ पूणे झालेले आहे. संबंधित कागदाच्या प्रती लेखापरीक्षणाच्या वेळेस तालुक्यास्तरावर दाखविण्यात आलेल्या आहेत.

**तालूका कृषि अधिकारी, उमरखेड जि. यवतमाळ**

उमरखेड तालुक्यात विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत तालुक्यात १३५ गावांपैकी १४ गावे निवडण्यात आली. सदर गावामधील मृद्संधारणाची कामे करण्याकरिता २० पाणलोट निवडण्यात आले. मार्च-२०११ अखेर हे पाणलोट करण्यात आले असून त्यावर रु.७.०४ कोटी इतका खर्च करण्यात आला. सदर तालुक्यामध्ये सन २००८-१० या कालावधीत ५७ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. त्यापैकी १७ आत्महत्या ह्या पात्र ठरलेल्या आहेत. त्यामधून ४ आत्महत्या विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत निवडलेल्या गावामधून आहेत.

सदर तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान हे ९०६ मी.मी.आहे. सन २००८-०९ मध्ये सदर तालुक्यात ६८१ मी.मी पर्जन्यवृष्टी झालेली आहे. ती सरासरी ७५% इतकी आहे. सन २००९-१० मध्ये ५४२ मी.मी इतका पाऊस पडलेला आहे. तो सरासरीच्या ५९% इतका आहे. सन २०१०-११ मध्ये ७८९ मी.मी इतकी पर्जन्यवृष्टी झालेली आहे. तो सरासरीच्या ८७% इतका आहे. सदर कमी पर्जन्यवृष्टीमुळे तालुक्यामध्ये दुष्काळ सदृश्य स्थिती दिसून येते. कमी पर्जन्यमानामुळे खरीपाच्या पीकाच्या उत्पन्नात घट झालेली दिसून येते. शेतकरी आत्महत्याचे हेच खरे कारण आहे. विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत झालेली कामे व शेतकऱ्यांची आत्महत्या याचा काहीच संबंध नाही. सदर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने सदर तालुक्यामध्ये पी.एम पॅकेज अंतर्गत ८० सिमेंट बंधाऱ्यांची कामे घेण्यात आली. त्यामुळे रब्बी हंगामामध्ये ९० शेतकऱ्यांना संरक्षित ओलीत देण्याकरिता यांचा फायदा झाला. त्याप्रमाणे सदर तालुक्यामध्ये १००० सिंचन विहीरी मंजूर केलेल्या असून ६६५ विहीरीची कामे सुरू करण्यात आली त्यापैकी ४०२ विहीरी पूर्ण झालेल्या आहेत.

**तालुका सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यामध्ये विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत १६ पाणलोटामध्ये सन २००६-०७ ते २००८-०९ मध्ये जलसंधारणाची कामे करण्यात आली. अहवालामधील परिच्छेद (Appendex ०२,८.४) iii) त्यामध्ये सुजलगाव, मलकापूर पांग्रा, साखरखेर्डा व सोनोषी या गावामध्ये सन २००७ ते २००९-१० या कालावधीमध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला.असे म्हटले आहे. परंतु विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत सदर गावामध्ये पाणलोटाची कामे करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेमध्ये सुधारणा झालेली नाही.

सिंदखेडराजा तालूक्याचे सरासरी पर्जन्यमान ७५० ते ८०० मि.मि. असून सन २००७-०८,२००८-०९ व २००९-१० मध्ये अनुक्रमे ६९६ मि.मि,५८५ मि.मि व ५८९ मि.मि पाऊस झालेला आहे.

सन २००७-०८ ते २००९-१० या तीन वर्षांमध्ये सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्यामुळे तसेच पाण्याचा उपसा जास्त प्रमाणात होत असल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खोल गेलेली आहे. वरील तीन वर्षांमध्ये रब्बी पिकांचे पेरणी क्षेत्र ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्ये पडलेल्या पावसावर अवलंबून असल्यामुळे पेरणी क्षेत्रात चढउतार दिसून येत आहे. ज्या वर्षी ऑक्टोंबर, नोव्हेंबर मध्ये जमिनीत ओलावा होता त्यावेळी पेरणी क्षेत्रात वाढ झालेली आहे. तसेच कापूस पिकाच्या क्षेत्रात ज्या वर्षी वाढ झाली त्या वर्षी रब्बीचे क्षेत्र कमी झालेले आहे. याबाबतचा तपशिल परिशिष्ट-२ सोबत जोडला आहे.

विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत १६ पाणलोटात (राताळी, पोफळी, शिवणी, वरोडी, वर्दडी खु., ढोरवी, केशव शिवणी, लिंगा (राजेगाव) कंडारी, भंडारी, चिंचोली जहांगीर, वाघजाई, अंचल, धानोरा, सोयदेव, ताडशिवणी, पांगरखेड व बुट्टानिमखेड) कामे झालेली आहेत. या पाणलोटामध्ये कमी पाऊस पडूनसुद्धा पिकांच्या उत्पादकतेमध्ये वाढ झालेली असून शेतकरी आत्महत्येस अनेक कारणे कारणीभूत आहेत. सिंदखेडराजा तालुक्यात झालेल्या आत्महत्या व त्याची कारणे याचा तपशिल परिशिष्ट-३ सोबत जोडला आहे.

विदर्भ पाणलोट विकास मिशन करिता सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत एकूण रुपये ३७१.०० कोटी निधी उपलब्ध होता. माहे मार्च २०१२ अखेर यापैकी रु.३५०.६६ कोटी खर्च झालेला आहे. या कार्यक्रमातंर्गत उपचारासाठी निवडलेल्या ११५७ पाणालेटापैकी १०५२ पाणलोट पूर्ण झाले आहेत, उर्वरीत कामे प्रगतीत आहेत. याबाबतचा लेखा परिक्षण कालावधीतील (सन २००६-०७ ते २००९-१०) मागितलेला निधी व मिळाल्याची तारीख यांचा प्रतिक्षीत तपशील खालीलप्रमाणे :—

(रु.कोटीत)

| अ.क्र. | वर्ष | मागितलेला निधी तारीख | निधी | | विभागस्तरावर निधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिळाल्याची तारीख | रक्कम | तारीख | रक्कम |
| १ | २००६-०७ | ५/१०/२००५ | २३/६/२००६ | १०.०० | ३०/६/२००६ | १०.०० |
| | | | २९/९/२००६ | ५.०० | ५/१०/२००६ | ५.०० |
| | | | ५/२/२००७ | ८०.०० | १०/२/२००७ | ८०.०० |
| | | | एकूण | ९५.०० | | ९५.०० |
| २ | २००७-०८ | १/१२/२००६ | ३१/८/२००७ | ५.०० | ४/९/२००७ | ५.०० |
| | | | २/१/२००८ | १२०.०० | १०/१/२००८ | १२०.०० |
| | | | एकूण | १२५.०० | | १२५.०० |
| ३ | २००८-०९ | ११/११/२००७ | १९/१२/२००८ | ५.०० | २५/१२/२००८ | ५.०० |
| | | | ४/२/२००९ | ६७.०० | १०/२/२००९ | ६७.०० |
| | | | एकूण | ७२.०० | | ७२.०० |
| ४ | २००९-१० | २३/९/२००८ | २/५/२००९ | २४.०० | २५/५/२००९ | २४.०० |
| | | | २६/३/२०१० | ४८.०० | २९/९/२०१० | ४८.०० |
| | | | एकूण | ७२.०० | | ७२.०० |

**सदरचे स्पष्टीकरण मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा.**

**२.४.८.६**

**वेगवर्धित पाणलोट विकास कार्यक्रम (ए डब्लू डी पी)**

- कामाच्या कार्यान्वयना दरम्यान प्रमाणके न पाळणे

उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जल संधारण सल्लागार मंडळ यांच्या अध्यक्षते खालील एका समितीने घेतलेल्या निर्णयानुसार (जानेवारी २००८) ए डब्लू डी पी अंतर्गत, कंपार्टमेंट बंडींगची कामे अग्रक्रमाने हाती घ्यावयाची होती.एका बैठकीत असे अनुदेश दिल्या गेले होते (जानेवारी २००८) की कंपार्टमेंट बंडींगमध्ये एका नलीका निर्गम मार्गाची तरतूद केली पाहिजे, म्हणजे, जर पाण्याचा साठा एक फुटापेक्षा जास्त असेल तर पाणी जवळच्या शेतात वळविल्या जाईल. यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यास व जमीन संधारणास मदत होईल.

चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी, ३७ ताकृअ मध्ये ए डब्लू डी पी कार्यान्वित केला होता व दोन ताकृअ मध्ये कंपार्टमेंट बंडींगला निर्गम मार्गाची तरतूद न केल्याचे दिसून आले.

• ताकृअ, कडेगांव मध्ये असे दिसून आले (ऑगस्ट २०११) की, निर्गम मार्गाची तरतूद न करता २,६७९.२९ हेक्टर क्षेत्र व्यापणारे, रु.१.६७ कोटी खर्चाचे कंपार्टमेट बंडीग कार्यान्वित केल्या गेले. त्यामुळे जवळच्या जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे तसेच जमिनीचे संधारण करण्याचा हेतू विफल झाला. ताकृअ, कडेगांव यांनी नमूद केले (ऑगस्ट २०११) की, याला उविकृअ विटा यांनी तांत्रिक मंजुरी दिली होती व एकाही अंदाजपत्रकात निर्गम मार्गाची तरतूद नव्हती.

• संगमनेर तालुक्यात असे आढळून आले (जुलै २०११) की २००८-११ दरम्यान ४,६०६ हेक्टर्स मध्ये कंपार्टमेंट बंडींगची कामे घेतल्या गेली होती ज्यासाठी प्रति हेक्टर चार पाईप्स या प्रमाणकाप्रमाणे १८,४२४ आरसीसी पाईप्सची आवश्यकता होती. तथापि, रु.३७.२७ लाख किंमतीचे फक्त ६,२११ पाईप्स विकत घेतल्या गेले आणि मंडळ कृषी अधिकारी यांच्याद्वारे गावांमध्ये वितरित केल्या गेले.

• लेखापरीक्षा चमू व विभागीय अधिकारी यांच्या संगमनेर तालुक्यातील मेंढेवन व वेल्हारे गावांच्या संयुक्त क्षेत्र भेटीच्या वेळी असे दिसून आले की कंपार्टमेंट बंडीगकरिता फक्त पाच पाईप्स वापरल्या गेले होते व बाकीचे पाईप्स गावांमध्ये विखुरलेल्या अवस्थेत पडलेले होते. ताकृअ यांनी वस्तुस्थिती मान्य केली (जुलै २०११) आणि नमुद केले की, पाईप्स बसविण्यासाठी शेतकऱ्यांना पटविल्या जाईल.

शासनाने नमूद केले (ऑक्टोंबर २०११) की एक सविस्तर उत्तर सादर केले जाईल, जे प्रतीक्षित होते. (नोव्हेंबर २०११)

• **कंत्राटदारांना खंड कामकऱ्यांना रोख प्रदान**

महाराष्ट्र कोषागार नियमांच्या (मकोनि)च्या नियम ३५५(२) अनुसार, कंत्राटदारांना/पुरवठादारांना, धनादेशा द्वारे प्रदान केले पाहिजे.

चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी, दोन ताकृअ (कडेगांव व अकोले) मध्ये असे दिसून आले की, २००६-११ या कालावधीत, विविध मंडळ कृषी अधिकाऱ्यांना (मंकृअ) रु.१.९९ कोटीची रक्कम शासकीय नियमांचे उल्लघंन करून रोखीने प्रदान करण्यात आली. त्यानंतर, मंकृअ नी सुद्धा कंत्राटदारांना व खंड कामकऱ्यांना रोख प्रदान केले जे अनियमीत होते आणि ज्यामध्ये कपटपूर्ण प्रदानाचा धोका होता.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की त्या भागात बँकेचे जाळे फार विखुरलेले होते म्हणून रोख प्रदान केल्या गेले. हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण ताकृअ व मकृअ ना बँकाच्या सर्वात जवळच्या शाखांमध्ये खाते उघडावयास सांगितले पाहिजे होते.

• **घेतलेली व पूर्ण केलेली कामे यातील तूट**

या योजनेखाली २००७-११ या कालावधीत घेतलेल्या २,००२ पाणलोटांपैकी १,९६१ पाणलोट पूर्ण झाले व ४१ पाणलोट अपूर्ण राहिले.

शासनाने नमुद केले (ऑक्टोबर २०११) की ही तूट मागणी केलेल्या निधीच्या अनुपलब्धतेमुळे होती. तथापि, मागणी केलेला निधी व मिळाल्याच्या तारखा यांचा तपशील प्रतिक्षित होता (नोव्हेंबर २०११).

यामुळे दिसून येते की निधीच्या तुटवड्यामुळे लक्ष्ये साध्य होऊ शकले नाहीत. शासनाने निधीच्या उपलब्धतेची निश्चिती करावयास हवी होती.

**ज्ञापन :—**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

**कडेगाव-** गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत कडेगाव ता.सांगली मध्ये कंपार्टमेन्ट बंडीगच्या कामामध्ये नलिका निर्गम मार्गाची तरतुद केली नाही. या क्षेत्रीय उपचारमध्ये मुलस्थानी जल व मृदसंधारण होणे अभिप्रत आहे. कडेगाव, जत या अवर्षण प्रवण तालुक्यामध्ये पर्जन्यमान अत्यंत अपुरे व लहरी स्वरुपात असते. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल जास्तीत जास्त पाणी शेतामध्ये तुंबविण्याकडे असतो. शेतातील जास्तीचे पाणी शेताबाहेर जाण्यासाठी शेतकरी स्वतः दगडी बांधाच्या सहाय्याने निर्गम मार्गाची व्यवस्था करतात. त्यामुळे अंदाजपत्रकात निर्गम मार्गाची तरतुद केली नसल्याचे दिसुन येते. तथापी अंदापत्रकात निर्गम मार्गाची तरतुद असणे अत्यंत आवश्यक आहे भविष्यातील कामे करताना क्षेत्रिय कार्यालये याची नोंद घेतील कृपया परिच्छेद वगळण्यात यावा.

**तालुका कृषि अधिकारी, संगमनेर**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नगर यांचेकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणानुसार संगमनेर तालुक्यात मेंढवण व वेल्हाळे येथील कंपार्टमेंट बंडींगमध्ये पाण्याचे निर्गमन होण्यासाठी सिमेंट पाईपचा वापर करण्यात आला होता. परंतु काही शेतकऱ्यांचे बसविलेले सिमेंटचे पाईप चोरीस गेले.

पाईप चोरीला जात असल्याचे काही शेतकऱ्यांचे लक्षात आल्यामुळे काही शेतकऱ्यांनी पाईप काढून वस्तीवर आणून ठेवले. त्या शेतकऱ्यांनी पाईप पुन्हा पावसापूर्वी बसवून घेऊ असे लेखी जबाब दिलेले आहेत. तालुका कृषि अधिकारी, संगमनेर यांनी कंपार्टमेंट बंडींगचे काम करताना सिमेंट पाईप बसविले होते व त्याबाबतचे महत्त्वसुद्धा शेतकऱ्यांना पटवून दिले होते. सद्यस्थितीत पुन्हा त्या शेतकऱ्यांचे प्रबोधन करून कंपार्टमेंट बंडींगचे ठिकाणी पाईप पुन्हा बसविण्यात आले आहेत व त्यांना त्याचे महत्त्वही पटवून देण्यात आले आहे. सोबत पाईप बसविलेले कंपार्टमेंट बंडींगचे फोटो व जबाब सहपत्रित.

कंपार्टमेंट बंडींगची कामे करताना एकूण ६२११ पाईपसाठीच मंजूरी प्राप्त असल्यामुळे तेवढेच पाईप वापरण्यात आले. उर्वरित गटांना मातीचे सांडवे मंजूर असल्यामुळे मातीचे सांडवे तयार करत आलेले आहेत.

स्पष्टीकरण मान्य करून कृपया परिच्छेद वगळण्यात यावा.

तालुका कृषि अधिकारी कडेगांव हे कार्यालय दिनांक ५ ऑगस्ट २००४ रोजी नवनिर्मित झालेले आहे. सदर नवनिर्मित तालुक्यामध्ये उपकोषागार अधिकारी कडेगांव यांच्याकडून या कार्यालयातील सर्व देयके ऑगस्ट २००४ ते सप्टेंबर २००६ अखेर पारीत करून उपकोषागारातून रोखीने रक्कम अदा केली जात होती. सदर रोखीने उपकोषागार अधिकारी, कडेगांव यांच्याकडून प्राप्त झालेली रक्कम जतन करणेकरिता या कार्यालयाच्या शासकीय तिजोरीचा वापर करण्यात येत होता.

तालूका कृषि अधिकारी कडेगांव कार्यालयाकडून शा.नि.क्र.वेतन/१००२/प्र.क्र.११८/०४/कोषा - प्र-५ मुंबई, दि.२४ सप्टेंबर २००४ अन्वये फक्त मासिक वेतन व भत्ते बँकेमार्फत प्रदान करण्याची कार्यपद्धती सुरू करण्यात आली. त्यामुळे ऑक्टोंबर २००६ ते मार्च २००८ अखेर उपकोषागार अधिकारी कडेगांव मधून फक्त वेतन व भत्ते देयकेच बँकामार्फत आहरण व संवितरण अधिकाऱ्याच्या खात्यावर जमा केली जात होती. कडेगांव येथील उपकोषागार कार्यालय हे नॉन बँकींग कोषागार असल्याने देयकाची अदायगी रोखीने होत असल्याने मुकादमांना /मजूरांना त्यांची मजूरी रोखीने/चेकने उपकोषागार अधिकारी कडेगांव मधून पारित केलेली रक्कम मंडळ कृषि अधिकारी कडेगांव/चिंचणी अं. यांना त्यांचे कडून शासकीय पावती घेऊन त्यांचे मार्फत कृषि पर्यवेक्षकाद्वारे मुकादमांना / मजूरांना अदा करण्यात येत होती.

सन २००६-०७ व २००७-०८ मध्ये मंडळ कृषि अधिकारी कडेगाव /चिचंणी अ यांचे बँकेत खाते उघडण्याबाबत कोणत्याही तरतूद अथवा सूचना नसल्याने मंडळ कृषि अधिकारी कडेगांव/चिंचणी अ यांना रोखीने/चेकने रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(१) शा.नि.वित्त विभाग क्र.डीडीओ-१००७/प्र.क्र.६३/कोषा-प्र-५, दि. ७ एप्रिल २००८ अन्वये उपकोषागार कार्यालय कडेगांव यांनी सर्व देयके पारित करून ता.कृ.अ. कार्यालयाचे खात्यामध्ये रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही केली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत परिशिष्ट ४ सोबत जोडली आहे. तसेच

(२) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र./२००८/प्र.क्र.१६१/जल-७, दि १० ऑक्टोंबर २००८ अन्वये सर्व मृद् संधारण योजना अंतर्गत फुटकळ ठेकेदार मजूर/खंड कामगारांना धनादेशाद्वारे मजुरीचे प्रदान करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयाची प्रत परिशिष्ट ५ सोबत जोडली आहे.

**अकोले तालुका**

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुका हा आदिवासी व अतिदुर्गम भागात मोडतो. या तालुक्यातील मृदसंधारणाच्या विविध योजनांच्या निधीतील कामे तालुक्यामध्ये सर्वच भागातून केली जातात. दुर्गम भागात बँकांची सोय नसल्याने काही मंडल कृषि अधिकारी यांनी कंत्राटदारांना रोख रक्कम प्रदान केल्या आहेत रक्कम न मिळाल्याबाबत वरिष्ठ कार्यालयास तक्रार नसल्याने व त्यानंतर संबंधित तालुका कृषि अधिकारी/मंडल कृषि अधिकारी यांनी मृदसंधारणाच्या सर्व कामांची बिले कंत्राटदारांना बँकेमार्फत अदा केली आहेत त्यामुळे सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

राज्यात वेगवर्धित (गतिमान) पाणलोट विकास कार्यक्रम (ए डब्ल्यू डी पी) सन २००७-०८ पासून सुरू झालेला आहे. या योजनेखाली २००७-११ या कालावधीत घेतलेल्या २००२ पाणलोटांपैकी मार्च २०११ अखेर १९६१ पाणलोट पूर्ण झाले व ४१ पाणलोट अपूर्ण राहीले. सन २०११-१२ मध्ये शासन निर्णय क्र.अनुदान-२०११/प्र.क.७०/जल-७, दिनांक २२/११/२०११ ची प्रत सोबत जोडली आहे. परिशिष्ट ६ त्यानुसार सदरच्या ४१ पाणलोटांना निधी वितरीत करण्यात येऊन सदरचे ४१ पाणलोट पूर्ण करण्यात आलेले आहेत.

याबाबतचा लेखापरिक्षण कालावधीतील (सन २००६-०७ ते २००९-११) मागितलेला निधी व मिळाल्याची तारीख यांचा प्रतिक्षीत तपशील खालीलप्रमाणे :—

(रु.कोटीत)

| अ.क्र. | वर्ष | मागितलेला निधी | | शासनाकडून निधी प्राप्त | |
|---|---|---|---|---|---|
| | | तारीख | रक्कम | तारीख | रक्कम |
| १ | २००७-०८ | १/१२/२००६ | ५६.६४ | ६/२/२००८ | २८.०० |
| २ | २००८-०९ | १०/११/२००७ | २६.६४ | ३०/४/२००८ | २.५५ |
| | | | | १७/१२/२००८ | १३.२५ |
| | | | | २१/१/२००९ | ५.८० |
| | | | | ९/२/२००९ | ६५.८६ |
| | | | | ३१/३/२००९ | ०.३६ |
| | | | | एकूण | ८७.८२ |
| ३ | २००९-१० | २३/९/२००८ | ४००.०० | ११/२/२०१० | ७.१३ |
| ४ | २०१०-११ | २०/२/२०१० | ५००.०० | १६/६/२०१० | ११.१३ |
| | | | | ९/३/२०११ | ५१.०० |
| | | | | एकूण | ६२.१३ |

**सदरचे स्पष्टीकरण कृपया मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा.**

**२.४.८.७**

**संकीर्ण बाबी**

**(i) माथा ते पायथा तंत्राचा अवलंब न करणे**

संचालकाचे अनुदेश (मार्च १९९७) व पाणलोट क्षेत्र विकास मार्गदर्शक तत्वांतील तरतुदींप्रमाणे, पाणलोटांवरील मृद् व जलसंधारण कामे, माथा ते पायथा तंत्राचा अवलंब करून (वरच्या भागापासून खालच्या भागापर्यंत), वरच्या भागातील सीमांतीक जमिनींचा विकास करण्यासाठी व खालच्या भागातील सिमेंट नाला बांध, माती नाला बांध किंवा शेततळी यांतील गाळ कमी करण्यासाठी कार्यान्वित करावयाची होती.

निवडलेल्या ३९ ताकृअ पैकी सात ताकृअ मध्ये असे दिसून आले की शेतकऱ्यांच्या मागणीमुळे माथा ते पायथा तंत्राचा अवलंब केल्या गेला नाही व सी सी टी, एल बी एस मातीचे बांधकाम, जिवंत नियंत्रण बांध अशा पाणलोटाच्या वरील/मधल्या भागातील कामांकडे दुर्लक्ष करून जास्त भर सिमेंट नाला बांध, माती नाला बांध किंवा शेततळी या खालच्या भागातील कामांवर दिल्या गेला. प्रकरणांचा तपशील परिशिष्ट २.४.१० मध्ये दिला आहे.

- ताकृअ, जथ यांनी नमूद केले (जून २०११) की LBS च्या कामाकरिता आवश्यक बोल्डर्सच्या जवळपासच्या क्षेत्रातील अनुपलब्धते मुळे वरच्या व मधल्या भागातील कामे रद्द केल्या गेली.

- ताकृअ, आटपाडी यांनी नमूद केले (जून २०११) की शेतकऱ्यांची मागणी व स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार करून, वरच्या भागातील कामांकडे दुर्लक्ष करून खालच्या वा मधल्या भागातील कामांवर जास्त भर दिला गेला.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की व्ही डब्लू डी एम मध्ये प्रदेशाची स्वाभाविक रचना लक्षात घेऊन जास्त कामे खालच्या भागात घेतल्या गेली. एमडब्लूडीएम च्या बाबतीत, असे नमूद केल्या गेले की, शेतकऱ्यांच्या विरोधामुळे कामे वगळल्या गेली.

ही उत्तरे मान्य करण्यासारखी नाहीत कारण या सर्व बाबी नियोजनाच्या टप्प्याच्या वेळीच लक्षात घ्यावयास हव्या होत्या.

**(ii) पाटबंधारे प्रकल्पांच्या प्रभुत्व क्षेत्रात कामाचे कार्यान्वयन**

मृद व जलसंधारण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे, पाटबंधारे प्रकल्पांच्या/योजनांच्या प्रभुत्व क्षेत्रात असणारी गांवे पाणलोटच्या विकासासाठी निवडू नयेत तथापि, असे आढळून आले की अकोले व अर्धापूर तालुक्यांत अनुक्रमे रु.३.१७ कोटी व रु.३५ लाखाची मृद् व जलसंधारण कामे, पाटबंधारे प्रकल्पांच्या प्रभुत्व क्षेत्रात घेतल्या गेली.

ताकृअ, अकोले यांनी नमूद केले की प्रकल्पाच्या प्रभुत्व क्षेत्राच्या पुच्छ टोकाला कामे घेतल्या गेली जिथे पाणी पोहचू शकत नव्हते.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण शेततळ्यांची कामे प्रभुत्व क्षेत्रात घेणे योजनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या विरुद्ध होते. याशिवाय, पुच्छ टोकाला पाणी पोहचले नाही हे सिद्ध करणारा कुठलाही अभिलेख नव्हता. अर्धापूरच्या बाबतीत उत्तर आलेले नव्हते. (नोव्हेंबर २०११.)

### (iii) विविध योजनांखालील अपूर्ण कामे

२००६-११ या कालावधीत मृद् व जलसंधारण कामे निवडक योजनांमध्ये घेतल्या गेली. असे आढळून आले की निवडलेल्या ३९ ताकृअ पैकी १४ ताकृअ मध्ये विविध योजनांखाली कामे अपूर्ण राहिली. चाचणी-तपासणी केलेल्या घटकांतील अपूर्ण कामांचा योजना-निहाय तपशील,कारणांसह परिशिष्ट २.४.११ मध्ये दिला आहे. असे आढळून आले की लाभार्थीची निकृष्ट आर्थिक स्थिती, निधी न देणे शेतकऱ्यांच्या संमतीचा अभाव, गांवकरी आणि पाणलोट समित्यांमधील विवाद इ. कारणांमुळे कामे अपूर्ण राहिली (जून, २०११) हे निकृष्ट प्रकल्प नियोजन, लाभार्थी मधील जागृतीचा अभाव, निकृष्ट निधी व्यवस्थापन, संनियत्रणाचा अभाव व योजनेचे निकृष्ट कार्यान्वयन दर्शविते.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की पूर्ण झालेल्या कामांची अद्यावत स्थिती कळविल्या जाईल, जी प्रतिक्षित होती (नोव्हेंबर, २०११)

### (iv) पाणलोट विकास कामांची परिरक्षा न करणे

विविध पाणलोट विकास योजनांचे एक मुख्य उद्दिष्ट, या भागातील कृषी उत्पादकता वाढवणे आणि या प्रकारे लाभार्थिचा आर्थिक दर्जा उंचावणे हे होते. तसेच, प्रत्येक पाणलोट प्रकल्पांची सर्व बांधकामे जसे सिमेंट नाला बांध, कंपार्टमेंट बंडींग, सी सी टी, शेततळी, इ. ही कालोघामुळे व पाण्यात गाळ साचल्यामुळे हानिप्रवण असल्याने, निर्माण केलेल्या बांधकामांची पाणी साठविण्याची क्षमता कमी झाली.

चाचणी तपासणी केलेल्या तीन ताकृअ मध्ये (जथ, मिरज व औसा) असे दिसून आले की जरी रु.३४.४८ कोटीची रक्कम (जथ रु.२६.७४ कोटी, मिरज रु.५.१५ कोटी व औसा रु.२.५८ कोटी) मृद् व जल संधारण कामांवर २००६-११ या कालावधीत, एन डब्लू डी पी, एन ए डी पी, ए डब्लू डी पी, आर व्ही पी या खाली खर्च केल्या गेली, तरी त्यांच्या परिक्षेकरिता काहीही खर्च केल्या गेला नाही.

या प्रकारे, भविष्यकाळातील परिक्षेकरिता कुठल्याही व्यवस्थेच्या अभावामुळे अवाढव्य खर्च करून निर्माण केलेल्या या संपत्तीचे आयुष्य आणि उपयोगिता कमी होईल आणि ते अपेक्षित लाभ देऊ शकणार नाहीत.

वस्तुस्थिती मान्य करताना, शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की २०११-१२ मध्ये पाणलोट विकास कामांच्या परिक्षेकरिता तरतूद केल्या गेली आहे.

### (V) सिमेंटच्या प्रापणातील अनियमितता

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अहमदनगर यांच्या अभिलेखांच्या छाननीत, प्रदानातील पुढील नियमबाहयता उघडकीस आल्या.

सिमेंट पुरवठ्याच्या अटी व शर्तीच्या, शर्त क्रमांक २ (अ) नुसार, रेल्वे पावतीसह उत्पादकाकडून सिमेंटचा माल प्रत्यक्ष प्राप्त झाल्यावर सिमेंटच्या किंमतीच्या ९८ टक्के जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याने प्रदान करावयाची होती. सिमेंट उर्वरित दोन टक्के किंमत, सिमेंट चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्यावर ३० दिवसांच्या आत प्रदान करावयाची होती. असे दिसून आले की, २००९-११ दरम्यान मागणी केलेल्या एकूण परिमाणाचे (१,१६०.१३ मे. टन) पूर्ण प्रदान (रु. ३५.६६ लाख) केल्या गेले. फक्त १००० मे. टन सिमेंट पुरविल्या गेले व उर्वरित रु. ४.९२ लाख किंमतीचे १६०.१३ मे. टन सिमेंट, जुलै, २०११ पर्यंत पुरविल्या गेले नव्हते. सिमेटच्या विलंबाने पुरवठ्याकरिता दर कंत्राटात काही शिक्षा खंड नसल्यामुळे पूर्ण परिणाम पुरवठा न केल्याबद्दल कंत्राटदाराला काही शिक्षा देता आली नाही. हा मुद्दा मान्य करताना शासनाने नमूद केले (ऑक्टोबर, २०११) की शिक्षा खंडाचा समावेश करून अटी व शर्ती सुधारित केल्या जातील.

- अहमदनगर पर्यंत सिमेंटची वाहतूक करण्याकरिता दर कंत्राट फर्मने चुकीच्या वाहतूक भाराचा दावा केल्याचा परिणाम तक्ता ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहतूक भाराच्या जादा प्रदानात झाला.

**तक्ता ७ : वाहतुक भाराचे प्रदान**

| वर्ष | प्रापण केलेले सिमेंट (मे.ट) | कंपनीच्या देयकाप्रमाणे वाहतूक भाडे (रु.प्रति मे ट) | रेल्वे प्राधिकाऱ्या प्रमाणे प्रत्यक्ष वाहतूक भाडे(रु. प्रति मेट) | कंपनीने लावलेले जादा वाहतूक भाडे (रु.प्रति मेट) | जादा प्रदान (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| २००८-०९ | ३,८१०.५८ | ४८८.८० | ४२०.३० | ६८.५० | २,६१,०२५ |
| २००९-११ | १,१६०.१३ | ४८०.०० | ४२०.३० | ५९.७० | ६९,२६० |
| एकूण | ४,९७०.७१ | | | | ३,३०,२८५ |

शासनाने रेल्वे प्राधिकाऱ्याकडून वस्तुस्थिती पडताळण्याचे मान्य केले (ऑक्टोबर, २०११)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**परिशिष्ट २.४.१०**

**विदर्भ पाणलोट विकास मिशन - बुलढाणा-शेगाव तालुका**

बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव तालुक्यातील विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत ७ पाणलोटांची निवड करण्यात आली होती. ७ पाणलोटांचे प्रकल्प मूल्य रु.२२५.९७ लाख आहे. सदरहू पाणलोटामध्ये मृद् व जलसंधारण उपचारांतर्गत त्यामध्ये वरच्या भागात लूज बोल्डर स्ट्रक्चरच्या साईट उपलब्ध नसल्यामुळे कामे होऊ शकली नाहीत. झालेल्या कामाची टक्केवारी १.८० आहे.

पाणलोटाच्या मध्य भागात ढाळीचे बांधाची कामे २८ गट १६८७ हेक्टर यासाठी निधी रु.६८.५४ लाख व २६९ शेततळ्यासाठी निधी रु.९५.४९ लाख इतक्या निधीची कामे झालेली असून झालेल्या कामाची टक्केवारी ७२.५८ आहे.पाणलोटाच्या खालच्या भागात सिमेंट नाला बांधाची १८ कामे रु.४४९५ लाख व माती नाला बांधाची २ कामे रु.६.६९ लाख इतक्या निधीची कामे झालेली असून झालेल्या कामाची टक्केवारी २२.८५ आहे.व्हीडब्ल्यूडीएम अंतर्गत शेगांव तालुक्यात झालेल्या कामाचा अहवाल परिशिष्ट ७ सोबत जोडला आहे.

नदी खोरे प्रकल्प अंतर्गत तालुका कृषी अधिकारी, जत यांचे कार्यक्षेत्रात माथा ते पायथा काम करीत असतांना ज्या शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात काम करण्यास संमती दिली त्या शेतकऱ्यांच्या शेतात सीसीटी, लूज बोल्डर, वृक्ष लागवड चेकबंडचे काम केले होते.प्रकल्प अहवाल तयार करतेवेळी पडीक, क्षेत्रामध्ये फळबाग लागवड अल्प प्रमाणात होती. परंतु नंतर नवीन विंधन विहिरी झाल्यामुळे व माती नालाबांधामुळे पाण्याची उपलब्धता झाली असल्यामुळे फळबाग लागवड क्षेत्रात वाढ झाली. फळबाग लागवड झाल्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रात सीसीटी व लूज बोल्डरचे काम करण्यास समंती दिली नाही. त्यामुळे लूज बोल्डरचे काम मूळ मंजूर कार्यक्रमाप्रमाणे होऊ शकले नाही. लूज बोल्डरचे काम ओघळीच्या परिसरात उपलब्ध असलेल्या दनघड दगडापासून काम करावयाचे असते, परंतु काही शेतकऱ्यांकडून फळबागेचे कंपांऊंड करणे, कच्चे घरे व जनावरांचे गोठे यासाठी दगडांचा वापर करण्यात आला, म्हणून लूज बोल्डरचे काम कार्यक्रमाप्रमाणे होऊ शकले नाही. त्यामुळे मुळ मंजूर प्रकल्प अहवाल सुधारित करण्यात आला व या सुधारित अहवालास केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ क्र.४-१९/२००७-एनआरएम-१, दि. १५ मार्च २०१० अन्वये मान्यता प्राप्त करून घेण्यात आली. भौगोलिक परिस्थितीनुसार जेथे माती नाला बांध व कंपार्टमेंट बंडीगचे काम करणे शक्य आहे व शेतकऱ्यांची जेथे संमती मिळाली,अशा ठिकाणी काम करण्यात आले आहे. त्यामुळे मृद् संधारणाचा उद्देश जास्तीत जास्त साध्य झाला आहे.

| उपचाराचेनाव | एकूण मंजूर कार्यक्रम | | झालेले काम | | एकूण सुधारित मंजूर कार्यक्रम | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| माती/दगडी बांध | १,३८८ | ५८.९४ | १६० | ४.३८ | १६० | ४.३८ |

**तालुका कृषि अधिकारी, लातूर**

पाणलोटातील कामे चालू केल्यानंतर लाभधारक शेतकरी व ग्राम विकास समिती यांनी समतल सलग चर (सी.सी.टी) माती नाला बांध व दगडी पौळ (एलबीएस)या सारख्या कामांना नियोजनांमध्ये असूनही सहमती दिली नसल्यामुळे सदरील कामे करण्यात आलेली नाहीत.त्यामुळे सुधारित आराखडयात वरील कामे वगळली होती.सदरील वगळलेल्या कामात विभागीय मराठवाडा पाणलोट विकास समिती यांचेकडून परवानगी घेतली होती.

**तालुका कृषि अधिकारी,कोपरगाव, जि. अ. नगर-**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अ. नगर यांचेकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणानुसार कोपरगाव तालुक्याचे क्षेत्र हे नैसर्गिकरित्या सखल असल्याने तेथे डोंगर, दऱ्या, ओढे, नाले, झरे फार कमी प्रमाणात आहेत.

पाणलोट विकास कामाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मृद् संधारण कामे करताना प्रथम अप्पर रिचेस, मिडल रिचेस व तद्नंतर लोअर रिचेस मधील कामे करण्याबाबतच्या सूचना आहेत. तथापि कोपरगाव तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र हे नैसर्गिकरित्या सपाट असल्याने तेथे अप्पर रिचेस, मिडल रिचेसची कामेच उपलब्ध नाहीत. त्यामुळे लोअर रिचेस मधील कामे करण्यात आलेली आहेत. याबाबत सन २००७-०८ ते २०११-१२ च्या यथार्थदर्शी आराखडयामध्ये सुद्धा लोअर रिचेसचीच कामे प्रस्तावीत करण्यात आलेली आहेत.कोपरगांव तालुक्याच्या यथार्थदर्शी आराखडयाप्रमाणे संबंधित कार्यालयाने अप्पर रिचेस व मिडल रिचेस मधील कामे शिल्लक नसल्याने लोअर रिचेसची कामे केलेली आहेत. सोबत सदरचा यथार्थदर्शी आराखडा व झालेल्या कामाचे सन एप्रिल, २००४ ते मार्च २००९ अखेर बाबनिहाय कामाचे विवरणपत्र परिशिष्ट ८ येथे सहपत्रित केले आहे.

स्पष्टीकरण मान्य करून कृपया परिच्छेद वगळण्यात यावा.

**तालुका कृषि अधिकारी, दारव्हा, जि. यवतमाळ**

पाणलोटांची कामे ही प्रामुख्याने दोन प्रकारची आहेत. (१) क्षेत्रीय उपचार (२) ओघळ नियंत्रण , यांचा मुख्य उद्देश म्हणजे जमिनीची होणारी धूप थांबविणे हे आहे. क्षेत्रीय उपचार मध्ये सलग समतजचर, ढाळीचे बांध ही कामे घेतली जातात यावर ५०% पेक्षा जास्त, खर्च झालेला आहे. प्रकल्पामध्ये झालेल्या कामांची संख्या व मंजूर रक्कम ही जिल्हा समितीने मंजूर केल्यानुसार असून खात्याच्या मार्गदर्शक सूचनेनुसार केलेली आहे असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ यांनी कळविले आहे.

**तालुका कृषि अधिकारी,अर्धापूर जिल्हा नांदेड**

अर्धापूर तालुका लाभक्षेत्रात येत असून सन २००७,२००८, व २००९ या सलग तीन वर्षात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील लाभ क्षेत्रामध्ये जलसंधारणाची कामे व शेततळ्यांची कामे घेण्यासाठी ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्र. जलसं-२०१०/ प्र.क्र.२०/जल-७, दि. ३० एप्रिल २०१० अन्वये खास बाब म्हणून मंजुरी दिली होती. त्यानुसार अर्धापूर तालुक्यात जुलै,२०१० पर्यंत (सन २०१०-११) शेततळ्यांची कामे घेण्यात आली. त्यानंतर मात्र शेततळ्यांची कामे करण्यात आलेली नाहीत. सोबत उपरोक्त पत्र व सन २००१ ते २०१० मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रत्यक्षात पडलेल्या पावसाची माहिती परिशिष्ट ९ सोबत जोडली आहे.

**जिअकृअ, नाशिक-**

जिअकृअ, नाशिक यांनी कळविलेप्रमाणे लेखा परिक्षण करतेवेळी अहवालानुसार राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शेततळे करणेसाठी १३०३ लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. त्यापैकी ८०० लाभार्थीना शेततळे पूर्ण केलेले आहेत व ४३२ शेततळे करणे शिल्लक होते. (१३०३-८७१ = ४३२). क्षेत्रीय पातळीवर कार्यारंभ आदेश देताना दोन महिन्याचे आत शेतकऱ्यांचे काम सुरू केले पाहिजे असे अपेक्षित आहे.तथापी शेतकऱ्यांच्या क्षेत्रीय पातळीवरील अडचणी (शेतात पिके असणे,आर्थिक स्थिती) विचारात घेता कार्यारंभ दिलेले सर्व लाभार्थी शेततळ्याचे कामास सुरुवात करतीलच असे नाही.त्यामुळे शेतकऱ्यांच्या क्षेत्रीय पातळीवरील अडचणीमुळे लेखा परिक्षणाच्या वेळी ४३२ शेततळेचे काम बाकी होते. तथापी दिनांक ३१ मे २०१२ अखेर सदर योजनेत सुरुवातीपासून १३४२ लाभार्थीनी शेततळ्यांची कामे पूर्ण केली आहेत त्यांना अनुदान अदा करणेत आलेले आहे.

कृपया स्पष्टीकरण मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**तालुका कृषि अधिकारी, उदगीर जि. लातूर -**

उद्गीर तालुक्यातील ७२ पाणलोटांपैकी सन २००७-०८ मध्ये गतिमान पाणलोट विकास योजनेतंर्गत एकूण पाणलोटांची निवड करण्यात आली होती. या पाणलोटाचे एकूण प्रकल्प मुल्य रु. १४२.४२ लाख एवढे होते. त्यापैकी २००७-०८ ते मार्च, २०१२ पर्यंत ८६.६९ लाख (अक्षरी शहाऐंशी लाख एकोणसत्तर हजार) अनुदान प्राप्त झाले असून यामधून ३० कामे पूर्ण करण्यात आली उर्वरीत कामे अनुदान प्राप्त होताच पूर्ण करण्यात येतील त्यामुळे सदरील परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

**तालुका कृषि अधिकारी, श्रीरामपूर-**

श्रीरामपुर तालुक्यात गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत सराला, महाकाळ वडगाव व भामाठाण येथील अपूर्ण पाणलोटाची निवड केलेली होती. सन २००९-१० व सन २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये सदरील अपूर्ण पाणलोट पूर्ण करण्यात आले आहे.

| अ.क्र. | पाणलोट | मंजूर कार्यक्रम | खर्च |
|---|---|---|---|
| १ | भामाठाण | ४२.४८ (सन १०-११) | ४२.४८(मार्च ११) |
| २ | महाकाळवडगाव | २२.६०(सन १०-११) | २२.६०(मार्च ११) |
| ३ | सराला | ३२.७१(सन ०९-१०) | ३२.७१ (मार्च १०) |

सोबत गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांच्या सन २००९-१० व २०१०-११ च्या मार्गदर्शक सूचना व खर्चाच्या अहवाल सहपत्रित करण्यात येत आहे. कृपया सदर परिच्छेदाचा सुधारित अनुपालन अहवाल आपले स्तरावरुन ग्राहय धरण्यात यावा.

**जिल्हा रायगड**

राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत रायगड जिल्ह्यामध्ये रक्कम रु. ८.०० कोटी रकमेची ११८ सिमेंट नाला बांध व ४१ वळण बंधाऱ्याची कामे मंजूर करण्यात आली होती.माहे मार्च,२०११ चे प्रगती अहवालानुसार रु.२.६६ कोटी रकमेची कामे हाती घेण्यात आली होती.सदरची कामे सन २०११-१२ मध्ये हाती घेऊन १२६ सिमेंट बंधाऱ्यावर रु.७.०८ कोटी व ४५ वळण बंधाऱ्यांवर रु.०.९२२५ कोटी खर्च करण्यात आला. सदरची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

नदी खोरे प्रकल्प योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यामध्ये सन २००२-०३ पासून १२ प्रकल्प कार्यान्वीत होते. केंद्र शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने सदरील प्रकल्प वेळेत पूर्ण होऊ शकले नाही.

**तालुका कृषी अधिकारी, अलिबाग**

गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत अलिबाग तालुक्यातील २ पाणलोटाची रु.०.७६ कोटीचा कार्यक्रम प्रस्तावित होता. त्यामध्ये १२ सिमेंट नाला बांध व ४ वळण बंधारे प्रस्तावित होते. त्यासाठी माहे, फेब्रुवारी २०११ मध्ये रु.०.६५१० कोटी निधी दिला गेला. परंतु वाळुचे अनुपलब्धतेमुळे सिमेंटची कामे पूर्ण करता आली नाहीत. सदरची कामे बेलोशी व ताडवागळे या पाणलोटात सन २०११-१२ मध्ये पूर्ण करण्यात आली असून, त्यामध्ये १२ सिमेंट बंधाऱ्यावर रु.०.५८६९ कोटी व ४ वळण बंधाऱ्यावर रु.०.०६४१ कोटी असा एकूण रु.०.६५१० कोटी प्राप्त अनुदान खर्च करण्यात आले आहे. विस्तृत अहवाल परिशिष्ट १० सोबत जोडला आहे.

गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत तालुका निहाय ७ प्रकल्पांची सद्यस्थिती खालील प्रमाणे .

| तालुका | प्रकल्प अंतर्गत पाणलोट | प्रकल्पांची किंमत (रु.लाख) | काम प्रारंभ झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची सध्याची स्थिती | अपूर्ण कामाची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| वरुड | हुमनपेठ | ३१.६२ | २००७-०८ | अपूर्ण | पुरवठादाराने सिमेंटचा पुरवठा न केल्यामुळे ८ सिनाबां रक्कम रु.१९.७९ लाखाची कामे अपूर्ण आहेत. सिमेंट प्राप्त होताच पाणलोट पूर्ण होईल. |
| चिखलदरा | खारीबाबा | ४३.०० | २००९-१० ते २०११-१२ | | पूर्ण सन २००९-१० व २०१०-११ मध्ये जिल्हास्तर आदिवासी उपयोजना निधीतून अपुरा निधी प्राप्त झाल्यामुळे त्यावर्षी पाणलोट अपूर्ण होते. सन २०११-१२ च्या प्राप्त निधीतून पाणलोट पूर्ण |
| चिखलदरा | आमली | १०.८४ | २००९-१० | अपूर्ण | सन २००९-१० मध्ये पाणलोटातील सिमेंट नाला बांध कामे सिमेंटचा पुरवठा न झाल्यामुळे अपूर्ण होती, ती नंतर पूर्ण झाली. स्थानिक मजुरांची मग्रारोहयो अंतर्गत कामांची मागणी असल्यामुळे प्रकल्पातील अकुशल कामे मग्रारोहयोतून समाविष्ट केली आहे. |
| चिखलदरा | वस्त्रापूर | १०.२४ | २००९-१० | अपूर्ण | अनगड दगडी बांधाची कामे शेतकऱ्यांनी करू न दिल्यामुळे भौतिक दृष्ट्या पाणलोट अपूर्ण दिसत आहे. तथापि, आर्थिक दृष्ट्या पाणलोट पूर्ण आहे. |
| चिखलदरा | बोराळा | २२.३१ | २००९-१० व २०१०-११ | अपूर्ण | सन २००९-१० मध्ये रु.५.४५ लाख व सन २०१०-११ मध्ये रु.४.६७ लाख अनुदान प्राप्त झाले. अपुरा निधी प्राप्त झाल्याने सदरचा पाणलोट अपूर्ण आहे.<br>सन २०१२-१३ मध्ये मंजूर तरतुदी मधून हा पाणलोट पूर्ण होईल. |
| चिखलदरा | कडगा-भांडूम | २२.८४ | २०१०-११ व २०११-१२ | पूर्ण | सन २०१०-११ मध्ये रु.७.७४ लाख अनुदान प्राप्त झाले होते. अपुऱ्या निधीमुळे हा पाणलोट अपूर्ण राहिलेला होता. सन २०११-१२ मध्ये प्राप्त निधी रक्कम रु.६.४४ लाख मधून सदरचा पाणलोट पूर्ण झाला आहे. |
| अंजनगाव सुर्जी | चिंचोली शिंगणे | २३.४३ | २००७-०८ | अपूर्ण | प्रकल्पात असलेली खोदतळे व लहान माती बांध कामे शेतकऱ्यांनी करू दिली नाहीत. त्यामुळे प्रकल्प भौतिक दृष्ट्या अपूर्ण दिसतो. तथापि आर्थिक दृष्ट्या पाणलोट पूर्ण झाला आहे. |

सदरचे स्पष्टीकरण कृपया मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा.

**तालुका कृषि अधिकारी,जत/मिरज-**

पाणलोट विकासाच्या कामामध्ये क्षेत्र उपचार व नाला उपचारांचा समावेश आहे. ही सर्व कामे नैसर्गिक स्त्रोतांची बळकटीकरण करणे यामध्ये मोडतात. कंपार्टमेंट बंडीग सीसीटी मजगी ही क्षेत्र उपचाराची कामे असुन ती खाजगी मालकीच्या वैयक्तीक शेतकऱ्यांच्या शेतावर करण्यात येतात. या उपचारांचे आयुष्यमान शासनाने ठरवून दिलेले आहे. तथापि शेतकऱ्यांनी स्वतःची बांध दुरुस्तीची कामे स्वखर्चाने करावयाची आहेत व ही कामे शेतकरी स्वतः पावसाळ्यापुर्वी स्वखर्चाने करीत असतात.

माती नाला बांधा, सिमेंट नाला बांधा ही नाला उपाचारांची कामे आहेत. ती सार्वजनिक नाल्यावर केली जातात. त्यामध्ये साठलेल्या पाण्यामुळे भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण होते. त्यामुळे अशा उपचारांची देखभाल स्वतः शेतकरी करतात. उपचाराच्या पाणीसाठ्यात साचलेला गाळ स्वखर्चाने वर्गणी काढून बाहेर काढतात.

सध्या महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानामधुन लोकसहभागातुन ही कामे केली जातात त्यामुळे पाणलोटाच्या विकास कामासाठी परिरक्षेकरिता तरतूद नसली तरी देखभालीची कामे लोकांमध्ये जनजागृती झाल्याने शेतकरी स्वतः लोकसहभागातुन करतात.

**तालुका कृषी अधिकारी, औसा.**

औसा तालुक्यामध्ये सन २००६ ते २०११ या कालावधीत मृद् व जलसंधारण कामावर रु.२.५८ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.सदरील कामाचे परिरक्षण करणेबाबत शासनाचे ऑक्टोबर २०११-१२ मध्ये पाणलोट विकास कामाच्या परिरक्षेकरिता तरतूद केली गेली आहे.या तरतूदीप्रमाणे या तालुक्यातील पाणलोट विकासाची झालेली कामे ज्या गावात झालेली आहेत, त्या गावचे ग्राम पंचायतीचे पाणलोट समिती बँक खात्यावर कामाच्या दुरुस्तीसाठी व देखभाली साठी निधी जमा करण्यात आलेला आहे.या कामाच्या कालावधीत सन २०११ मध्ये समाप्त झालेला आहे. सदरील कामे दुरुस्त करण्याचे किंवा देखभाल करण्याचे या पुढील काळामध्ये काही कामाच्या बाबतीत दुरुस्ती व देखभाल करावी लागली तर ज्या पाणलोटातील संबंधित ग्राम पंचायतीना ताकृअ, औसा कार्यालयाने केलेल्या हस्तांतरण कामाचे जसे प्रत्येक पाणलोटात सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, कंपार्टमेंट बंडींग, सीसीटी, शेततळे इ. कामामध्ये गाळ साचल्यामुळे हानीप्रवध असल्याने त्या कामास दुरुस्ती व देखभाल करण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात आल्या आहेत.

सदरचे स्पष्टीकरण कृपया मान्य होऊन परिच्छेद वगळण्यात यावा.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर कार्यालयामार्फत दि. ३ मार्च २००९ रोजी ग्रासीम इंडस्ट्रीज,मुंबई यांना ११६० मे.टन सिमेंट पुरवठयाचे आदेश देण्यात आले. यापैकी कंपनीकडून ११२८.८० मे. टन सिमेंटचा पुरवठा झालेला आहे.यानुसार कंपनीकडून ३१.३३ मे. टन सिमेंट प्राप्त होणे आवश्यक होते. तद्नंतर संबंधित कार्यालयाने आणखी ३१.९८ मे. टन सिमेंटची मागणी कंपनीकडे नोंदविली. याप्रमाणे एकूण ६३.३१ मे. टन सिमेंट कंपनीकडून पुरवठा न झाल्यामुळे या सिमेंटबाबत अदा केलेली रक्कम रु. २०५२८०.७७ व रेल्वे वाहतुकी पोटी अदा केलेली रक्कम रु.३०३८८.८० अशी एकूण रक्कम रु.२,३५,६६९.५७ परत करण्याविषयी संबंधित कार्यालयाकडून कंपनीकडे पाठपुरावा सुरू आहे. कंपनीकडून सिमेंटच्या विलंबाने पुरवठयाकरिता सन २०११-१२ या वर्षातील दर करारामध्ये शिक्षा खंडाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरिता ग्रासीम सिमेंट कंपनीचे मालखेड उत्पादन स्थळापासून रेल्वेरेकद्वारे सिमेंट वाहतूक करणे करिता जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर कार्यालयाने तेथील रेल्वे कार्यालयाकडून वाहतुकीसाठी येणारा अपेक्षित खर्च मागविला आहे. त्यानुसार रेल्वे कार्यालयाने खालीलप्रमाणे मालखेड ते अहमदनगर पर्यंत प्रति मे.टन सिमेंट वाहतूकीचा खर्च कळविला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रेल्वे वाहतूक रु | : | ४२०.३० प्रती मे.टन |
| २. | अतिरिक्त ७% बिझी रु.<br>सिझन चार्जेस | : | २९.४२ प्रती मे.टन |
| ३. | २% डेव्हलपमेंट चार्जेस रु. | : | ८.४१ प्रती मे.टन |
| ४. | टर्मिनल चार्जेस रु. | : | ४०.०० प्रती मे.टन |
| | एकूण रूपये | : | ४९८.१३ प्रती मे.टन |

वरीलप्रमाणे मालखेड ते अहमदनगर पर्यन्त रेल्वे वाहतुकीद्वारे येणारा खर्च हा रक्कम रु.४९८.१३ प्रती मे.टन इतका येत आहे.तथापि,सन २००८-०९ मध्ये कंपनीने सदरील कार्यालयाकडून सिमेंट वाहतुकीसाठी रक्कम रु.४८८.८० प्रती मे.टनाची आकारणी केली आहे. त्यामुळे सन २००८-०९ मध्ये जादा रकमेचे प्रदान करण्यात आले.

रेल्वे प्राधिकाऱ्यांकडील दर पत्रकानुसार सन २००९-१० या कालावधीकरिता मालखेड ते अहमदनगर रेल्वे वाहतूक भाडे रु. ४७८.७१ प्रति मे.टन होते. कंपनीकडील दर पत्रकानुसार रु. ४८० मे. टन दराने कंपनीस वाहतूक भाड्याची रक्कम अदा करण्यात आली.याप्रमाणे ११६०.१३ मे. टन सिमेंटच्या वाहतुकीसाठी एकूण रक्कम रु. ५५६८६२.४० कंपनीकडे जमा करण्यात आली आहे.

सदर रेल्वे वाहतूकीसाठी जादा झालेल्या प्रदानाची रक्कम रु. १४९६.५७ (४८०.०० - ४७८.७१ = १.२९ × ११६०.१३ = १४९६.५७) परत करण्याविषयी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,अहमदनगर कार्यालयाकडून कंपनीकडे पाठपुरावा सुरू आहे. तरी कृपया सदरील परिच्छेद वगळण्यात यावा.

**२.४.९**

**लक्ष्ये आणि साध्ये**

राज्यातील निवडलेल्या योजनांच्या बाबतीत,लक्ष्ये आणि साध्ये यांची २००६-११ दरम्यानची स्थिती परिशिष्ट २.४.१२ मधील तपशीलाप्रमाणे होती.

- असे आढळून आले की एन. ए. डी. पी. खाली बांधावयाच्या शेततळ्यांच्या ७९,००० या लक्ष्याच्या तुलनेने २००७-११ दरम्यान ६२,०१८ शेततळी बांधल्या गेली.
- एन. डब्लू. डी. पी. मध्ये, २००६-११ साठी १,३७,४४७ हेक्टर्स चे लक्ष्य होते,त्याच्या तुलनेत १,३६,८४९ हेक्टर व्यापला गेले.
- एम. डब्लू. डी. एम. खाली, आठ मेगा पाणलोट व २८५ सुक्ष्म पाणलोटामध्ये एकूण १.७७ लाख हेक्टर क्षेत्र उपचारासाठी निवडल्या गेले. कामे अजूनही सुरूच होती.
- व्ही. डब्लू. डी. पी. खाली ७०३ पाणलोटा मध्ये एकूण ७.०८ लाख हेक्टर क्षेत्र उपचारासाठी निवडल्या गेले. तथापि, फक्त ६६७ पाणलोट पूर्ण झाले व उर्वरित ३६ पाणलोट मार्च २०११ पर्यंत अपूर्ण होते.
- ए. डब्लू. डी. एम. खाली, २००७-११ साठी २,००२ पाणलोटांचे लक्ष्य होते, त्याच्या तुलनेत १,९६१ पूर्ण झाले.
- आरव्हीपी खाली,२००६-११ दरम्यान २,०६,०३४ हेक्टर्स मध्ये मृद् व जलसंधारण कामे कार्यान्वित करावयाची होती.तथापि फक्त १,७४,२९० हेक्टर व्यापला गेले होते.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेमध्ये लाभार्थी शेतकऱ्यांनी शेततळ्याचे काम कृषि विभागाकडे तांत्रिक मार्गदर्शनातून स्वतः खोदून पूर्ण करावयाचे होते व नंतर त्यापोटी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कृषि विभागाने करावयाची होती. काही लाभार्थ्यांना शेततळे घ्यावयाचे होते. तसा त्यांनी विभागाकडे अर्जही केला आहे. तथापि स्वतःकडे शेततळे खोदण्यासाठी पुरेसा पैसा नसल्याने शेततळे खोदलेले नव्हते. त्यामुळे ऑडिटच्या काळात उद्दिष्टपूर्ती कमी दिसून येते. तथापि सदर योजना मे २०१२ अखेर सुरू ठेवून उपलब्ध निधीतून ७३,३२८ शेततळे पूर्ण करण्यात आली आहेत. मोठ्या आकाराची शेततळे घेतल्याने उद्दिष्ट पूर्ती कमी झाली आहे.

मराठवाडा पाणलोट मिशनमध्ये ८ मेगा पाणलोटांमध्ये २८५ सूक्ष्म पाणलोटांतर्गत एकूण १.७७ क्षेत्र मार्च २०१२ अखेर उपचारित झाले आहे.

विदर्भ पाणलोट मिशनमध्ये सूक्ष्म पाणलोटामधून एकूण ७.०८ लक्ष हेक्टर क्षेत्र उपचारित करावयाचे होते.त्यापैकी मार्च २०१२ अखेर ९५१ पाणलोट पूर्ण झाले आहे.वन विभाग १७ पाणलोट अपूर्ण आहेत.अपूर्ण पाणलोट करण्याबाबत संबंधित विभागाकडे विभागीय पाणलोट मिशनच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू आहे.

गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमामध्ये अपूर्ण पाणलोट प्रथम प्राधान्याने पूर्ण करण्यात येतात.त्यासाठी जिल्हा वार्षिक योजना व राज्यस्तर निधी उपलब्ध करून दिला जातो.उपलब्ध निधीतून जे पाणलोट जास्त टक्क्यांनी पूर्ण झाले आहेत. तथापि अपूर्ण आहेत अशा पाणलोटांना प्राधान्याने निधी देण्यात येतो.त्यामुळे लक्षाच्या प्रमाणात साध्य कमी झाल्याचे दिसून येते.स्पष्टीकरण मान्य करून परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

केंद्र शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने पाणलोट प्रकल्प वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. तरी कृपया सदरील परिच्छेद वगळण्यात यावा.

**२.४.१०**

**पाण्याच्या पातळीवरील प्रभाव**

भुजल सर्वेक्षण व विकास अभिकरण (जीएसडीए) यांनी पाठविलेल्या नऊ निवडक जिल्ह्यातील अभिलेखांचे २००६-११ या कालावधीत पाण्याच्या पातळीवरील प्रभावाचे निर्धारण करण्यासाठी विश्लेषण केले गेले. पुढील मुद्दे आढळुन आले :

• सांगली व लातूर जिल्ह्यांच्या सर्व तालुक्यांत स्थिर पाणी पातळी (स्थि. पा. पा. ) गेल्या पाच वर्षाच्या सरासरी स्थि. पा. पा. पेक्षा जास्त होती. सांगली जिल्ह्यातील वाढ (मे २०११) ०.१० मी. ते २.२८ मी या टप्प्यात होती तर लातुर जिल्ह्यातील वाढ (ऑक्टोबर २०१०) ०.९५ ते ५.१२ मी. या टप्प्यात होती.

• नांदेड जिल्ह्यात मे २०११ ची स्थि. पा. पा. गेल्या पाच वर्षाच्या सरासरी स्थि. पा. पा. पेक्षा, एक तालुका वगळता सर्व तालुक्यात जास्त होती.ही वाढ ०.०८ मी ते २.५४ मी होती. किनवट तालुक्यात स्थि. पा. पा. ०.१७ मी नी घटली.

• रायगड जिल्ह्यात ऑक्टोबर २०१० मध्ये १५ पैकी १२ तालुक्यात स्थि. पा. पा. मध्ये गेल्या पाच वर्षांच्या सप्टेंबर मधील सरासरी स्थि. पा. पा. पेक्षा घट झाली. स्थि. पा. पा. मधील घट १.९५ मी ते ०.०३७ मी या टप्प्यात होती. जिल्ह्यातील उर्वरित तीन तालुक्यात याच काळात स्थि. पा. पा. वाढली, ही वाढ ०.००३ ते २.४३. मी. या टप्प्यात होती.

• नाशिक जिल्ह्याच्या १५ तालुक्यापैकी आठ तालुक्यांत स्थि. पा. पा. ०.०८ मी ते २.०८ मी. या टप्प्यात वाढली आणि उर्वरित सात तालुक्यात ती कमी झाली.

वरील विश्लेषणावरुन असा निष्कर्ष काढता येतो की निवडलेल्या सहा योजना आणि मृद् व जल संधारणाच्या इतर योजना ज्यांना भारत सरकार व राज्य शासन यांनी निधी दिला,त्यांच्या कार्यान्वयामुळे सांगली व लातूर च्या सर्व तालुक्यातील स्थि. पा. पा. मधील वाढीला मदत झाली.तथापि,नांदेड जिल्ह्याच्या एका तालुक्यात, रायगड जिल्ह्याच्या १२ तालुक्यांत व नाशिक जिल्ह्याच्या सात तालुक्यात, स्थि. पा. पा. मध्ये घट दिसून आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

कृषि विभागामार्फत जे पाणलोट विषयक विविध उपक्रम राबविले जातात त्याचा मूळ उद्देश फक्त जलसिंचनाच्या पुरता मर्यादित नसुन त्यात मृद व जलसंधारण हे दोन्ही उद्देश आहेत.

• कृषि विभागामार्फत पाणलोट विषयक उपक्रम नमुद जिल्ह्यातील (नांदेड, रायगड, नाशिक) पूर्ण तालुक्यात राबविले जात नाहीत. तालुक्यातील ठराविक पाणलोट क्षेत्र निश्चित करून त्यात पाणलोट विषयक योजना राबविण्यात येतात. सदर पाणलोटाचे क्षेत्र हे सूक्ष्म स्वरुपात असून त्याचे क्षेत्र सूमारे ५०० ते १००० हे असते.

• भूलम सर्व्हेक्षण विकास यंत्रणा यांनी नोदवलेले निरिक्षणे ही पूर्ण तालुक्याची सरासरी आहे त्यामळे पाणलोटाचा सदृष्य परिणाम त्यात दिसून येणार नाही.

भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होण्यासाठी विविध कारणे कारणीभूत आहेत. त्यापैकी खालीलप्रमाणे काही कारणे आहेत.

१. पाऊसमान सरासरी व प्रत्यक्ष पडलेला पाऊस, पावसाचा कालावधी इ.

२. जमिनीचा प्रकार,त्याची भूगर्भीय संरचना इ.

३. जमिनवरील जैविक आच्छादन झाडे/झुडपे इ.

४. जमिनीवर झालेली मृद व जलसंधारणाची कामे.

भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होणसाठी वरीलप्रमाणे विविध कारणे आहेत. त्या अनुषंगाने तालुक्यात पाण्याच्या पातळीत घट झालेली असावी.

सन २००९-१० पासुन एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत मेघा पाणलोट संकल्पना आल्याने ५ ते ६ हजार हेक्टर क्षेत्रावर पाच वर्षांत कार्यक्रम राबविला जात आहे. त्याच धर्तीवर इतर पाणलोटाचे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचा निश्चितच भूगर्भीय पातळीत वाढ होणेस मदत होत आहे.

तरी मृद व जलसंधारण कामामुळे विहिरीतील पाण्याच्या पातळीवर अभाव हा आक्षेप वगळण्यात यावा.

**२.४.११/२.४.११.१**

**संनियंत्रण व अंतर्गत नियंत्रण रचना**

**अंतर्गत नियंत्रण**

**तपशीलवार यादीचे व्यवस्थापन**

चाचणी तपासणी केलेल्या ३९ ताकृअ पैकी,दोन ताकृअ मध्ये खाली चर्चिल्या प्रमाणे,सिमेंट संग्रह नोंदवहया ठेवल्या नव्हता.

• ताकृअ, जत यांच्या अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले की २००६-११ या कालावधीत रु.७७.५८ लाख किंमतीचे १९७६.८० मे. टन सिमेंट प्राप्त केले गेले पण संग्रह नोंदवही ठेवली गेली नव्हती.

ताकृअ, जत यांनी नमूद केले (जून २०११) की, कृषी विभागाकरिता वेगळे गोदाम नव्हते आणि सिमेंट थेट कामाच्या जागी पुरवले गेले व अभिलेख मंडळ स्तरावर ठेवले गेले होते.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण मकृंअ च्या स्तरावरील गैर वापर भुरटी चोरी व जादा साठा करणे रोखण्यासाठी,ताकृअ ने त्याच्या नियंत्रणाखालील सर्व मकृंअ ना पुरवठा केलेल्या सिमेंटचा अद्यावत अभिलेख ठेवला पाहिजे.

• त्याचप्रमाणे ताकृअ दारव्हा मध्ये असे आढळुन आले की २००६-०९ या वर्षादरम्यान रु.२८.७७ लाख किंमतीचे ८३२.२३ मे. टन. सिंमेंट प्राप्त केले गेले. तथापि सिमेंटची प्राप्ती वितरण व बाकी साठा या संबंधीचे अभिलेख विनंती केल्यानंतरही लेखा परिक्षेकरिता दाखल केले गेले नाहीत.

शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की आता संग्रह वही ठेवली जात होती. तथापि, अभिलेख लेखापरीक्षेकरता दाखल केल्या गेले नाहीत ही वस्तुस्थिती कायम आहे.

**कार्य नोंदवही न ठेवणे**

प्रत्येक मंकृअ ने कामाचा तपशील दर्शविणारी कार्य नोंदवही ठेवणे, मृद संधारण नियमपुस्तिका मध्ये विहित केले आहे. जी प्रत्येक महिन्यात ताकृअ ने तपासली पाहिजे. चाचणी-तपासणी केलेल्या आठ ताकृअ मध्ये, असे दिसून आले की या ताकृअ च्या खाली काम करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांनी कार्य नोंद वह्या ठेवल्या नव्हत्या. यामुळे, कुठल्या कामांना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी मिळाली होती, कामांची किमंत किती होती हे लेखापरीक्षेमध्ये पडताळता आले नाही. शासनाने नमूद केले (ऑक्टोबर २०११) की सर्व आठ तालुका कृषि अधिकारी मध्ये कार्य नोंद वह्या आता ठेवल्या जात होत्या.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लेखा परिक्षणाचे वेळी सिमेंट खरेदी १९७६.८० टन सिमेंट खरेदी केल्याचे विवरणपत्र सादर करण्यात आलेले होते. परंतु तालुका कृषि अधिकारी जत यांचे अधिनस्त सन २००६-०७ ते २०१०-११ या कालावधीत १८६८.८० मे. टन सिमेंट खरेदी करणेत आलेले होते आणि त्याप्रमाणे मंडळ कृषि अधिकारी स्तरावर सिमेंट पोहोच झालेले आहे. मंडळ निहाय खरेदी व प्राप्त सिमेंट तपशील सोबत जोडला आहे. तरी अनुपालन मान्य व्हावे.

लेखा परिक्षण पथकास सिमेंट पुरवठ्याबाबत झालेल्या तफावतीचे सविस्तर आकडे व प्रत्यक्ष मागणी व पुरवठा इत्यादीबाबीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| प्रत्यक्ष मागणी | लेखा पथकास दिलेली संख्या | प्रत्यक्ष सिमेंट पुरवठा व त्याबाबत अदा केलेली |
|---|---|---|
| वर्ष | मे. टन | मे. टन |
| २००७-०८ | १६६९.४५ | १६६९.४५ |
| २००८-०९ | २३६.७५ | ८९.४५ |
| २००९-१० | ७०.६० | १०९.९० |
| एकूण | १९७६.८० | १८६८.८० |

सोबत- तालुका कृषि अधिकारी स्तरावरील साठा नोंदवहीत नोंद घेऊन सिमेंट साठा नोंदवहीची झेरॉक्सप्रत सोबत जोडली आहे.

सन २००६ ते २००९ या कालावधीत दारव्हा तालुका, कृषि अधिकारी कार्यालयामध्ये रु. २८.७७ लाख किंमतीचे ८३२.२३ मे. टन सिमेंट प्राप्त झाले. सिमेंट चे वितरण व शिल्लकसाठा या संबंधिचे अभिलेखे (साठा नोंदवही) ठेवण्यात आलेले होती. सदर साठा नोंदवहीच्या छायांकित प्रत सुलभ संदर्भाकरिता सोबत सहपत्रीत करण्यात आले आहे.

मृद्संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत विविध कामासंदर्भात सविस्तर मार्गदर्शिका मध्ये नमुद केलेप्रमाणे आवश्यक दस्तऐवज/नोंदवह्या मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी कार्यालयात जतन करणे आवश्यक आहे. या प्रकरणी आयुक्तालयाचे

परिपत्रक क्रग. १७५५ दि. १३ जुलै २०१२ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मंडल कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी स्तरावर आवश्यक ते दस्तऐवज/नोंदवहया ठेवण्यात आलेल्या असून अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत.

**२.४.१२**

**निष्कर्ष**

व्यापक एकात्मीकृत नियोजनाविना पाणलोट प्रकल्प कार्यान्वित केले गेले. अधिकतम निधी मार्च महिन्यात दिला गेला त्यामुळे टाळण्याजोगा घाईने केलेला खर्च झाला. राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रम अंतर्गत, पाणी झिरपण्याचा उद्देशित हेतू शेततळी साध्य करत नव्हती. विदर्भ पाणलोट विकास मिशन हे यशस्वी नव्हते. पाणलोटांच्या योग्य विकासाकरिता घटकांचे कार्यान्वयन विहित अनुक्रमाने, " माथा ते पायथा " पद्धतीचा अवलंब करून झाले नाही. पाणलोट उपचार कामे पाटबंधारे प्रकल्पांच्या प्रभुत्व क्षेत्रांत घेतल्या गेली. चाचणी- तपासणी केलेल्या योजना अंतर्गत ची कामे अपूर्ण राहिली. तथापि, सांगली व लातूर जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांमध्ये, मृद व जलसंधारण कामांमुळे, स्थिर पाणी पातळीत वाढ होण्यास सहाय्य झाले. तथापि, तीन जिल्ह्यांच्या २० तालुक्यांत स्थिर पाणी पातळीत घट झालेली दिसून सुद्धा आली. चाचणी- तपासणी केलेल्या योजनांसाठी ठरविलेली लक्ष्ये आर्थिक अडचणीमुळे साध्य झाली नाही. अंतर्गत नियंत्रण रचना दुबळी होती व अभिलेखांचे ठेवणे अयोग्य होते.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वरील सर्व लेखा परिच्छेदाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये सदर लेखापरिच्छेदाचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**२.४.१३**

**शिफारसी**

**शासनाने पुढील बाबी कराव्या :**

१. सर्व पाणलोट योजनांच्या विकासाकरिता राज्य पातळीवर एक व्यापक व एकात्मीकृत योजना तयार करावी.

२. निधीच्या उपलब्धतेची शाश्वती करावी व निधी देण्यातील विलंब टाळावा.

३. मृद व जल संधारण कामे योग्य अनुक्रमाने " माथा ते पायथा " तंत्राचा अवलंब करून कार्यान्वित करावीः

४. एक परिणमकारक संनियंत्रण व नियंत्रण रचना करावी.

ही बाब शासनाकडे निर्देशित करण्यात आली (सप्टेंबर २०११). उत्तर प्राप्त झालेले नव्हते (ऑक्टोबर २०११).

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१. अ. केंद्र शासनाच्या सर्व विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमासाठी सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ (सुधारित २०११ अन्वये) राज्यात पाणलोट विकासासाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम २००९-१० पासून कार्यान्वित करण्यात आला आहे.

या कार्यक्राअंतर्गत सन २००९ पासून ३९लाख हेक्टर क्षेत्राचे रुपये ६२९१ कोटीचे एकूण ११७० प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहे.

ब. सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणुन राज्यात जलयुक्त शिवार अभियान शा.नि.क्र जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि. ५ डिसेंबर १४ अन्वये राबविण्यात येत आहे.

पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारात अडविणे भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, सिंचन क्षेत्रात वाढ करणे, ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पुर्नज्जीविकरण करणे, भूजल अधिनियम अंमलबजावणी विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करणे, अस्तित्वात असलेल्या व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची पाणीसाठवण क्षमता वाढविणे, जलस्त्रोत्रातील गाळ लोकसहभागातून काढून पाणीसाठा वाढविणे इ. मुख्य उदेश विचारात घेऊन जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. या योजनेतंर्गत राज्यात ६२०५ गावे निवडण्यात आलेली आहेत.

२. पाणलोट विकास कार्यक्रम अंमलबजावणीसाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत केंद्र शासनाकडून शाश्वत निधी वेळेत उपलब्ध करून देण्यात येतो त्याप्रमाणे राकवियो अंतर्गत महात्मा फुले जल भूमी संधारण अभियान कार्यक्रमासाठी तसेच जिल्हा वार्षिक योजनातून पाणलोट विकास कार्यक्रमासाठी निधी वेळेत उपलब्ध करून देण्यात येतो.

३. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत निवडलेल्या पाणलोटाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात येतो त्यास राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते. पाणलोटाची कामे सविस्तर प्रकल्प अहवालाप्रमाणे मृद व जलसंधारणाची कामे माथा ते पायथा या तंत्राचा अवलंब केला जातो. त्याचप्रमाणे सन २०१३-१४ पासून पाणलोटाच्या माथा क्षेत्रामध्ये खोल सलग समतल चर या नविन उपचाराचा अवलंब करण्यात येत आहे.

४. मृद व जलसंधारणाच्या विविध योजनांती कामांची गुणवत्ता राखण्यासाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाचे नियंत्राणासाठी ग्रामस्तरावर पाणलोट समिती, जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर स्वतंत्र वसुंधरा राज्य स्तरीय पाणलोट विकास यंत्रणा कार्यरत आहे. त्याचप्रमाणे MELD च्या माध्यमातून सनियंत्रण केले जाते. जलयुक्त शिवार अभियानार्तगत करण्यात येणाऱ्या कामाचे सनियंत्रण करण्यासाठी तालुका,जिल्हा व विभागस्तरावरुन समित्या स्थापन केल्या आहेत.

राज्य (मंत्रालय)स्तरावर सनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

तसेच SIMNIC च्या माध्यमातून जलयुक्त शिवार अभियानातून घेण्यात योणाऱ्या सर्व कामाची माहिती Online भरण्यात येत आहे तसेच MRSAC या माध्यमातून सर्व कामाचे डिजिटल फोटो, अक्षांश व रेखांशसह काम चालू असताना व पूर्ण झाल्यावर अपलोड करण्यात येतात.

**साक्ष**

**१.२ परिच्छेद क्रमांक २.४.६ "मृद व जलसंधारण कार्यक्रमाचे कार्यान्वयन"**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी समितीने विभागीय सचिवांची व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणलोट विकास कार्यक्रम सुरू? करण्यात येत आहे. या नवीन पाणलोट विकास कार्यक्रमाची माहिती समितीला विभागाने उपलब्ध करून द्यावी. तसेच, या कार्यक्रमाविषयीची संक्षिप्त माहिती सचिवांनी समितीला द्यावी असे विभागास सांगितले असता पूर्वी पाणलोट विकासाचे काम वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून होत होते. सन १९९२ मध्ये जलसंधारण विभागाची स्थापना झाल्यानंतर तीच कामे एकत्रितपणे जलसंधारण विभागाकडून करण्याचा निर्णय झाला. राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७ लाख हेक्टर आहे. त्यापैकी २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यायोग्य आहे. त्यामध्ये ४४ आर १८५ हेक्टर क्षेत्रावर पाणलोट आहे. १ हजार हेक्टरपर्यंत सूक्ष्म पाणलोट व २५ हजार हेक्टरपर्यंत मेगा पाणलोट असे आपण गृहित धरतो. पाणलोटाचा कार्यक्रम हाती घेतल्यानंतर राज्याने वेगवेगळ्या योजना राबविल्या आहेत. केंद्र शासनाने एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम हाती घेतला आहे. पूर्वीच्या सर्व योजना बंद करून एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राबविला जातो. पाणलोटाचे एकात्मिक नियोजन होऊन आराखडा तयार व्हावा व त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा लेखापरिच्छेदात व्यक्त केली गेली आहे. सन २००६-२००७ मध्ये हा कार्यक्रम तयार केला गेला आणि सन २००८ मध्ये एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम सुरू झाला. या संदर्भात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. पूर्वी ६ हजार प्रति हेक्टर याप्रमाणे खर्च करण्यास मान्यता होती आता ती १२ हजार रुपये केलेली आहे. त्यामध्ये काही गोष्टी पाणलोट निवडीमध्ये घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे पाणलोट विकासाचे काम हाती घेत असताना पाणलोटाच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंतच्या ॲक्टिव्हिटी आणि ड्रेनेज ॲक्टिव्हिटी बरोबरच रोजगार निर्मिती करण्याबाबतची तरतूदही केलेली आहे. पाणलोटाच्या कार्यक्रमामध्ये ५ हजार हेक्टरचा एक प्रकल्प केला जातो. केंद्र शासनाने हा कार्यक्रम सुरू केल्यानंतर योजनेचा प्रत्येक गटनंबर वाईज डीपीआर तयार करून त्यास केंद्र शासनाची मंजुरी घेतली जाते आणि त्यानंतर अंमलबजावणी सुरू होते. आतापर्यंत ३४,५५९ सूक्ष्म पाणलोटाची कामे निवडली होती. त्यापैकी २७७०० पाणलोट कार्यक्रम सुरू केलेले आहेत. आज अखेरपर्यंत १२,८८७ सूक्ष्म पाणलोट कार्यक्रम पूर्ण केलेले आहेत.

लेखापरिच्छेदात अनेक योजनांच्या माध्यमातून पाणलोट विकासाचा कार्यक्रम केला जातो, असा आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. आता आपण एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमाअंतर्गत कार्यक्रम राबवीत आहोत व प्रत्येक कार्यक्रमाचा डीपीआर तयार करून नंतरच त्याची अंमलबजावणी होणार आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

लेखापरिच्छेदातील मूळ आक्षेप काय आहे ? यासंबंधी माहिती देण्यास विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, एकात्मिक पद्धतीने आराखडा तयार व्हावा व त्याची अंमलबजवणी व्हावी. एकात्मिक पद्धतीने कार्यक्रम तयार करून, नियोजन करून काम केले जात नव्हते, असा आक्षेप आहे. आपण सन २००६-२००७ मध्येच याबाबतची ऑर्डर विभागाने काढली आहे.

विभागाने जो नवीन कार्यक्रम हाती घेतला आहे तो शास्त्रशुद्धरित्या तपासला गेला आहे का ? राज्यामध्ये जमिनीचे वेगवेगळे प्रकार आहेत. काही जमिनी कठीण आहेत, काही जमिनींमध्ये पाणी जिरते तर काही जमिनींमध्ये पाणी जिरत नाही. त्यामुळे सरसकट सर्व ठिकाणी आपण बंधारे घेऊ शकणार आहोत का ? यापूर्वी आपण मातीचे बंधारे बांधण्याची योजना केलेली आहे. काही ठिकाणी ४ हजार रुपयांमध्ये बंधारा व्हायचा तर काही ठिकाणी त्यासाठी ५० हजार रुपये खर्च येत होता. त्यामुळे राज्यातील सर्व जमिनींचा टेक्निकल डेटा घेऊन जमिनीच्या पोतानुसार योजना घेतल्या पाहिजेत. अन्यथा काही जिल्ह्यांमध्ये कंत्राटदारांनी आपल्या नातेवाईकांच्या नावाने २००-४०० बंधाऱ्यांची कामे घेतलेली आहेत. पाणी

अडवा, पाणी जिरवा, यासाठी नेमके कोणते प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत, त्यापैकी किती प्रकल्प सुरू आहेत. नवीन कार्यक्रम अयशस्वी होऊ नये, यासाठी कोणता अभ्यास करण्यात आला आहे, ही माहिती देखील मिळाली पाहिजे असे समितीने विभागास सांगितले तसेच या योजनेच्या माध्यमातून अनेक गावांचा प्रश्न सुटला अशी वस्तुस्थिती नाही. तांत्रिक दृष्टीकोनातून तपासणी करून ती योजना कशा पद्धतीने यशस्वी होईल यादृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. जलसंधारण विभागाकडून सांगण्यात येते की, दरवर्षी २५ हजार गावे दुष्काळमुक्त करणार आहोत. पाच वर्षानंतर तेथे काहीच करावे लागणार नाही, कशाच्या आधारावर मापदंड तयार केलेले आहेत, ते कृपया समितीस सांगावे असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी जलयुक्त शिवार योजना ही एकात्मिक पद्धतीने गावांची निवड करून राबविण्यात येत आहे असा खुलासा केला.

ज्या गावांना पाण्याची टंचाई आहे तेथे ही योजना राबविली पाहिजे, परंतु जेथे सिमेंट बंधारे आहेत, त्या पाणलोट क्षेत्रात सुद्धा ही योजना राबविण्यात येत आहे. २०० हेक्टर्सचे, ५०० हेक्टर्सचे असे अनेक पाणलोट क्षेत्र तयार झाल्याचे रेकॉर्ड विभागाकडे उपलब्ध आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. यापूर्वी अनेक गावांमध्ये पाणलोट क्षेत्र विकासाची कामे यशस्वी केलेली आहेत. अशा ठिकाणी तांत्रिक पद्धतीने कामे केलेली असून तेथील रिझल्टही चांगले आलेले आहेत. अशा गावांची नांवे सांगायची झाले तर हिवरे बाजारचे उदाहरण देता येईल. माथा ते पायथ्याचे काम, त्यानंतर ड्रेनेजचे काम केले. विभागाच्या अनुभवानुसार ज्या चुका झाल्या होता, त्या सर्व विचारात घेऊन त्यानुसार जलयुक्त शिवार योजनेचा कार्यक्रम हाती घेतला आहे. सन २०११ ते २०१३ मध्ये प्रचंड दुष्काळ पडला होता, त्यावेळी हा कार्यक्रम राबविण्याचा विभागाने प्रयत्न केला. त्याला अधिक व्यापकता देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर साखळी सिमेंट बंधाऱ्याची कल्पना पुढे आली. पूर्वी तालुक्याला साखळी सिमेंट बंधारे देण्याचा प्रयत्न केला. या सर्व गोष्टींमुळे विहिरींची पाण्याची पातळी वाढली. या सर्व गोष्टी एकत्रित करून आम्ही काही लोकांचा अनुभव विचारात घेतला. जलयुक्त शिवार योजना राबविण्याचा उद्देश म्हणजे भूगर्भातील पाण्याची पातळी वर आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. ज्या गावांना पाण्याची गरज आहे, ते पहिल्यांदा विचारात घेतलेले आहे. वॉटर बजेटींग विचारात घेतले आहे. त्या गावातील पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची गरज वर्कआऊट करून हे काम करण्यात येणार आहे. या योजनेसाठी गावामध्ये एक इंजिनिअर आणि एक कृषि अधिकारी या दोघांना पाठविण्यात येते. त्यांनी यासंबंधीचा आराखडा तयार करावयाचा आहे भविष्यातील पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी पाणी उपलब्धततेसाठी काय करता येईल, याचा विस्तृत आराखडा तयार केला. यापूर्वी अशा कामांसाठी डीपीडीसी मधून तसेच राज्य सरकारकडून पैसे उपलब्ध करून देण्यात येत होते. ज्या गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जातो, जेथे डॉर्क झोन आहे, जेथे सातत्याने दुष्काळ पडतो ती गावे जिल्हाधिकाऱ्यांनी निवडलेली आहेत. त्या गावांमध्ये या योजना सुरू करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व योजना कन्व्हर्जन करण्याचा निर्णय घेतला. या पाणलोट कार्यक्रमास मान्यता देताना काही निकष आहेत. ज्या गावांमध्ये टँकरने पाणी दिले जाते, तेथे पाणलोट क्षेत्र विकासास मान्यता दिली होती. आता एकत्रितरित्या हा सर्व कार्यक्रम सुरू आहे. तांत्रिक सिमेंट बंधाऱ्यासाठी साईटची निवड करण्यासाठी जीएसडीए कडून पाहणी करावी लागणार आहे. जर जीएसडीएने पाहणी केली नाही तर सिमेंट बंधाऱ्याचा उपयोग होत नाही. या अनुषंगाने श्री. धोटे, मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली होती. त्या समितीचा रिपोर्ट विभागाने स्वीकारलेला आहे. त्या समितीने काही मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. त्यामध्ये साईट निवड कशी करायची, सिमेंट बंधाऱ्याचे तांत्रिक स्पेशिफिकेशन, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

साईट सिलेक्शन करताना काय म्हटलेले आहे? अशी समितीने विचारणा केली असता त्या भागामधील कॅचमेंट एरिया व रनअप एरिया विचारात घेऊन साईट सिलेक्शन करायचे असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जलसंधारण विभागातर्फे जी कामे केली जातात, त्यामध्ये मेजर कामे घेतलेली असून साचलेला गाळ काढणे, ज्या कामांमध्ये किरकोळ दुरुस्ती होत नाही तेथे प्राधान्याने रिज्युविनेशन करणे, ओल्ड स्ट्रक्चर दूरुस्त करणे, नाल्यांचे रुंदीकरण, खोलीकरण करणे, नवीन स्ट्रक्चर तयार करणे इत्यादी कामे करण्यासाठी जो गॅप फंडीग लागेल तो दिला जाणार आहे. जलयुक्त शिवार योजना गेल्या सहा महिन्यापासून सुरू झालेली आहे. पहिल्या टप्प्याचे काम सुरू झालेले आहे. अनेक ठिकाणी जलयुक्त शिवार योजनेची लोकसहभागातून चांगली कामे सुरू असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**परिच्छेद क्र. २.४.७.२. " अंदाजपत्रक व खर्च "**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, राष्ट्रीय कृषि विकास योजना ही केंद्र सरकारची योजना आहे या योजनेला निधी कसा उपलब्ध होतो?

उपरोक्त अनुषंगाने विभागीय सचिव यांनी अशी माहिती समितीस अवगत केली की, ही योजना राष्ट्रीय कृषि विकास योजना या नावाने ओळखली जाते. ही राज्याची योजना असून या योजनेला केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. सन २००७-२००८ मध्ये ही योजना सुरू झाली असून सन २०१४-२०१५ पर्यंत ही योजना १०० टक्के तत्वावर लागू होती. या योजनेला केंद्र सरकारकडून पैसे उपलब्ध होत होते. सन २०१५-२०१६ पासून ५०:५० या तत्वावर या योजनेचे विभाजन झाले. या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे कृषि, कृषि संलग्न जे इतर विभाग आहेत त्याच्यामध्ये गुंतवणूक आणि उत्पादन वाढविणे. सर्वसाधारणपणे वर्षाला ७५० कोटी रुपये ते ९०० कोटी रुपये दरवर्षी उपलब्ध होत असतात.

सन २००७-२००८ पासून ते सन २०१४-२०१५ पर्यंत आपल्या राज्याला ५२३५ कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. या योजनेमधील कृषि, कृषि संलग्न विकास करण्याच्या दृष्टीने कृषि विभाग तसेच वेगवेगळ्या विभागाकडून आपण प्रस्ताव मागवितो. वखार महामंडळ, कृषि खात्याच्या स्वतःच्या योजना, मृद जलसंधारण, जलसंधारणाच्या योजना, असे विविध विभागाचे प्रस्ताव प्राप्त होतात. त्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने एक समिती स्थापन केलेली आहे. या प्रस्तावांची छाननी झाल्यानंतर प्रस्ताव मंजूर केले जातात. यामध्ये प्रामुख्याने जे तत्व पाळलेले आहे, ते असे आहे की, केंद्र शासनाची योजना असेल तर त्यामध्ये केंद्र शासनाचे कॉस्ट-नॉर्म्स आणि सबसिडी पॅटर्न लागू होतो. राज्य शासनाची योजना असेल तर राज्य शासनाचे कॉस्ट-नॉर्म्स आणि सबसिडी पॅटर्न लागू होतो. राज्य व केंद्र शासन यांची दोहोंची मिळून योजना असेल तर राज्य शासनाने ठरविल्याप्रमाणे कॉस्ट-नॉर्म्स आणि सबसिडी पॅटर्न योजनेला लागू करण्यात येतो. अशा प्रकारच्या योजनांमध्ये राज्य शासन २५ टक्क्यांपर्यंत सबसिडी देते. याप्रमाणे आमच्याकडे एकूण अकरा विभागांकडून निरनिराळ्या जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव येतात. या कामांमध्ये जलसंधारण मृदसंधारण आदि कामांचा समावेश असतो. या प्रस्तावांची तपासणी करून एका ठराविक मर्यादेपर्यंत त्यांना निधी वितरित करण्यात येतो. तसेच ज्या विभागांचा प्रस्ताव असेल ते ते विभाग संबंधित योजनेच्या अंमलबजावणीकरिता प्रस्ताव, इतर तांत्रिक मान्यता आदि प्रक्रिया करून कृषी विभागाकडे पाठविते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मृद संधारणेपासून मातीच्या बांधांपर्यंतच्या कामांचाही या प्रकारच्या योजनांमध्ये समावेश असतो. अशा प्रकारची कामे विभागामार्फत केली जातात की, एनजीओमार्फत केली जातात ? अशी पृच्छा समितीने केली असता राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून हे प्रकल्प राबविले जातात. कृषी विभागामार्फत हे प्रकल्प व संबंधित जलसंधारण व मृदसंधारणाच्या कामांचा समावेश असलेल्या योजना राबविल्या जातात असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच आयडब्ल्यूपीए हा कार्यक्रम केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे. या कार्यक्रमापैकी काही कामे म्हणजे केवळ दहा टक्के कामे एनजीओ यांच्यामार्फत केली जातात. याकरिता एनजीओ यांचे इम्पॅनेलमेंट कसे करावे,याबाबत केंद्र शासनाच्या गाईडलाईन्स आहेत. किती कोटी रुपयापर्यंतची कामे एनजीओ यांच्याकडे सोपविण्यात यावीत,याबाबतही केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना निश्चित करून दिलेल्या आहेत असाही खुलासा विभागीय सचिवांनी केला.

राज्यभरातील ज्या जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारे एनजीओमार्फत कामे केलेली आहेत, त्या कामांचे ऑडिट केले गेले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार एनजीओ यांनी केलेल्या कामांचे मॉनिटरीली इव्हॅल्युएशन केले जाते. सदरहू इव्हॅल्युएशन करण्याकरिता एक यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. एनजीओ यांच्यामार्फत करंट इव्हॅल्युएशन केले जाते त्यानंतर त्याचे फायनल इव्हॅल्युएशन केले जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली व एनजीओ यांनी केलेल्या कामांचा प्रस्ताव व त्याकरिता आवश्यक असणारी तांत्रिक मान्यता व इतर प्रक्रिया ही वसुंधरामार्फत केली जाऊन संबंधित विभागाकडून यासंबधीच्या अंतिम प्रस्तावाला मान्यता घेण्याचे काम केले जाते असेही समितीस विदित केले.

एनजीओ यांनी केलेल्या कामांचा प्रस्ताव व त्याकरिता लागणाऱ्या विविध मान्यताही त्यांच्यामार्फतच दिल्या जातात. या सर्वांमधून आऊटपूट मात्र काहीच नसते. या संदर्भात वाशिम व अमरावती जिल्ह्यामध्ये एनजीओ यांनी केलेल्या कामांची पाहणी व इतर जिल्ह्यातील कामांची पाहणी ग्रासरु?टला जाऊन करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण व सहली या सर्व कागदावरच असतात. प्रत्यक्षात जर प्रशिक्षणाबाबत जाऊन विचारणा केली असता कोणालाच काहीच माहिती नसते. एनजीओ यांच्या कामामध्ये व त्याकरिता मिळालेल्या निधीमध्ये खूप मोठया प्रमाणात घोळ झालेला आहे. राज्यभरातील पाच जिल्हे नमुन्यादाखल घेऊन त्यामध्ये या सर्व कामांची पाहणी करण्यात यावी. यामध्ये काही एनजीओ केवळ नावाला आलेल्या आहेत. जलसंधारणाची कोणकोणती कामे राज्यभरातील अनेक जिल्ह्यांमध्ये करून घेतली त्यांची यादी तसेच राज्यातील एनजीओ यांच्या नावाची व त्यांनी केलेल्या कामांची यादी समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सांगितले असता समितीला माहिती सादर करण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

विभागाला शेवटच्या महिन्यात पैसे मिळतात. तो पैसा खर्च केला नाही तर वित्त विभागाकडून समायोजनाची मान्यता घेण्यात येते का ? याबाबत महालेखाकार यांनी जे निरीक्षण नोंदविलेले आहे, त्याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? तसेच, ॲक्रुड इंटरेस्टबाबत विभागाचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता व्याजासंदर्भातही केंद्र शासनाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसारच विभागीय कार्यवाही होत असते. “As regard unspent balance and amount earned as interest, a decision has already been taken in this Department that these amounts would be adjusted against further releases against approved activities of any particular scheme/programme.” व्याजाची रक्कम देखील कामांकरिताच वापरायची असते, असे गाईडलाईन्समध्ये म्हटलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्या वर्षी जर पैसा खर्च केला नाही तर तो पैसा दुसऱ्या वर्षी वापरण्याची परवानगी मिळण्याकरिता वित्त विभागाची परवानगी त्यासंबंधीच्या समायोजनाकरिता घ्यावी लागते. शेवटच्या महिन्यात पैसे मिळाल्यानंतर मार्च महिन्यानंतरच्या कालावधीत जल व मृद संधारणाची कामे होतांना दिसतात असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या संदर्भातील बऱ्याच रकमा बऱ्याच वेळा केंद्र शासनाकडून देण्यात आलेल्या आहेत. सदरहू निधी या कामांकरिता मिळाल्यानंतर तो विभागीय पातळीवर कामांप्रमाणे योग्य

प्राधिकरणाला रिलीज करावा लागतो. सदरचा निधी विभागीय पातळीवरील कामांकरिता पंचायत समित्यांकडे रिव्हॅलिडेट करावा लागतो. डिसेंबरनंतरच्या कालावधीमध्ये खऱ्या अर्थाने वर्किंग सिजन सुरू होतो. विभागीय पातळीवरील कामांकरिता पंचायत समित्यांना रिव्हॅलिडेट करून निधी रिलीज करावा लागतो.

ज्या कर्मचाऱ्यांनी अखर्चित राहिलेला निधी डायव्हर्ट केला, त्यांच्याविरुद्ध विभागाने कोणत्या प्रकारची कारवाई केलेली आहे ? प्रशिक्षणाकरिता प्रत्यक्षात कमी खर्च झालेला आहे, याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली.

उपरोक्त अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, कर्मचाऱ्यांनी निधी डायव्हर्ट केलेला नाही. काही अखर्चित निधी नियमाप्रमाणे शेततळी व बांध यांच्याकरिता वापरण्यात आला होता. शेततळ्याकरिता जे शेतकरी पात्र होते, त्यांच्याकरिता नियमाप्रमाणे व योजनेतील निकषांप्रमाणे शेततळी बांधण्यात आली.

शेततळ्याचा हा निधी डायव्हर्ट करण्याचा प्रकार घडलेला नाही. जे शेतकरी शेततळ्यास पात्र होते, त्यांना शेततळी बांधून देण्यात आलेली आहेत. त्याकरिता शेततळ्यांचा आरक्षित असलेला निधी वापरण्यात आलेला आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आली होती. शेततळ्यांकरिता या योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. या यादीतील काही पात्र शेतकऱ्यांना आर.क्यू.आय मधून राज्य रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पैसे देण्यात आले होते. या दोन्हीचे निकष एकसारखेच आहेत. जसे पैसे आले तसे, पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना शेततळ्याकरिता उपलब्ध करून दिले. राज्य शासनाने याबाबतचा शासन निर्णय काढून निधी वाटपाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते.

याकरिता १२ लाखाच्या ऐवजी केवळ २.४७ लक्ष रुपये एवढाच खर्च झालेला आहे, याची कारणे काय आहेत ? तसेच आणखी एक गंभीर विषय असा आहे की, यामध्ये खर्च न करता खर्च दाखविण्यात आलेला असून ही वस्तुस्थिती नाही.

समितीच्या उपरोक्त प्रश्नाला विभागीय सचिवांनी असे विदित केले की, अंजनगाव-सुर्जी, तालुका कृषी अधिकारी यांनी २.९९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. परिच्छेदात २.९९ कोटी रुपये इतकी रक्कम दाखविण्यात आलेली आहे. विभागाकडे या खर्चाच्या माहितीची प्रत आहे. परंतु या संदर्भातील अनुषंगिक कामांकरिता २,९२,०७५ रुपये एवढी रक्कम प्रत्यक्षात खर्च झालेली आहे. ही जी रक्कम दाखविण्यात आलेली आहे, त्यामध्ये विनाखर्च दाखविलेली रक्कम २३.४६ लक्ष रुपये एवढी आहे. त्यावरील व्याजाची रक्कम ६.३० लक्ष एवढी होती.

समितीने या अनुषंगाने अशी पृच्छा केली की, शेतकऱ्यांवर करण्यात आलेल्या प्रत्यक्ष खर्चाबाबत आम्ही आपल्याला विचारत आहोत. पैसे खर्च न करता ते खर्च झाल्याचे दाखविण्यात आलेले आहेत. तालुका कृषी कार्यालय, अंजनगाव,सुजी येथे विदर्भ पाणलोट विकास मिशनच्या कामावर झालेला रुपये २.९९ कोटींचा खर्च हा रुपये २३.४६ लाख ( रुपये ६.३० लाख व्याजासहित) धरुन होता. जो बँक खात्यात विनाखर्च पडून आहे. याबाबत महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले आहे की, विनाखर्च राहिलेली रक्कम खर्च झाली म्हणून दाखविणे चूक आहे तर विनाखर्च राहिलेली रक्कम खर्च झाली, म्हणून का दाखविण्यात आले आहे ?

परिच्छेदामध्ये दाखविलेली २.०० कोटी ही रक्कम विदर्भ पाणलोटमधील एकूण १२ सुक्ष्म पाणलोटांच्या पाणलोट आराखडामधील उपचार कामासाठीची प्रस्तावित रक्कम होती. प्रत्यक्षात पाणलोट उपचार कामांसाठीची खर्च म्हणजे ढाळीचे बांध याकरिता २३९.८४ लाख रुपये खर्च आला शेततळ्यांकरिता ५२.९१ लाख रुपये खर्च आला. तसेच संगमनेर येथील प्रकरणासंदर्भात प्रत्यक्षात ४.७६ लक्ष रुपये उपलब्ध करून देण्यात आले होते. प्रत्यक्षात झालेला खर्चाव्यतिरिक्त असलेला उर्वरित खर्च डायव्हर्ट केलेला नाही. बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्रामध्ये झालेल्या बियाणे विकास कार्यक्रमाचे रेकॉर्ड एसडीओ यांच्याकडे आलेले आहे. कृषी विकास केंद्रामार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, याबाबतचे रेकॉर्ड एसडीओ यांच्याकडे आलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कृषी विकास केंद्रामध्ये घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनाही बोलाविण्यात यावे. जेणेकरून केंद्रामध्ये प्रत्यक्षात प्रशिक्षण व अभ्यास सहली घेण्यात आलेल्या आहेत की नाहीत हे समजेल. अन्यथा कृषी विज्ञान केंद्रामार्फत आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण व अभ्यास सहली या केवळ कित्येकदा कागदावरच असल्याचे पाहिले आहे. ही कामे करणाऱ्या एनजीओ यांचा आढावा घेऊन त्याचे रेकॉर्ड विभागाने मेंटेन करून त्याप्रमाणे विभागीय पातळीवर प्रत्यक्ष कार्यवाही होत आहे की नाही हे पाहिले पाहिजे. प्रशिक्षणाकरिता असलेले पैसे प्रशिक्षणार्थी शेतकरी यांच्या बोगस सही व नावासह मॅनेज केलेले असतात. तसेच, या प्रशिक्षण कार्यक्रमांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींचाही समावेश करण्यात यावा, जेणेकरून प्रशिक्षणाकरिता असलेला खर्च प्रशिक्षणाव्यतिरिक्त अन्य कामावर होणार नाही अशी सूचना समितीने केली असता या कामाच्या खर्चाची अचूक माहिती समितीसमोर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

२.९९ कोटी रुपये खर्च दाखविला २३.६ कोटी रुपये शिल्लक असतांना देखील ती रक्कम देखील खर्च झाल्याचे दाखविण्यात आलेले आहे. खर्चाची अचूक माहिती देत असतांना अंजनगाव सुर्जी २.९९ कोटी रुपये एवढी रक्कम दाखविली. प्रशिक्षणावर जो खर्च झाला त्यावेळी जी माहिती उपलब्ध करून दिली ती २९२.७५ लक्ष एवढी रक्कम त्यावेळी खर्च झालेली आहे. आणि या कार्यक्रमामध्ये अखर्चित राहिलेली रक्कम २३.४६

लक्ष रुपये इतकी दाखविण्यात आलेली आहे. त्यात ६.३० लाख रुपये एवढी व्याजाची रक्कम होती आणि तालुका स्तरावरील १७.१५ कोटी रुपये अखर्चित अनुदान होते. २३.७४ लक्ष रुपये तालुका कृषी अधिकारी अंजनगाव सुर्जी यांच्या खात्यामध्ये व्याजासह शिल्लक होते, त्यानुसार जी व्याजाची रक्कम त्यांनी संबधित जिल्हा अधीक्षक आणि कृषी अधिकारी यांना वर्ग केलेले आहेत. अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे या निधीमधील १४७ लक्ष रुपये शिल्लक होते. यामधील काही निधी पाणलोट समिती यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. १.७० कोटी रुपये पाणलोट समितीकडे वर्ग करण्यात आले होते. पाण्याच्या पातळीकरिता १७.०४ लक्ष रुपये एवढा खर्च करण्यात आलेला असून उर्वरित रक्कम १३.८० कोटी रुपये एवढी रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता परिच्छेदानुसार विनाखर्च दाखविलेली रक्कम २३.४६ ही बरोबर असून त्यामध्ये ६.३० लाख रुपये ही व्याजाची रक्कम आहे. १७.१५ लाख रक्कम ही अखर्चित आहे. अशा प्रकारे २३.४६ लाख रक्कम तालुका कृषी अधिकारी अंजनगाव व १२ पाणलोट समिती यांच्या खात्यामध्ये त्यावेळेसही शिल्लक होती. त्यानुसार एकूण शिल्लक रकमेपैकी सरतेशेवटी रुपये ६.७९ लाख जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांच्याकडे रुपये ५.३२ लाख वर्ग करण्यात आली. त्यांच्याकडून ती चलनाद्वारे शासनास जमा करण्यात आली. तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून १.४७ लाख रुपये चलनाद्वारे शासनाकडे जमा करण्यात आलेले आहेत.

तसेच, ग्रामपंचायत निवडणूक माहे मे २०१० व येणाऱ्या खरीप व रबी हंगामाच्या व्यस्त कार्यक्रमामुळे तसेच असामान्य/विपरीत हवामानामुळे कपाशी व तूर पिकांचे झालेले नुकसानीमुळे शेतकऱ्यांची अभ्यास दौऱ्याकरिता मानसिकता नसल्यामुळे पाणलोट समित्यांकडून शेतकरी अभ्यास दौरा कार्यक्रम प्राप्त होऊ शकला नाही. कार्ड संस्था, अंजनगांव सुर्जी यांना शेतकरी अभ्यास दौऱ्याकरिता रुपये २.४७ लाख निधी देण्यात आला होता. परंतु सदर संस्थेकडून शेतकरी अभ्यास दौऱ्याकरिता रुपये १.४७ लाख खर्च होऊन उर्वरित रुपये एक लाख रक्कम परत करण्यात आली. सदर एक लाख रुपये अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पाणलोट समित्यांना त्यांच्या खर्चाकरिता मागणीनुसार वर्ग करण्यत आली. व ७० हजार रुपये पाणलोट समित्यांद्वारे डम्पिंग लेव्हल खरेदीकरिता खर्च करण्यात आले आहे. तसेच, रुपये ०.१२ लाख हे कार्यालयीन कामांकरिता खर्च करण्यात आले. संभावित शेतकरी अभ्यासदौऱ्याकरिता असलेली उर्वरित रक्कम १३.८० लाख धनादेश क्रमांक १६७८८१ दिनांक २५ नोव्हेंबर २०१२ नुसार जिअकृअ अमरावती यांना दिनांक १६ जानेवारी २०१२ चे पत्रान्वये सर्मपित करण्यात आलेली आहे. दिनांक २५ नोव्हेंबर २०१२ रोजी १३.८० लाख रुपये शासनाकडे सर्मपित करण्यात आलेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**परिच्छेद क्रमांक २.४.८.१ “ राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रम (एनएडीपी) ”**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पाणी साठवणुकीसाठी प्लास्टीक लाईनिंगचा उपयोग केल्यामुळे जलसंधारणाचे मूल तत्वच विफल होते. हे शासनाच्या नियमाच्या परस्पर विरोधी आहे. या संदर्भात समितीला माहिती द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता शासनाने शेततळ्याच्या गाईडलाईन्स इश्यू केल्यानंतर ज्या ठिकाणी फळबाग कार्यक्रम होता त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांकडून शेततळ्यांसाठी मागणी होती. पण ती शेततळी इनलेट आणि आऊटलेट स्वरुपाची होती. शेतकऱ्यांची मागणी होती की, इनलेट व आऊटलेट विरहित शेततळी करावीत. त्यासंदर्भात शासनाने सन २०१० मध्ये शासन निर्णय काढला आणि विदाऊट इनलेट व आऊटलेट शेततळी करण्यास मान्यता दिली. परंतु त्यासाठी लागणारे प्लास्टिक शीट बसविण्याचे काम शेतकऱ्यांनी स्वतःच करायचे होते. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कार्यक्रमामध्ये आपण शेततळी दिलेली आहेत याचा चांगला उपयोग होत असून बागायतीसाठी याचा चांगला उपयोग होत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

सुरुवातीला ८९ हजार शेततळ्यांचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते त्यापैकी फक्त ७३ हजार ३२५ शेततळी झाली उर्वरित ५ हजार ६७५ शेततळ्यांची कामे का झाली नाहीत ? या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, एकूण ७९ हजार शेततळ्यांचे लक्ष्य देण्यात आले होते. त्यानंतर सुधारित लक्ष्य ७३ हजार ५०० शेततळ्यांचे करण्यात आले. त्यापैकी ७३ हजार ३२५ शेततळी झालेली आहेत. म्हणजे जवळपास ९९.९९ टक्के शेततळी पूर्ण झालेली आहेत. या कामासाठी जेवढा निधी दिला होता तेवढा निधी खर्च झालेला आहे. त्या संदर्भात ॲग्रीकल्चरल फायनान्स कमिशनने रिपोर्ट दिलेला आहे. तो अे.जी. ना सादर करण्यात येईल. यासाठी १३ जिल्ह्यांतील ७२९९ गावे निवडण्यात आली होती. प्रत्येक गावातील १० टक्के सॅम्पलिंग करून त्यांनी रिपोर्ट केलेला आहे. या १३ जिल्ह्यांचा रिपोर्ट दिलेला आहे त्यामध्ये अनुसूचित जातीचे २६ टक्के, भटक्या जमातीचे १४ टक्के , लहान शेतकरी ७२ टक्के, अल्पभूधारक १६ टक्के होते. ५ एकरा खालील ८८ टक्के शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे. आकारमानाची मोठी शेततळी ४९ टक्के झालेली आहेत. त्यानंतरच्या आकारमानाची २८ टक्के झालेली आहेत. शेततळ्यांमुळे भूगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. संरक्षित सिंचनामध्ये वाढ झालेली आहे. खरीपाच्या पिकामध्ये ३२ टक्के तर रब्बीच्या पिकामध्ये ३८ टक्के वाढ झालेली आहे. लागवडीखालील क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे त्यामध्ये कापसामध्ये ७० टक्के, सोयाबीनमध्ये ५७ टक्के वाढ झालेली आहे. काही शेततळ्यांमध्ये मत्स्य संरक्षण केलेले आहे. शेततळ्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. ही अतिशय चांगली योजना असून नफ्याचे प्रमाण १:३९ इतके आहे. ॲग्रीक्चरल फायनान्सने रिपोर्ट दिलेला आहे. त्या रिपोर्टची प्रत समितीला सादर करण्यात येईल, असेही विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक २.४.८.२ " नदी खोरे प्रकल्प (आरव्हीपी) "**

उपरोक्त परिच्छेदातील नदीखोरे प्रकल्पासंबंधी थोडक्यात माहिती द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता एकूण पाच प्रकल्प घेण्यात आले होते. दमणगंगा, सरदार सरोवर इत्यादी प्रकल्प हाती घेण्यात आले. कामे हाती घेण्याआधी बोल्डर्सच्या उपलब्धतेची निश्चिती करून घेतली गेली नाही असा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. या संदर्भात विभागाने रिव्हाईज उत्तर सादर केलेले आहे. सुरूवातीला जेवढे लूज बोल्डर्स होते ते नंतर कमी झाले या संदर्भात विभागीय समिती आहे त्या समितीची मान्यता घेऊनच हे काम केलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महालेखाकार यांनी मुद्दा काढलेला आहे की, सुरुवातीला १३०० चे ठरले होते नंतर कमी का केले ? या समितीच्या प्रश्नाला सुरुवातीला १३०० करण्याचे ठरले होते. त्यास रिव्हाईज मान्यता घेतल्यानंतर विभागाने ते काम केले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शेगाव आणि बनाली येथील पाणलोटांबाबत मूल्यमापनात्मक अभ्यास केला असल्यास मूल्यमापनाच्या अहवालाची प्रत लोकलेखा समितीस सादर करण्याबाबत समितीने विभागास सांगितले. कंत्राटदारांना व खंड कामकऱ्यांना रोखीने पैसे दिले यासंदर्भात समितीने विचारणा केली असता सन २००४ मध्ये कडेगाव तालुक्याची नव्याने निर्मिती झाली. त्या ठिकाणी नॉन बँकींग ट्रेझरी होती. तेथे सुरूवातीला बँकेची सुविधा नव्हती. परंतु त्यानंतरचे पेमेंट धनादेशाव्दारे केलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एकूण १२३४ वॉटर शेडस तयार करावयाच्या होत्या त्यापैकी फक्त २७१ वॉटरशेडस तयार करण्यात आल्या याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? यासंदर्भात विभागीय सचिव यांनी समितीस असे विदित केले की, सुरुवातीला या वॉटरशेडसच्या कामासाठी ९७ कोटी रुपये मंजूर झाले होते त्यापैकी प्रत्यक्षात ३८ कोटी रुपये उपलब्ध झाले त्याप्रमाणे २१४ वॉटरशेडस पूर्ण केली.

मातीबांधसाठी जर प्रत्यक्ष २५ पैसे खर्च येत असेल तर त्याचे एस्टीमेट १ रुपया दाखविण्यात येते. यातील नेमकी वस्तुस्थिती काय आहे ? याबाबत उत्तर देताना विभागीय प्रतिनिधी यांनी या संदर्भात तांत्रिक समिती आहे, ती कमिटी कॉस्ट ठरवून देते असा खुलासा केला.

२५ पैशाचे काम असेल तर १ रुपयाचे एस्टीमेट करण्यात येते अशी वस्तुस्थिती आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता युनिर्व्हसिटीच्या लोकांकडून हे तपासून घेतो. या अगोदर अशा तक्रारी आल्यानंतर आम्ही युनिर्व्हसिटी प्राध्यापकांची कमिटी नेमून त्यांच्याकडून तपासणी करून ते रिव्हाईज केले होते समितीच्या सूचनेप्रमाणे तसे करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक २.४.८.३ "राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम (एनडब्ल्यूडीपी)" - निधीच्या अपुऱ्या तरतुदीमुळे मंद प्रगती**

राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमामध्ये मोर्शी, वरूड व अंजनगांव सुर्जी यांना अल्प निधी का देण्यात आला, सदर बाबतीतील सद्य:स्थिती काय आहे ? डीपीआरचे व प्रशिक्षण देण्याचे काम केले. मात्र प्रत्यक्षात पाणलोटाचे काम हाती घेण्यातच आले नाही. डीपीआर व प्रशिक्षण यासाठी पैसे खर्च झाले आहेत अशी विचारणा समितीने केली असता राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम एआयबीपीमध्ये घेतला आहे. कार्यक्रम झालेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत २१० कोटी रूपयांचा सुधारित प्रकल्प होता. पाठविलेल्या प्रस्तावाप्रमाणे पैसे उपलब्ध झाले. अतिरिक्त ४५ कोटी रूपये आरकेव्हीवायमधून मागितले होते, ते मंजूर झाले. प्रत्यक्षात ६ कोटी रूपये उपलब्ध झाले. उपलब्ध झालेल्या रकमेतून कार्यक्रम पूर्ण केला असून राहिलेला कार्यक्रम आयडब्ल्यूएमपीच्या कार्यक्रमामध्ये आला आहे त्यामध्ये कामच झालेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एका योजनेत काम घेतले तर ते दुसऱ्या योजनेत घेता येत नाही असे समितीने सुचित केले असता यामध्ये मापदंड वाढले होते आणि रक्कमही कमी उपलब्ध झाली होती. १३८ कोटी रूपयांचा निधी प्राप्त झाला आणि त्यातील १३७.८३ कोटी रूपये निधी खर्च झाला. मधल्या काळात सुधारित मापदंडही झाले. शेवटच्या टप्प्यात ४५ कोटी रूपयांच्या अगेंस्ट फक्त ६ कोटी रूपये मिळाले, त्यामध्ये ते काम झाले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

इतकी कमी रक्कम मिळण्याचे कारण काय आहे तसेच निधी केंद्र शासनाचा होता की राज्य शासनाचा होता ? केंद्र सरकारने प्रस्ताव का नामंजूर केला, पैसे का दिले नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता आरकेव्हीवायचेच पैसे होते आणि ते राज्य शासनानेच मंजूर करायचे होते. माहे ऑक्टोबर, २०१० मध्ये ते मंजूर केले असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले तसेच राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमात सन २०१०-११ मध्ये ६ कोटी रूपये मिळाले, सन २०११-१२ मध्ये १८ कोटी रूपये मिळाले, सन २०१२-१३ मध्ये १९ कोटी रूपये मिळाले, सन २०१३-१४ मध्ये १९ कोटी रूपये मिळाले, सन २०१४-१५ मध्ये १ कोटी ८८ लाख रूपये मिळाले. सदर कार्यक्रमात सन २००७-०८ ते सन २०१०-११ या काळात ७८ कोटी रूपये निधी मिळाला, तेवढा खर्च झाला. उपचारित क्षेत्र ८० हजार हेक्टर आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी अवगत केली.

या योजनेत १ लाख ४१ हजार हेक्टरवर काम केले नाही. फक्त ४० हजार हेक्टरवर काम केले आहे. विभागाला २१० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध झाला आहे.

The P.A.C. would like to know why works on 40,000 hectares only was taken up instead of 1.41 lakh hectares, When funds of Rs. 210 crores were available? Whether there was overlap in

areas under NWDP and other Schemes? असे समितीने विभागास सांगितले असता २१० कोटी रूपये प्रकल्प किंमत होती व प्रत्यक्षात काम झाले आहे. १३८ कोटी रूपये निधी प्राप्त झाला, त्यातील १३७.८३ कोटी रूपये खर्च झाला आणि उपचारित क्षेत्र १ लाख ३० हजार हेक्टर झाले. १ लाख ८१ हजार हेक्टर क्षेत्रापैकी १ लाख ३० हजार हेक्टर क्षेत्रामध्ये उपचार झाले. महालेखाकारांच्या अहवालामध्ये ४० हजार हेक्टर म्हटले आहे. परंतु ते तसे नसून १ लाख ३० हजार हेक्टर आहे ते आजच्या तारखेचे आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने सांगितलेली माहिती सन २०१४-१५ पर्यंतची आहे. समिती फक्त त्या वर्षापुरते बोलत आहे. त्या वर्षामध्ये फक्त ४० हजार हेक्टर झाले. विभाग सांगत आहे की, सन २००९-१० मध्ये १४ कोटी ३९ लाख रूपये मिळाले परंतु महालेखाकारांचे म्हणणे आहे की, तुम्हाला २१० कोटी रूपये मिळाले आहेत अशी विचारणा समितीने केली असता प्रकल्पाची किंमत २१० कोटी रूपये होती. सन २००७ पासून आज अखेरपर्यंत प्रत्यक्षात १३८ कोटी रूपये मिळाले असून केंद्र सरकारकडून निधी कमी वितरित झाला असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तसेच माहे मार्च, २०१३ मध्ये हा कार्यक्रम रद्द करून आयडब्ल्यूएमपीचा कार्यक्रम सुरू केला. बाकीचे सर्व कार्यक्रम रद्द केले. त्यांनी कळविले होते की, शिल्लक राहिलेला कार्यक्रम आयडब्ल्यूएमपीखाली घ्यावा त्यामुळे बाकीचे सर्व कार्यक्रम रद्द झाले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अंतिम निर्धारण अहवाल सादर करण्यात येईल असे विभागाने सांगितले आहे. तो केला आहे का ? या समितीच्या प्रश्नाला अहवाल सादर केला आहे त्याची समितीला प्रत देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच ८ जिल्ह्यांमध्ये याबद्दलचे मूल्यमापन केले आहे. पडीक क्षेत्र लागवडीखाली आणण्यामध्ये वाढ झाली आहे, सिंचनामध्ये वाढ झाली आहे. प्रामुख्याने गहू, हरभरा, सोयाबीन, कापूस व तूर या पिकांच्या सरासरी उत्पादनात वाढ झाली आहे असे अहवालात म्हटले आहे. शेतजमीन असलेल्या व नसलेल्या ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध करून देण्यास मदत झाली. ६ जिल्ह्यांमध्ये आणखी साधणे निर्माण झाली आहेत असे अहवालात दिले आहे. पाण्याची उपलब्धता वाढली की नाही, पाण्याची उपलब्धता वाढून जमिनीची धूप थांबण्यास मदत झाली किंवा कसे हे त्यांनी पाहिले आहे. सदर अहवाल कृषी वित्त महामंडळाचा असून त्यांनी ८ जिल्ह्यांमध्ये जाऊन तपासणी केली आहे. तो अहवाल महालेखाकारांना उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. आता आडब्ल्यूएमपी कार्यक्रम सुरू आहे बाकीचे सर्व कार्यक्रम बंद असल्याचेही समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक २.४.८.४ "मराठवाडा पाणलोट विकास मिशन (एमडब्ल्यूडीएम)" - लोकांच्या सहभागाकरिता पृथक रक्षित योजना निधीचा वापर न होणे.**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, सदर प्रश्न मराठवाडा पाणलोट विकास मिशन संदर्भात आहे. विभागाने ४७.६८ लाख रूपयांचा निधी परत केला का ? २६ लाख रूपये सर्वेक्षण, प्रोजेक्शन वगैरेसाठी खर्च केले आहेत. विभागाने सन २००५-०६ चे पेमेंट सन २०११ मध्ये केले आहे हे दोन्ही विषय गंभीर आहेत सदर दोन्ही विषयांच्या संदर्भात स्पष्टीकरण द्यावे.

लेखापरीक्षण झाले त्यावेळी ३५.७६ लाख रूपये इतकी रक्कम उपलब्ध होती. त्यामध्ये प्रशिक्षणासाठी ११.३२ लाख रूपये, सर्वेक्षण प्रकल्प अहवालासाठी २०.६५ लाख रूपये असे एकूण ३२.९४ लाख रूपये खर्च झाले असून ही रक्कम ३५.७६ लाख रूपयांमधून खर्च झाली आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर २.८२ लाख रूपये इतकी रक्कम परत केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महालेखाकारांनी आक्षेप काढला आहे की, ६६ लाख रूपयांपैकी फक्त ६ लाख रूपये खर्च झाले. सन २००९ मधील १२.३२ लाख रूपयांचे पेमेंट सन २०११ मध्ये केले. २६ लाख रूपये सर्वेक्षण, प्रोजेक्शन वगैरेसाठी खर्च केला आणि ४६.६८ लाख रूपये शासनाला परत केले, त्याबद्दल विभागाने माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता किनवटचा अहवाल आहे. वन विभागाच्या क्षेत्रामध्ये उपचारासाठी बदल झाले. किनवटमध्ये झालेला खर्च महालेखाकारांनी कागदपत्रे पाहिल्यानंतर झाला आहे. प्रशिक्षणासाठी १२ लाख रूपये आणि सर्वेक्षणासाठी २० लाख रूपये खर्च झाला आणि त्याचे प्रमुख कारण असे आहे की, यामध्ये वाढीव क्षेत्र व वन क्षेत्र यांचे ॲडिशन झाले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

लातुरच्या बाबतीतील ३६.६१ लाख रूपयांचा ओरिजनल कार्यक्रम होता, तो रिव्हाईज झाला. सदर कार्यक्रमासाठी २.४५ लाख रूपयांस सुधारित मान्यता घेण्यात आली असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी केला.

मराठवाड्याच्या संदर्भात १ लाख ८२ हजार हेक्टर क्षेत्र उपचारित करायचे होते, त्यापैकी १ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्र उपचारित केले आहे, म्हणजे जवळपास ९७ टक्के काम झाले आहे. मराठवाड्याच्या संदर्भातील अहवाल आला असून मराठवाड्याचे स्वतंत्र मूल्यमापन आले असून त्याची प्रत देखील समितीला सादर करण्यात येईल. कृपया ते रेकॉर्डवर ठेवावे कारण कोणते बदल झाले आहेत ते त्यामध्ये दिले आहे चांगले बदल झाले असल्याचे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

विदर्भाच्या २ मुद्यांच्या संदर्भात सांगायचे आहे. ३५० कोटी रूपये खर्च केल्यानंतर मृदू व जलसंधारणाचे लक्ष्य साध्य केले आहे. १६.४४ लाख रूपये खर्च केल्यानंतर जलसंधारणाची स्थिती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता ७०३ पाणलोट पूर्ण करायचे होते, त्यापैकी ६६७ पाणलोट म्हणजे जवळपास ९५ टक्के पाणलोट पूर्ण केले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**शिफारस व अभिप्राय :**

**१.३ (१) परिच्छेद क्रमांक २.४ : "मृद व जलसंधारण कार्यक्रमाचे कार्यान्वयन"**

ग्रामीण विकास व जलसंधारण विभागाकडून कृषी विभागाशी विचार विनिमय करून सर्व योजनांचे (केंद्र तसेच राज्य पुरस्कृत) नियोजन केले जाते. सुक्ष्म पाणलोटाच्या विकासाकरिता तालुका कृषी अधिकारी योजना तयार करतात आणि त्या जिल्हा पातळी समितीकडे मंजूरीकरिता सादर करतात. जिल्हापातळी वरील समिती योजनांना मंजूरी देते आणि शासनाकडे निधीची मागणी करते. जलसंधारण विभागामार्फत सन १९९२ पासून एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. तथापि, राज्याच्या सर्व भागात कार्यान्वीत होत असणाऱ्या सर्व योजनांचा अंतर्भाव असणारे व्यापक, एकात्मिकृत नियोजन जलसंधारण विभागाकडून करण्यात आलेले नाही. विभागीय सचिवांनी पाणलोट कार्यक्रमाचा जिल्हानिहाय यथार्थदर्शी आराखडा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. विभागाने एकात्मिक पद्धतीने मेगा पाणलोटनिहाय सर्वंकष नियोजनाच्या दृष्टीने संपूर्ण राज्याचा व्यापक एकात्मिकृत आराखडा तयार करावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.४ (२) परिच्छेद क्रमांक २.४.७.२ : "अंदाजपत्रक व खर्च वर्षाचे शेवटी निधीचे वितरण"**

महालेखापालांनी मृद व जलसंधारणाच्या ६ योजनांवर सन २००६ ते २०११ दरम्यान झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण केले असता राज्यातील निवडलेल्या योजनांतर्गत खर्चाकरिता दिलेल्या निधीपैकी अधिकतम निधी आर्थिक वर्षाच्या शेवटी माहे मार्च मध्ये दिल्याचे दिसून आले. याबाबत विभागाने साक्षी दरम्यान स्पष्ट केले की, खरीप व रब्बी हंगामात पिके घेतली जातात. सदर पिके माहे फेब्रुवारी अखेर शेतात उभी असतात त्यामुळे अशा क्षेत्रात मृदसंधारणाची कामे करता येत नाहीत. अशा क्षेत्रात मृदसंधारणाची कामे करण्यासाठी मार्च, एप्रिल, मे व जूनचा पहिला पंधरवडा मिळतो. त्यामुळे मार्च महिन्यात प्राप्त झालेला निधी त्याच महिन्यात १००% खर्च करण्यास मर्यादा येतात. त्यामुळे त्या त्या वित्तीय वर्षात खर्च कमी झाल्याचे दिसून येते. विभागाने सादर केलेला खुलासा विचारात घेता शासन स्तरावरुन मंजूर निधी कोणत्याही वर्षी ३१ मार्च अखेर खर्च होवू शकणार नाही, ही वस्तुस्थिती विचारात घेवून जलसंधारण विभागाने वित्त विभागाशी चर्चा विनिमय करून अर्थसंकल्पित निधी त्याच वित्तीय वर्षा अखरेपर्यंत खर्च होण्याच्या दृष्टीने माहे मार्च अखेर खर्च होणारा निधी त्या-त्या वर्षात वितरीत करावा, माहे एप्रिल नंतरच्या खर्चाची तरतूद आर्थिक वर्षात करावी व त्यानुसार मासिक खर्चाचे विवरण पत्र तयार करावे व त्यानुसार खर्च होईल, कोणत्याही परिस्थितीत निधी व्यपगत होणार नाही व ज्या योजनांकरिता निधी उपलब्ध आहे त्या योजनांचा लाभ संबंधितांना त्याच वर्षात मिळेल याबाबत निश्चित स्वरुपाची उपाययोजना करावी व अपवादात्मक परिस्थितीत संबंधित योजना राबविण्यात येत असलेले भौगोलिक क्षेत्र, पिक पद्धती या बाबी विचारात घेवून त्या आर्थिक वर्षात अखर्चीत राहणारा निधी खर्च करण्यास १ ते २ महिन्यांची मुदतवाढ देणेबाबत शासनस्तरावरुन विचार व्हावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.५ (३) परिच्छेद क्रमांक २.४.८.१ : " कार्यक्रमाचे कार्यान्वयन - शेततळ्यांचा आकार ठरविण्यासाठी प्रमाणकाचा विचार न करणे "**

शासन स्तरावरुन निर्गमित मार्गदर्शक तत्वांप्रमाणे शेततळ्याचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्याकडे किमान भूधारणा ०.६० हेक्टरची अट आहे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या शेततळ्यांची तरतूद होती आणि अर्थसहाय्याचे प्रदान शेततळ्यांच्या आकारावर आधारीत होते. महालेखापालांच्या चाचणी लेखा परिक्षणात असे दिसून आले की, तालुका कृषी अधिकारी, जत यांनी लाभार्थ्यांची अल्प भूधारणा असतानाही बऱ्याच मोठ्या आकाराची शेततळी मंजूर केली. ४२ शेतकरी ज्यांची भूधारणा ०.६० ते १.५ हेक्टर होती. तथापि, त्यांना मोठ्यात मोठ्या आकारमानाची (३० × ३० × ३) शेततळी मंजूर करून त्याकरिता प्रती शेततळे रु.८२,२४०/- एवढी रक्कम मंजूर करण्यात आली होती. अशाच पद्धतीची पुनरावृत्ती तालुका कृषी अधिकारी, धर्माबाद यांनीही केली. अल्प भूधारणा असणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्यात मोठ्या आकारमानाची शेततळी दिल्यामुळे लागवडी खालील क्षेत्र कमी झाले व कमी भूधारणा असणाऱ्या शेतकऱ्यांना शेततळी मंजूर केल्यामुळे जास्त भूधारणा असलेले शेतकरी लाभापासून वंचित राहिले. त्यामुळे एकंदरीत उत्पन्नावर विपरीत परिणाम झाला. याबाबत विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांमध्ये लाभार्थ्यांच्या नावावर कमीत कमी ०.६० हेक्टर जमीन उपलब्ध असावी, अशा लाभार्थ्यांना शेततळे मंजूर करण्याबाबत निर्देश आहेत. तथापि, शेततळे किती भूधारणा असलेल्या शेतकऱ्याला कोणत्या आकारमानाचे द्यावे याबाबत स्पष्ट सूचना नाहीत. विभागाने सदर योजनेबाबत दिलेल्या निर्देशांचा/सूचनांचा फेर आढावा घ्यावा व शेतकऱ्यांची मागणी, त्या ठिकाणची पीक पद्धती, भौगोलिक परिस्थिती व शेतकऱ्यांची भूधारणा विचारात घेवून योग्य आकाराचे शेततळे मंजूर करण्याबाबत कळवावे, जेणेकरून शासन स्तरावरुन शेततळ्यावर होणारा खर्च योग्य त्या ठिकाणी होईल व त्याचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना मिळून त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. याबाबत विभागाने निश्चित स्वरुपाची उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.६ (४) परिच्छेद क्रमांक २.४.८.२ : "नदी खोरे प्रकल्प (RVP) - "गाळ संनियंत्रण स्थानके न उभारणे"**

नदी खोरे प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ७ वर्षासाठी पाणलोटाचा जलविद्या व गाळ यांच्याबद्दलचा प्रतिसाद मोजण्यासाठी ५ पाणलोटांपैकी कमीत कमी १ पाणलोटाची गाळ संनियंत्रण केंद्र (गासकें) स्थापन करण्यासाठी निवड करणे अनिवार्य आहे. महालेखापालांच्या चाचणी लेखा परिक्षण केलेल्या तपासणीत ३९ तालुका कृषी अधिकाऱ्यांपैकी फक्त ५ मध्ये RVP कार्यान्वित होते. ४ तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या तपासणीमध्ये गाळ संनियंत्रण केंद्र स्थापन केलेले नव्हते/ काम करीत नव्हते. त्यामुळे पाणलोटाचा जलविद्या व गाळ यांच्याबद्दलचा प्रतिसाद मोजता आलेला नाही. याबाबत समितीसमोर साक्षी दरम्यान गाळ संनियंत्रण केंद्र स्थापन करण्यात येतील, गाळ संनियंत्रण केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती विभागाकडून सादर करण्यात आली. महालेखापालांच्या चाचणी लेखा परिक्षणा व्यतिरिक्त जलसंधारण विभागाने अन्य सर्व तालुका कृषी अधिकाऱ्यांनी स्थापन करावयाची गाळ संनियंत्रण केंद्र स्थापन करण्याबाबत कार्यवाहीचा आढावा घ्यावा व आतापर्यंत झालेल्या गाळ संनियंत्रणाच्या कामांची गुणवत्ता व उपयुक्तता तपासून घेण्यात यावी व या उद्देशात कितपत सफलता मिळाली याबाबत देखील पूर्ण आढावा घेवून यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च व कर्मचारी वर्ग या बाबींचा देखील विचार करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.७ (५) परिच्छेद क्रमांक २.४.८.६ : "वेगवर्धित पाणलोट विकास कार्यक्रम (एडब्ल्युडीपी)"**

लेखापरिक्षकांचा चमू व विभागीय अधिकारी यांच्या संगमनेर तालुक्यातील मेंढेवन व वेल्हारे गावांच्या संयुक्त भेटीच्या वेळी असे दिसून आले की, कंपार्टमेंट बंडींगकरिता फक्त ५ पाईप्स वापरले गेले होते व बाकीचे पाईप्स गावामध्ये विखुरलेल्या अवस्थेत पडलेले होते. विभागाने अनुपालनामध्ये शेतकऱ्यांचे प्रबोधन करून कंपार्टमेंट बंडींगच्या ठिकाणी पाईप पुन्हा बसविण्यात आले व त्यांना त्याचे महत्त्वही पटवून देण्यात आले असा खुलासा सादर केला. यासंदर्भात विभागाने राज्यातील सर्वच तालुक्यातील कंपार्टमेंट बंडींगकरिता बसविण्यात आलेल्या पाईप वापराचा आढावा घ्यावा व शासनाने निधी खर्च करून उपलब्ध करून देण्यात आलेले पाईप्स योजनेच्या कामाकरिता वापरण्यात येत आहेत. सदर पाईपाचा गैरवापर होऊन नये याबाबतची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याकडे सोपविण्यात यावी व त्यांनी त्याचे पालन न केल्यास कार्यवाहीची तरतूद असावी. योजनेचा संपूर्ण लाभ शेतकऱ्यांना मिळेल याबाबत उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.८ (६) परिच्छेद क्रमांक २.४.८.७ : "माथा ते पायथा तंत्राचा अवलंब न करणे"**

संचालकांचे सन १९९७ चे निर्देश व पाणलोट क्षेत्रविकास मार्गदर्शक तत्वातील तरतुदीप्रमाणे पाणलोट वरील मृद व जलसंधारणाची कामे माथा ते पायथा तंत्राचा अवलंब करून (वरच्या भागापासून खालच्या भागापर्यंत) वरच्या भागातील सिमांकीत जमिनीचा विकास करण्यासाठी व खालच्या भागातील सिमेंट नालाबांध, माती नालाबांध किंवा शेततळी यांच्यातील गाळ कमी करण्यासाठी ही पद्धत कार्यान्वित करावयाची होती. महालेखापालांनी चाचणी लेखापरिक्षणात निवडलेल्या ३९ तालुका कृषी अधिकाऱ्यांपैकी ७ तालुका कृषी अधिकाऱ्यांमध्ये असे दिसून आले की, शेतकऱ्यांच्या मागणीमध्ये माथा ते पायथा तंत्राचा अवलंब केला गेला नाही व सी.सी.टी, एल.बी.एस. मातीचे बांधकाम किंवा जिवंत नियंत्रण बांध अशा पाणलोटाच्या वरील/मधल्या भागातील कामाकडे दुर्लक्ष करून जास्तीत जास्त भर सिमेंट नालाबांध, माती नालाबांध किंवा शेततळी या खालच्या भागातील कामावर दिला गेला. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाशामध्ये एल.बी.एस.च्या कामाकरिता आवश्यक बोल्डर्सची अनुपलब्धता, स्थानिक भौगोलिक परिस्थिती, शेतकऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रात सी.सी.टी. व लुज बोल्डर्सचे काम करण्यास संमती न देणे ही कारणे समितीसमोर सादर केली. ही कारणे मान्य करण्यासारखी नाहीत. योजनेवर झालेल्या खर्चाचा संपूर्ण लाभ मिळण्याच्यादृष्टीने योजनेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य असताना त्या पद्धतीने कार्यवाही झाली नसल्याचे दिसून आले. त्यामुळे योजनेचा हेतू पूर्णतः सफल होवू शकला नाही. ज्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शक तत्वांचे पालन केले नाही त्यांचेविरुद्ध कडक कार्यवाही करण्यात यावी. जलसंधारण विभागाने राज्यातील अशा सर्व कामांचा आढावा घ्यावा व माथा ते पायथा या तंत्राच्या अवलंबनाकरिता निश्चित मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही होण्याच्यादृष्टीने उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.९ (७) परिच्छेद क्रमांक २.४.८.७ : "विविध योजनांखाली अपूर्ण कामे"**

सन २००६ ते २०११ या कालावधीत मृदसंधारणाच्या कामाच्या चाचणी लेखापरिक्षणात निवडलेल्या ३९ तालुका कृषी अधिकाऱ्यांपैकी १४ तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे विविध योजनांखालील कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. याबाबत अपूर्ण कामांची कारणे नमूद करताना लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती, निधी न देणे, शेतकऱ्यांच्या संमतीचा अभाव, गावकरी आणि पाणलोट समितीमध्ये विवाद या कारणांमुळे कामे अपूर्ण राहिली असल्याचा खुलासा लेखापरिक्षणात करण्यात आला. तसेच अनुपालनामध्ये तालुकानिहाय अपूर्ण कामाची स्थिती व त्याची कारणे नमूद करताना पुरवठादाराने सिमेंटचा पुरवठा न केल्यामुळे कामे अपूर्ण, शेतकऱ्यांनी काम करू न दिल्यामुळे काम अपूर्ण, अपुरा निधी अशी कारणे नमूद करण्यात आली. काही कामे आर्थिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत. तथापि, भौतिकदृष्ट्या अपूर्ण दिसत आहेत. विभागाने दिलेली कारणे समितीस संयुक्तिक वाटत नाहीत. जलसंधारणाच्या कामासाठी जेवढा निधी मंजूर होता त्याच निधीत ती कामे पूर्ण करणे अपेक्षित असते. विभाग हा जलसंधारणाच्या काही ठराविक कामांनाच प्राधान्य देतात व अन्य कामे दुर्लक्षित राहतात. एकंदरीत पाणलोट क्षेत्र विकसित करण्यामागे विभागाची

उदासिनता असल्यामुळे या योजनेचा उद्देश सफल होत नाही. या प्रकरणी नियोजनाचा अभाव देखील दिसून येतो. अतः या कामांची चौकशी करून संबंधित विभागाच्या दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात यावी. तसेच मृदसंधारणाच्या अपूर्ण कामांचा आढावा घेवून कामे पूर्ण करण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**१.१० परिच्छेद क्र.३.२.६ "लघु पाटबंधाराच्या कामावर व्यर्थ खर्च" :-**

लघु पाटबंधारे तलावाच्या दुरुस्तीच्या कामावर अपुरे पर्यवेक्षण आणि अनियमित अंमलबजावणीमुळे रु.३ कोटींचा व्यर्थ खर्च.

महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाने फेब्रुवारी २००३ मध्ये असा निर्णय दिला की, कुठल्याही प्रकाराची गळती/दोष दुरुस्ती केंद्रीय संकल्प चित्र संस्था CDO कडे शिफारसी आणि मार्गदर्शनार्थ पाठविताना शासनतर्फे पाठवावेत.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास आणि जलसंधारण विभागने (विभाग) रु.१.७७ कोटीच्या लघुपाटबंधारे (MI) तलावाच्या निष्णप, तालुका भुदरगड जिल्हा कोल्हापूर येथे बांधकामास प्रशासकीय मान्यता(मार्च १९९९) दिली होती. ह्या योजनेस रु. १.१८ कोटींची तांत्रिक मान्यता दिली होती (एप्रिल १९९९) MI तलाव बांधण्यामागील उद्देश १०७५ घ.मी.पाणी साठा करणे आणि १६५ हेक्टर सिंचनाखाली आणण्याचा होता. कार्यकारी अभियंता (EE) MI विभाग (स्थानिक स्तर) कोल्हापूर यांनी (सप्टेंबर १९९९) हे काम मे. अश्विनी कन्स्ट्रक्शनला रु.१.२० कोटींना (अंदाजित मुल्याच्या ११.३० टक्के अधिक) दिले. दोष जोखीम अवधीत (defect liability period) म्हणजे काम पुर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या अवधीत, जर कुठले दोष आढळले तर ते दुरुस्त करण्यास कंत्राटदार जबाबदार होता.

EE हयांचेकडील दस्ताऐवजांच्या तापसणीत (सप्टेंबर २०१०) असे आढळून आले की, कंत्राटदाराने घळ भरणीच्या कामासहित मे २००४ मध्ये तलावाचे काम पुर्ण केले. त्यावर रु.२.८७ कोटी खर्च झाला.हया बंधाऱ्यात २००४ च्या पावसाळ्यात पहिल्यांदा पाणी साठविले गेले. तलाव भरल्यानंतर पाण्याची गळती होत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे डिसेंबर, २००४ पर्यंत पाणी वाहून गेले. हया गळतीच्या दुरुस्तीसाठी EE यांनी कुठलाही तातडीची दुरुस्ती करण्याची कृती न केल्यामुळे पावसाळ्यात भरलेले पाणी दरवर्षी डिसेंबर पर्यंत वाहून जात होते बंधाऱ्याच्या गळतीमुळे जमीनीची धूप होऊन, आजुबाजूच्या शेतात वाळू आणि दगड इत्यादी भरले गेले. EE यांनी (मार्च २००६) मधे तहसिलदार, भुदरगड यांना रु.४.६७ लाखाचा धनादेश बाधित शेतकऱ्यांनानुकसान भरपाई म्हणून वाटप करायला दिला.

EE यांनी दुरुस्तीचे काम (एप्रिल २००६ आणि मार्च २००७) दोन कंत्राटदारांना दिले जे ऑक्टोबर २००७ आणि जून २००८ ला पूर्ण झाले. दुरुस्ती प्रस्तावाचे काम शासनाकडे पाठविले नाही. जे वरती सांगितलेल्या पाटबंधारे विभागाच्या निदर्शनांचा भंग करणारे आहे. कार्यकारी अभियंत्याने रु.१०.७८ लाखाचे दुरुस्तीचे काम मूळ कंत्राटदाराच्या सुरक्षा ठेवीतून कंत्राटदाराच्या जोखीम आणि मुल्यावर करून घेतले. असेही दिसून आले की विधानसभेच्या तारांकित प्रश्नावर EE यांनी बंधाऱ्याला कुठलाही गळती नव्हते असे सांगितले, जे चूक होते.

अधीक्षक अभियंता दक्षता आणि गुण नियंत्रण, मुंबई परिमंडळ ह्यांनी (ऑगस्ट २००८) MI तलावाच्या कामाला दिलेल्या भेटीत बंधाऱ्याच्या बांधकामाची गुणवत्ता योग्य नव्हती तसेच गुण नियंत्रण चाचणीचे परिणाम रेकॉर्डमध्ये ठेवले गेले नव्हते असे मत व्यक्त केले. हयावरुन असे दिसून येते की, ग्क्ष विभाग कोल्हापूर यांनी बांधकामाचे पुरेसे पर्यवेक्षण केले नाही.

पुढे अधीक्षक अधियंता, डॅम सेफ्टी आर्गनायझेशन यांनी बंधाऱ्याला दिलेल्या भेटीत (डिसेंबर २००८) असे निदर्शनास आणून दिले की, MI तलाव फुटू शकेल आणि जवळच असलेले करडवाडी खेडे त्यात बुडून जाईल. मुख्य अभियंता यांनी एप्रिल २००९ मध्ये असे ठरविले की, दुरुस्ती करून सुद्धा पाणी गळती न थांबल्याने पायालगतच्या १० मीटर अंतरावरील केलेली घळभरणी तोडून पाण्याला नैसर्गिक वाटेने वाहू दयावे ज्यामुळे आपत्तीची शक्यता टाळता येऊ शकेल. त्याप्रमाणे रु.२२.५४ लाख घळ तोडण्यासाठी खर्च केले ज्यातील रु.१२.५८ लाख जून २०१० मध्ये दिले गेले होते.

निदर्शनास आणून दिल्यानंतर मुख्य अभियंतांनी (जानेवारी २०११), लघू पाटबंधारे तलावाला गळती असल्याचे मान्य करून पुढील आपत्तीची शक्यता टाळण्यासाठी एक पाट/पन्हाळ काढून पाण्याला निसर्गतः वाहू देण्याचे ठरविल्याचे सांगितले.

उत्तरात दुरुस्तीच्या कामात विलंब झाल्याची कारणे आणि अपुऱ्या पर्यवेक्षणाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत काहीही उल्लेख नाही. तथापि, लघुपाटबंधारे तलावाच्या बांधकाम आणि दुरुस्तीवर केलेला रु.३.०० कोटीचा खर्च व्यर्थ झाला आणि तलाव बांधकामाचा हेतु सफल होऊ शकला नाही.

हे प्रकरण शासनाच्या निदर्शनास जुलै, २०११ ला आणून दिले. अजूनपर्यंत उत्तर आले नाही. (ऑक्टोबर, २०११).

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जून, २००४ च्या पहिल्या घळभरणीनंतर सिंचन विमोचकाच्या दुभाजक भिंत व खालील बाजूच्या भिंतीमधून २८/१०/२००४ रोजी गळती दिसून आली. गळती संबंधी ठेकेदारास १६/११/२००४ रोजी पत्रान्वये गळती थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. परंतु ठेकेदाराने गळती थांबविण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. तशाच स्थितीत सन २००५ मध्ये ही धरणात पाणी साठा करण्यात आला. पुन्हा पहिल्यासारखीच सिंचन विमोचकाच्या दुभाजक भिंतीखाली व पावसाळ्यानंतर दोन तीन महिन्यात धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट झाली. अशीच स्थिती सन २००६ मध्ये ही झाली. तरीसुद्धा ठेकेदाराने गळती थांबविण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. त्यामुळे दिनांक १५.२.२००३ च्या शासन परिपत्रकान्वये व निविदा शर्त १७ व २० अन्वये ठेकेदारावर जबाबदारी निश्चित करून गळती दुरुस्तीचे काम ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव अनामत रक्कम रु.१७.९० लक्ष मधून करणेचे निश्चित केले. गळती थांबविण्यासाठी निविदा क्र.ब-१/६३ सन २००६-०७ मा.अधिक्षक अभियंता यांच्या पत्र क्र.११४० दि.२०/४/२००६ अन्वये कामे करून घेतली व सन २००७-०८ मध्ये धरणात पाणी साठा करण्यात आला. सलग चार वर्षात धरणात पाणी साठा करूनही धरणाच्या निकृष्ट कामाच्या गुणवत्तेमुळे पूर्ण क्षमतेने धरणात पाणी साठा होत नाही. या कारणास्तव ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत आली.

गळती थांबविण्यासाठी अधिक्षक अभियंता यांच्या पत्र क्र.११४०, दि.२०/४/२००६ अन्वये सूचना दिल्या त्यानुसार निविदा क्र.ब-१/६३ सन २००६-०७ अन्वये कामे करून घेतली. सदरची कामे ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव अनामत रक्कम रु.१७.९० लक्ष मधून करणेचे निश्चित केले. व सन २००७-०८ मध्ये धरणात पाणी साठा करण्यात आला. महाराष्ट्र विधानसभेमध्ये तारांकित प्रश्न क्र.१५०० दिनांक २५/११/२००४ अन्वये निष्पण, मेघोली व आणखी २० कोल्हापूर जिल्ह्यातील धरणांमधून गळती होत असलेबाबतचा प्रश्न विचारण्यात आला होता.

ल.पा.त.निष्पण मध्ये सन २००४ मध्ये पूर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यात आला होता. दिनांक २८/१०/२००४ उपविभाग व १६/११/२००४ कार्यकारी अभियंता यांनी पत्रान्वये ठेकेदारास सिंचन विमोचकातून गळती होत असून ती थांबविण्यासाठी ताबडतोब उपाययोजना करण्याबाबत कळविले होते. तसेच गळती ही धरणातून नसून सिंचन विमोचकातून पाणी येत असलेमुळे धरणाच्या तळातून गळती नसलेबाबत कार्यकारी अभियंता यांनी उत्तरात नमूद केले असावे.

धरणातील गळती ही प्रामुख्याने कामातील हलगर्जीपणा व निकृष्ट कामे केल्यामुळे असून त्याबाबत संबंधिताच्यावर दोषारोप पत्रे बजावण्याबाबत शासन स्तरावर कारवाई झालेली आहे.

सन २००८ च्या हंगामात पाणीसाठा कमी झाल्यानंतर सिंचन विमोचकाजवळ दोन खड्डे पडलेले निदर्शनास आले व अधीक्षक अभियंता,मध्यवर्ती धरण सुरक्षा संघटना यांनी भेट देऊन कामाची गुणवत्ता ही खराब असल्यामुळे २००९ मध्ये धरणात पाणीसाठा करणे धोकादायक असल्याचे मत व्यक्त केले. म्हणून २००९ मध्ये मा.मुख्य अभियंता ल.पा. (स्थानिक स्तर) यांचे समवेत झालेल्या बैठकीत धरणाच्या घळभरणी भागातून पाण्यासाठी नैसर्गिक मार्ग मोकळा करून देणेबाबत ठरविण्यात आले व हे काम यांत्रिकी संघटनेकडून करून घेण्याबाबत ठरले. यावरुन खात्याने दुरुस्ती करण्याबाबत ठेकेदाराच्या अनामत रक्कमेतून २००६-०७ मध्ये काम करून घेतले आहे. तसेच सन २००४ ते २००८ कालावधीतील गळती ही धोकादायक नसल्याने २००८ पर्यंत गळती संदर्भात ठोस उपाययोजना सन २००४ मध्ये लगेचच घेतली नाही.

सन २००९-१० मध्ये प्राथमिक तपासणी नंतर संबंधित अधिकाऱ्यांच्यावर जबाबदाऱ्या निश्चित करून, जुलै-२०१२ मध्ये दोषारोप पत्रे सादर करण्यात आली आहेत. याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर/कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ खाली दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली असून सविस्तर चौकशीसाठी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत याबाबतची विभागीय चौकशी मंत्रालयीन स्तरावरुन विषेश चौकशी अधिकारी (२) सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत सुरू आहे. याबाबत दि. ०९.०४.२०१५ रोजीची सुनावणी संस्थगित होऊन पुढील तारीख निश्चित करण्यात आली आहे.

दुरुस्ती उपाययोजनांचा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचा अभिप्राय घेऊन. सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. १०५५.६१ लक्ष चे शासनास सादर केले आहे. त्यानंतर शासनाने दि. ११/१०/२०१२ अन्वये धरणात शास्वत पाणी साठा होणार असले बाबत पुनश्चः खात्री करणेसाठी सी.डी.ओ.नाशिक यांना विचारणा केली आहे.

त्यानंतर दि. २०/१०/२०१२ व १८/१/२०१३ रोजी अधीक्षक अभियंता महाराष्ट्र संकल्प चित्र संघटना, नाशिक यांनी क्षेत्रिय भेटी दिल्या आहेत. व या ठिकाणचा भूस्तर हा पाझरास अनुकूल असल्याने याबाबत भूवैज्ञानिकांचे मत घेण्याबाबत कळविले. त्यानंतर सदर कामास वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, कोल्हापूर यांनी दिनांक १५.०५.२०१३ रोजी कामास भेट देऊन आपला अहवाल दिला. सदर अहवालानुसार क्षेत्रीय परिसरातील दृष्टांश पहाता उभ्या आडव्या भेगा असलेला व विदारीत असा कमी प्रमाणात रुपांतरीत क्वार्टझाईट सँडस्टोन

(Low grade Metamorphosed Quartzite Sandstone) या प्रकारचा भूस्तर आढळून आला आहे. दृष्टांशामधील भूस्तराच्या रचनेनुसार व परिस्थितीतील भौगोलिक परिस्थितीनुसार या पद्धतीच्या भुस्तराने व्यापलेला परिसर हा पाण्याचा पाझर हा पाण्याचा पाझर होण्यास सहाय्यभूत ठरणारा वाटतो. सदर कार्यक्षेत्रावर धरणस्थळ अधो बाजूचा भुस्तर सदर ठिकाणी ल.पा. तलाव ऐवजी पाझर तलाव बांधणे चा पर्याय प्रस्तावित करणे योग्य ठरेल असे अभिप्राय शासनास कळविण्यात आले आहेत. त्यावर शासनाने आवश्यक ते बदल करून अंदाजपत्रक सादर करण्यास दिनांक ०६/०१/२०१४ च्या पत्रान्वये कळविले आहे. क्षेत्रीय परिस्थिती पाहता सदर योजना ल.पा. तलाव म्हणून कार्यान्वित झालेली असून मुख्य माती धरणाचे मातीकाम २००४ मध्ये पूर्ण होऊन त्यामध्ये २००४ ते २००९ या कालावधीमध्ये पाणीसाठाही करण्यात आलेला आहे. तसेच या ल.पा. तलावावर रु.४१३.७२ लक्ष इतका खर्च झालेला आहे. या योजनेच्या प्रथम सुधारित अंदाजपत्रकासही महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.लपात/११०३/५७०/प्रक्र-३४६/जल-१, मंत्रालय, मुंबई दिनांक २२/६/२००४ नुसार रु.४२०.३८ लक्ष एवढ्या रकमेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आलेली आहे. मंजूर योजनेनुसार या योजनेमध्ये ५ कि.मी. लांबीचा कालवा प्रस्तावित असून त्यायोगे १६५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यापैकी बहुतांश सिंचनक्षेत्र हे कालव्याच्या शेवटच्या टप्प्यात आहे. त्यामुळे पाझर तलाव म्हणून बदल केल्यास कालवा वगळावा लागेल व त्यामुळे प्रत्यक्ष सिंचनाऐवजी अप्रत्यक्ष सिंचन क्षेत्र कमी होणार आहे. त्यास प्रकल्पग्रस्तांचा ठाम विरोध आहे. त्यामुळे ल.पा.तलाव म्हणून बहुतांश काम झालेल्या परिस्थितीत आस्तित्वातील ल.पा. तलावाच्या गळतीवर म.सं.सं. नाशिक यांचेकडून ठोस उपाययोजना प्राप्त करून घेऊन त्याप्रमाणे दुरुस्तीची उपाययोजना करून धरणामध्ये पूर्ववत पाणीसाठा करण्याचे नियोजन आहे.

यासंदर्भात धरणामध्ये कायमस्वरूपी व विश्वासार्ह पाणीसाठा होणेचे दृष्टीने ठोस उपाययोजना सुचविणेसाठी मा.सचिव, जलसंधारण विभाग यांनी दिनांक १५ जुलै २०१४ रोजी मंत्रालयामध्ये सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक येथील संबंधित वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. सदर बैठकामध्ये सर्व बाबींची सांगोपांग चर्चा झाली व सर्वानुमते यावर उपाययोजना सुचविणेसाठी तीन मुख्य अभियंत्यांनी त्रिसदस्यीय समिती नेमण्याचे ठरले. त्यानुसार मा. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे, मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक व मा.मुख्य अभियंता, कोयना जलविद्युत प्रकल्प, पुणे यांची समिती नेमण्यात आली. सर्व समिती सदस्यांनी सप्टेंबर, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीमध्ये स्वतंत्रपणे क्षेत्रीय भेटी दिल्या. याबाबत चर्चा करण्यासाठी मा.समिती प्रमुख तथा मुख्य अभियंता, लघु सिंचन, जलसंधारण (पुणे) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त प्रसृत करण्यात आले त्यामध्ये धरण क्षेत्राच्या भूस्तराची भूवैज्ञानिकांच्याकडून पहाणी होणे आवश्यक असल्याचे नमूद केले व धरण क्षेत्रामध्ये विंधन विवरे घेऊन त्याच्या चाचणी निष्कर्षाबाबत वेगवेगळ्या भुवैज्ञानिकांची मते घेणेचे ठरले. त्याप्रमाणे सध्या कार्यक्षेत्रावर विंधन विवरे घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. भुवैज्ञानिकांचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर ते समितीच्या निदर्शनास आणून त्यानंतर सुचविलेल्या उपाययोजनेप्रमाणे अंदाजपत्रक तयार करून क्षेत्रीय काम करण्याचे नियोजन आहे.

**१.११ साक्ष :-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी जलसंधारण विभागाच्या सचिवांची व विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.२.६. ल.पा.तलाव निष्णप ता. भुदरगड, जि.कोल्हापूर रुपये ३०० कोटीचा निष्फळ खर्च झालेला आहे, असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. लघु पाटबंधारे तलावाच्या दुरुस्तीच्या कामावर अपुरे पर्यवेक्षण आणि अनियमित अंमलबजावणीमुळे रुपये ३ कोटी रुपयांचा व्यर्थ खर्च झालेला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता महालेखाकार यांनी अशी माहिती समितीस दिली की, परिच्छेद क्रमांक ३.२.६ के बारे में हमारा कहना यह है कि मायनर इरिगेशन तालाब की दुरुस्ती के काम पर अपूर्ण पर्यवेक्षण और अनियमित अंमलबजावणी के कारण ३.०० करोड़ रुपये का व्यर्थ खर्च हुआ है. महाराष्ट्र शासन के ग्रामविकास और जल संधारण विभाग ने १.७७ करोड रुपये के, तालुका भुदरगड, जिला कोल्हापुर, यहाँ के मायनर इरिगेशन के तालाब के कन्स्ट्रक्शन के काम को मार्च, १९९९ को प्रशासकीय मान्यता दी थी. इस योजना के तहत १.१८ करोड रुपये की तांत्रिक मान्यता अप्रैल १९९९ में दी थी. यह काम मार्च २००२ तक पूरा करना था. यह काम पूरा होने के बाद एक साल के अंदर यदि कहीं पर दोष दिखायी दिया तो उसको दुरुस्त करने के लिए कान्ट्रक्टर जिम्मेदार था. सन २००४ की बरसात में पहली बार इस बंधारे में पानी जमा किया गया. बाद में ऐसा ध्यान में आया कि तालाब पानी से भरने के बाद पानी लिकेज हो रहा है. दिसम्बर २००४ तक पानी बह गया. लिकेज की दुरुस्ती के लिए कार्यकारी अभियंता ने किसी भी तरह की तत्काल दुरुस्ती संबंधी कोई भी कृती न करने के कारण बरसात में भरा हुआ पानी हर साल दिसम्बर में बह कर चला जा रहा था. इससे ऐसा दिखायी देता है कि मायनर इरिगेशन विभाग कोल्हापुर ने बांधकाम का उचित पर्यवेक्षण नहीं किया. जो जवाब दिया गया है, उस जवाब में दुरुस्ती के काम में विलंब होने संबंधी का कारण एवं अपूरे पर्यवेक्षण के बारे में की गई कार्यवाहीसंबंधी कोई भी जिक्र नहीं है. मायनर इरिगेशन तालाब के बांधकाम एवं दुरुस्ती पर किया गया ३.०० करोड़ रुपये का खर्च व्यर्थ हुआ और तालाब बांधकाम का हेतु सफल नहीं हो सका.

उपरोक्त अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, भुदरगड,कोल्हापूर येथील टँकच्या डिझाईनमध्ये झालेल्या बिघाडामुळे हा टँक लिकेज झाला. सन २००४ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला. तीन वर्ष या प्रकल्पामध्ये पाणी साठा करण्यात आला होता यामध्ये डिझाईन फॉल्ट झाला होता ठेकेदारांनी याचे काम बरोबर केले नाही. त्यानंतर कमिटी पाहणीकरिता गेल्यानंतर त्यांना धरणाच्या कामामध्ये अनियमितता आढळून आली होती. विधिमंडळाची आश्वासन समिती देखील दिनांक ३० सप्टेंबर, २०१० रोजी गेली होती. समितीने या भेटींतर्गत चार ते पाच सूचना केल्या होत्या. धरणाचे काम पाहणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी, ठेकेदारांकडून या कामाचा खर्च वसूल करून घ्यावा. यासंदर्भात भूसंपादनाचे पेमेंटसंदर्भात कोर्टाने नोटीसही बजाविलेली आहे. सन २००९ मध्ये हा लघुपाटबंधारे प्रकल्प धोकादायक म्हणून जाहीर करण्यात आला होता.

दिनांक ३० सप्टेंबर,२००९ रोजी विधानसभा आश्वासन समितीने या प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर चार सूचना केल्या होत्या. पाणीसाठा पुर्ववत होण्याकरिता धरण गळती प्रतिबंध लवकरात लवकर करण्यात यावा. या दृष्टीने अधीक्षक अभियंता, नाशिक यांनी या प्रकल्पाची दिनांक ११ जानेवारी, २०११ रोजी पाहणी केली या सर्वांनी या धरणाच्या कामाकरिता पर्यायी योजना सुचविल्या होत्या असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

दिनांक २८ एप्रिल,२००४ रोजी गळती थांबविण्याकरिता तत्काळ उपाययोजना करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला होता. परंतु दोषी अधिकारी यांच्याविरुद्ध तत्काळ कारवाई करण्यात आली होती का ? ठेकेदारांनी सदोष काम केल्यामुळे गळती सुरू झालेली असतांनाही त्यांच्याकडून या कामाचा संपूर्ण खर्च वसूल केलेला आहे का ? तसेच, या दोषी ठेकेदारांचे पेमेंट थांबविणेही आवश्यक होते. ही सर्व प्रोसेस गळती झाल्याबरोबरच होणे आवश्यक आहे. आश्वासन समितीने भेट दिल्यानंतर या कारवाईच्या प्रक्रियेला गती आली हे खरे आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता जलसंपदा विभागामार्फत दोन कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता यांच्या विरुद्ध दोषारोपपत्र दिनांक ६ जुलै,२०१२ रोजी दिले गेले. या सर्व घटना आश्वासन समितीने भेट दिल्यानंतरच्या आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विधानसभा आश्वासन समितीने सदरहू प्रकल्पाला भेट दिल्यानंतर अशीही शिफारस केली होती की, पर्यवेक्षण पातळीवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य बजाविले नाही म्हणून आज धरणाचे काम निकृष्ट व सदोष झालेले आहे. अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही म्हणून त्यांच्याविरुद्ध जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करण्यात यावी असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता या कामातील हलगर्जीपणाकरिता तत्कालीन अभियंत्यांना जबाबदार धरण्यात आलेले आहे. सन २००९-२०१० नंतर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून, जुलै,२०१२ मध्ये दोषारोप पत्रे सादर करण्यात आली आहेत. या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर / कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा ७ शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम ८ खाली दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली असून सविस्तर चौकशीसाठी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत विशेष चौकशी अधिकारी यांचेमार्फत देखील याची चौकशी चालू आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला तसेच या धरणामध्ये तीन वर्षे पाणी साठा झाला होता. सन २००८ मध्ये गळती सुरू होऊन पाणी साठविण्याबाबतचा प्रॉब्लेम झाला. या धरणाची पाहणी करण्याकरिता तत्काळ स्थानिक समिती गेली व पाहणी करून प्राथमिक कार्यवाही सुरू करण्यात आली होती. निकृष्ट कामाच्या गुणवत्तेमुळे पूर्ण क्षमतेने धरणात पाणी साठा होत नाही. या कारणास्तव ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात आली असेही समितीस अवगत केले.

मंत्रालयीन चौकशी समितीने यासंदर्भात तांत्रिक उपाययोजनाही सुचविलेल्या आहेत. त्यांचा अवलंब विभागीय स्तरावर विहित कालमर्यादेत करण्यात येणार आहे का ? जेणेकरुन धरणाच्या दुरुस्तीचे काम लवकर करण्यात येईल. तसेच दोष जोखीम अवधीत म्हणजे काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीत जर कुठले दोष आढळले तर ते दुरुस्त करण्यास कंत्राटदार जबाबदार होता. कार्यकारी अभियंता यांच्या दस्तावेजांच्या तपासणीत असे आढळून आले की, कंत्राटदाराने घळ भरणीच्या कामासहित मे, २००४ मध्ये तलावाचे काम पूर्ण केले. त्यावर रुपये २.८७ कोटी खर्च झाला. या बंधाऱ्यात २००४ च्या पावसाळ्यात पहिल्यांदा पाणी साठविले गेले. तलाव भरल्यानंतर पाण्याची गळती होत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे डिसेंबर,२००४ पर्यंत पाणी वाहून गेले. या गळतीच्या दुरुस्तीसाठी कार्यकारी अभियंता यांनी कोणतीही तातडीची दुरुस्ती करण्याची कृती न केल्यामुळे पावसाळ्यात भरलेले पाणी दरवर्षी डिसेंबरपर्यंत वाहून जात होते. संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे झालेले आहे, हे स्पष्ट असतांनाही कारवाई करण्याकरिता त्या अधिकाऱ्यांची निवृत्त होण्याची वाट पाहिली जात आहे का ? अशी विचारणा समितीने केली. तसेच या प्रकल्पाच्या कामामध्ये असलेल्या तांत्रिक बिघाडामुळे पाणी साठा कमी होत गेला पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनी काम चालू असतांना केलेल्या दुर्लक्ष व हलगर्जीपणामुळे हे घडलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले.

श्री. माने, श्री. देसाई अनुक्रमे उप सचिव व ज्युनियर इंजिनियर यांच्या सुनावणीचे काम पूर्ण झालेले आहे. श्री. जाधव, उप निबंधक, श्री. बी. एस. नायक, आय.ओ. यांच्याविरुद्ध सुनावणीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. याचे काम पॅरेंट विभाग म्हणून जलसंपदा विभागाच्या देखरेखी अंतर्गत चालू आहे. जलसंपदा विभागाकडे क्वालिटी कंट्रोल असा स्वतंत्र संवर्ग अस्तित्वात नाही. या बाबीचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. जलसंधारण विभागाच्या मार्फत हा पाठपुरावा करणे चालू असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २००४ मध्ये या प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले. तीन वर्षे पाणी साठा झाला. सन २००७ मध्ये या प्रकल्पाची गळती सुरू होऊन पाणीसाठा झपाटयाने कमी झाला. तरीही याबाबतच्या अनियमिततेची चौकशी होऊन कारवाई झाली नाही. एक इंजिनियर मयत झाला. अशा प्रकारे कठोर कारवाई करण्याबाबत वेळकाढूपणाचे धोरण विभागाने अवलंबविलेले आहे. समितीच्या अहवालामध्ये प्रकल्पाच्या कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत,अनियमिततेसंबंधीच्या कारवाईच्या विलंबासंबंधी नोंद करण्यात यावी. याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे. पंधरा वर्षांमध्ये यासंबंधी कारवाई झाली नाही म्हणजे यावर आता कधीच कारवाई होणार नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता पाझर तलावाच्या संदर्भात अनेक ठिकाणी तांत्रिक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत असून या संदर्भातील तक्रारींची माहिती घेण्यात येईल व काही विषय इतर विभागाशी संबंधित आहेत ते त्यांच्या मूळ विभागाकडे पाठवून या बाबत माहिती घेऊन चार्जशीट तयार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

राज्यात मोठया प्रमाणात निकृष्ठ दर्जाची कामे झालेली आहेत. यामध्ये कंत्राटदार व अधिकाऱ्यांचे संगनमत झालेले आहे. या बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. धरणात पाणी सोडल्यानंतर एक-दोन वर्षातच तक्रारी येत असतील तर ते योग्य नाही. या करिता समिती स्थापन करून या समितीने तपासणी करणे आवश्यक आहे. या संदर्भात एवढी वर्षे होऊन देखील कोणालाही निलंबित केलेले नाही. या करिता एक संयुक्त समिती स्थापन करता येईल येणाऱ्या तक्रारींवर ही समिती कारवाई करु शकते. यामुळे कमी कालावधीमध्ये निर्णय घेता येईल. या संदर्भात कोणते धोरणात्मक निर्णय घेतले आहे, याची समितीला माहिती द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी याकरिता दोन समित्या तयार करण्यात येतील असे समितीस सांगितले.

लघुपाटबंधारे तलावामध्ये सन २००४ मध्ये पाणी सोडल्यानंतर गळती सुरू झाली. तेथील एस्टीमेट फॉल्टी आहे काय याची सर्व्हे करताना छाननी केली नव्हती काय ? केंद्रीय संकल्पचित्र सीडीओ यांनी पाहणी केली नव्हती काय ? यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे कंत्राटदारासोबत ज्या अधिकाऱ्यांनी या कामाला मान्यता दिली, त्यांची देखील चौकशी झाली पाहिजे.

तसेच १ कोटी ७७ लाख रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली व तांत्रिक मान्यता १ कोटी १८ लाख रुपयांची मिळाली. टेंडर पास झाल्यानंतर काम पूर्ण करण्याची मुदत सन २००२ पर्यंत होती. हे काम सन २००४ मध्ये पूर्ण झाले. कामास विलंब झाल्यामुळे दंड आकारण्यात आला काय ? हे काम २.८७ कोटी रुपयांचे असताना त्या करिता सुधारित तांत्रिक मंजुरी घेतली होती काय ? १ कोटी १८ लाख रुपयांच्या कामाला तांत्रिक मान्यता घेतली असून त्याकरिता निविदा काढली वर्क ऑर्डर दिली. दोन्ही प्रकारच्या मंजुरी न घेता हे काम केले आहे काय ? सुप्रमा कधी घेण्यात आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता उपरोक्त संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू असून सीडीओ, कंत्राटदारांनी काम बरोबर केले आहे, मात्र ही साईट का निवडली असा प्रश्न आहे. यासंदर्भात काही तक्रारी आल्या होत्या. तसेच दि. २२ जून, २००४ रोजी ४२०.३८ लक्ष रुपयांच्या कामाला सुप्रमा घेण्यात आली होती अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

काम पूर्ण करण्याची मुदत सन २००२ मध्ये संपली होती. अशा वेळी काम करण्याकरिता फेर टेंडर काढले होते काय ? मुदत संपल्यानंतर ५-१० टक्के काम राहिले असल्यास काम पूर्ण करण्याची मंजुरी दिली जाते. मात्र या ठिकाणी जवळजवळ अडीच पटीने काम वाढले. हे वाढीव काम टेंडर काढून करता आले असते. कंत्राटदाराच्या फायद्यासाठी हा कालावधी वाढवण्यात आला होता काय ? तसेच सन २००२ मध्ये काम पूर्ण व्हावयास हवे होते. यामुळे सन २००४ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्याचे काहीच कारण नव्हते. हे काम दुसऱ्या कंत्राटदारास द्यावयास हवे होते आणि सुप्रमा घेतल्याशिवाय काम सुरू करता येत नाही ते नियमबाह्य आहे.

या तलावामध्ये सध्या लिकेज होत असून तेथे पाणी साठत नाही, तेथे पाणी साठवण्याकरिता १० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे असे समितीने विभागास अवगत केले तसेच सन २०१०-१२ मध्ये अधीक्षक अभियंता, नाशिक यांनी भेट दिली. येथील भूस्तर हा पाझरास अनुकूल असल्याने या बाबत भूवैज्ञानिकांचे मत घेण्याबाबत कळविले. त्या नंतर सदर कामास वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, कोल्हापूर यांनी दि. १५ मे २०१३ रोजी कामास भेट देऊन आपला अहवाल दिला. यावर उपाययोजना सुचविण्यासाठी तीन मुख्य अभियंता यांची त्रिसदस्यीय समिती नेमण्याचे ठरले. सर्व समिती सदस्यांनी सप्टेंबर १४ ते नोव्हेंबर १४ या कालावधीमध्ये स्वतंत्रपणे भेटी दिल्या. यांनतर दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी बैठक घेण्यात आली. धरण क्षेत्राच्या भूस्तराची भूवैज्ञानिकांकडून पाहणी होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार पाहणी केली गेली आहे काय ? अशीही विचारणा समितीने केली असता मुख्य अभियंता लघु सिंचन (जलसंधारण),पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि. २५ नोव्हेंबर १४ रोजी बैठक घेण्यात आली होती. या समितीने काही उपाययोजना सुचवल्या आहेत त्यापैकी एक उपाययोजना अशी होती की तेथे ४ बोअर करावेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

या सर्व प्रकरणांची चौकशी किती कालावधीमध्ये पूर्ण होईल ? कनिष्ट अधिकारी गंभीरपणे काम करीत नाही. चौकशी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक असून ठराविक कालावधीमध्ये चौकशी करून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे, अशा सूचना विभागीय सचिवांनी द्याव्यात असे समितीने सूचित केले.

महाराष्ट्रातील जलसंधारणाचे मायनर इरिगेशनचे प्रोजेक्ट, लोकल सेक्टरमध्ये जिल्हापरिषदेने केलेले साकव, तलाव आहेत त्यामध्ये बऱ्याच अडचणी असल्याने शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. उलट शेतकऱ्यांचे नुकसानच होते. या करिता मायनर इरिगेशन प्रोजेक्टचा आढावा जलसंधारण विभागाने घेतला पाहिजे. तसेच अशा प्रोजेक्टची तपासणी एका विशिष्ट कालमर्यादेत केली पाहिजे. तसेच त्या करिताची जबाबदारीही निश्चित केली पाहिजे. या अनुषंगाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक व्यापक स्वरूपात चौकशी केली पाहिजे. तसेच, चौकशीच्या गाईडलाईन्सही दिल्या पाहिजेत अशा सूचनाही समितीने विभागास केल्या.

यामध्ये जलसंपदा विभागाची देखील संयुक्त जबाबदारी असून दुसरे जलसंधारण विभागात क्वालिटी कंट्रोलची काही सिस्टम नाही या संदर्भात समितीने शिफारस केल्यास बरे होईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीने उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी पुन्हा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे, तसेच मान्यता न घेता १०.७८ लक्ष रुपयांचे जे दुरुस्तीचे काम झालेले आहे, त्याबाबतची माहिती द्यावी असे विभागास सांगितले असता निष्णप, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर या कामातील अनियमितता यासंदर्भात कंत्राटदाराची सुरक्षा अनामत रक्कम रुपये १७.९०५ लक्ष शासकीय खाती जमा केलेली आहे. तसेच, दक्षता पथकाने पाहणी केल्यानंतर कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांवर ८५ लाख रुपयांची वसुली निश्चित केलेली आहे. त्यांना चार्जशिट दिलेली आहे. त्यांची चौकशी सुरू झालेली असून सदर अधिकारी हे जलसंपदा विभागाचे होते व ते जलसंधारण विभागात प्रतिनियुक्तीवर होते त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी दोषारोपपत्र निश्चित केलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

दोषींवर दोषारोपपत्र निश्चित केल्यानंतर चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. त्यांचा रिपोर्ट प्राप्त झालेला असून सदरहू रिपोर्ट शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात आलेला आहे. तो २-३ दिवसांपूर्वीच मा. मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यात आलेला असल्याचे सचिव, जलसंपदा विभाग यांनी समितीस सांगितले तसेच चौकशी अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीनुसार दोषींवर आरोप सिद्ध झालेला आहे. दोषींना काय शिक्षा द्यावी, हे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर ठरत असते असा खुलासाही विभागीय सचिवांनी केला. तसेच दोषी असणारे ते चारही अधिकारी सेवानिवृत्त झालेले असून त्यांच्याकडून वसूली प्रस्तावित केली आहे असे समितीने सांगितले.

सन २००४ मधील प्रकरणावर समितीस सन २०१५ मध्ये चर्चा करीत आहोत. दोषींवर त्याच वेळेस कारवाई केली असती तर, आज ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्यावर कोणती कारवाई करायची, असा प्रश्नच उद्‌भवला नसता. महालेखाकारांनी याबाबतचा रिपोर्ट पाठविल्यानंतर त्यावर काहीही कारवाई न होता तो ३-४ वर्षे असाच पडून होता. याकरिता संबंधितांवर काय कारवाई केली आहे ? दोषींवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या सेक्शन ८ अंतर्गत कारवाई केली आहे की, सेक्शन १० अंतर्गत कारवाई केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता वसुली संदर्भातील प्रकरणे मेजर पेनल्टी धरतो. दोषी अधिकारी सेवेत असते तर त्यांच्या विरुद्ध अधिक कडक कारवाई प्रस्तावित केली असती मात्र ते सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या सेक्शन ८ अंतर्गत वसुली प्रस्तावित केलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. ही बाब गंभीर असून धरण फुटण्याची वेळ आली होती त्यामुळे पाण्याचा विसर्गही काढावा लागला. सदरहू प्रकरणाबाबतचा चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल कधी प्राप्त झाला आहे व सन २००४ मध्ये हे प्रकरण उघडकीस आले त्यानंतर चौकशी समिती कधी नेमली, चौकशी समितीला तिचा अहवाल सादर करण्याकरिता किती दिवसांची मुदत दिली होती, चौकशी अधिकाऱ्यांनी हे प्रकरण १० वर्षे प्रलंबित ठेवले का ? अशी विचारणा समितीने केली.

या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, दिनांक ३० जून २००८ रोजी जलसंधारण विभागाकडून अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांच्याकडे अहवाल पाठविण्यासाठी पत्र पाठविण्यात आले. दिनांक २९ ऑगस्ट २००८ रोजी दक्षता पथकाने तलावाची क्षेत्रीय पाहणी केली. दिनांक २ सप्टेंबर २००८ रोजी तलावाच्या गुणवत्ता चाचण्या घेऊन निष्कर्ष अभिप्रायासह पाठविण्याबाबत अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांना दक्षता पथकाने कळविले. दिनांक ५ डिसेंबर, २००८ रोजी अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांचा अहवाल दक्षता पथकाकडे सादर झाला. दिनांक ३० मार्च, २००९ रोजी अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांचा अहवाल जलसंधारण विभागाकडे सादर झाला. दिनांक ६ डिसेंबर, २०१० रोजी मुख्य अभियंता ल.पा. स्थानिक स्तर, पुणे यांच्याकडून विभागीय चौकशीचा प्रस्ताव सिंचन व्यवस्थापन (कामे) कार्यासनाकडे सादर झाला. दिनांक १० फेब्रुवारी, २०११ रोजी सिंचन व्यवस्थापन (कामे) यांच्याकडून सदर विभागीय चौकशीचा अहवाल दक्षता-१ कार्यासनाकडे सादर झाला. दिनांक २०.४.२०११ रोजी दक्षता कार्यासनाकडून मुख्य अभियंता, ल.पा. स्थानिक स्तर, पुणे यांच्याकडे प्रस्तावाबाबत पूरक माहिती मागविली. ल.पा. स्थानिक स्तर, पुणे यांना मे व जून, २०११ मध्ये स्मरणपत्र पाठविण्यात आले. दिनांक १०.८.२०११ व दिनांक २७.९.२०११ रोजी मुख्य अभियंता, ल.पा. स्थानिक स्तर, पुणे यांना अर्धशासकीय पत्र पाठविले. दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ रोजी मुख्य अभियंता, ल.पा. स्थानिक स्तर, पुणे यांच्याकडून पूरक माहिती प्राप्त झाली. दिनांक ६ मार्च, २०१२ रोजी विभागीय चौकशीच्या प्रस्तावावर मुख्य अभियंता यांचे तांत्रिक अभिप्राय प्राप्त झाले. दिनांक १३ मार्च, २०१२ रोजी विभागीय चौकशीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केला. दिनांक २ एप्रिल, २०१२ रोजी विभागीय चौकशीच्या प्रस्तावाला सामान्य प्रशासन विभागाची मान्यता मिळाली. दिनांक १२ जून, २०१२ रोजी विभागीय चौकशीच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री महोदयांची मान्यता मिळाली. दिनांक ६ जुलै, २०१२ रोजी दोषारोप पत्रे निर्गमित करण्यात आली.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१२ मध्ये विभागीय चौकशीच्या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर ऑगस्ट, २०१५ मध्ये आपल्याकडे तो अहवाल आला. तो पर्यंत यातील दोषी अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने या प्रकरणी केवळ पैशांच्या वसुलीची कारवाई करण्याचाच पर्याय दिसतो. तसेच विभागीय चौकशी सुरू करीत असताना त्यासाठी ३-४ किंवा ६ महिन्यांची कालमर्यादा घालता येत नाही काय ? हे प्रकरण सन २००४ मध्ये निदर्शनास आले असून सन २०१२ मध्ये या संदर्भातील चौकशी सुरू करण्यात आली आहे. सन २०१२ मध्ये मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी करण्यास परवानगी दिलेली असताना देखील विलंब लावण्यात आलेला आहे. यामध्ये कोण अधिकारी होते, त्यांची नावे व ते सेवानिवृत्त केव्हा झाले त्यांच्या तारखा समितीला सांगाव्यात असे समितीने सांगितले.

श्री. जाफळेकर, अधीक्षक अभियंता हे दिनांक ३१ जुलै २०१५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. नाईक, उप विभागीय अभियंता हे दिनांक ३० नोव्हेंबर २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. खोत शाखा अभियंता हे दिनांक ३१ मे २०१४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर श्री. र. के. देसाई, शाखा अभियंता हे दिनांक ३१ मे २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१२ मध्ये विभागीय चौकशी करण्यास परवानगी दिली होती. या प्रकरणाची विभागीय चौकशी सहा महिन्यांत पूर्ण केली असती तर हे सर्व अधिकारी सेवेत असते व त्यांच्यावर कारवाई करता आली असती कारण हे सर्व अधिकारी २०१३, २०१४ व २०१५ या वर्षांत सेवानिवृत्त झाले आहेत. या अधिकाऱ्यांकडून ८५ लाख रुपये शासनाला वसूल करावयाचे आहेत ते कशा प्रकारे वसूल करण्यात येणार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता त्यांच्या पेन्शनमधून ही रक्कम वसूल करता येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या प्रोजेक्टची एकूण किंमत किती होती. त्यापैकी किती रक्कम खर्च झाली आहे. जी रक्कम खर्च करण्यात आली त्यातून काही आऊटपूट निघाला आहे काय ? ही रक्कम हेल्डअप झालेली आहे. या बंधाऱ्यापासून जी सिंचन क्षमता निर्माण होणार होती तो उद्देश पूर्ण झाला आहे काय ? किंवा जो बेसिक खर्च करण्यात आलेला आहे तो वाया गेलेला आहे काय ? प्रकल्प पूर्ण झाला नसेल तो पूर्ण करण्यासंदर्भात पुढील काय कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच त्या प्रकल्पातून गळती होत असल्यामुळे तो दुरुस्त करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. ते काम पूर्ण होऊन सिंचनाचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला आहे काय ? आता त्या प्रकल्पाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली तसेच रुपये ८५ लाख शासन कशाप्रकारे वसूल करणार आहे. पेन्शनमधून ही रक्कम वसूल करताना आता शासनाला अडचण येणार आहे, त्यामुळे याबाबत काही दुसरा मार्ग आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता या प्रकरणाची चौकशी सुरू असताना वसुलीचा विचार करण्यात आलेला आहे. जे दोषी अधिकारी आहेत, त्यांची मालमत्ता सील करून व त्यांचा लिलाव करून संबंधित रकमेची वसुली करता येईल, असा एक पर्याय शासनाकडे असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या प्रकरणाची चौकशी करण्यास मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१२ मध्ये परवानगी दिलेली आहे. सन २०१२ ते २८ ऑगस्ट २०१५ पर्यंत या चौकशीसाठी इतका विलंब लागण्याचे काय कारण आहे. या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, विभागीय चौकशी अधिकारी यांना अर्ध न्यायिक अधिकार देण्यात आलेले असतात. त्यांच्या प्रोसेसप्रमाणे जो उशीर झालेला आहे तेवढाच उशीर या प्रकरणात झालेला आहे. चौकशीचा अहवाल आल्यानंतर सदर प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री महोदयांकडे सादर करण्यात आले आहे.

विभागीय चौकशीसाठी ४० महिन्यांचा कालावधी लागला असल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. प्रकल्पावर करण्यात आलेला खर्च वाया गेला आहे काय ? या प्रकल्पाची दुरुस्ती करून तो प्रकल्प उपयोगात आणला आहे काय याबाबत विभागाचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्यामध्ये पाणी अडविण्यात आले होते, परंतु प्रकल्पातून गळती होते असे लक्षात आल्यावर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते. जलसंधारण विभागाच्या दक्षता पथकाकडून पाहणी केल्यानंतर त्या कामासाठी १ कोटी ७० लाख रुपयांचे इस्टिमेट तयार करण्यात आले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हा प्रकल्प दुरुस्त करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता यांच्याकडून वित्त विभागाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या दुरुस्तीला मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

या प्रकल्पाची एकूण किंमत किती होती. त्यापैकी किती रक्कम खर्च झाली आहे. त्या प्रकल्पाची आता उपयोगिता किती आहे. या समितीच्या प्रश्नाला या प्रकल्पावर २ कोटी ८७ लाख रुपये खर्च झाले आहेत. ज्या ठिकाणावरून वेस्ट वॉटर जाते त्या ठिकाणी दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती, त्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येत आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परंतु या प्रकल्पाचा जो ठेकेदार होता त्या व्यक्तीला व त्याच्या कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय ? विभागाकडून दिलेल्या लेखी उत्तरात सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हाधिकारी यांच्याकडून सदर ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू आहे असे नमूद केल्याचे समितीने सांगितले असता संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. जलसंधारण विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्राद्वारे कळविले आहे की, या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे. त्याचप्रमाणे या ठेकेदारास कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. त्याचा करारनामा संपुष्टात आणला आहे. त्यामुळे त्याची नव्याने कोठेही नोंदणी करण्यात येऊ नये अशा प्रकारे नोंदणी न झाल्यामुळे त्याला

पुन्हा कोणतेही काम घेता येणार नाही. ८५ लाख रुपये वसूल करण्याबाबत सचिव महोदयांनी सांगितल्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रापर्टीचा लिलाव करून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हा प्रकल्प सुरू करताना भूवैज्ञानिक यांच्याकडून तपासणी अहवाल तसेच त्यांची मान्यता घेण्यात आली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता सीडीओ यांच्याकडून मान्यता घेण्यात आली होती. तसेच मेरी चे डायरेक्टर यांच्याबरोबर या प्रकल्पाबाबत चर्चा केली होती. या प्रकल्पामध्ये हेड रेग्युलेटरसाठी ११ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. त्यांच्याकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतर जलसंधारण विभागाकडून या कामावर निधी खर्च करण्यात आलेला आहे. तसेच सीडीओ यांच्याकडून जमिनीचे पोरोसिटी मापदंड प्रमाणपत्रानुसार त्या ठिकाणी बंधारे घेता येतात त्या ठिकाणच्या जमिनीतील पोरोसिटीचे प्रमाण ५० पर्यंत असल्यामुळे तेथे पाणी थांबत नसल्यामुळे ते जमिनीतून पाझरून जाते. यासंदर्भात द्विसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता व सीडीओ विभागाचे मुख्य अभियंता यांची समिती स्थापन करण्यात आली होती. यासंदर्भातील अहवाल सादर करण्यात आला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या प्रकल्पावर झालेला पूर्ण खर्च वाया गेलेला आहे. आता या प्रकल्पाची दुरुस्ती करण्यासाठी जो नवीन प्रस्ताव तयार करण्यात येत आहे त्यासाठी वित्त विभागाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आता कारवाई संदर्भातील प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी कारवाईला मान्यता दिल्यावर काय कारवाई सुरू करण्यात आली यासंदर्भात माहिती समितीला कळविण्यात यावी. तसेच दिनांक २० ऑक्टोबर २०१२ व दिनांक १८ जानेवारी २०१३ रोजी अधीक्षक अभियंता महाराष्ट्र संकल्प चित्र संघटना, नाशिक यांनी क्षेत्रिय भेटी दिल्या आहेत. त्यावेळी त्यांनी अशी शिफारस केली की, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी पाहणी करून अहवाल सादर करावा. त्यानंतर भौगोलिक परिस्थितीची पाहणी करून अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर मुख्य अभियंता लघु सिंचन पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ रोजी बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत धरण क्षेत्राच्या भूस्तराची भूवैज्ञानिकांच्याकडून पाहणी होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. ही पाहणी अद्याप झालेली नाही काय ? या समितीच्या प्रश्नाला सदर प्रकल्पाच्या जागेची भूवैज्ञानिक यांच्याकडून प्राथमिक तपासणी झालेली आहे. आता डिटेल चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे, त्यांचा अहवाल आल्यानंतर वित्त विभागाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी केली.

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कारवाई करण्यास परवानगी दिल्यानंतर काय कारवाई करण्यात आली यासंदर्भातील माहिती समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सांगितले असता माहिती समितीस सादर करण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित केले तथापि माहिती अप्राप्त आहे.

शासनाच्या पैशाची लूट करण्यात आलेली असल्यामुळे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय ? तसेच संबंधित ठेकेदार आश्विनी कंस्ट्रक्शन यांची कामे दुसऱ्या ठिकाणी सुरू असून अश्विनी कंन्ट्रक्शन कंपनीचे जे कोणी पार्टनर असतील त्यांच्यावर देखील फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता यासंदर्भातील विभागीय चौकशी पूर्ण झाल्यावर याबाबत पुढील कार्यवाही करता येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

बाळगंगा व कोंडाणे प्रकल्पासाठी जे सुत्र लावण्यात आले तेच सुत्र या प्रकल्पाला लावावे असे मत समितीने व्यक्त केले असता कंत्राटदाराचे रजिस्ट्रेशन आता होणार नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्यांची पुन्हा नोंदणी करण्यात येणार नाही. सदर कंत्राटदार सुरूवातीला एका नावाने कंपनी रजिस्टर करीत असेल तर पुन्हा तो दुसऱ्या नावाने कंपनी रजिस्टर करु शकतो म्हणून सदर कंपनी व कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात आले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जलसंधारण विभागामार्फत कोंडाणे व बाळगंगा प्रकल्पांच्या बाबतीत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधित कंत्राटदारांना अटकही करण्यात आलेली आहे. ते गुन्हे विभागाने ज्या नियमाखाली दाखल केले आहेत, त्याच नियमाखाली या प्रकरणीही विभागाने फौजदारी कारवाई करावी, अशी समितीची अपेक्षा आहे. कोंडाणे आणि बाळगंगा प्रकल्पांच्या बाबतीत अधिकारी आणि कंत्राटदार यांच्याविरुद्ध न्यायालयात केसेस सुरू आहेत. म्हणजे, राज्यातील एका प्रकल्पाच्या बाबतीत विभागाने फौजदारी कारवाई केलेली आहे तशीच या प्रकरणी फौजदारी कारवाई करणार का अशी समितीने विचारणा केली व कायद्यानुसार फौजदारी खटला दाखल करणे शक्य असेल तर या प्रकरणी संबंधित कंत्राटदारांच्या विरोधात फौजदारी कारवाई विभागाने करावी. अधिकाऱ्यांवर करावयाच्या कारवाईबाबतचा प्रस्ताव विभागाने मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेला आहे. मुख्यमंत्री महोदय निर्णय घेतील त्याप्रमाणे त्यांच्यावर कारवाई होईल. परंतु, कंत्राटदारांनी हजगर्जीपणा व निष्काळजीपणा केलेला आहे. जलसंपदा विभागाचे अधिकारी जलसंधारण विभागाकडे प्रतिनियुक्तीवर येतात. परंतु, दोन्ही विभागांसाठी सर्व्हिस रुल्स सारखेच आहेत. त्यामुळे या सर्व प्रकरणी समितीने जे निदेश दिले आहेत त्याप्रमाणे विभागाने १५ दिवसांच्या आत कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले असता समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

या प्रकरणात पाणी झीरपून, धरण फुटून लोकांचे जीव धोक्यात येण्याची शक्यता असतानाही कंत्राटदारांविरोधात फौजदारी कारवाई का झाली नाही ? हा सार्वजनिक हिताचा प्रश्न आहे त्यामुळे या कंत्राटदारांविरोधात फौजदारी कारवाई झालीच पाहिजे. तशी कारवाई करता येत नसेल तर तो नियम समितीला सचिवांनी दाखवावा. यापुढे देखील निविदा निघणार आहेत परंतु, अशी एखादी घटना घडली तर संबंधित कंत्राटदार आणि

अधिकारी यांच्याविरोधात फौजदारी कारवाई केली जाईल, अशा प्रकारची अट विभागाने निविदा अटींमध्ये घातली पाहिजे तशी अट विभागाकडून घालण्यात येणार आहे का ? या समितीच्या प्रश्नाला समितीच्या निदेशानुसार फौजदारी कारवाईची बाब तपासून ती माहिती समितीला सादर करण्यात येईल तसेच निविदेमध्ये घालावयाच्या अटीबाबत उपस्थित केलेली बाबही तपासून घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

या परिच्छेदासंदर्भात विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की, "या धरणातील गळती ही कामातील हलगर्जीपणामुळे, निकृष्ट कामामुळे आहे व संबंधितांवर दोषारोप पत्र बजावण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन झाली आहे." समितीचे म्हणणे एवढेच आहे की, या धरणामुळे लोकांचे जीवन धोक्यात आले व त्यामुळे काम थांबविले आहे. त्यादृष्टीने संबंधित कंत्राटदारांविरोधात फौजदारी कारवाई होऊ शकते. तसेच, अधिकाऱ्यांवर केवळ वसुलीची कारवाई करीत असताना फौजदारी कारवाई मात्र करीत नाही. त्यामुळे अधिकारी आणि कंत्राटदार यांच्याविरोधात फौजदारी कारवाई करणे गरजेचे असून विभागाने ही कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच अधिकाऱ्यांच्या तांत्रिक चुका, कंत्राटदारांचा कामातील हजगर्जीपणा, निकृष्ट बांधकाम, कमी दर्जाचे बांधकाम साहित्य वापरणे यामुळे शासनाचे करोडो रुपये खर्च होत असले तरी बांधकामाची गुणवत्ता मिळत नाही व लोकांच्या जीवनाशी खेळणाऱ्या घटना घडतात. अशा घटना राज्यातील अनेक प्रकल्पांच्या बाबतीत घडल्या आहेत. त्या संदर्भात कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यामुळे अशा सर्व प्रकल्पांच्या बाबतीत दोषींवर कारवाई करावी, अशा प्रकारची शिफारस समितीने शासनाला करावी, असे समितीने एकमताने ठरविले.

विभागाने या सर्व मुद्यांचा विचार करून एक नियमावली समितीला प्रस्तावित करावी. अनेक प्रकल्पांवर सरकारचा निष्फळ खर्च झालेला आहे. प्रकल्प टेक्निकली साऊंड नसताना अनेक प्रकल्प मागील काळात हाती घेण्यात आले व त्यावरील पूर्ण खर्च वाया गेला आहे. अशा सर्व प्रकल्पांच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांवर आपण जोपर्यंत जबाबदारी निश्चित करणार नाही किंवा फौजदारी कारवाई करणार नाही तोपर्यंत अशाच प्रकारे निष्फळ खर्च होत राहील आणि त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. फौजदारी खटला दाखल करण्याबाबत आवश्यकता असेल तर विभागाने नियमात दुरुस्ती करावी, अशी समितीची शिफारस असल्याचे समितीने विभागास सांगितले.

संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांच्या मालमत्ता जप्त करण्याबाबतची तरतुदही नियमात असली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

**समितीच्या शिफारशी :-**

१.१२ (१) जलसंधारण विभागामार्फत ता.भुदरगड, जि.कोल्हापूर येथे बांधण्यात आलेल्या लघुपाटबंधारे तलावाकरिता रु. १.७७ कोटीची प्रशासकीय मान्यता असताना घळभरणीच्या कामासहीत रु. २.८७ कोटी एवढा खर्च झाला. तलावाचे बांधकाम माहे मे, २००४ मध्ये पूर्ण झाले. पावसाळ्यात तलावात पाणी जमा झाले परंतु माहे डिसेंबर, २००४ पर्यंत संपूर्ण पाण्याची गळती झाली. पुढे सतत गळती होत राहिली. सन २००९ मध्ये मध्यवर्ती धरण सुरक्षा संघटना यांनी भेट देऊन कामाची गुणवत्ता ही खराब असल्यामुळे सन २००९ मध्ये धरणात पाणीसाठा करणे धोकादायक असल्याचे मत व्यक्त केले. तद्नंतर धरणाच्या घळभरणी भागातून पाण्यासाठी नैसर्गिक मार्ग मोकळा करण्याचे मुख्य अभियंता ल.पा. (स्थानिक स्तर) यांनी ठरविले व ते काम यांत्रिकी संघटनेकडून करून घेण्यात आले. एकंदरीत तलाव बांधण्यामागील उद्देश १०७५ घ.मी. पाणीसाठा करणे आणि १६५ हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचा होता तो सफल झाला नाही व धरण बांधकामावर झालेला खर्च रु. २.८७ कोटी वाया गेला. इतकेच नाही तर हा बंधारा गळतीमुळे फुटून यात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तहानी देखील होण्याचा धोका निर्माण झाला. परिणामी सन २००९ मध्ये हा प्रकल्प धोकादायक म्हणून जाहीर करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणी समितीसमोर साक्षी दरम्यान सदर बंधाऱ्याचे संकल्पचित्रामध्ये (डिझाइन) दोष असणे, पाझर तलावाच्या जागेवर सदरहू बंधारा बांधण्यात येणे, अधिकाऱ्याचे पुरेसे पर्यवेक्षण नसणे, अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा करणे, ठेकेदाराने सदोष काम करणे, दोषी ठेकेदाराची अदायगी थांबविणे आवश्यक असतानाही संपूर्ण रक्कम अदा करणे, बंधाऱ्याच्या गळतीमुळे जमीनीची धूप होऊन आजूबाजूच्या शेतात वाळू आणि दगड भरणे, विधानसभेच्या तारांकीत प्रश्नावरील उत्तरात कार्यकारी अभियंता यांनी बंधाऱ्याला कुठलीही गळती नाही असे चुकीचे उत्तर देणे, दुरुस्तीच्या कामास शासनाची मंजुरी न घेणे, आश्वासन समितीने भेटीमध्ये दिलेल्या सूचनेनंतरही कार्यवाही न होणे अशा गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. अधिकाऱ्यांची ही कृती बेजबाबदारपणाची व हलगर्जीपणाची तर आहेच शिवाय शासनाच्या निधीचा अपव्यय करणारी व याही उपर जनतेच्या जिवाशी खेळण्यासारखी आहे. या संदर्भात झालेल्या विभागीय चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर वेळीच कार्यवाही न केल्याने आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. सदरहू बंधाऱ्यांचे काम सन २००४ मध्ये पूर्ण होऊन देखील त्यातील गळतीमुळे सदरहू बंधारा हा निरुपयोगी ठरला. याबाबत सभागृहात तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून चर्चा होऊन देखील तसेच आश्वासन समिती, विधानसभा यांनी सन २०११ मध्ये या संदर्भात विशेष अहवाल देखील सभागृहाला सादर केल्यानंतर देखील सदरहू प्रकरणी कुठलीही कार्यवाही विभागाकडून करण्यात आली नाही. वास्तविक पाहता लोकलेखा समितीसमोर या संदर्भात साक्ष सुरू होण्यापूर्वी विभागाकडून प्राप्त झालेल्या ज्ञापनामध्ये या सर्व बाबी अतिशय स्पष्ट होऊन कार्यवाहीसह विभागाने समितीसमोर साक्षीस येणे अपेक्षित होते. परंतु अद्यापही या प्रकरणी पूर्ण जबाबदारी निश्चित करण्यात विभाग अपयशी ठरले. अतः सदरहू प्रकरणी कार्यवाहीबाबत विभाग गंभीर आहे किंवा कसे ? याबाबतच

साशंकता निर्माण होते. विभागाकडून सदरहू प्रकरणी चौकशी केल्याचे साक्षी दरम्यान सांगण्यात आले. परंतु सदरहू चौकशी देखील अत्यंत त्रोटक स्वरुपाची आणि तांत्रिक व वरिष्ठ अधिकाऱ्यांसंदर्भात बचावात्मक पवित्रा घेणारी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. परिणामी विभागाने अधिकाऱ्यांवर निश्चित केलेल्या जबाबदारीबाबत देखील विभागाच्या हेतूबाबत शंका घेण्यास पूर्ण वाव आहे. सदरहू प्रकरणी लघुपाटबंधारे तलाव प्रकल्पाच्या जागेची निवड करण्यापासून ते ठेकेदाराला देयकाची अदायगी करण्यापर्यंत या प्रकरणाशी संबंधित असलेल्या तांत्रिक व वरिष्ठ अधिकारी आणि सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करणे अपेक्षित असतानाही विभागाने केवळ दोन निम्न अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही केल्याचे दर्शविण्यात आले. ही बाब समितीस न पटणारी आहे. अतः तलावाच्या जागेची निवड प्रक्रिया, संकल्प चित्र तयार करणे, तांत्रिक मान्यता देणे, प्रशासकीय मान्यता देणे, तांत्रिक पर्यवेक्षण करणे, देयक अदायगीकरिता प्रमाणित करणे या संपूर्ण प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या तांत्रिक व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. सदर दोषी अधिकाऱ्यांच्या वेतन/निवृत्तीवेतनामधून वसुलपात्र रकमेची वसुली करण्यात यावी, आवश्यकतेनुसार दोषी अधिकाऱ्यांच्या मालमत्ता जप्त करून वसुली करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.१३ (२) लघु पाटबंधारे तलाव ता. भुदरगड, जि. कोल्हापूर या तलावाच्या बांधकामाकरिता नियुक्त मेसर्स अश्विनी कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने तलावाच्या कामात अत्यंत हलगर्जीपणा केलेला आहे, सन २००४ मध्ये पहिल्या घळभरणीनंतर सिंचन विमोजकाच्या दुभाजक भिंती व खालील बाजूच्या भिंतीमधून माहे ऑक्टोबर,२००४ मध्ये गळती दिसून आली, ठेकेदारास दुरुस्तीच्या सूचना देऊनही ठेकेदाराने गळती थांबविण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. तद्नंतर सन २००५, २००६ व २००७ या तीन वर्षातही धरणात दुरुस्ती करूनही निकृष्ट कामकाजामुळे पाणीसाठा होत नव्हता. एकंदरीत ठेकेदाराने सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचे करून त्यात अक्षम्य चुका, हजगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे तलाव बांधकामावरील खर्च वाया गेला व त्यात पाणीसाठाही होऊ शकला नाही, परिणामी १६५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली न आल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना त्याचा लाभ देखील मिळू शकला नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. ठेकेदाराकडून निकृष्ट बांधकामासंदर्भात वसुलपात्र रक्कम वसुल करण्यात यावी व ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात यावे. त्यांच्या नावे अन्य कंपनीची नोंदणी कुठेही करण्यात येऊ नये, मे.अश्विनी कन्स्ट्रक्शन या संस्थेच्या संचालक किंवा सभासद यांच्या नावेही अन्य ठिकाणी कोणतीही संस्था नोंदविल्या जाऊ नये व त्यांना राज्यात कोणत्याही विभागाकडून काम देण्यात येऊ नये याबाबत विभागाने कठोर उपाययोजना करावी. तसेच या संपूर्ण प्रकरणी ठेकेदार दोषी आढळल्यास त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.१४ (३) लघु पाटबंधारे विभागाने भुदरगड, जि.कोल्हापूर येथे बांधण्यात आलेल्या तलावाच्या बांधकामाची मुदत सन २००२ मध्ये संपली होती. तद्नंतर जवळ-जवळ अडीच पटीने काम वाढले. वाढीव कामाकरिता स्वतंत्र निविदा मागवून ठेकेदार निश्चित करणे आवश्यक होते. तथापि अशा पद्धतीने कार्यवाही न करता त्याच कंत्राटदाराकडून माहे मे, २००४ मध्ये वाढीव काम करून घेण्यात आले त्यावर एकूण रु. २.८७ कोटी एवढा खर्च करण्यात आला. सुधारित प्रशासकीय मान्यता न घेता व स्वतंत्र निविदा न मागविता करण्यात आलेला खर्च नियमबाह्य आहे. अशा नियमबाह्य कार्यवाहीस जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.१५ (४) लघु पाटबंधारे विभागामार्फत राज्यात मोठ्या प्रमाणावर तलावाची बांधकामे करण्यात येतात. राज्यातील अन्य ठिकाणी देखील निकृष्ट दर्जाची कामे झालेली आहेत, अशा तक्रारी आहेत. यामध्ये कंत्राटदार व अधिकाऱ्यांचे संगनमत झालेले आहे. धरणात पाणी साठल्यानंतर एक किंवा दोन वर्षातच तक्रार येत असतील तर ते योग्य नाही. कमीत कमी ५ वर्षाच्या कामाची गॅरंटी व दुरुस्तीची जबाबदारी निविदेत असावी याकरिता विभागाने एक समिती स्थापन करून सर्वच तलावाची तपासणी करणे आवश्यक आहे. तपासणीअंती लघु पाटबंधारे विभागाच्या तलावाबाबत एक धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, जेणेकरून शासनाने केलेला खर्च वाया जाणार नाही व धरणाच्या पाण्याचा लाभ संबंधित शेतकऱ्यांना मिळेल. यासंदर्भात विभागाने निश्चित केलेले धोरण व उपाययोजनेबाबतचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

१.१६ (५) समितीच्या असेही निदर्शनास आले की, जलसंधारण विभागाकडून बांधलेल्या लघू पाटबंधारे तलावाच्या गुणवत्ता नियंत्रणाबाबत कोणतीही कार्यपद्धती अस्तित्वात नाही, त्यामुळे तलाव बांधणीमध्ये गुणवत्ता राखली जात नाही, परिणामी तलावात पाणीसाठा न होणे, गळती वाढणे, शेतकऱ्यांना लाभ न मिळणे व एकंदरीत तलाव बांधणीवर झालेला खर्च वाया जाणे अशा बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. जलसंधारण विभागाने गुणवत्ता नियंत्रणाची पद्धत विभागामध्ये सुरू करावी त्यासाठी आवश्यक गुणनियंत्रण पथक तयार करावे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.

## गृह विभाग

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-११ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.१ "राज्याची सुरक्षा धोक्यात टाकून पुरवठादारास बॉम्बसूटचा पुरवठा करण्यासाठी ६.२२ कोटीचा माल मिळण्यापूर्वीच पूर्ण प्रदान केल्याने पुरवठादारास अवाजवी लाभ झाला" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

राज्यातील पोलीस पथकाला अधिक चांगली सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्याच्या उद्देशाने तात्काळ आदेश प्रक्रियेच्या अंतर्गत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने सहाय्यक पोलीस महानिरीक्षक, मुंबई यांनी ३५ संभाव्य पुरवठादाराकडून बॉम्ब नष्ट करणारी (८० बॉम्बसूटसह) साधने पुरविण्यासाठी तांत्रिक आणि वाणिज्यीक निविदा आमंत्रित केल्या (डिसेंबर २००८). खरेदी समितीच्या शिफारशीनुसार (फेब्रु. २००९), जी निविदा प्रक्रिया पुर्ततेसाठी गठीत केली होती, गृह विभागाने २८ मार्च २००९ रोजी ८२ बॉम्बसूटच्या खरेदीसाठी मेसर्स टेक्नोट्रेड इम्पेलक्स इंडिया प्रा.लि. (पुरवठादार) ला रु. ६.२२ कोटींचा पुरवठा आदेश दिला AIGP आणि पुरवठादार यांच्यामध्ये बॉम्बसूट पुरवठा करण्याबद्दल एक करार करण्यात आला (मार्च २००९) पुरवठादारास अमेरीकेतील केजो. लि. कंपनीकडून बॉम्बसूट आयात करण्यासाठी परवानगी देण्यात आली. खरेदीची पूर्ण रक्कम म्हणजे रु.६.२२ कोटी, ३१ मार्च, २००९ रोजी संक्षिप्त आकस्मिक देयकांवर काढण्यात आली.

करारातील अटींनुसार पुरवठादाराने निविदा स्विकृतींच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत बॉम्बसूटचा पुरवठा करायचा होता आणि त्याबदल्यात ९०% रकमेचे प्रदान माल मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत करायचे होते. बाकी १०% रकमेचे प्रदान माल मिळाल्यानंतर आणि त्यांचे समाधानकारक निरीक्षण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत करावयाचे होते. माल स्विकारण्यापुर्वी विभागाच्या अधिकृत अधिकाऱ्यांकडून मालाची तपासणी होणे आवश्यक होते.

सीमा शुल्क विभागाकडून सीमा शुल्कामधील सवलतींचे प्रमाणपत्र मिळण्यास उशीर झाल्यामुळे बॉम्बसूटचा पुरवठा विहित वेळेत होऊ शकला नव्हता असे DGP च्या दस्ताऐवजांची तपासणी करिता (ऑगस्ट २०१०) दिसून आले. तथापि, महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या सभापतींकडून आणि गृह खात्याच्या राज्य मंत्र्यांकडून दूरध्वनीद्वारे मिळालेल्या सूचनेनुसार (२८ जून २००९) AIGP यांनी पुरवठादारास एकरकमी प्रदान करण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी पुरवठादाराकडून त्यांच्या प्रदान रकमेइतकी बँक प्रतिभुती (BG) घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे जुलै २००९ पर्यंत वैध असलेल्या BG प्राप्त झाल्यानंतर (१ जुलै २००९) रोजी पुरवठादारास ६.२२ कोटी प्रदान करण्यात आले. (दि. २८.०६.२००९)

विभागाच्या असे निदर्शनास आले की, पुरवठादाराने (ऑगस्ट २००९ ते मे २०१० या दरम्यान) अमेरीकेच्या ऐवजी दक्षिण आफ्रिकेतून ३६ तर चीन मधील अधिकृत कारखान्यातून ४६ बॉम्ब सुट आयात केले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही अधिकृत प्रयोगशाळेकडून ह्या मालाच्या गुणवत्तेची चाचणी करण्यात आली नव्हती. पुरवठादाराकडून मालाची आपुर्ती करण्याचा (मे २००९) प्रयत्न झाला. तरी विभागाद्वारे तो माल, गुणवत्ता चाचणी न केल्याच्या आधारावर स्विकारला गेला नाही. विभागाद्वारे मालाचा पुरवठा करण्यामध्ये झालेल्या विलंबाकरिता आणि कालबाह्य झालेल्या बँक प्रतिभूतीची वैधता पुरवठादाराकडून वाढवून घेण्यासाठी कुठलीही कृती केली नाही. अशाप्रकारे करारातील अटींचा भंग करून माल प्राप्त होण्यापूर्वी आणि त्याचे निरीक्षण करण्यापूर्वी १००% रक्कम प्रदान करणे, करारामध्ये गुणवत्तेच्या खात्रीबाबतीत अपुरी तरतूद असणे, बँक प्रतिभूतीची वैधता वाढवून न घेणे इत्यादीमुळे २ वर्षापेक्षा अधिक विलंब होऊनही ८२ बॉम्बसुटचा पुरवठा होऊ शकला नव्हता. याशिवाय आकस्मिक निधीमधून रक्कम आहरण करून तात्काळ आदेश प्रक्रिया देण्यामागील हेतू या प्रकरणात सफल झाला नाहीच. ह्याशिवाय विभागाला स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतील होणाऱ्या लाभापासून वंचित व्हावे लागले.

ह्याशिवाय राज्याची सुरक्षा व्यवस्था धोक्यात घालून विभागाच्या अनियमित त्रुटीमुळे पुरवठादारास आर्थिक लाभ झाला.

शासनाद्वारे (मे २०११) एका अंतरिम उत्तराद्वारे असे सांगण्यात आले की, DGP यांना बॉम्बसुट प्राप्त न झाल्याविषयी चौकशी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे अतिरीक्त पोलीस महासंचालक यांनी (जुलै २०११) मध्ये कळविले की, हे प्रकरण भ्रष्टाचार विरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आले आहे. अंतिम अनुपालन अहवाल प्राप्त झाला नाही. (ऑक्टोबर २०११)

**ज्ञापन :-**

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.**

१. सदर प्रकरणी गृह विभाग, मंत्रालय येथील श्री.रसाळ, सह सचिव, श्री.चवरे, कक्ष अधिकारी व श्री. कुडले, सहायक यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून सदर प्रकरणी सचिव (विशेष), गृह विभाग यांची विशेष चौकशी अधिकारी (२) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुषंगाने दि. १२ मे २०१५ रोजी चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यावर दि. ७ जून २०१५ रोजी अपचाऱ्याकडून अभिवेदन मागविण्यात आले असून अभिवेदन अद्याप अप्राप्त आहे.

२. पोलीस महासंचालक कार्यालयातील श्री.श्रीकांत तरवडे, सहा. पोलीस महानिरीक्षक यांचेविरुद्ध दि. १२.३.२०१३ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावण्यात आले असून विभागीय चौकशी चालू करण्यात आली आहे. तथापि, चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. तसेच श्रीमती अनिता राठोड (कार्यालय अधीक्षक), श्री. अनंत दबके (लिपिक) व इतरांची विभागीय चौकशी करण्यात येऊन चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालावर अपचाऱ्याचे अभिवेदन प्राप्त झाले असून त्यानुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयातर्फे कार्यवाही चालू आहे.

३. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई कार्यालयातील श्री.दिलीप बोंद्रे, सहायक आयुक्त (तत्कालीन पो.नि.) यांना बॉम्बसूट खरेदी प्रक्रियेच्या वेळी निष्काळजीपणा करून वरीष्ठांची दिशाभूल केल्याप्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.१३.०५.२०१४ च्या आदेशान्वये पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरिता स्थगित करणे ही शिक्षा देण्यात आली आहे.

४. पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे यांचे कार्यालयातील श्री.अशोककुमार नौकुडकर, सहायक आयुक्त यांचेविरुद्ध दि.१२.३.२०१३ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावण्यात आले असून विभागीय चौकशी चालू करण्यात आली आहे. चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल अप्राप्त आहे.

५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे कार्यालयातील श्रीमती हेमांगी मेढेकर, सहायक लेखा अधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.१०.२.२०१२ च्या पत्रान्वये संचालक, लेखा व कोषागारे कार्यालयास कळविण्यात आले आहे.

६. सदर प्रकरणाशी संबंधित कंपन्या व निविदाकार यांचेविरुद्ध झालेल्या चौकशीची सद्यःस्थिती :-

(१) मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि अमिनी इंडस्ट्रिज, मुंबई, या कंपनीस व कंपनीच्या निविदाकारांना कायमस्वरुपी व शनैश्वर इंडस्ट्रियल वर्क्स, मुंबई या कंपनीस ३ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दि.३०.०९.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(२) मे. टेक्नोट्रेड इंपेक्स प्रा. लि. या कंपनीचे श्री.बिमल अगरवाल यांच्याच मे. पंचरत्न प्लास्टिक व मे. जेमिनी एंटरप्रायजेस या बेनामी कंपन्या असल्याने या दोन्ही कंपन्याना देय असलेली रु.७,०२,४८,१५०/- रोखून ठेवण्यात यावी असे दि.२२.११.२०१४ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक यांना कळविण्यात आले आहे.

(३) श्री.विमल अगरवाल, संचालक, मेसर्स, टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे विरोधात कुलाबा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नं. २१/२०१२, भा.दं. वि.- ४२०,४०६,४६९,४११,१२०-बी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व याबाबत आर्थिक गुन्हे प्रकटीकरण यांचेमार्फत तपासणी चालू आहे.

(४) मे.टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांना बँक गॅरंटी पोलीस महासंचालक कार्यालयास त्वरीत सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र दि.२५.१०.२०१२ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र, टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांनी मा. सेशन कोर्ट, मुंबई येथे अटकपूर्व जामीनाच्या मंजूरीस अनुसरुन दि.२७.१२.२०१२ रोजी रु.६२१.०० लाख इतकी बँक गॅरंटी सादर केली आहे. तथापि, त्यांनी पोलीस महासंचालक कार्यालयामध्ये बँक गॅरंटी दिलेली नाही.

(५) उपरोक्त गुन्ह्यामध्ये कंपनीचे संचालक श्री.बिमल अगरवाल यांना अटकपूर्व जामीन मंजूर करताना मा. Cheif Metropolitan Magistrate, 19th Court Esplanade, Mumbai यांनी दि.२७.०८.२०१२ च्या आदेशान्वये आरोपींना रु.७.०० कोटी किंमतीची बँक गॅरंटी जमा करण्याबाबत निर्देश दिले. त्यास अनुसरुन आरोपी श्री.बिमल अगरवाल यांनी रु.७.०० कोटी रकमेची बँक गॅरंटी आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडे जमा केली असून ती वेळोवेळी पुनर्जिवीत करण्यात येत आहे.

(६) मेसर्स टेक्नोट्रेड इपेक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेली रु.६,२१,६९,१२०/- इतकी आगाऊ रक्कम परत मिळण्याकरिता न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी विधी व न्याय विभागाची परवानगी मिळण्याबाबतचा पोलीस महासंचालकाचा प्रस्ताव विधी व न्याय विभागास सादर करण्यात आला आहे.

**२.२ साक्ष :-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे व दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी पोलीस मुख्यालय, मुंबई येथे गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांची व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने परिच्छेदांवरील महालेखाकारांच्या आक्षेपासंबंधी थोडक्यात माहिती द्यावी असे सांगितले असता यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या केसमध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने विभागीय चौकशी सुरू करण्यात आली होती. अद्यापही काही केसेस संदर्भातील विभागीय चौकशी अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, मुंबई कार्यालयातील श्री. दिलीप बोंद्रे, तत्कालीन पोलीस निरीक्षक यांच्यावर

शिक्षा बजावण्यात आली असून दिनांक १३.५.२०१४ च्या आदेशान्वये पुढील देय वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरिता स्थगित करण्याची शिक्षा करण्यात आली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर इतर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

या बाबतीतील कारवाई गृह विभाग किंवा माननीय मुख्यमंत्री यांच्या स्तरावर होत नाही. तर त्या संवर्गाकरिताची डिसिप्लिनरी ऑथॉरिटी स्वतः पोलीस महासंचालकांकडे आहे. या प्रकरणाच्या बाबतीत त्यांनी समोर आलेल्या तथ्याचा अभ्यास करून डिसिप्लिनरी ऑथॉरिटीचा अधिकार वापरुन ही शिक्षा केलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या प्रकरणात जे तथ्य समोर आलेले आहे, त्याची माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, पुरवठादारास बॉम्बसूटचा पुरवठा करण्यापूर्वीच ६.२२ कोटी रुपयांचे प्रदान केल्याने पुरवठादारास अवाजवी लाभ झाला असा एजींचा आक्षेप असून या प्रकरणी श्री. रसाळ, सह सचिव, श्री. चवरे, कक्ष अधिकारी व श्री. कुडले, सहाय्यक गृह विभाग यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली. दिनांक १२.५.२०१५ रोजी चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार अपचाऱ्यांकडून दिनांक ७.७.२०१५ रोजी अभिवेदन मागविण्यात आले असून ते अद्याप अप्राप्त आहे.

ही केस तपशीलवार सांगावी जसे की, या कामाचे टेंडर कधी काढण्यात आले, ६ कोटी २० लाख रुपयांचे पेमेंट कोणाच्या सांगण्यावरुन केले गेले ही सर्व माहिती रेकॉर्डवर आली पाहिजे. असे समितीने विभागास सांगितले असता सदर माहिती सादर करण्याकरिता काही वेळ लागण्याची शक्यता असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००९ मधील प्रकरणाची सद्यःस्थिती सांगण्याकरिता सन २०१५ मध्ये विभागास सांगितल्यानंतरही काही वेळ लागणार असल्याचे सचिव सांगत आहेत याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच समितीला असे वाटते की, हा तर चौकशीचा फार्स असून तो चौकशी अहवाल पाहावा या चौकशी अहवालानुसार मागविलेली काही अभिवेदने येणे बाकी आहेत या अभिप्रायांशी विभागीय सचिव म्हणून सहमत आहात काय ? अशी विचारणा समितीने केली असता जी सद्यःस्थिती समोर आलेली आहे ती नाकारलेली नसून ती मान्य केलेली आहे त्याप्रमाणेच चौकशीत दोषी आढळलेल्यांवर कारवाई केलेली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणात ज्यांच्यावर दोषारोपण केले आहे, त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही दोषी नाही याच्याशी सचिव सहमत आहात काय ? अशी विचारणा समितीने केली असता याच्याशी विभाग सहमत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणावर पडदा टाकण्यासाठी फोर्ज चौकशी केलेली आहे. तत्कालीन पोलीस निरीक्षक आता वरिष्ठ पदावर आहेत. त्यांच्यावर केवळ एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई केली गेली. पोलीस निरीक्षकांना पोलीस महासंचालकांच्या चेंबरमध्ये प्रवेश करण्याकरिताही ८-८ दिवस बाहेर उभे राहावे लागते. अशा पोलीस निरीक्षकांनी पोलीस महासंचालकांची दिशाभूल केली असे विभागाला म्हणावयाचे आहे काय ? एका पोलीस निरीक्षकाला एवढे अधिकार आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता या प्रकरणांतर्गत डिसीप्लीनरी ऑथॉरिटीला सर्व अधिकार दिले होते. या चौकशी दरम्यान संबंधित समितीला त्यामध्ये जे तथ्य आढळले त्याप्रमाणे त्यांनी योग्य ती शिक्षा बजाविलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परिच्छेद क्र.३.३.१ संदर्भात महालेखाकार यांनी समितीस असे विदित केले की, गृह विभाग ने मार्च २००९ को ८२ बॉम्बसूट की खरीदी के लिए ६.२२ करोड़ रुपये का आदेश दिया. मार्च, २००९ को एक अग्रिमेंट हुआ. खरीदी की पूरी रकम यानी ६.२२ करोड़ रुपये, ३१ मार्च २००९ को संक्षिप्त आकस्मिक देयक पर निकाली गई. दो महीने के अंदर बॉम्बसूट सप्लाय करना था. माल स्वीकार करने से पहले विभाग के अधिकृत अधिकारी द्वारा माल की जांच होना आवश्यक था. लेकिन जून २००९ को ६.२२ करोड़ रुपये प्रदान किए गए. डिपार्टमेंट के ध्यान में ऐसा आया कि सप्लायर ने अमेरिका के बजाय दक्षिण आफ्रिका में से ३६, तो चीन में के अधिकृत कारखाने से ४६ बॉम्बसूट आयात किए थे. इस माल की अधिकृत प्रयोगशाला की ओर से गुणवत्ता की जाँच नहीं की गई थी. जो बैंक गॅरंटी थी, वह खत्म हो गई थी, बैंक गॅरंटी को बराने के बारे में कोई कृती नहीं की गई थी. अभी तक ८२ बॉम्बसूट का सप्लाय नहीं हो सका है. आकस्मिक निधि में से रकम आहरण करके तत्काल आदेश प्रक्रिया देने के पिछे का हेतु इस केस में सफल हुआ ही नहीं. राज्य की सुरक्षा व्यवस्था खतरे में डालकर डिपार्टमेंट के अनियमित त्रुटी के कारण सप्लायर को आर्थिक लाभ हुआ.

निविदेच्या अटीमध्ये असे म्हटले होते की, यामध्ये बॉम्बसूटचा माल यायच्या आधी पेमेंट करावयाचे पोलीस निरीक्षकाने ठरविले होते. निविदेच्या अटीच्या नावाखाली पोलीस निरीक्षकाला चौकशीच्या दायऱ्यामध्ये उभे करून मोठमोठे ऑफिसर्स चौकशीमधून सुटतील असे यांना वाटत आहे का ? अशी विचारणा समितीने केली.

राज्यातील पोलीस पथकाला अधिक चांगली सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्याच्या उद्देशाने तत्काळ आदेश प्रकियेंतर्गत पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने सहायक पोलीस महानिरीक्षक, मुंबई यांनी ३५ संभाव्य पुरवठादाराकडून बॉम्ब नष्ट करणारी साधने पुरविण्यासाठी तांत्रिक आणि वाणिज्यिक निविदा आमंत्रित केल्या (डिसेंबर, २००८) खरेदी समितीच्या शिफारशीनुसार जी निविदा प्रक्रिया पुर्ततेसाठी गठित केली होती.

त्यानुसार गृह विभागाने २८ मार्च, २००९ रोजी ८२ बॉम्बसूटच्या खरेदीसाठी मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि. ला रुपये ६.६२ कोटींचा पुरवठा आदेश दिला. एआयजीपी आणि पुरवठादार यांच्यामध्ये बॉम्बसूट पुरवठा करण्याबद्दल एक करार करण्यात आला. पुरवठादारास अमेरिकेतील केजो लि.कंपनीकडून बॉम्बसूट आयात करण्यासाठी परवानगी देण्यात आली. खरेदीची पूर्ण रक्कम म्हणजे रुपये ६.२२ कोटी, ३१ मार्च, २००९ रोजी संक्षिप्त आकस्मिक देयकांवर काढण्यात आली. करारातील अटींनुसार पुरवठादाराने निविदा स्वीकृतीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत बॉम्बसूटचा पुरवठा करायचा होता आणि त्याबदल्यात ९० टक्के रकमेचे प्रदान माल मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत करायचे होते. बाकी १० टक्के रकमेचे प्रदान माल मिळाल्यानंतर आणि त्यांचे समाधानकारक निरीक्षण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत करावयाचे होते माल स्वीकारण्यापूर्व विभागाच्या अधिकृत अधिकाऱ्यांकडून मालाची तपासणी करणे आवश्यक होते. दिनांक १२ मे,२०१५ रोजी चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्यावर दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी अपचाऱ्यांकडून अभिवेदन मागविण्यात आले असून अभिवेदन अद्याप अप्राप्त आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सीमा शुल्क विभागाकडून सीमा शुल्कामधील सवलतींचे प्रमाणपत्र मिळण्यास उशीर झाल्यामुळे बॉम्बसूटचा पुरवठा विहित वेळेत होऊ शकला नव्हता असे डीजीपी च्या दस्ताऐवजांची तपासणी केली असता (ऑगस्ट, २०१०) दिसून आले. तथापि, महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींकडून आणि गृह खात्याच्या राज्यमंत्र्यांकडून दूरध्वनीद्वारे मिळालेल्या सूचनेनुसार एआयजीपी यांनी पुरवठादारास एकरकमी प्रदान करण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी पुरवठादारांकडून त्यांच्या प्रदान रकमेइतकी बँक प्रतिभूती घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे जुलै, २००९ पर्यंत वैध असलेल्या बँक प्रतिभूती प्राप्त झाल्यानंतर पुरवठादारास ६.२२ कोटी रुपये प्रदान करण्यात आले असे विभागाकडील स्पष्टीकरणात दिलेले आहे. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता बॉम्बसूट खरेदीसंदर्भात विभागाच्या असे निदर्शनास आले की, पुरवठादाराने अमेरिकेच्या ऐवजी दक्षिण आफ्रिकेतून ३६ तर चीनमधील अधिकृत कारखान्यातून ४६ बॉम्ब सूट आयात केले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही अधिकृत प्रयोगशाळेकडून या मालाच्या गुणवत्तेची चाचणी करण्यात आली नव्हती. असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीस केला.

करारातील अटींचा भंग करून माल प्राप्त होण्यापूर्वी आणि त्याचे निरीक्षण करण्यापूर्वी १०० टक्के रक्कम प्रदान करणे योग्य नाही. करारामध्ये गुणवत्तेच्या खात्री बाबतीत अपुरी तरतूद असणे बँक गॅरंटीची वैधता वाढवून न घेणे यामुळे या खरेदीमध्ये विलंब झाला. एआयजीपीने हा निर्णय कोणाच्या म्हणण्यावरुन घेतला याचा यामध्ये उल्लेख केलेला आहे. विधानसभेच्या सभापती, तत्कालीन गृह राज्यमंत्री यांनी फोनवरुन सूचना केल्या, असे विभागाने म्हटलेले असून पोलीस महासंचालक कार्यालयातील श्री.श्रीकांत तरवडे सहायक पोलीस महानिरीक्षक यांचेविरुद्ध दिनांक १२ मार्च, २०१३ च्या ज्ञापनान्वये दोषारोप पत्र बजाविण्यात आले असून विभागीय चौकशी चालू करण्यात आली आहे असे सांगितलेले आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक यांनी हे प्रकरण भ्रष्टाचार विरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आले आहे. समितीला याबाबतचा अंतिम अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही असे समितीने विभागास सांगितले तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, त्यांना शिक्षा झाली पाहिजे. या संदर्भात सध्या जी काही कार्यवाही झालेली आहे, ती या विषयाला पूर्णपणे न्याय देणारी नसल्याचे सांगता समितीने नाराजी व्यक्त केली.

गृह विभाग, पोलीस महासंचालनालय कार्यालय, राज्य गुप्त वार्ता विभाग, पोलीस आयुक्त ठाणे, संचालक लेखा व कोषागरे या ४-५ विभागांमधील कर्मचारी, अधिकाऱ्यांनी चूक केल्याचे किंवा निष्काळजीपणा केल्याचे आढळून आले आहे. आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग मुंबई कार्यालयामधील श्री. बोंद्रे, सहायक आयुक्त यांनी बॉंबसुट खरेदी प्रक्रियेच्या वेळी निष्काळजीपणा करून वरिष्ठांची दिशाभूल केल्या प्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाने पुढील वर्षी देय असलेली वार्षिक वेतन वाढ एक वर्षाकरिता स्थगित केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

चुकीचे व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत जे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत त्यांच्यावर देखील जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. माननीय सभापतींनी किंवा आमदारांनी, मंत्री महोदयांनी फोन केल्यामुळे निर्णय घेतला असे विभागास सांगता येणार नाही ही बाब तपासून घेतली पाहिजे असे समितीने विभागास सुचित केले.

याअनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, पोलीस महासंचालक कार्यालयातील श्री. श्रीकांत तरवडे, सहा.पोलीस महानिरीक्षक यांचा या प्रकरणामध्ये मोठा सहभाग होता. या संदर्भातील चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.या संदर्भात शासन स्तरावर कारवाई सुरू आहे.

विभागीय सचिवांनी सांगितले आहे की, सन २०१२ मध्ये मंत्रालयाला लागलेल्या आगीमुळे जुने रेकॉर्ड नष्ट झाले. मात्र या प्रकरणाच्या संदर्भातील कागदपत्रे पोलीस महासंचालक कार्यालय, लेखा व कोषागरे यांच्याशी संबंधित आहे. मंत्रालयाला आग लागून ४ वर्षे झाली आहेत. तरी देखील विभागाला ही फाईल नव्याने तयार करता आलेली नाही यावर महालेखाकारांचा आक्षेप आहे. विभागाचे हे उत्तर समितीला योग्य वाटत नाही. ९० टक्के रकमेचे प्रदान माल मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत व उर्वरित १० टक्के रकमेचे प्रदान माल मिळाल्यानंतर आणि त्याचे समाधानकारक निरिक्षण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत करावयाचे होते. अशा प्रकारे रक्कम देण्याचे अधिकार एआयजीपी यांच्याकडे आहेत काय ? फोन आल्यानंतर अधिकाऱ्याने चुकीचा निर्णय घेतला. अशा प्रकारे फोनच्या आधारे आपल्याला निर्णय घेता येतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता फोनच्या आधारे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करणे योग्य नसल्याचे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

या संदर्भात एआयजीपी मधील संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली गेली ? त्यांना बडतर्फ का केले गेले नाही तसेच चौकशी समितीची शेवटची बैठक केव्हा घेण्यात आली व चौकशी समिती केव्हा स्थापन झाली होती तसेच जबाब नोंदवण्यासाठी संबंधित अधिकारी समिती समोर आले होते काय अशी विचारणा समितीने केली असता सचिव श्री. नलावडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

याअनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, विधानसभा अध्यक्ष व माननीय गृह राज्य मंत्री यांनी फोनवर बोलणे करून सूचना दिल्या की, ज्याप्रमाणे इतर केसमध्ये खरेदी करून रक्कम अगोदर दिली जाते, त्यानुसार रक्कम अगोदर देण्याचा नियम लावून वरील रकमेचा धनादेश काढावा असे करण्यास हरकत नाही, असे लिहून त्या खाली सही करण्यात आली आहे.

हा विषय गंभीर असून सदर प्रकरणाची चौकशी सुरू आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध चौकशी सुरू आहे, ते आता नागपूरचे डीआयजी झाले आहेत. कोणतीही चौकशी करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्याचे निलंबन केले जाते. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची चौकशी आयएएस दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. वस्तुतः संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून त्यांना नॉन एक्झिक्युटींव्ह पदावर नियुक्त करून त्यांची चौकशी केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता समितीच्या भावनांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांची नॉन एक्झिक्युटीव्ह पदावर बदली करण्याबाबत नोट पूट अप केली जाईल असे समितीस आश्वासित केले.

या प्रकरणात निधीची परतफेड कशी केली जाणार आहे, या बाबत फौजदारी गुन्हा दाखल केला काय, त्यांना ब्लॅक लिस्ट केले आहे काय ? या संदर्भात कोणती कारवाई केली जात आहे ? या समितीच्या प्रश्नाला अकार्यकारी पदावर संबंधित अधिकाऱ्याची बदली केली जाईल. तसेच वसुली बाबत काय कार्यवाही केलेली आहे त्या बाबत माहिती घेऊन समितीला अवगत करण्यात येईल असे आश्वासित केले तसेच विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव देण्यात आलेला असून तो प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात अधिक माहिती देता येईल असेही समितीस सांगितले.

सहा वर्षे होऊन देखील अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही. पुरवठादाराने ॲन्टीसिपेटरी बेल करिता अर्ज दिलेला आहे. तसेच आपल्याकडे बँक गॅरंटी जमा न करता ती कोर्टामध्ये जमा केलेली आहे. या प्रकरणाबाबत विभागाने कारवाई केली पाहिजे. असे समितीने सांगितले तसेच श्री.बिमल अगरवाल यांच्या मे.पंचरत्न प्लास्टिक व मे.जेमिनी एंटरप्रायझेस या बेनामी कंपन्या असल्याने या दोन्ही कंपन्यांना देय असलेले ७ कोटी २ लक्ष ४८ हजार रुपये रोखून ठेवण्यात यावे, असे पत्रान्वये पोलीस महासंचालकांना कळवले होते. त्यानुसार सदर रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे काय ? ही रक्कम कोणत्या वस्तुची खरेदी करण्याकरिता देण्यात आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता पैसा अभी रुका हुआ है. पेमेंट नहीं हुआ है. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

श्री. श्रीकांत तरवडे, सहा. पोलीस महानिरीक्षक यांच्याविरुद्ध दि. १२ मार्च २०१३ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावण्यात आले. त्यानंतर त्यांना पदोन्नती दिली आहे. सचिवांनी सांगितले आहे की, संबंधितांची अकार्यकारी पदावर बदली केली जाईल. त्यांची चौकशी प्रधान सचिव, गृह विभाग यांच्यामार्फत करण्यात येणार आहे काय तसेच सदरहू चौकशी किती दिवसांत करण्यात येईल अशी विचारणा समितीने केली. चौकशी अधिकारी बदलुन चौकशी करता येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

बँक गॅरंटी घेण्याचे ठरल्यानंतर ६ कोटी २२ लाख रुपयांचा चेक काढण्यात आला. याचा अर्थ बँक गॅरंटी घेतल्यानंतरच पुरवठादारास चेक देण्यात आला होता. त्याने योग्य कालावधीत पुरवठा न केल्याने बँक गॅरंटी जप्त झाली पाहिजे होती. त्याने विहित कालावधीत बॉम्बसूटचा पुरवठा केला होता का ? बँक गॅरंटी जप्त करण्याची जबाबदारी कोणाकडे होती ? या समितीच्या प्रश्नाला बॉम्बसूटचा पुरवठा विहित कालावधीत केला नव्हता तसेच बँक गॅरंटी व्यपगत झाली होती, त्यामुळे ती इनकॅश करता आली नाही असा खुलासाही विभागीय प्रतिनिधींनी केला.

माहे जुलै, २००९ मध्ये बँक गॅरंटी देण्यात आली आणि केवळ त्याच महिन्यापुरती बँक गॅरंटी होती. जुलै, २००९ मध्ये पेमेंट केले गेले. बँक गॅरंटी जुलै, २००९ पर्यंतच वैध असल्याने ती एक महिन्यातच व्यपगत झाली. यावरुन यामध्ये सुनिश्चित असे षडयंत्र असल्याचे दिसून येते तसेच विभागाने याबाबतची संपूर्ण माहिती सादर करावयाची आहे व यातील दोषी अधिकाऱ्यांचे नावही समितीस सांगावे. असे समितीने विभागास सांगितले असता या प्रकरणी विभागीय चौकशी प्रपोज केली होती, त्यांच्या अहवालाप्रमाणे दोषींवर कारवाई करण्यात आली आहे. श्री. तरवडे यांच्यावरही दोषारोप बजावण्यात आले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीच्या बैठकीत उपस्थित झालेल्या कोणत्याही प्रश्नाला न्याय मिळालेला नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यानंतर अतिशय महत्त्वाच्या अशा विषयाबाबतच्या या प्रकरणाच्या साक्षीच्या वेळी अभ्यास न करता आल्याने समितीच्या प्रश्नांची उत्तरे विभाग देऊ शकला नाहीत. हा विषय अत्यंत गंभीर आहे विभागाने हे प्रकरण लाईटली न घेता पुढच्या बैठकीच्या वेळेस या विषयावर सखोल चौकशी करून, सगळी माहिती घेऊन आले पाहिजे, जेणेकरून या विषयाबाबत अंतिम निर्णय होईल. त्या अनुषंगाने बैठकीत उपस्थित झालेल्या सर्व प्रश्नांवर कारवाई करून समितीला अहवाल द्यावा असे निदेश देऊन समितीची बैठक स्थगित करण्यात आली होती.

"राज्याची सुरक्षा धोक्यात टाकून पुरवठादारास बॉम्बसूटचा पुरवठा करण्यासाठी ६.२२ कोटीचा माल मिळण्यापूर्वीच पूर्ण प्रदान केल्याने पुरवठादारास अवाजावी लाभ झाला" या विषयाबाबत अधिक माहिती जाणुन घेण्याच्या दृष्टीने अपूर्ण माहितीसह स्थगित ठेवलेली साक्ष समितीने दि.१५ ऑक्टोबर, २०१५ रोजी विभागीय सचिव व इतर प्रतिनिधी यांची साक्ष पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेतली. साक्षीच्या वेळी समितीने दिनांक २५ ऑगस्ट २०१५ रोजी विधानभवन येथे समितीची साक्ष झाली होती. त्यावेळी विभागाने बऱ्याच प्रकरणामध्ये कार्यवाही करण्याबद्दल आश्वासन दिले होते. त्याबद्दल समितीला अहवाल पाठविलेला आहे त्या अहवालातील नमूद कार्यवाहीबद्दलची थोडक्यात माहिती देण्यात यावी. असे विभागीय सचिवांस सांगितले असता विभागीय सचिवांनी पुढील माहिती समितीस अवगत केली.

दिनांक २३ ऑक्टोबर २००८ पासून २६ डिसेंबर २००८ पर्यंत बॉम्बसूटचे १३३ नग विकत घ्यायचे होते. शासनाने अंतिमतः ८२ नग खरेदी करण्यास परवानगी दिली होती. त्याला वेगवेगळी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. बॉम्बसूट खरेदी करण्याकरिता वापरण्यात आलेल्या प्रक्रियेप्रमाणे पाच कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या. या पाच कंपन्यांपैकी तीन कंपन्यांचा मालक एकच होता. म्हणजेच त्याने तीन वेगवेगळ्या नावाने निविदा भरल्या होत्या. उर्वरित दोन कंपन्या वेगळ्या होत्या. तसे पाहिले तर तीन कंपन्यांमध्येच खरी स्पर्धा होती. डीजी ऑफीसने ६० लाख ५८ हजार १०७ प्रती नग या प्रमाणे मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांना ऑर्डर दिली. ऑर्डर देण्यापूर्वी बॉम्बसूट देण्यास मान्यता द्यावी, असा मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांनी शासनास अहवाल पाठविला. सदरहू अहवाल दिनांक २६ फेब्रुवारी २००९ रोजी शासनास प्राप्त झाला. गृह विभागाने जवळपास एक महिन्याच्या कालावधीनंतर दिनांक २८ मार्च २००९ रोजी मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांना मान्यता दिली. सदरची मान्यता मिळाल्यानंतर कंपनीकडून सादर करण्यात आलेल्या बिला पोटी कंपनीकडून ३१ तारखेला पैसे उचलले गेले. त्याच स्तरावर घडलेल्या घटनेबाबत मोठा आक्षेप आहे. पोलीस रेकॉर्ड प्रमाणे आणि डीजीपी यांच्याकडे असलेल्या रेकॉर्डमध्ये असे स्पष्ट लिहिले आहे की, तत्कालीन एआयजी यांनी त्यांना दुरध्वनीवर प्राप्त झालेल्या इन्स्ट्रक्शन किंवा विनंती नुसार सप्लायरला ॲडव्हान्स पैसे दिले. त्यांनी याबाबतची नोंद केलेली आहे. अशा प्रकारची कार्यवाही करण्याचा कोणत्याही अधिकाऱ्याचा अधिकार नाही. परंतु त्यांनी नोटीसमध्ये असेही म्हटले आहे की, अशा प्रकारचा ॲडव्हान्स पूर्वी देखील उचल करून देण्यात आलेला होता. ९० टक्के माल पुरवठा झाल्यानंतर व त्याची तपासणी झाल्यानंतर पुरवठादाराला पैसे द्यायला पाहिजे होते. बॉम्बसूटचा पुरवठा होण्यापूर्वीच पैसे देणे उचित नव्हते. त्यामुळे यामध्ये चूक झालेली आहे. जेव्हा सॅम्पल देण्याची प्रक्रिया सुरू झाली, तेव्हा सॅम्पल चेक न करता माल घेण्यात यावा, असा कंपनीने हट्ट धरला. त्यामुळे वाद निर्माण झाला व कंपनीने आज पर्यंत मालाचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे माल न घेताच देण्यात आलेले ६ कोटी रुपये कंपनीकडेच आहेत हा महत्त्वाचा आक्षेप आहे. यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झाले नाही याचे कारण म्हणजे इतर दोन प्रकरणामध्ये सदर सप्लायरकडून घेण्यात आलेल्या मालाचे १६ कोटी रुपये सदरहू कंपनीला दिलेले नाही. म्हणजे या प्रकरणात उचल म्हणून देण्यात आलेले ६ कोटी रुपये यातून वजा केल्यास कंपनीचे १० कोटी रुपये आपल्याकडे रहातात. ही बाब खरी असली तरी या प्रकरणात अनियमितता झालेली आहे, हे नाकारता येत नाही तसेच सदरहू पुरवठादार पूर्वी पासून विभागाला अनेक वस्तुंचा पुरवठा करत होता असे ही अवगत केले.

बॉम्बसूट बनविणारी टेक्नॉलॉजी त्याच्याकडे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता तशी टेक्नॉलॉजी त्यांच्याकडे नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच तत्कालीन अपर पोलीस महासंचालक श्री. पंकज गुप्ता यांनी स्वतः चौकशी केली होती. सदरहू चौकशीमध्ये आढळून आलेल्या दोषी अधिकाऱ्यांमध्ये जवळपास २१ जण होते. त्यामध्ये श्री. श्रीकांत कृष्णराव तरवडे, तत्कालीन पोलीस महानिरीक्षक, श्रीमती प्रिया प्रकाश परब, कार्यासन अधिकारी (सेवानिवृत्त), श्री. दिलीप गुलाबराव बोंद्रे, पो.नि., श्री. अशोककुमार नौकुडकर, तत्कालीन पोलीस निरीक्षक (सहायक पोलीस आयुक्त, ठाणे), श्रीमती अनिता राठोड, कार्यासन अधिकारी, श्रीमती हेमांगी रेडेकर, सहायक लेखाधिकारी, (संचालक, लेखा व कोषागारे यांचे कार्यालय), श्री. अनंत सदाशीव दबके, प्रमुख लिपीक (पोलीस महासंचालक कार्यालय), श्री. बापू आत्माराम परब, कार्यालय अधीक्षक, श्री. किरण साळवे, प्रमुख लिपीक इत्यादी. तसेच या प्रकरणी शासन आदेशानुसार महासंचालक, एसीबी मुंबई यांना भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. यांच्या चौकशीसाठी मंत्रालयातील व पोलीस विभागातील खालील नमूद अधिकारी दोषी आढळून आलेले आहेत. यामध्ये श्री. गौतम ज्योती रसाळ, सह सचिव, गृह विभाग, श्री. सिद्धार्थ चवरे, तत्कालीन कक्ष अधिकारी, गृह विभाग, श्री. राजेश विठ्ठल कुंडले, तत्कालीन सहायक, गृह विभाग व अगोदर वाचून दाखविलेली नावे मिळून १३ जणांची नावे आहेत. यामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही, तर अनियमितता झालेली आहे, असे त्यांनी म्हटलेले आहे. असा ही खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये अनियमितता झालेली आहे, असे दाखविण्यात आले आहे. परंतु अनियमितता करण्यामागे भ्रष्टाचार करण्याचा हेतू असतो. अनियमिततेतूनच भ्रष्टाचार होत असतो. नियमांना डावलून सप्लायरला ९० टक्के पेमेन्ट करण्यात आले होते. फोनवर पेमेन्ट करण्याचा निर्णय घेता येत नाही. आपण समितीला चौकशीचा अहवाल सादर केलेला आहे. तत्कालीन ॲडीशनल किंवा असिस्टंन्ट आय.जी. यांच्या स्वाक्षरीने हे घडलेले असताना देखील त्यांची अजूनपर्यंत चौकशी पूर्ण झालेली नाही या प्रकरणामागचे खरे मुख्य सुत्रधार तेच आहेत. कनिष्ठ पदावरील अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी केली जाते परंतु त्यांच्यावर कार्यवाही झालेली नाही. लहान लोकांवर तातडीने कार्यवाही केली जाते परंतु मूळ सुत्रधारावर कार्यवाही करण्यास विलंब का होत आहे? काहीतरी अपेक्षा असल्याशिवाय नियमांना डावलण्यात येत नाही. या प्रकरणात करण्यात आलेली अनियमितता भ्रष्टाचार करण्यासाठीच करण्यात आली होती. सप्लायरला अगोदर पैसे देण्यामागे इतर कोणती भूमिका असू शकते? त्यामुळे विभागाचे म्हणणे समितीला पटत नाही, असे समितीने विभागासमोर स्पष्टपणे सांगितले.

या प्रकरणाचे विभाग समर्थन करीत नाही. परंतु कोणावरही अशा प्रकारची कार्यवाही करता येत नाही. पूर्ण माल सप्लाय झाल्यावर पैसे देण्यात यावे, असे निविदेमध्ये स्पष्ट दिलेले होते. त्यामुळे या प्रकरणात अनियमितता झालेली आहे, हे विभागास मान्य असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच दोषारोप पत्र तयार करणे, चौकशी अधिकारी नेमणे आणि प्रेझेंटींग ऑफीसर नेमणे हे गृह विभागाचे काम आहे. चौकशी अधिकाऱ्याने चौकशी पूर्ण केल्यावर त्यांच्याकडून गृह विभागाला अहवाल सादर केला जातो व त्यानंतर मा.मुख्यमंत्री यांना कळविण्यात येते व दोषींना शिक्षा केली जाते. चौकशी सुरू असतानाच्या कालावधीमध्ये विभागाला चौकशी अधिकाऱ्याला आदेश देता येत नाही.

गृह विभागाने दिनांक १२ मार्च २०१३ रोजी दोषारोप पत्र दिले. परंतु दोषारोप पत्रातील त्यांचे उत्तर त्यांनी मान्य केले नाही. त्यानंतर दिनांक १७ सप्टेंबर २०१३ रोजी चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. इन्कॉयरी ऑफीसर हे मंत्रालयीन सचिव दर्जाचे अधिकारी असतात. नवीन आलेले प्रधान सचिव श्री. शामलाल गोयल यांना विनंती करून सुनावणीची तारीख लवकर लावण्यात आली असल्याचा खुलासा विभागामार्फत करण्यात केला.

विभागाने फोनचा उल्लेख केला परंतु सदरहू फोन क्लार्क, कक्ष अधिकारी किंवा अन्य खालील अधिकारी यांना आला नसेल. सदरहू फोन वरीष्ठ अधिकाऱ्यांना आला असेल. सदरहू वरिष्ठ अधिकाऱ्याच्या सूचनेवरुन किंवा नोटींग वरुन खालील अधिकाऱ्यांनी टिपणी तयार केली असेल किंवा प्रक्रिया पूर्ण केली असेल. ज्या अधिकाऱ्याला फोन आला, तो अधिकारीच याला जास्त जबाबदार आहे, असे समितीचे मत असून त्यांच्यावर अद्यापि कार्यवाही न होण्याचे कारण काय आहेत? या समितीच्या प्रश्नांला चौकशी सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले तसेच कार्यवाही चालू असून ती संथ गतीने चालू आहे, हे मान्य असून पुढील तारीख २ नोव्हेंबर असल्याचे ही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

पुरवठादार यांच्या मे.टेक्नोट्रेड इम्पेक्स इंडिया कंपनीकडून मल्टी फंक्शनल बेल्ट खरेदी करण्यात आले. त्याकरिता ९ कोटी ९० लाख रुपये अदा करावयाचे होते. मात्र सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्यामुळे ही रक्कम शासनास जमा करण्यात आली. पुरवठादार यांच्या मालकीच्या इतर कंपन्या (१) डायमंड टेक्निकल इंडस्ट्रीज (२) मे. जेमिनी इंडस्ट्रीज व (३ ) पंचरत्न प्लास्टिक यांनी ७ कोटी २ लाख रुपयांचा गणवेश व इतर साहित्याचा पुरवठा केला असून सदर रक्कम शासनास जमा करण्यात आलेली आहे. वेगवेगळ्या कंपन्यांच्या नावाने मालाचा पुरवठा केलेला आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली असता ६ कोटी २२ लाख रुपयांचे पेमेंट करण्यात आले, त्यावेळी तेवढ्याच रकमेची बँक गॅरंटी घेण्यात आली होती. बँक गॅरंटी घेतलेली असल्यामुळे ही रक्कम आम्ही कधीही एन्कॅश करु? शकतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदर घटना मार्च, २००९ मधील असून हा ऑडीट पॅरा सन २०१०-२०११ मधील आहे. या घटनेस ६ वर्षे ६ महिने होऊन देखील दोषी असणाऱ्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीची चौकशी अद्याप पूर्ण झाली नसून ती लांबली आहे. इतर संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी देखील अद्याप पूर्ण झालेली नाही. चौकशी पूर्ण होण्यासाठी अद्याप २-३ वर्षे लागणार आहेत. एका व्यक्तीवर दोषारोप ठेवण्यात आला असून चौकशी सुरू केली आहे. मात्र इतर कोणत्याही प्रकारचे बंधन त्यांच्यावर घालण्यात आलेले नाही. मुख्य आरोपीवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. The delay in justice caused so many complications in such cases and main culprit can get benefit of such things. The main person who had done mistakes in this case is enjoying posting in Nagpur असे समितीने सांगितले तसेच संबंधितांची बदली नॉन ऑपरेशनल पदावर करण्यासाठी प्रस्ताव सादर करु व तो प्रस्ताव समितीला देखील पाठवू असे मागील बैठकीच्या वेळी सचिवांनी सांगितले होते. त्यानुसार नॉन ऑपरेशनल पदावर बदली करण्यासंदर्भात ७ दिवसांत कार्यवाही करावी. तसेच दोषी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले. वास्तविक अशा अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून नंतर चौकशी व कारवाई करणेबाबत समितीने चर्चेदरम्यान सांगितले असता डी.आय.जी. कॅटेगरीमध्ये अगोदरच पदांची कमतरता असून नागपूर मध्ये ए.सी.पी. ची १६ पदे रिक्त असल्यामुळे निलंबित करणेबाबत पुन्हा एकदा विचार व्हावा असे महासंचालकांनी समितीसमोर विदित केले असता समितीने यावर आक्षेप घेत तीव्र नापसंती दर्शविली.

या संदर्भात तातडीने प्रस्ताव पाठवून निर्णय घ्यावा या प्रस्तावावरील निर्णय समितीला १५ दिवसात कळविण्यात यावा असे निदेश समितीने विभागास दिले.

श्री.रसाळ यांच्याविरुद्ध चौकशी आदेश देण्यात आले आहेत. दि. १ नोव्हेंबर २०१२ रोजीच्या आदेशान्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. १७ महिन्यानंतर सन दि. ४ एप्रिल २०१४ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. या चौकशी अहवालामध्ये काही दोषारोप अंशतः सिद्ध होत असल्याचे नमूद केले आहे. या बाबत स्पष्टीकरण द्यावे. असे समितीने सांगितले असता प्रत्येक दोषारोपाचे वाचन केल्यानंतर पुरावे दाखल केले जातात. कर्मचाऱ्यांनी काय पुरावे सादर केले या वरून निष्कर्ष काढून चौकशी अधिकारी निर्णय देतात की, सदर गुन्हे पूर्णतः सिद्ध होत आहे की, अंशतः सिद्ध होत आहेत. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

श्री. बोंद्रे यांना एक वर्ष वेतनवाढ स्थगितीची शिक्षा देण्यात आली असून सदरची शिक्षा दोषारोपाच्या तुलनेत योग्य आहे, असे नमूद केले आहे. शिक्षेचा कालावधी ठरविण्याचे पॅरामिटर काय आहे ? अशी विचारणाही समितीने केली असता या संदर्भात कॉंपीटन्ट ॲथोरीटीचा निर्णय अंतिम असतो व त्या निर्णयाप्रमाणे शिक्षा दिली जाते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यावर समितीने या कार्यपद्धतीमध्ये बदल होणे आवश्यक असून याकरिता समितीने शिफारस करावी असे एकमताने समितीने ठरविले.

या प्रकरणाबाबत साडे सहा वर्षे चौकशी सुरू आहे. सामान्य लोकांपर्यंत हा विषय पोहचलेला आहे. अशावेळी चौकशी जलद गतीने होणे आवश्यक आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत बरेचसे संबंधित अधिकारी निवृत्त झाले असतील अशी शंका समितीने उपस्थित केली असता संबंधितांना अकार्यकारी पदावर पाठविण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली या संदर्भात समितीकडे १५ दिवसात रिपोर्ट पाठवण्यात येईल. तसेच चौकशी लवकरात लवकर पूर्ण होण्याकरिता चौकशी अधिकारी श्री. शामलाल गोयल यांना सांगण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

तसेच समितीने दिलेल्या सूचनांबाबत शासन कार्यवाही करीत असून चौकशी पूर्ण करण्यासाठी कालावधी ठरविण्यात येईल व चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

श्री.अशोक नौकुडकर यांची चौकशी मार्च, २०१३ पासून सुरू होती. चौकशी सुरू होऊन १३ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. दि. २१ फेब्रुवारी २०१४ रोजी प्राथमिक चौकशी ठेवण्यात आली असता सादरकर्ता अधिकारी तसेच अपचारी अधिकारी गैरहजर होते. सदर अपचारी अधिकारी अडीच वर्षांपासून चौकशीकरिता सादर होत नाही अशा अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई केली पाहिजे असे समितीने विभागास सांगितले.

या अनुषंगाने विभागीय सचिवांनी १५ दिवसात कार्यवाही करण्यात येईल असे समितीने आश्वासित केले.

पुरवठादार कंपनीला कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकले आहे, असे उत्तर विभागाने दिलेले असून त्यासोबत दोन असोसिएट कंपन्या आहेत असेही म्हटले आहे. या तीनही कंपन्यांची नावे काळ्या यादीत टाकली आहेत की एकाच कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकले आहे अशी विचारणा समितीने केली.

मे. टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि., अमिनी इंडस्ट्रिज, मुंबई आणि शनैश्वर इंडस्ट्रियल वर्क्स, मुंबई या तीनही कंपन्यांची नावे कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्यात आली असल्याचे समितीस अवगत केले.

अद्याप या कंपन्या आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागामध्ये वस्तुंचा पुरवठा करण्याचे काम करीत आहेत. काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय फक्त गृह विभागाला लागू आहे की, शासनाच्या सर्व विभागांना लागू आहे? अशी विचारणा समितीने केली असता उद्योग विभागाच्या संमतीने काळ्या यादीत टाकले असून या कंपन्या अजूनही शासनाच्या इतर विभागांना पुरवठा करीत असतील तर त्याची उद्योग विभागाला माहिती देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

यापुढे ज्या कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकले जाईल, त्याची माहिती सर्क्युलरद्वारे शासनाच्या सर्व विभागांना कळविण्यात यावी, जेणेकरुन त्यांना पुन्हा काम मिळणार नाही अशी सूचना समितीने विभागास केली.

विभागीय सचिवांनी सुरूवातीला सांगितले की, बँक गॅरंटी कॅश करु शकतो. सहा वर्षे सहा महिने होऊनही पुरवठा झाला नाही, गृह विभाग बँक गॅरंटी कॅश करणार आहे का? सध्या बँक गॅरंटी कोणाकडे आहे अशी विचारणा समितीने केली असता.

सध्या बँक गॅरंटी आर्थिक गुन्हे विभागाकडे असून या मुद्दा संदर्भात लिगल पॉईंट तपासून बँक गॅरंटी इनकॅश करून बॉम्बसूटचा मुद्दा संपविता येईल. १६ कोटी रुपये का दिले नाही यासाठी ते वेगळ्या मार्गाने भांडत आहेत, त्याबाबत आपण निर्णय देऊ शकतो. या प्रकरणी लिगल ओपिनियन घेऊन कार्यवाही करु व १५ दिवसात समितीला कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

मुद्दा उपस्थित केल्यानंतर सुद्धा कारवाई होत नाही असे चित्र राज्याच्या पोलीस दलामध्ये जात असेल तर कोणावरही याचा धाक राहणार नाही. या समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी अशी माहिती समितीला अवगत केली की या मुद्यांची विभागाने गंभीर दखल घेतली आहे. डी.जी.ऑफिस म्हणजे फिल्ड ऑफिस आहे या ऑफिसमध्ये आणि मंत्रालयातील गृह विभागामध्ये सामंजस्य असले पाहिजे, माहितीची देवाणघेवाण पाहिजे सुधारणेच्या बाबी विभागाच्या विचाराधीन होत्या. आता विभागीय सचिव दर आठवड्यातून एकदा शुक्रवारी सकाळी ११-०० वाजता डी.जीं.च्या सर्व सहकाऱ्यांसमवेत चर्चा करण्यासाठी बसतात तसेच मंत्रालयातील अधिकारी ही असतात. प्रत्येक मुद्यावर चर्चा होते त्यामुळे सामंजस्य वाढले असून माहितीची देवाणघेवाण वाढली असल्याचे ही समितीस सांगितले तसेच विभागीय चौकशी किती दिवसात पूर्ण करावी, चौकशी अहवालातील शिफारशीची अंमलबजावणी किती दिवसात करावयाची हे निश्चित करण्यात येत असून मुख्य सचिव त्याचा आराखडा तयार करीत असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**समितीचे अभिप्राय :-**

२.३ राज्यातील पोलीस पथकाला अधिक चांगली सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्याच्या उद्देशाने तत्काळ आदेश प्रकियेंतर्गत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने सहायक पोलीस महानिरीक्षक, मुंबई यांनी ३५ संभाव्य पुरवठादाराकडून बॉम्ब नष्ट करणारी साधने पुरविण्यासाठी तांत्रिक आणि वाणिज्यिक निविदा आमंत्रित केल्या ( डिसेंबर, २००८ ) खरेदी समितीच्या शिफारशीनुसार जी निविदा प्रक्रिया पुर्ततेसाठी गठित केली

होती. दिनांक २३ ऑक्टोबर २००८ पासून २६ डिसेंबर २००८ पर्यंत बॉम्बसूटचे १३३ नग विकत घ्यायचे होते. शासनाने अंतिमतः ८२ नग खरेदी करण्यास परवानगी दिली होती. त्याला वेगवेगळी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. बॉम्बसूट खरेदी करण्याकरिता वापरण्यात आलेल्या प्रक्रियेप्रमाणे पाच कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या. या पाच कंपन्यांपैकी तीन कंपन्यांचा मालक एकच होता. म्हणजेच त्याने तीन वेगवेगळ्या नावाने निविदा भरल्या होत्या. उर्वरित दोन कंपन्या वेगळ्या होत्या. तसे पाहिले तर तीन कंपन्यांमध्येच खरी स्पर्धा होती. डीजी ऑफीसने ६० लाख ५८ हजार १०७ प्रती नग या प्रमाणे मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांना ऑर्डर दिली. ऑर्डर देण्यापूर्वी बॉम्बसूट देण्यास मान्यता द्यावी, असा मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांनी शासनास अहवाल पाठविला. सदरहू अहवाल दिनांक २६ फेब्रुवारी २००९ रोजी शासनास प्राप्त झाला. गृह विभागाने जवळपास एक महिन्याच्या कालावधीनंतर दिनांक २८ मार्च २००९ रोजी मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा. लि., मुंबई यांना मान्यता दिली. सदरची मान्यता मिळाल्यानंतर कंपनीकडून टाकण्यात आलेल्या बिला पोटी कंपनीकडून ३१ मार्च, २००९ या तारखेला पैसे उचलले गेले. त्याच स्तरावर घडलेल्या घटनेबाबत मोठा आक्षेप आहे. पोलीस रेकॉर्ड प्रमाणे आणि डीजीपी यांच्याकडे असलेल्या रेकॉर्डमध्ये असे स्पष्ट लिहिले आहे की, तत्कालीन एआयजी यांनी त्यांना दुरध्वनीवर प्राप्त झालेल्या इन्स्ट्रक्शन किंवा विनंतीनुसार पुरवठादाराला ॲडव्हान्स पैसे दिले. त्यांनी याबाबतची नोंद केलेली आहे. अशा प्रकारची कार्यवाही करण्याचा कोणत्याही अधिकाऱ्याचा अधिकार नाही. परंतु त्यांनी नोटीसमध्ये असेही म्हटले आहे की, अशा प्रकारचा ॲडव्हान्स पूर्वी देखील उचल करून देण्यात आलेला होता. ९० टक्के माल सप्लाय झाल्यानंतर व त्याची तपासणी झाल्यानंतर सप्लायरला पैसे द्यायला पाहिजे होते. बॉम्बसूटचा सप्लाय होण्यापूर्वीच पैसे देणे उचित नव्हते. त्यामुळे यामध्ये चूक झालेली आहे. जेव्हा सॅम्पल देण्याची प्रक्रिया सुरू झाली, तेव्हा सॅम्पल चेक न करता माल घेण्यात यावा, असा कंपनीने हट्ट धरला. शिवाय पुरवठादाराने अमेरिकेच्या ऐवजी दक्षिण आफ्रिकेतून ३६ तर चीनमधील अधिकृत कारखान्यातून ४६ बॉम्ब सूट आयात केले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही अधिकृत प्रयोगशाळेकडून या मालाच्या गुणवत्तेची चाचणी करण्यात आली नव्हती. त्यामुळे वाद निर्माण झाला व कंपनीने आजपर्यंत या मालाचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे माल न घेताच देण्यात आलेले ६ कोटी रुपये कंपनीकडेच आहेत हा महत्त्वाचा आक्षेप आहे. यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झाले नाही याचे कारण म्हणजे इतर दोन प्रकरणामध्ये सदर सप्लायरकडून घेण्यात आलेल्या मालाचे १६ कोटी रुपये सदरहू कंपनीला दिलेले नाही. म्हणजे या प्रकरणात उचल म्हणून देण्यात आलेले ६ कोटी रुपये यातून वजा केल्यास कंपनीचे १० कोटी रुपये आपल्याकडे रहातात. ही बाब खरी असली तरी या प्रकरणात अनियमितता झाली असल्याचे विभागाने मान्य केले आहे. पुरवठादार मे.टेक्नोट्रेड इम्पेक्स इंडिया प्रा.लि., अमिनी इंडस्ट्रीज, मुंबई आणि शनैश्वर इंडस्ट्रीयल वर्कस, मुंबई या कंपन्यांकडे बॉम्बसूट बनविणारी टेक्नॉलॉजी नसताना त्यांना ऑर्डर देण्यात आली. ही गंभीर बाब आहे. तत्कालीन अपर पोलीस महासंचालक श्री. पंकज गुप्ता यांनी स्वतः चौकशी केली होती. सदरहू चौकशीमध्ये गृह विभाग, पोलीस महासंचालनालय कार्यालय, राज्य गुप्त वार्ता विभाग, पोलीस आयुक्त ठाणे, संचालक लेखा व कोषागरे या ४-५ विभागांमधील कर्मचारी, अधिकाऱ्यांनी चूक तसेच निष्काळजीपणा केल्याचे आढळून आले आहे व दोषी अधिकाऱ्यांमध्ये जवळपास २१ जण होते. त्यामध्ये श्री. श्रीकांत कृष्णराव तरवडे, तत्कालीन पोलीस महानिरीक्षक, श्रीमती प्रिया प्रकाश परब, कार्यासन अधिकारी (सेवानिवृत्त), श्री. दिलीप गुलाबराव बोंद्रे, पो.नि., श्री. अशोककुमार नौकुडकर, तत्कालीन पोलीस निरीक्षक (सहायक पोलीस आयुक्त, ठाणे), श्रीमती अनिता राठोड, कार्यासन अधिकारी, श्रीमती हेमांगी रेडेकर, सहायक लेखाधिकारी, (संचालक, लेखा व कोषागारे यांचे कार्यालय), श्री. अनंत सदाशीव दबके, प्रमुख लिपीक (पोलीस महासंचालक कार्यालय), श्री. बापू आत्माराम परब, कार्यालय अधीक्षक, श्री. किरण साळवे, प्रमुख लिपीक इत्यादी. तसेच या प्रकरणी शासन आदेशानुसार महासंचालक, एसीबी मुंबई यांना भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. यामध्ये मंत्रालयातील खालील नमूद अधिकारी दोषी आढळून आलेले आहेत. श्री. गौतम ज्योती रसाळ, सह सचिव, गृह विभाग, श्री. सिद्धार्थ चवरे, तत्कालीन कक्ष अधिकारी, गृह विभाग, श्री. राजेश विठ्ठल कुंडले, तत्कालीन सहायक, गृह विभाग अशी ३ जणांची नावे आहेत. यामध्ये भ्रष्टाचार झालेला नसून अनियमितता झालेली आहे असे विभागीय सचिवांचे म्हणणे आहे. परंतु अनियमितता करण्यामागे भ्रष्टाचार करण्याचा हेतू असतो. अनियमिततेतूनच भ्रष्टाचार होत असतो. नियमांना डावलून सप्लायरला ९० टक्के पेमेन्ट करण्यात आले होते. तत्कालीन ॲडीशनल किंवा असिसटन्ट आय. जी. यांच्या स्वाक्षरीने हे घडलेले असताना देखील त्यांची अजूनपर्यंत चौकशी पूर्ण झालेली नाही याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

विभागाने फोनचा उल्लेख केला परंतु सदरहू फोन क्लार्क, कक्ष अधिकारी किंवा अन्य खालील अधिकारी यांना आला नसेल. सदरहू फोन वरीष्ठ अधिकाऱ्यांना आला असेल. सदरहू वरिष्ठ अधिकाऱ्याच्या सूचनेवरुन किंवा नोटींग वरुन खालील अधिकाऱ्यांनी टिपणी तयार केली असेल किंवा प्रक्रिया पूर्ण केली असेल. ज्या अधिकाऱ्याला फोन आला, तो अधिकारीच याला जबाबदार आहे, असे समितीचे मत असून त्यांच्यावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

**समितीच्या शिफारशी :—**

**२.४ शिफारस क्रमांक १ :** मुंबईवर झालेल्या २६/११ च्या आत्मघाती बॉम्ब हल्ल्यात अनेक नागरिक मृत्युमुखी पडले. तसेच गृह विभागाचे वरिष्ठ अधिकारी व अनेक पोलीस देखील मृत्युमुखी पडले होते. या पार्श्वभुमीवर राज्याच्या सुरक्षिततेसंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नाला

अनुसरुन शासनाने अतिशय गांभीर्याने व राज्यातील पोलीस पथकाला अधिक चांगली संरक्षण व्यवस्था प्रदान करण्याच्या चांगल्या उद्देशाने शासनाने बॉम्बसुट खरेदी करण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी तात्काळ निधीची तरतूद करून सदर निधी उपलब्ध देखील करून देण्यात आला. त्यातून रु.६.२२ कोटीची एकूण ८२ बॉम्बसुट खरेदीची प्रक्रिया माहे डिसेंबर, २००८ पासून सुरू झाली असून माहे जुलै, २००९ मध्ये मालाचा पुरवठा न करताच पुरवठादारास संपुर्ण रक्कमेचे प्रदान करण्यात आले. संबंधितांची ही कृती अतिशय बेजबाबदारपणाची व निष्काळजीपणाची असून यात मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरप्रकार झाल्याचे दिसून येते. या घटनेस जवळ-जवळ ६ ते ७ वर्ष उलटून देखील अद्यापपर्यंत विभागाकडून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई देखील करण्यात आलेली नाही. केवळ सदरहू प्रकरणी काही अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू असून ती अद्याप पूर्ण झालेली नाही. या चौकशीला लागत असलेला अमर्याद विलंब पाहता गृह विभाग संबंधितांवर करावयाच्या कारवाईबाबत गंभीर नाही असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. परिणामी पदोन्नती व सेवेतील अन्य लाभ हे कर्मचारी सद्यःस्थितीत मिळवित आहेत. वास्तविक या प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेता या प्रकरणी तातडीने गृह विभागाकडून कारवाई करणे अपेक्षित असतांनाही तसे करण्यात आले नाही. त्यानंतर महालेखाकारांनी या प्रकरणी आक्षेप घेतल्यानंतर देखील या गंभीर प्रकरणी विभागाने चौकशी सुरू करण्याशिवाय संबंधितांवर कोणतीही कार्यवाही केली नाही. साक्षीसाठी येणेपूर्वी तरी विभागीय सचिवांनी संपूर्ण चौकशी व संबंधितांवर कठोर कारवाई करूनच सचिवांनी समितीपुढे येणे आवश्यक होते. परंतु तसे झाल्याचे दिसून येत नाही. या संपूर्ण प्रकरणात सुस्पष्टपणे संघटित आर्थिक गुन्हेगारी असल्याचे दिसून येते व परिणामी जनतेच्या सुरक्षेशी खेळ करण्याचा हा प्रकार असून याबद्दल विभागाने गांभिर्य दाखविणे आवश्यक असतानाही विभागाने हे प्रकरण गांभिर्याने घेतल्याचे दिसून येत नाही. अतः या प्रकरणी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करून कठोर कारवाई करून एक महिन्याच्या आत समितीस कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

**२.५ शिफारस क्रमांक २ :** शासनाचे नियम, करारातील अटी तसेच विहित कार्यपद्धती डावलून नियमबाह्य पद्धतीने ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुरवठादाराला रक्कम प्रदान करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यांचेवर गृह विभागाने कोणतीही कारवाई केलेली नसून पुढे त्यांना पदोन्नती देखील देण्यात आली व सद्यःस्थितीत ते अधिकारी गृह विभागात वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. याउपर साक्षी दरम्यान जेव्हा समितीने विचारणा केली की, अशा अधिकाऱ्याला शासनाने निलंबित का केले नाही ? तर मुळात ही पदे राज्यात फार कमी आहेत व अशा वरिष्ठ पदांवरील व्यक्तीस निलंबित केले तर त्याचा कामावर परिणाम होईल अशी सबब गृह विभागाच्या महासंचालकांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून समितीसमोर सांगण्यात येणे ही तर अधिकच आक्षेपार्ह बाब आहे व गृह विभागासारख्या जनतेच्या सुरक्षिततेशी संबंधित असलेल्या विभागाकडून असे सांगण्यात येणे ही बाब तर खचितच समर्थनीय व विभागाला भुषणावह नाही. महासंचालकांनी केलेल्या या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर आधारित सत्यता पडताळून पहावी व शासनाने याची योग्य ती दखल घेऊन नोंद घ्यावी. गृह विभागाची ही भूमिका व कार्यपद्धती अतिशय आक्षेपार्ह असून याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व अशा अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून नंतर त्यांची चौकशी करून त्यांचेवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

**२.६ शिफारस क्रमांक ३ :** पुरवठादारास नियमबाह्यरित्या आणि अटी व शर्तींचा भंग करून प्रदान करण्यात आलेल्या रु.६.२२ कोटीची वसुली पुरवठादारांकडून तातडीने करून संबंधित पुरवठादारांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एका महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**२.७ शिफारस क्रमांक ४ :** पुरवठादार मे. टेक्नोट्रेड इम्पेक्स इंडिया प्रा.लि., अमिनी इंडस्ट्रिज, मुंबई आणि शनैश्वर इंडस्ट्रियल वर्क्स, मुंबई या ३ कंपन्यांचे नाव कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तथापि अद्यापही या कंपन्या आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभागामध्ये वस्तु पुरवठा करण्याचे काम करीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. शासनाच्या एका विभागाने जर कंपनीला काळ्या यादीत टाकले तरीदेखील ती कंपनी अन्य विभागाकडून कशी काय पात्र ठरू शकते ? यामध्ये शासनाच्या विभागांचा एकमेकांशी समन्वय नसल्याचे दिसून येते. शासनाच्या एका विभागाने जर कंपनीला काळ्या यादीत टाकले तर अन्य कुठल्याही विभागामार्फत या कंपनीस पात्र ठरविण्यात येवू नये असे स्पष्ट आदेश शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे. तसेच काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीचे नाव व माहिती शासनाच्या सर्व विभागांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावी तसेच शासनाने काळ्या यादीत टाकलेल्या कंपन्यांची व त्यांच्या संचालक/मालकाची नावे वेबसाईटवर देखील टाकण्यात यावी जेणेकरून ही माहिती सर्वांसाठीच उपलब्ध राहील व याचे पालन शासनाच्या सर्वच विभागाकडून करण्यात यावे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**२.८ शिफारस क्रमांक ५ :** शासनामार्फत अनेक कंपन्यांचा समावेश काळ्या यादीत वेळोवेळी करण्यात येतो. अशा वेळेस ती संबंधित कंपनी ही काळ्या यादीत टाकण्यात येते. परंतु त्या कंपनीच्या संचालकांवर किंवा मालकावर मात्र कुठलेही निर्बंध शासनामार्फत घालण्यात येत नाहीत. परिणामी तिच व्यक्ती पुन्हा दुसरी कंपनी स्थापन करून शासनाच्या निविदा प्रक्रियेत अन्य कंपनीच्या नावाने भाग घेते. परिणामी केवळ कंपनी काळ्या यादीत टाकल्यामुळे शासनाचा उद्देश व हेतू साध्य होत नाही. अशा परिस्थितीत काळ्या यादीचे वा अपात्रतेचे निर्बंध हे कंपनीसोबतच कंपनीच्या संचालकांवर किंवा मालकावर देखील घालण्यात यावेत. जेणेकरून त्याच संचालकांना किंवा मालकाला दुसरी कंपनी स्थापन करून शासनाच्या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्याबाबत शासनास मोठ्या प्रमाणात अंकुश ठेवता येईल यासाठी एक सक्षम यंत्रणा सुरू करावी तसेच अन्य विभागात या

पुरवठादाराचे जे कामकाज सुरू आहे त्याची देखील उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**२.९ शिफारस क्रमांक ६ :** बॉम्बसुट खरेदी करण्याकरिता ज्या ०५ कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या त्यातील ०३ कंपन्यांचे मालक एकच होते. तसेच ज्या कंपनीला बॉम्बसुटचा पुरवठा करण्याचे कंत्राट देण्यात आले त्यांच्याकडे बॉम्बसुट बनविण्याबाबतचे कुठलेही विकसीत तंत्रज्ञान नसताना किंवा या क्षेत्रात त्या कंपनीचा कुठलाही पुर्वानुभव तसेच एक्सपर्टाइज नसताना कोणत्या निकषाच्या आधारे या कंपन्या निविदा प्रक्रियेत भाग घेतात व पात्रही ठरतात ही बाब तर शासनाच्या एकुणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी पुरवठादाराची कुठलीही पात्रता निश्चित करण्यात येत नाही तर फक्त निविदेमधील सर्वात कमी रकमेची निविदा हा एकमेव निकष पात्र ठरविण्यासाठी शासनाकडून वापरण्यात येतो. कोणत्या पुरवठादाराने निविदा प्रक्रियेत भाग घ्यावा याबाबत कुठलेही निकष, नियमावली अथवा मानके ही विशद करण्यात येत नाहीत. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. पुरवठादाराच्या मुल्यमापनाचे कोणतेही नियम व निकष अस्तित्वात नसल्यास योग्य पुरवठाराची निवड होत नाही व त्याचा संपुर्ण परिणाम हा मालाच्या गुणवत्तेवर व पुरवठ्यावर पडतो. प्रस्तुत प्रकरणी अशा मुल्यमापनांचा समावेश निविदा अटींमध्ये न करण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा. शासनाच्या सर्वच विभागात निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पुरवठाराचा आर्थिक, तांत्रिक तसेच या क्षेत्रातील कामाचा अनुभव व अन्य पात्रता प्रथमतः निश्चित करण्यात यावी व त्यानंतरच निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच यासंदर्भात एक सक्षम यंत्रणा स्थापन करून त्याचे नियंत्रण व देखरेख राज्याच्या मुख्य सचिवांकडे असावे अशी समितीची शिफारस आहे.

**२.१० शिफारस क्रमांक ७ :** करारातील अटींचा भंग करून माल प्राप्त होण्यापूर्वी आणि त्याचे निरीक्षण करण्यापूर्वी नियमबाह्यरित्या व अस्तित्वात असलेल्या कार्यपद्धतीच्या विरोधात जाऊन १००% रक्कम पुरवठादारास प्रदान करण्यात आली व त्या बदल्यात पुरवठादाराकडून एका महिन्याच्या आतच संपणारी बँक गॅरंटी घेण्यात आली. त्यातही बँक गॅरंटीची वैधता देखील वाढवून घेण्यात आली नाही. परिणामी ती व्यपगत झाली. त्यामुळे शासनाकडे पुरवठादाराच्या जमा असलेल्या रकमेचे रोखीकरण शासनास करता आले नाही. संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांची ही कार्यपद्धती अत्यंत बेजबाबदारपणाची व निष्काळजीपणाची असून या संपुर्ण प्रक्रियेस जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध तातडीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**२.११ शिफारस क्रमांक ८ :** समितीसमोर येणाऱ्या अनेक प्रकरणांमध्ये समितीच्या असे निदर्शनास आले की, कित्येक प्रकरणात अधिकारी / कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येते. परंतु ही चौकशी पूर्ण होऊन दोषींवर कार्यवाही करण्यास मात्र विभागाकडून अमर्याद विलंब होतो. दरम्यानच्या कालावधीत अनेक लोक सेवानिवृत्त होतात, तर काही मयत होतात, तर काही शासनाकडून पुढील सर्व लाभ प्राप्त करून घेतात. त्यायोगे वर्षानुवर्षे या विभागीय चौकशा सुरूच राहतात व या चौकशांचे कुठलेही भय संबंधितांच्या मनात राहात नाही. कित्येक प्रकरणात या विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेच या चौकशा सोपविण्यात येत असल्यामुळे त्या चौकशा निःपक्षपातीपणे होतीलच याची शाश्वती नसते. विभागांतर्गत असलेल्या संबंधांचा परिणाम व प्रभाव देखील या चौकशांवर पडतो. या विभागीय चौकशांसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्यात येऊन त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच यासंदर्भात व इतर अनेक प्रकरणांसंदर्भात समितीने मा.मुख्य सचिवांनाही बैठकीस बोलविले असता विभागीय चौकशी किती दिवसात पूर्ण करावी, चौकशी अहवालातील शिफारसीची अंमलबजावणी किती दिवसात करावयाची या संदर्भात मुख्य सचिवांमार्फत कालबद्ध आराखडा तयार करीत असल्याचे समितीस अवगत करण्यात आलेले होते. सदरहू आराखडा तातडीने निश्चित करण्यात यावा व त्यानुसार विभागीय चौकशी विहित कालमर्यादेत पूर्ण करणेबाबतच्या स्पष्ट सूचना सर्व संबंधितांना शासनामार्फत देण्यात याव्यात. आराखडा तयार करताना विषयाचे गांभिर्य बघून अशा चौकश्या विभागांतर्गत अधिकाऱ्यांकडे देण्याऐवजी त्या विभागाबाहेरील अन्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे देण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच चौकशी अधिकाऱ्यांनी जर चौकशी विहित कालमर्यादेत पूर्ण केली नाही तर चौकशी अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्याबाबतची तरतूद यात करावी व याअनुषंगाने चौकशीच्या विलंबाच्या सर्व पळवाटा बंद करण्यात याव्यात व केलेल्या कारवाईबाबत समितीस एक महिन्याच्या आत अवगत करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-११ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.२.५ "व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची कार्यपद्धती" व परिच्छेद क्र. ३.२.२ "दोषी संस्थांवर दंडनिहाय कार्यवाही करण्याबाबत अपुऱ्या तरतूदी" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

**परि.क्र.२.५.६.१ "निधी न पुरविल्यामुळे पंचवार्षिक योजनेतील समाविष्ट योजना सुरू होऊ शकल्या नाहीत "**

पंचवार्षिक योजना २००७-२०१२ कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी विभागाने त्यांचे विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या कार्यान्वयनासाठी वर्ष २००७-२०१२ या कालावधीकरिता पंचवार्षिक योजना आखली होती, जी पुढे वार्षिक योजनेमध्ये विभागली गेली आणि ज्यांना निधी उपलब्धतेनुसार प्राधान्य दिले गेले. कॉनफेडेरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिज (CII) ने केलेल्या सर्वेक्षणानुसारच्या स्थानिक उद्योगाकडून कुशल आणि अर्धकुशल कामगारांच्या असलेल्या मागणीला नियोजन प्रक्रियेत आधारभूत मानले गेले. तसेच सहाय्यक शिकाऊ उमेदवार सल्लागार (AAA) प्रत्येक जिल्ह्यासाठी लागणाऱ्या जागांची माहिती गोळा करतो आणि राज्यस्तरावर ती माहिती संचालक (प्रशिक्षण) जो शिकाऊ उमेदवारी सल्लागारही (AA) असतो त्याच्या कडून एकत्रित करून वार्षिक योजना तयार करताना ही माहिती विचारात घेतली जाते.

लेखा परिक्षणात असे दिसून आले की, पंचवार्षिक योजनेत समाविष्ट असलेल्या आणि वार्षिक योजनांतून ज्यांचा पाठपुरावा केला जातो अशा सात योजनांसाठी शासनाने रु.२९.५० कोटीचा निधी अद्याप (ऑगस्ट २०११) पुरविला नसल्याने ज्याचा तपशिल परिशिष्ट २.५.२ मध्ये दिला आहे त्या योजनांच्या कार्यन्वयनांत विलंब झाला. यामुळे उमेदवारांना उपलब्ध संधीचा लाभ उठविता आला नाही. शिवाय नियोजन स्तरावरील दुरदृष्टीचा अभाव दिसून आला.

वस्तुस्थिती मान्य करता सहसचिव यांनी नमूद केले की, (नोव्हेंबर, २०११) वित्त विभागाने निधी उपलब्ध करून न दिल्याने निधी पुरविता आला नाही. पुढे असेही नमूद केले की, या योजना यापूर्वीच चालू असलेल्या योजनांमध्ये समाविष्ट केल्या होत्या आणि शारीरिक अपंग तसेच मुलीसाठी इ. वेगळ्या संस्था चालविणे शक्य नव्हते. हे उत्तर मान्य करण्याजोगे नव्हते कारण योजनांच्या व्यवहार्यतेचा वार्षिक आढावा घ्यावयास पाहिजे होता आणि जरुरीनुसार त्यात फेर फार करावयास होते.

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.**

परिच्छेद क्रमांक २.५.६.१ मध्ये उपस्थित केलेल्या मुद्याचे अनुषंगाने असे नमूद करण्यात येते की, शासनाने पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या सात योजनांसाठी रुपये २९.५० कोटी निधी उपलब्ध करून न देण्याची योजनानिहाय कारणे व तपशिल खालील प्रमाणे आहेत.

परिशिष्ट २.५.२ मध्ये समाविष्ट असलेल्या ०७ योजनांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१. शारिरिक दृष्ट्या अपंग असलेल्या व्यक्तिचे पुनर्वसन केंद्र (अपंगासाठी स्वतंत्र विंग) :-** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२००९/(३६/०९) व्यशि-३, दिनांक २६ जून, २००९ अन्वये राज्यातील सहा विभागीय स्तरावर प्रत्येकी ०४ व्यवसाय अभ्यासक्रमांची स्वतंत्र प्रशिक्षण विंग (शाखा) सुरू करण्यास विभागामार्फत तत्वतः मान्यता प्राप्त झाली होती. मात्र नियतव्यय हा अर्थसंकल्पीत होऊ शकला नाही त्यामुळे योजना कार्यान्वित झाल्या नाही.

तथापि अपंग अधिनियम १९९५ नुसार राज्यातील सर्व शारिरिक दृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांना व्यवसायिक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रवेश क्षमतेच्या ३% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार वर्षनिहाय शारिरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश पुढीलप्रमाणे आहेत.

| शैक्षणिक वर्ष | प्रवेशित अपंग विद्यार्थी |
|---|---|
| २००९-१० | ७१८ |
| २०१०-११ | ७७८ |
| २०११-१२ | ८५६ |

या व्यतिरिक्त उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०१०/प्र.क्र.६४/व्यशि-३, दिनांक २३ ऑगस्ट, २०१० अन्वये फक्त अंधांसाठी Ms Office for VIS Blind ह्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या दोन तुकड्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथे सुरू करण्यात आलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे कार्यवाही करून राज्यातील सर्व भागातील अपंग विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**२. मुलींसाठी २० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थापन करणे :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटीआय २००९/(७/०९) व्यशि-३, दिनांक २६ जून २००९ अन्वये राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास तत्वतः मान्यता प्राप्त झाली होती. याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी नियोजन विभागास सादर केला असता महिलांसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याऐवजी या २० ठिकाणी अस्तित्वात असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तीन पाळ्या सुरू करून त्यापैकी एक पाळी महिलांकरिता योग्य राहील असे अभिप्राय नियोजन विभागाकडून देण्यात आले होते.

तथापि राज्यामध्ये महिलांसाठी १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू आहेत. तसेच महिलांना व्यवसाय अभ्यासक्रमांच्या संधी सुरू आहेत. तसेच महिलांना व्यवसाय अभ्यासक्रमांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महिलांसाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या ३०% आरक्षण निर्णय क्र.आयटीआय-२०१२/प्र.क्र.९७/व्यशि-३, दिनांक १३ जून २०१२ अन्वये देण्यात आलेले आहे. तसेच फक्त महिलांसाठी प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये एक किंवा त्यापेक्षा जास्त व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार वर्षनिहाय दिलेले प्रवेश खालील प्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष | प्रवेशित अपंग विद्यार्थी |
|---|---|
| २००९-१० | १६२९६ |
| २०१०-११ | १९७६७ |
| २०११-१२ | २३१८६ |

**३. निदेशकांसाठी प्रशिक्षण .–** रोजगार व प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या क्षेत्रिय संस्थांमार्फत शिल्प निर्देशकांसाठी CTI व इतर Refresheer Course आयोजित केले जाते. तथापि या प्रशिक्षण कार्यक्रमाखाली मर्यादित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात असल्यामुळे राज्यातल्या उर्वरित निदेशकांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करण्यासाठी कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना प्रस्तावित होती. तथापि सदर योजना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नसल्याने या योजनेसाठी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला नाही.

**४. शिक्षणार्थी/शिकाऊ उमेदवारांसाठी वसतीगृह .-** मुंबई विभागात नागपूर व अमरावती विभागातील औ.प्र.संस्थामधून उत्तीर्ण उमेदवार उद्योगांमध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून मोठ्या प्रमाणात येत असल्याने या प्रशिक्षणार्थ्यांना राहण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी औ.प्र.संस्था, मुलुंड येथे वसतीगृह बांधकाम करण्याचे प्रस्तावित होते. तथापि सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त न झाल्याने नियतव्यय अर्थसंकल्पीत करण्यात आलेला नाही.

**५. अ.जा./अ.ज. साठी विशेष कार्यक्रम :-** अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांसाठी विभागामार्फत स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था/अभ्यासक्रम सुरू करणे या उद्दिष्टांसाठी ११ व्या पंचवार्षिक योजनांमध्ये नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला होता. परंतु सदर योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही. तथापि सामाजिक न्याय विभागांमार्फत अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलांमुलींकरिता सहा विभागीय स्तरावर उच्च स्तर औ.प्र. संस्था सुरू करण्यास मान्यता देण्यात आल्यामुळे हा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला नाही.

सद्यःस्थितीत सामाजिक न्याय विभागामार्फत प्राप्त होणाऱ्या निधीतून अमरावती, नागपूर, औरंगाबाद व नाशिक या ठिकाणी अनुसूचित जाती व नवबौद्धांसाठी ४ स्वतंत्र औ.प्र. संस्था सुरू करण्यात आलेल्या आहेत.

**६. संपर्क/अदान प्रदान प्रयोगशाळेची स्थापना (Communication Skill Lab).—** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक आस्थापनामध्ये रोजगार मिळविण्यासाठी Communication Skill आवश्यक असल्याने ते शिकविण्यास या प्रयोगशाळेचा वापर केला जाणार होता. तथापि या योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली नसल्याने सदर योजना कार्यान्वित झालेली नाही.

**७. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कर्मचारी वर्गाची कमतरता/अभाव दूर करणे :-** ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये निर्माण करण्यात येणाऱ्या पदांवरील कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्ते यांवरील खर्चासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी सदर योजना समाविष्ट करण्यात आली होती.

सन २०११-१२ पासून व्यवसाय शिक्षणाचा विस्तार करणे ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेखाली उपलब्ध होणाऱ्या निधीतून योजनांतर्गत योजनेमध्ये सुरू करण्यात आलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अधिकचे व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी निर्माण करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर पदांचे वेतन व भत्यावरील खर्च भागविण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.३.२.२ "दोषी संस्थांवर दंडनिहाय कार्यवाही करण्याबाबत अपुऱ्या तरतुदी" :-**

जानेवारी, २००७ मध्ये, महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने, तांत्रिक, उच्च आणि व्यावसायिक शिक्षण संस्था इत्यादींच्या मंजुरीपेक्षा जास्त क्षमतेच्या प्रवेश प्रकरणांचे पुनर्वलोकन करून असा निर्णय दिला आहे की, त्या शिक्षण संस्थांनी प्रत्येक जादा अश्या प्रवेशांची चूक पहिल्यांदाच केली आहे त्या शिक्षण संस्थांनी प्रत्येक प्रवेशासाठी असलेल्या विहित ट्यूशन फी (शैक्षणिक शुल्क) च्या २०० टक्के रक्कम दंड म्हणून भरावी. पुढे, अशा प्रकारचे जादा प्रवेश ज्या शिक्षण संस्थांनी दुसऱ्यांदा दिले आहेत त्यांनी प्रत्येक प्रवेशासाठी शैक्षणिक शुल्काच्या ५०० टक्के रक्कम दंड म्हणून भरावी. ज्या शिक्षण संस्थांनी ही चुक दोन पेक्षा अधिक वेळा केली आहे त्यांची प्रकरणे तांत्रिक शिक्षणासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद आणि शिक्षण प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय परिषदेकडे मान्यता रद्द करण्यासाठी पाठविण्यात येतील. तथापि, अशा प्रकारच्या अनेक वेळा दोषी आढळून आलेल्या संस्थांच्या गटाला, ज्या विविध ठिकाणी कार्यरत असतात त्यांना कुठलीही दंडात्मक कारवाई करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे कुठलाही पुरेसा निर्णय (resolution) नव्हता.

संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई (संचालक) ह्यांचेकडील दस्ताऐवज (जून, २०१०) आणि नंतर इतर संबंधित दस्ताऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की, महाराष्ट्रातील सहा क्षेत्रातील चार पैकी दोन मुंबई (एक संस्था) आणि पुणे (तीन संस्था) शिक्षण संस्थांनी मंजुरीच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. तथापि, फेब्रुवारी, २०११ पर्यंत चार दोषी शिक्षण संस्थांकडून विभागाला रु.२.०१ कोटींची (परिशिष्ट ३.१) वसुली करता आली नाही. असेही आढळून आले की, राज्यात वर्ष २००६-११ या कालावधीत चार शिक्षण संस्थांच्या गटांनी त्यांच्याकडून राज्यात कार्यरत असलेल्या एका संस्थेत आणि/ किंवा संस्थांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी क्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिले होते (परिशिष्ट ३.२) परंतु अशा प्रकारच्या अतिरिक्त प्रवेशावर विभागाच्या ठरावामध्ये केवळ दंड वसुलीचीच तरतूद आहे. ठरावातील अशा अपूर्णतेमुळे शिक्षण संस्थांना अनेकदा दंड वसुलीचीच तरतूद आहे. ठरावातील अशा अपूर्णतेमुळे शिक्षण संस्थांना अनेकदा दंड होऊन सुद्धा अतिरिक्त भरती करण्याची संधी उपलब्ध झाली.

(१) अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर आणि नाशिक

(२) मुंबई क्षेत्र :- नवी मुंबई चे सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे इंजिनिअरींग कॉलेज ह्यांनी शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये ३० जादा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. पुणे क्षेत्र : २००६-०७ या शैक्षणिक वर्षात कासेगाव शिक्षण संस्थेचे, राजाराम बापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे यांनी ७२ विद्यार्थ्यांना आणि सिंहगड इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, वडगांव, पुणे ह्यांनी (५४) आणि अभिनव एज्युकेशन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (६०), तर पुणे यांनी ११४ अतिरिक्त विद्यार्थ्यांना वर्ष २००७-०८ मध्ये प्रवेश दिला.

विभागाद्वारे स्वतःच्या निर्देशक तत्वांचे पालन करण्यात न आल्यामुळे दोषी संस्थांकडून परिणामतः रु. २.०१ कोटीची वसुली होऊ शकली नाही. शासकीय ठरावही अशा संस्थांना दोषपूर्ण कामकाजासाठी परावृत्त करण्यात अपयशी ठरला. स्वतःच्या नियंत्रणातील विविध संस्थांमध्ये किंवा विविध अभ्यासक्रमात अतिरिक्त भरती करून संस्थेद्वारा दंड तर टाळण्यात आलाच परंतु शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधाही विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या गेल्या नाहीत.

संचालक, ह्यांनी आपल्या उत्तरात (फेब्रुवारी, २०११) असे सांगितले की, चार दोषी संस्थांकडून दंड वसूल करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

एप्रिल, २०११ मध्ये हा विषय प्रशासकीय सचिवांकडे पाठविण्यात आला. परंतु ऑक्टोबर, २०११ पर्यंत कोणतेही उत्तर मिळालेले नाही.

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

**शासन निर्णय क्रमांक :** एनजीसी-२००५/(८२१/०५)/मशि-३, दिनांक २२ जानेवारी २००७ मध्ये संस्थेने अभ्यासक्रम / विषय / तुकड्या शासनाच्या मान्यतेशिवाय परस्पर सुरू केल्यास किंवा यातील मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास, अशा अनधिकृतपणे प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यामागे त्याने भरणा केलेल्या शिक्षण शुल्काच्या २००% दंड आकारावा व तिसऱ्यांदा पुनरावृत्ती झाल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्यासारखी शिक्षा करण्यात येईल किंवा शिखर संस्थेकडे उदा. अेआयसीटीई, एनसीटीई यांचेकडे मान्यता रद्द करण्यासाठी शिफारस करण्यात येईल अशी तरतूद आहे. सदर शासन निर्णयात संस्थेच्या अभ्यासक्रम /विषय / तुकड्या /फार्मसी असे अभ्यासक्रम आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची संस्था, तयचा इन्स्टिट्युट कोड क्रमांक त्याची प्रवेश क्षमता वेगळी व स्वतंत्र असते. त्याच्या प्रवेश प्रक्रिया भिन्न असतातृ या सर्व बाबींचा विचार करून तंत्र शिक्षण संचालनालयाच्या वतीने अभ्यासक्रमनिहाय प्रक्रिया विचारात घेऊन जादा प्रवेशाबाबत दंडाची आकारणी करण्यात येते.

जादा प्रवेशाबद्दल दिनांक २२ जानेवारी २००७ च्या शासन निर्णयाच्या आधारे तंत्र शिक्षण संचालनालयाने दंडात्मक कारवाई करून एकूण रुपये २,१०,९६,८०० (अक्षरी रुपये दोन कोटी दहा लाख शहान्नव हजार आठशे फक्त) इतकी रक्कम वसूल केलेली आहे. उक्त शासन निर्णयामध्ये व्याज आकारण्याची तरतूद नसल्याने व्याज आकारण्यात आलेले नाही. त्यामुळे पहिल्यांदा जादा प्रवेश केल्याबद्दल २०० टक्के तद्नंतर पुनरावृत्ती केल्याबद्दल ५०० टक्के दंड अशी कार्यवाही केली आहे. परिच्छेद ३.२.२ मध्ये नमूद संस्थांपैकी कोणत्याही संस्थेने तिसऱ्यांदा जादा प्रवेशाची पुनरावृत्ती केलेली नसल्यामुळे संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच, उपरोक्तप्रमाणे इतर कोणत्याही संस्थांनी अनधिकृतपणे प्रवेश केल्याची प्रकरणे आढळून आलेली नाही. तथापि, भविष्यात अशा प्रकारे संस्थांनी अनधिकृतपणे प्रवेश करु नयेत यासाठी सन २०१३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०-महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी अधिनियम लागू करण्यात आला आहे.

**साक्ष :-**

३.२ "निधी न पुरविल्यामुळे पंचवार्षिक योजनेतील समाविष्ट योजना सुरू होऊ शकल्या नाहीत" या मुद्यांच्या संदर्भात सचिवांनी थोडक्यात माहिती सांगावी असे समितीने विभागास सांगितले असता अकरावी पंचवार्षिक योजना सन २००७ ते २०१२ या कालावधीत होती. नवीन पंचवार्षिक योजना सुरू झाल्यानंतर सात नवीन योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. या सात योजनांवर शासनाकडून कोणताही खर्च करण्यात आला नाही. नवीन पंचवार्षिक योजना सुरू होतांना अनेक कल्पना पुढे येतात त्यामुळे नवीन योजना सुरू करण्याचा विचार केला जातो. या सात योजनांना बजेटमध्ये आऊटले मंजूर करण्यात आला नाही. या योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाली नाही, सदर योजना नवीन असल्यामुळे त्यांना निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे या योजनांवर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. तसेच या सातही योजना नवीन असल्यामुळे या योजनांना तत्वतः मंजुरी देण्यात आली होती. या योजना नवीन असल्यामुळे वित्त विभागाच्या मान्यतेनंतर त्या योजना मंत्रिमंडळासमोर सादर कराव्या लागतात. मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्यासंदर्भात शासन निर्णय काढणे आवश्यक होते. परंतु निधीची उपलब्धता नसल्यामुळे अशा नवीन योजना लवकर सुरू करता येत नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या योजनेच्या संदर्भात सर्व तालुक्यांमध्ये आयटीआय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. आता ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत, त्यांच्याकडील कोर्स आऊटडेटेड झाले आहेत, १५ ते २० वर्षापूर्वी गिअर बॉक्स बनविण्यात येत होते, तेव्हा त्या पार्टला मागणी होती. परंतु आता जे नवीन गिअर बॉक्स आहेत त्यावर मुलांना प्रशिक्षण दिले जात नाही. त्यामुळे सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपग्रेड करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर एनसीव्हीटीचे प्रशिक्षण घ्यावे लागते, त्या शिवाय एनसीव्हीटीचे प्रमाणपत्र मिळत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील मशीनरी व इतर साहित्याचे अपग्रेडेशन करण्याची कार्यवाही केंद्र सरकार जागतिक बँकेच्या सहकार्याने करीत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कारंजा व वाशिम येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ६-६ महिन्यांचे प्रशिक्षण कोर्स आहेत. तेथील कोर्स जुने आहेत, यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, ज्या मुलांनी आयटीआय केले, त्यांना पुणे येथील टेल्को व बजाज अँटो या कंपनीमध्ये सहा महिने तात्पुरती नोकरी मिळते, त्यानंतर कंपनीच्या मॅनेजरला कळते की, यांनी घेतलेले शिक्षण उपयोगाचे नाही त्यामुळे त्यांना नोकरीतून काढून टाकले जाते. त्यामुळे प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपग्रेड करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील साहित्याची खरेदी केंद्रीय स्तरावरुन करण्यात येते. त्यामुळे आवश्यक त्या मशीनरी उपलब्ध होत नाहीत. आयटीआयच्या संदर्भात संलग्नतेचा मुद्दा महत्त्वाचा आहे. आयटीआयमधील नवीन कोर्स व नवीन तुकड्या यासाठी संलग्नता मिळविणे गरजेचे आहे. राज्यातील आयटीआयमधील पाठ्यक्रम व तुकड्या मंजूर आहेत त्यांना संलग्नता नाही अशा कोर्सेस व तुकड्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे नवीन पाठ्यक्रम व नवीन तुकड्यांची संलग्नता न करून घेणे आवश्यक आहे असेही समितीने विभागास सांगितले.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा आढावा घेतल्यावर असे निदर्शनास आले की, जवळपास १७०० तुकड्यांना संलग्नतेची परवानगी मिळू शकेल. याच्या नियमानुसार आवश्यक ती पदे, यंत्रसामग्री व जागेची उपलब्धता करून दिल्यास संलग्नता मिळेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना श्रेणीवाढ करणे तसेच नवीन मशीनरी व साहित्य घेण्यासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले असता यासंदर्भात वित्त विभागाची मान्यता दोन महिन्यात मिळेल, निधी उपलब्ध झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सन १९८० च्या जनगणनेनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत, आता लोकसंख्या व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता आहे असेही समितीने सांगितले. यासंदर्भात एक चांगला टेक्निकल असिस्टंट खाजगी विभागातून नेमून त्याचा सल्ला घेण्यात यावा अशी शिफारस ही समितीने केली.

अनेक ठिकाणी शासकीय आयटीआय मध्ये प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. काही ठराविक तालुक्यांमधील शासकीय आयटीआयमध्ये प्राचार्य म्हणून नेमणूक झाल्यास तेथे काम करण्यास प्राचार्य उत्सुक नसतात. त्यामुळे काही ठराविक जिल्ह्यांमधील आयटीआय केंद्रांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त असतात असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता प्राचार्यांची पदे एमपीएससी भरते. प्राचार्य हे पद वर्ग-१ श्रेणीतील आहे. राज्यभरामध्ये प्राचार्यांची ३४२ पदे आहेत, त्यापैकी २०४ पदे रिक्त आहेत. ५८ टक्के प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. याकरिता एमपीएससीकडे पाठपुरावा सुरू आहे. आयटीआय प्रशिक्षकांची देखील २६ टक्के पदे रिक्त आहेत. प्रशिक्षकांची पदे एमपीएससी कडून भरली जात नसून ती संचालक स्तरावरच भरली जातात. या पदांच्या भरतीकरिताही पाठपुरावा सुरू असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

प्रशिक्षक व प्राचार्य यांची पदे लवकर भरण्याकरिता विभागातून जिल्हा पातळीवर सक्त सूचना जाणे आवश्यक असून पद भरतीकरिता विलंब झाला तर राज्यातील ग्रामीण भागातील तरुण वर्गाला तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण देण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. तरुण पिढीला चांगले व्यवसायिक प्रशिक्षण देऊन देशाची एकूणच उत्पादन क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता राज्यातील, जिल्ह्यातील आयटीआय केंद्रांच्या माध्यमातूनही मदतीचा हातभार लावता येईल असे मत समितीने व्यक्त केले.

या १२४२ संस्थांपैकी काही संस्थांचे वार्षिक निर्धारण गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून झालेले नाही. अजूनही ५५ अशा संस्था अस्तित्वात आहेत की ज्यांचे वार्षिक निर्धारण झालेले नाही. याची कारणे काय आहेत ? त्याच्यावर काय कारवाई करण्यात येईल ? अशी विचारणा समितीने केली असता काही संस्था ज्यांचे वार्षिक निर्धारण गेल्या दहा-पंधरा वर्षांपसून झालेले नाही त्यांचा ऑडिटदरम्यान प्रश्न निर्माण झाला होता. मुंबई, पुणे, नाशिक,अमरावती या ठिकाणच्या संस्थांचे वार्षिक निर्धारण झालेले आहे. नागपूर आणि औरंगाबाद येथील संस्थांचे वार्षिक निर्धारण बाकी आहे. या संस्थांचे लेखे येत नसल्यामुळे त्यांचे वार्षिक निर्धारण बाकी आहे. या संस्थांमध्ये विविध संवर्गातील विविध केडरची बरीचशी पदेही रिक्त आहेत. विभागाने या संस्थांना सर्व पदे भरण्याच्या सुस्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. या संस्थांच्या पदभरतीचा व लेख्यांचा आढावा घेण्याचे काम सुरू आहे. लेखा अधिकाऱ्यांची पदेही रिक्त असल्यामुळे वार्षिक निर्धारण न झालेल्या संस्थांच्या लेख्यांचे काम अपूर्ण आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

लेखा अधिकाऱ्यांची पदेही रिक्त असल्यामुळे वार्षिक निर्धारण न झालेल्या संस्थांच्या लेख्यांचे काम अपूर्ण आहे, हे कारण अपूर्ण लेख्यांकरिता समर्थनीय आहे का ? या समितीच्या प्रश्नाला विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, एकंदरीत २.५ कोटी रुपयांची रक्कम नॉन सॅलरी ग्रांट म्हणून दिलेली असते. सार्वजनिक कर्मचाऱ्यांच्या पगाराची बिले जिल्हा कोषागारातून ड्रॉ केली जातात. शासन प्रत्येक विद्यार्थ्याच्या मागे या अनुदानांतर्गत ३०० रुपये प्रती माह देते. नागपूर आणि औरंगाबाद सोडून इतर जिल्ह्यातील सर्व संस्थांचे २०१० पर्यंतचे सर्व असेसमेंट पूर्ण झालेले आहे.

प्रादेशिक कार्यालये व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाची एकूण २७ बांधकामे कोणती व कोणत्या १४ बांधकामांना सचिव समितीची मान्यता प्राप्त झाली नाही व त्याची कारणे काय आहेत ? सर्व प्रकारचा निधी मिळाल्यानंत ही प्रशासकीय कामांमुळे याकरिता विलंब झालेला असेल तर ते योग्य नाही. निविदा अंतिम न झाल्यामुळे यंत्रसामग्रीच्या खर्चामध्ये बचत झालेली आहे, हे खरे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता आयटीआय प्रशिक्षण इमारत व इक्विपमेंट याकरिता पैसे रिलीज करण्यात आले होते. त्याकरिता प्रभावी तरतूद पुढील पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात येणार होती. त्यामुळे मूळ मागणी स्वरुपात संपूर्ण निधीची तरतूद बजेटमध्ये दाखविण्यात आली असली तरी ती पुढील पुरवणी मागणीपर्यंत देण्यात आली नव्हती अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

आयटीआयचा दर्जा उंचावण्याकरिता शासनाकडून काय उपाययोजना केल्या आहेत तसेच, याकरिता केंद्र हिश्श्याचा निधी एकूण २५४.१८ कोटी रुपये केव्हा प्राप्त झालेला आहे. २०६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना रुपये ५१५ कोटी रक्कम देऊ केलेली होती, त्यापैकी फक्त रुपये ७९.१२ कोटींचा खर्च करण्यात आला होता. तसेच एसएससी ने आयडीपी ना संमती देण्यापूर्वीच त्यांचे योग्यरीत्या निर्धारण न करण्याचे कारण काय आहे ? अशी पृच्छा समितीने केली.

ही योजना केंद्र शासनाने पीपीपी तत्त्वावर राबविलेली आहे. केंद्र शासनाने या योजनेंतर्गत प्रत्येक आयटीआय ला २.५ कोटी रुपये कर्ज तत्वावर दिलेले आहे. यामधील ५० लाख रुपये टर्म डिपॉझिट म्हणून बँकेत ठेवणे आवश्यक आहे. उर्वरित रक्कम आयटीआयमधील इतर कामांकरिता खर्च करण्यात येईल. औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञान विषयक मागणीशी सांगड घालण्यासाठी आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी आणि बहुविध कुशल कामगार बळ निर्माण करण्यासाठी खालील परिच्छेदात चर्चिलेल्या दोन विनिर्दिष्ट निधीच्या योजना मार्फत सध्याच्या आयटीआयचा दर्जा उंचावण्याचे किंवा त्यांच्या कक्षा विस्तारण्याचे भारत सरकारने ठरविले होते. जागतिक बँकेच्या मदतीने सहाय्यित व्यवसायिक प्रशिक्षण सुधारणा प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येणार आहे. शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत ०४ व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या सन २०१४-२०१५ मध्ये सुरू करण्यात आलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या सन २००७ च्या आदेशान्वये संस्थेतील सर्व व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेच्या २० टक्के प्रवेश आयएमसी मार्फत करण्यात यावेत असे निर्देश देण्यात आलेले आहेत. संस्था व्यवस्थापन समितीने त्यांच्या मार्फत ऑगस्ट, २०१० पासून सुरू करण्यात येणाऱ्या सर्व नवीन व्यवसाय तुकड्यांमध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा अधिकचे २० टक्के प्रवेश गुणानुक्रमे द्यावेत असे निर्देश असल्याने प्रवेश शुल्काद्वारे होणाऱ्या महसूलामध्ये घट झालेली आहे. याकरिता दोन ते तीन महिन्यांमध्ये सुरुवात करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२८ आयटीआयच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, चार आयटीआयने ८८ विद्यार्थ्यांना संलग्न नसणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिल्याने, ते विद्यार्थी एनसीव्हीटी प्रमाणपत्रासाठी अपात्र ठरले. या तांत्रिक अडचणींकरिता शासन काय उपाययोजना करणार आहे ? या समितीच्या प्रश्नाला विभागीय सचिव यांनी एनसीव्हीटी अभ्यासक्रमाला शासन मान्यता होती जर एखादा अभ्यासक्रम एनसीव्हीटी मान्यता नसेल आणि राज्य मंडळाची मान्यता असेल त्यामध्ये सदर विद्यार्थी पास झाला तरीही त्याला एनसीव्हीटी परीक्षेला बसता येत नाही.

भारत सरकारच्या राजपत्रानुसार एससीव्हीटीच्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी योजना लागू करण्यात आलेली आहे. तसेच त्यांना स्वयंरोजगाराची संधी देखील उपलब्ध आहे. यावरुन एससीव्हीटी अंतर्गत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांच्या भवितव्यावर कोणताही वाईट परिणाम झालेला नाही. संलग्नता प्राप्त न झाल्यास व्यवसायात प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांना पुढील परिणामांची पूर्व कल्पना देण्यात येते व त्यांच्या संमतीनुसारच त्यांचे प्रवेश कायम ठेवण्यात येतात. याकरिता एससीव्हीटी प्रवेशाबाबत हमीपत्र घेण्यात येते. असे प्रशिक्षणार्थी एससीव्हीटी परीक्षेस बसतात व डीजीईटी च्या पत्रान्वये जे प्रशिक्षणार्थी एससीव्हीटी अंतर्गत यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून उत्तीर्ण होतात असे प्रशिक्षणार्थी राष्ट्रीय परिषदेच्या परीक्षेस खाजगी उमेदवार म्हणून पात्र ठरतात असा खुलासा केला.

**परिच्छेद क्र.२.५.६.१**

**समितीच्या अभिप्राय व शिफारशी :—**

३.३ (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील साहित्याची खरेदी केंद्रीय स्तरावरून करण्यात येते. त्यामुळे आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध होत नाहीत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या संदर्भात संलग्नतेचा मुद्दा महत्त्वाचा आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील नवीन अभ्यासक्रम व नवीन तुकड्या यासाठी संलग्नता मिळविणे गरजेचे आहे. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रम व तुकड्या मंजुर आहेत त्यांना संलग्नता नाही अशा अभ्यासक्रमांची व तुकड्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे नवीन पाठ्यक्रम व नवीन तुकड्यांची संलग्नता करून घेणे आवश्यक आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना श्रेणीवाढ करणे तसेच नवीन मशीनरी व साहित्य घेण्यासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. सन १९८० च्या जनगणनेनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत, आता लोकसंख्या व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता असल्यामुळे यासंदर्भात विभागाने तातडीने कार्यवाही करावी व तसा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

३.४ (२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्राचार्यांची पदे अनेक ठिकाणी रिक्त आहेत. काही ठराविक तालुक्यांमधील शासकीय आयटीआयमध्ये प्राचार्य म्हणून नेमणूक झाल्यास तेथे काम करण्यास प्राचार्य उत्सुक नसतात. त्यामुळे काही ठराविक जिल्ह्यांतील आयटीआय केंद्रांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त असतात. प्रशिक्षक व प्राचार्य यांची पदे लवकर भरण्याकरिता विभागातून जिल्हा पातळीवर सक्त सूचना जाणे आवश्यक असून पद भरतीकरिता विलंब झाला तर राज्यातील ग्रामीण भागातील तरूण वर्गाला तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण देण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. तरूण पिढीला चांगले व्यवसायिक प्रशिक्षण देऊन देशाची एकूणच उत्पादन क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता राज्यातील, जिल्ह्यातील आयटीआय केंद्रांच्या माध्यमातूनही मदतीचा हातभार लावता येईल असे मत समितीने व्यक्त केले. राज्यभरामध्ये प्राचार्यांची ३४२ पदे आहेत, त्यापैकी २०४ पदे रिक्त आहेत. ५९ टक्के प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तातडीने पाठपुरावा करण्यात यावा. तसेच आयटीआय प्रशिक्षकांची २६ टक्के पदे रिक्त आहेत. सदर पदे देखील तातडीने भरण्यात यावी. राज्यातील शासकीय आयटीआय मधील प्राचार्य व प्रशिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

३.५ (३) राज्यात कार्यरत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा आढावा घेताना समितीच्या असे निदर्शनास आले की, प्रशिक्षण संस्थांचे अभ्यासक्रम कालबाह्य झालेले आहेत, प्रशिक्षण संस्थेमधील यंत्रसामुग्री कालबाह्य झालेली आहे. त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकडून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळून देखील ते त्या ठिकाणची अद्ययावत यंत्रसामुग्री हाताळू शकत नाही व त्यांना नोकरीवरुन कमी केले जाते. यास्तव विभागाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रम व यंत्रसामुग्रीचा आढावा घ्यावा व ते अभ्यासक्रम अद्ययावत व यंत्रसामुग्री उन्नत करून विद्यार्थ्यांना अद्ययावत प्रशिक्षण द्यावे. जेणेकरून कालानुरुप आवश्यक तांत्रिकज्ञान व आधुनिक यंत्र, त्यांना हाताळता येईल. तसेच कालबाह्य झालेली यंत्रसामुग्री निष्कासित करण्यात यावी. याबाबत विभागाने निश्चित उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.४ " न्युनतम देकाराच्या विवेकाहीन फेटाळण्यामुळे जादा खर्च " व परिच्छेद क्रमांक ३.२.५ " राजकोषाला जादा खर्च " आणि ३.३.४ दर सूचीमध्ये विमाप्रभाराची विवेकहीन तरतूद " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**न्युनतम देकाराच्या विवेकहीन फेटाळण्यामुळे जादा खर्च**

**शासनाकडून पहिली मागणी विवेकहीन पद्धतीने फेटाळण्याचा परिणाम पुनर्निविदेवर रु.३.४७ कोटी जादा खर्च होण्यात आला.**

वेडगांव-पोडसा-शिरपूर-कागज नगर रस्त्यावर (मुजिमा १९) वर्धा नदीवर मोठा पुल बांधण्याच्या कामाला शासनाने रु.६.१० कोटींची प्रशासकीय मान्यता दिली. (ऑक्टोबर २००५) या कामाच्या अंदाजपत्रकाला मुख्य अभियंता (सार्वजनिक बांधकाम प्रदेश), नागपूर यांनी रु.५.९४ कोटीची तांत्रिक मंजूरी दिली होती. (ऑक्टोबर २००६) पात्र कंत्राटदारांकडून माहोरबंद एकमुफ्त निविदा "सी" प्रपत्रात बोलावल्या गेल्या. (मे, २००६) मेसर्स खरे आणि तारकुंडे कन्स्ट्रक्शन, नागपूर यांचा रु.९.५७ कोटीचा देकार (निविदेत नमूद केलेल्या रु.५.९४ कोटी किंमतीच्या ६१.११ टक्के जास्त) हा न्यूनतम आढळून आला. (जानेवारी, २००७) हा देकार मंजूर करणे मुख्य अभियंत्यांच्या अधिकाराबाहेर असल्याने त्यांनी ती बोली मंजूरी करिता शासनाकडे पाठविली. (फेब्रुवारी २००७) या बोलीची शिफारस करताना मुख्य अभियंता यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले की, (i) या कामाचे स्थान अतिशय संवेदनाक्षम आणि मागासलेल्या भागात होते (ii) कंत्राटदार अत्यंत अनुभवी व समर्थ होता आणि कंत्राटदाराने नमूद केलेले दर वाजवी होते आणि स्पर्धा पर्याप्त आणि योग्य होती. शासनाच्या निर्देशांप्रमाणे २२ ऑगस्ट, २००७ ला वाटाघाटी केल्या गेल्या. ज्या दरम्यान कंत्राटदाराने त्याची बोली रु.८.९८ कोटी पर्यंत कमी करण्याचे मान्य केले व त्याच्या देकाराची विधिग्राह्यता ३० नोव्हेंबर, २००७ पर्यंत वाढवून दिली. तथापि वित्त विभागाने हा देकार दराच्या गैर अवाजवीपणाच्या कारणांनी नाकारला (नोव्हेंबर २००७), आणि विभागाला पुन्हा नवीन बोली बोलविण्याचे आदेश दिले.

पुन्हा निविदा बोलावल्या असता (डिसेंबर २००७/जानेवारी २००८) त्याच कंत्राटदाराचा म्हणजे मेसर्स खरे आणि तारकुंडे यांचा रुपये १२.६३ कोटीचा देकार न्यूनतम आढळून आला. रु.१२.६३ कोटीच्या न्यूनतम देकाराची मुख्य अभियंता आणि शासनाकडे शिफारस केली. (एप्रिल, २००८) व ती करताना पहिल्या मागणीच्या वेळी दिलेली कारणेच पुन्हा दिली. कंत्राटदाराने त्याचा देकार रु.१८ लाखांनी कमी केला व रु.१२.४५ कोटीचा वाटाघाटीचा देकार दिला. सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यूनतम देकार मंजूर केला. (मार्च २००९) दुसऱ्या मागणीच्या वेळी दिलेली कारणे ही पहिल्या मागणीच्या न्यूनतम देकाराची शिफारस करताना दिलेली कारणेच असल्याने पहिल्या मागणीच्या वेळी न्यूनतम देकार शासनाने नाकारणे विवेकहीन ठरले आणि त्याचा परिणाम रु.३.४७ कोटीच्या जादा खर्चात झाला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, चंद्रपूर यांनी नमूद केले (मार्च २०१०) की, वित्त विभागाने पहिल्या मागणीच्या वेळी न्यूनतम देकार गैरवाजवी दरांच्या कारणांनी नाकारला होता आणि पुन्हा निविदा बोलाविण्याचे निर्देश दिले होते. हे उत्तर मान्य करण्यासारखे नाही कारण दोन्ही मागण्यांचे समर्थन करताना मुख्य अभियंता यांनी सारखीच कारणे दिली होती आणि कामाच्या व्याप्तीमध्ये काहीही वाढ झालेली नव्हती. विभागाचे प्रारंभीचे अंदाज अवास्तववादी सिद्ध झाले कारण रु.१७.६६ कोटीचा सुधारित अंदाजाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरी करिता पाठविला होता (जून २०१०). मार्च, २०११ पर्यंत मंजूरी प्रतिक्षित होती.

ही बाब शासनाला कळविण्यात आली (जून, २०११) त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही. (ऑक्टोबर २०११)

**ज्ञापन :–**

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.**

सदर काम केंद्रीय मार्ग निधी योजनेअंतर्गत सन २००५-०६ मध्ये मंजूर झाले व बजेटमध्ये घेतले. सदर पूलाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु.६.१० कोटी इतकी आहे. (ऑक्टोबर २००५) व तांत्रिक मान्यता रु.५.९४ कोटी इतकी आहे. (दरसूची २००६-०७)

सदर कामाच्या निविदा मे २००६ मध्ये सी फॉर्म वरील निविदेनुसार पात्र कंत्राटदाराकडून मागविल्या. निविदा किंमत रु.५.९४ कोटी एवढी होती. मेसर्स खरे व तारकुंडे कन्स्ट्रक्शन, नागपूर यांनी निविदा रु.९.५७ कोटी (६१.११%) मूळ निविदा रकमेच्या जास्त असल्याचे आढळले. त्यांनी सादर केलेली निविदा निम्नतम दराची असल्याने ती शासनास मान्यतेकरिता सादर करण्यात आली. दिनांक २२/८/२००७ रोजी मुख्य अभियंता स्तरावर कंत्राटदाराशी वाटाघाट करण्यात आली व त्यानंतर कंत्राटदारास मेसर्स खरे व तारकुंडे कंन्स्ट्रक्शन, नागपूर यांची रु.८.९८ कोटी या रकमेमध्ये काम करण्यास तयारी दर्शविली. सदर प्रकरण वित्त विभागाला मंजूरीकरिता सादर केले असता वित्त विभागाने कंत्राटदाराने दिलेला वरील देकार "दर अवाजवी असल्यामुळे स्विकारार्ह नाही. फेर निविदा बोलाविणे योग्य राहील" असे अभिप्राय दिले होते. वित्त विभागाने दिलेल्या

निर्देशानुसार डिसेंबर २००७-०८ मध्ये फेर निविदा प्रक्रिया राबविली असता त्याच कंत्राटदाराने (मेसर्स खरे व तारकुंडे) सादर केलेला रु.१२.६३ कोटीचा देकार न्यूनतम होता. हा देकार शासनास शिफारस करून सादर करण्यात आला. (दि.१५/४/२००८) ही शिफारस करताना खालील कारणे दिली होती :—

(१) प्रत्यक्ष काम करावयाची जागा ही नक्षलग्रस्त भागातील असून ते क्षेत्र अतिसंवेदनशील व दुर्गम भाग आहे.

(२) कंत्राटदाराकडे व्यापक अनुभव आहे. तसेच काम करण्याची क्षमता देखील आहे.

(३) कंत्राटदाराने या देकाराकडे नमूद दर वाजवी व स्पर्धात्मक दृष्ट्या योग्य वाटतात.

पहिल्या निविदेच्या वेळीही देकार स्विकारण्यासाठी साधारण वरीलप्रमाणे कारणे देण्यात आली होती.

दुसऱ्या निविदा अधिक्याबाबतच्या प्रस्तावावर वित्त विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले होते :—

The price quoted is Rs.12.63 Cr. against AA cost of Rs.6.1 Cr. i.e. bids received are 107.04% more than estimated cost. The estimated cost is of 2006-07 DSR. The revised estimated cost is Rs.9.42Cr. And bid of Rs. 12.63Cr. Is 34% higher than revised estimated. It is presumed that revised cost is as per base price included in the tender document. Under this circumstances invitation of bids a fresh is recommended.

सदर दुसरा निविदा प्रस्ताव मान्य करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या टिप्पणीत असे नमूद केले होते की, सध्याच्या दरसूचीनुसार मूळ अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनुसार सुधारित किंमत रु.९.४२ कोटी येते. प्राप्त झालेला फेर देकार रु.३.२० कोटी येते. प्राप्त झालेला फेर देकार रु.३.२० कोटीने जास्त (३४%) आहे. या ३४% जादा देकारातून रु.१.७१ कोटीची अतिरिक्त कामे कंत्राटदाराने करून द्यावयाची प्रस्तावित आहे. त्यामध्ये खालील कामांचा समावेश होता :—

(१) Construction of Temporary roads and river crossing.

(२) Construction of temporary hutting and labour charges.

(३) Sand filling for islanding for foundations.

(४) Additional security required as site is located in Naxalite and sensitive area.

(५) Extra for design charges.

वरील कामासाठी जी अतिरिक्त रक्कम खर्च करावी लागणार आहे ती ३४ टक्के निविदा अधिक्याच्या १८.२८% येत आहे. त्यामुळे वास्तवात १५.७५% इतके निविदा अधिक्य होत आहे. पूल उभारणे ही दुर्गम व संवेदनशील भागात आहे. तसेच निविदेत असलेले भाववाढीचे कलम दोन्ही बाजूनी लागू असते. जर कच्चा मालाच्या किंमती कमी झाल्या तर कंत्राटदारास तेवढी रक्कम कमी दिली जाते.

प्रथमतः बोलाविण्यात आलेल्या निविदेतील न्यूनतम प्राप्त देकार मूळ निविदा रकमेच्या ६१.११ टक्क्यांनी जास्त असल्याने वित्त विभागाने दर अवाजवी असल्याने फेर निविदा बोलाविण्याबाबत सूचविले होते. तदअनुषंगाने पुन्हा मागविलेली निविदा व त्यातील प्राप्त देकार अद्ययावत किंमतीशी तुलना केली असता ३४ टक्क्यांनी जास्त असल्याचे दिसून आले. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने वरीलप्रमाणे केलेला खुलासा पाहता फेर निविदा अधिक्याचा प्रस्ताव वित्त विभागाने मान्य केल्याचे दिसून येते. वरील वस्तुस्थिती पाहता पहिल्या न्यूनतम देकाराच्या विवेकहीन फेटाळणीमुळे पुर्ननिविदेवर रु.३.४७ कोटी जादा खर्च झाला असे म्हणणे योग्य होणार नाही. सबब सदर लेखा आक्षेप निर्लेखित करण्यात यावा ही विनंती.

**फेर लेखा आक्षेप :—**

वित्त विभागाच्या निर्देशानुसार फेर निविदेनंतर कंत्राटदाराने सादर केलेला लेखा आक्षेप दरसूची २००७-०८ नुसार ३२ टक्क्यांपेक्षा देखिल कमी आहे. सदर बाब लेखा परीक्षाकार्यालयास मान्य नाही. कारण, दरम्यानच्या कालावधीत मूळ अंदाजापेक्षा ५९ टक्के इतकी वाढ फेर निविदेनंतरच्या देकारात झाली आहे. सबब, न्यूनतम देकाराच्या विवेकहीन फेटाळण्यामुळे जादा खर्च शासनाकडून पहिली मागणी विवेकहीन पद्धतीने फेटाळण्याचा परिणाम, पुर्ननिविदेवर रु.३.४७ कोटी जादा खर्च होण्यात झाला.

The reply that the offer of the contractor at the time of second call wad less i.e.32% above the updated cost of work as per DSR 2007-08 hence accepted by the Finance Department is not

acceptable to audit because during this period there was 59% increase in the estimated cost of the work. Thus, injudicious rejection of offer at the time of first call (even though CE opined that rates were reasonable) resulted in extra burden of Rs.3.47 crore to Government.

**राजकोषाला जादा खर्च**

**"न्यूनतम निविदाकाराऐवजी दुसऱ्या कंत्राटदाराला काम देण्याचा परिणाम रु.१.१९ कोटी जादा खर्च होण्यात झाला " यासंदर्भात महालेखाकारांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले :-**

अंदाजित किंमत रु.१७.९९ कोटी असलेल्या औरंगाबादच्या कॅन्सर रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्या बांधकामाच्या निविदा नोव्हेंबर २००८ मध्ये बोलावल्या होत्या. बोलीदारांच्या अर्हतेकरिता निविदेतील एक अट अशी होती की बोलीदाराने गेल्या पाच वर्षात म्हणजे २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत रु.४.९० कोटी किंमतीपेक्षा कमी किंमत नसलेले यासारखे काम क्रियान्वित करून पुर्ण केले असले पाहिजे.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद (अधीक्षक अभियंता) यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत उघडकीस आले की, रुग्णालयाच्या बांधकामासाठीच्या बोलीच्या प्रतिसादात आठ देकार प्राप्त झाले होते. कंत्राटदारांनी सादर केलेल्या तांत्रिक बोली अधीक्षक अभियंता यांनी उघडल्या होत्या आणि सर्व आठ देकार योग्य आढळले होते. त्यानंतर आर्थिक बोली उघडल्या असता तीन कंत्राटदारांचे देकार न्युनतम होते. कंत्राटदार "अ" (अंदाजित किंमतीच्या ९.९९ टक्के कमी) कंत्राटदार "ब" (अंदाजित किंमतीच्या ५.३० टक्के कमी) व कंत्राटदार "क" (अंदाजित किंमतीच्या ३.३३ टक्के कमी).

अधीक्षक अभियंता यांनी कंत्राटदार "अ" यांच्या देकाराची जो न्युनतम बोलीदार होता आणि ज्याने गेल्या पाच वर्षात रु.६.०६ कोटी इतक्या किंमतीची यासारखी कामे क्रियान्वित व पुर्ण केली होती त्याची मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, औरंगाबाद (मुअ) यांचेकडे मंजूरीसाठी शिफारस केली (डिसेंबर २००८). मुख्य अभियंता यांनी कंत्राटदार "अ" यांचा देकार अशाकरिता नाकरला (डिसेंबर २००८) की जी कामे पुर्ण झाली अशी दाखविली होती, ती २००३-२००४ पूर्वी चालू केली होती. द्वितीय न्युनतम बोलीदार (कंत्राटदार "ब") विचारात घेतला नाही कारण त्याची आर्थिक उलाढाल परिगणन करताना दुसऱ्याकडे सोपविलेल्या कामाची कागदपत्रे दाखल केली होती. मुख्य अभियंता यांनी एका बोलीदाराशी (कंत्राटदार "क") वाटाघाटी केल्या (डिसेंबर २००८) आणि त्याचा वाटाघाटींचा ३.३४ टक्के कमी असलेला देकार मंजूर केला.

याप्रकारे, न्युनतम निविदा नाकारण्याच्या विवेकहीन निर्णयाचा परिणाम रु.१.१९ कोटी जादा बोजा पाडण्यात झाला.

अधीक्षक अभियंता यांनी नमुद केले (सप्टेंबर २००९) की मुख्य अभियंता यांनी तांत्रिक कारणांनी न्युनतम देकार नाकारला आणि ते काम, थोड्या अवधीत अर्थसंकल्पीय अनुदान संपविण्यासाठी ताबडतोब सोपविले गेले. मुख्य अभियंता यांनी पुढे नमुद केले (जानेवारी २०१०) की, कंत्राटदार " अ" यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची मुख्य अभियंता कार्यालय स्तरावर पडताळणी केली गेली आणि असे दिसून आले की एका प्रशासकीय इमारतीचे बांधकाम त्याने ठराविक काळात पूर्ण केले नव्हते. अधीक्षक अभियंता यांचे उत्तर स्विकारण्यायोग्य नाही कारण-

(१) अर्हतेची कसोटी ही "गेल्या पाच वर्षात क्रियान्वित केलेले आणि पूर्ण केलेले" ही होती आणि विभागाने अर्थ लावल्याप्रमाणे "गेल्या पाच वर्षात सुरुवात केलेल आणि पूर्ण केलेले" अशी नव्हती आणि,

(२) " दोन लिफाफे पद्धती" खालील निविदा आणि बोली कागदपत्रे उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये करारनिविष्ट केलेले आहे की लिफाफा क्र.१ (तांत्रिक बोली) मधील आशय विभागाला मंजूर असल्यासच लिफाफा क्र.२ उघडला जावा. लिफाफा क्र.२ उघडल्याची वस्तुस्थिती दर्शविते की कंत्राटदाराने अर्हता कसोटी पूर्ण केली होती. अधीक्षक अभियंता यांनीही त्यांच्या मुख्य अभियंता यांना पाठविलेल्या गोपनीय पत्रात (डिसेंबर २००८) हे म्हणणे कायम केले होते.

(३) शिवाय, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेच्या नियम २०८ प्रमाणे जर न्युनतम निविदा अथवा वाटाघाटी ऐवजी दुसरी निविदा मंजुर करावयाची असेल तर हा निर्णय एका व्यक्तिगत अधिकाऱ्याने घेऊ नये तर महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेच्या परिशिष्ट-११ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, या कारणासाठी खास गठित केलेल्या एका समितीने घ्यावा. अशी कुठलीही समिती गठित केली नव्हती आणि मुख्य अभियंता यांनी कंत्राटदार "अ" आणि "ब" यांचा न्युनतम देकार नाकारला.

ही बाब शासनाला मे २०११ मध्ये कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झालेले नाही. (ऑक्टोबर २०११)

**ज्ञापन :-**

**उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.**

औरंगाबाद येथे कॅन्सर रुग्णालय बांधकामास दि. ५.७.२००८ रोजी रु.२२,७७,२८,०००/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी दि.१.११.२००८ रोजी रु. १६,३२,९४,३३६/- इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता दिली होती. विद्युत कामासह

निविदेची किंमत रु.१७,९८,५१,४२१ निविदेत ठेवण्यात आली होती. एकूण आठ कंत्राटदारांनी दि. २८ नोव्हेंबर २००८ रोजी निविदा दाखल केल्या होत्या. अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांनी दि. २८ नोव्हेंबर २००८ रोजी लिफाफा क्र.१ उघडला होता व त्यातील कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर लिफाफा क्र.२ दि. २९ नोव्हेंबर २००८ रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची व्यवस्थितपणे तपासणी न करता सर्व ८ कंत्राटदारांकडे अर्हता असल्याचे समजून अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांनी लिफाफा क्र. २ उघडले होते. कंत्राटदार “अ” म्हणजेच मे. एलोरा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद याचा देकार सर्वात कमी (९.९९ टक्के कमी दराने) असल्याने त्यांचे न्यूनतम देकाराचे निविदा पत्र अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांनी दि. ३ डिसेंबर २००८ अन्वये शिफारशींसह मान्यतेस्तव मुख्य अभियंता कार्यालयाकडे सादर केली होती.

(२) मुख्य अभियंता कार्यालयात लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची विस्ताराने केलेल्या पडताळणीनंतर असे आढळून आले की, मे.एलोरा कन्स्ट्रक्शन हे निविदा शर्तीतील अर्हतेच्या कसोटीची पूर्तता करत नाही.

(३) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन हे निविदेतील अट क्र. xiv (b) ची पुर्तता करत नव्हते. ह्या अटीप्रमाणे सारख्या प्रकारचे काम दि. १ एप्रिल २००३ नंतर सुरू केलेले व दि. ३१ मार्च २००८ पूर्वी समाधानकारकरित्या पुर्ण करावयास हवे होते. परंतु मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसुन येते की, त्यांनी दावा केलेले सारखे प्रकारचे काम हे सन २००१ साली हाती घेतल्याने अर्हतेच्या कसोटीची पूर्तता करू शकलेले नाही. कंत्राटदाराने दावा केलेले काम हे दि. ७ मार्च २००१ च्या कार्यारंभ आदेशान्वये हिंगोली येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम २४ महिन्याच्या कालावधीत (दि. ६ मार्च २००३ पर्यंत) पूर्ण करण्याचे आदेशित होत. दि. ३१ मार्च २००३ पर्यंत कंत्राटदाराने रु. २८९.७२ लक्ष किंमतीचे काम केले होते. दि. ७ मार्च २००१ ते दि. ३१ मार्च २००३ या कालावधीत संबंधित कंत्राटदाराने भरीव काम केले असल्याने ऑडीटने अनुमान केल्यानुसार हे काम दि. १ एप्रिल २००३ नंतर सोपविलेले होते असे म्हणता येणार नाही.

(४) द्वितीय निम्नतम देकार असलेले कंत्राटदार “ब” म्हणजेच मे.वंडर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे कागदपत्रांची पडताळणी केली असता ते देखील अर्हता कसोटीची पूर्तता करू शकलेले नाहीत. निविदा शर्तीप्रमाणे गेल्या ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल रु.१२२४.७१ लक्ष एवढी पाहिजे. तथापि, कंत्राटदाराने लिफाफा क्र.१ मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांप्रमाणे सरासरी वार्षिक उलाढाल रु.८१७.३६ लक्ष असल्याने सदर कंत्राटदाराचा देकार स्वीकारला गेला नाही. उर्वरित ६ कंत्राटदारांची कागदपत्रे स्विकारार्ह नसल्याचे आढळून आले.

(५) मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी दि. ८ डिसेंबर २००८ अन्वये अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांचे स्पष्टीकरण मागितले होते. अधीक्षक अभियंता यांनी दि. १० डिसेंबर २००८ अन्वये सादर केलेले स्पष्टीकरण मुद्याला धरुन नसल्याने मुख्य अभियंता यांनी पुन्हा दि. १० डिसेंबर २००८ अन्वये अतिरिक्त स्पष्टीकरण मागितले होत. त्यांचे अनुपालनार्थ अधीक्षक अभियंता यांनी दि. १२ डिसेंबर २००८ च्या सुधारित उत्तरात असे स्पष्ट केले आहे की, मे.एलोरा कन्स्ट्रक्शन व मे. वंडर कन्स्ट्रक्शन यांचे लिफाफा क्र. २ हे अनावधानाने उघडले गेले आणि या दोघा कंत्राटदारांचे देकार रद्द करण्यात येऊन कंत्राटदार “क” (मे.प्रकाश कन्स्टोवेल, नाशिक) यांची ३.३३ टक्के निम्न दराची निविदा स्वीकारणेस्तव शिफारस करण्यात आली.

(६) अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांचा सुधारित प्रस्ताव विचारात घेऊन मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी दि. १६ डिसेंबर २००८ रोजी निविदा स्विकृतीचे पत्र अधीक्षक अभियंता, औरंगाबाद यांना दिले. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, औरंगाबाद यांनी दि. १८ डिसेंबर २००८ रोजी कार्यारंभ आदेश जारी केले.

(७) तृतीय निम्नतम देकार असणाऱ्या कंत्राटदारास हेतुपुरःस्सरपणे काम वाटप करण्यात आलेले नाही कारण प्रथम व द्वितीय देकार असणाऱ्या कंत्राटदारांच्या कागदपत्रांची पुनर्पडताळणी मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्या कार्यालयात केल्यानंतर ते पात्रता अटींची पूर्तता करीत नसल्यामुळे अपात्र झाले होते. अधीक्षक अभियंता यांनी सुद्धा त्यांच्या दि. १२ डिसेंबर २००८ च्या पत्रान्वये मे.एलोरा कन्स्ट्रक्शन व मे.वंडर कन्स्ट्रक्शन यांचे कागदपत्रांच्या तपासणीत चूक झाल्याचे व त्यांचे वित्तीय बोली अनावधानाने उघडल्याचे मान्य करून पुढे ते रद्द करण्याची शिफारस करून मे. प्रकाश कन्स्टोवेल, नाशिक यांची निविदा प्रथम निम्नतम झाल्यामुळे स्वीकारण्याची शिफारस केली होती.

(८) (१) Commision and Commencement या दोन्हींमध्ये फरक आहे असे परिच्छेदात नमूद करण्यात आले आहे. परंतु कार्यारंभ आदेशाची तारीख हीच काम सोपवल्याची (Date of Commission) अथवा सुरू केल्याची (Date Of Commencement) म्हणून ग्राह्य धरण्यात येते. हिंगोली येथील प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे कार्यारंभ आदेश दि. ७ मार्च २००१ रोजीचे होते. संबंधित कंत्राटदाराने दि. ७ मार्च २००१ ते दि. ३१ मार्च २००३ या कालावधीत रु.२८९.७२ लक्ष किंमतीचे काम पुर्ण केले होते. निविदेतील पात्रता अटीनुसार कार्यारंभ आदेश दि. १ एप्रिल २००३ नंतर व काम पुर्णत्वाचा दिनांक ३१ मार्च २००८ पुर्वी असावयास हवा. येथे नमूद कामाचा कार्यारंभ आदेश दि. १ एप्रिल २००३ पुर्वीचा असल्यामुळे निविदेतील पात्रता अटीच्या निकषात बसत नसल्यामुळे अपात्र ठरले होते.

(२) अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या दि. १२ डिसेंबर २००८ च्या पत्रान्वये मे. एलोरा कन्स्ट्रक्शन व मे. वंडर कन्स्ट्रक्शन यांचे कागदपत्रांच्या तपासणीत चूक झाल्याचे व त्यांचे वित्तीय बोली अनावधानाने उघडल्याचे मान्य करून पुढे ते रद्द करण्याची शिफारस करून मे. प्रकाश कन्स्टोवेल, नाशिक यांची निविदा प्रथम निम्नतम झाल्यामुळे स्विकारण्याची शिफारस केली होती.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेच्या नियम २०८ प्रमाणे जर एखाद्या बोलीदाराच्या समर्थतेबद्दल आक्षेप नसेल तर त्याची वित्तीय स्थिती, त्याच्या गत कामाच्या प्रगतीबद्दल जर आक्षेप नसेल तर सर्वसाधारणपणे निम्नतम देकार असणाऱ्या निविदा स्वीकारल्या जाव्यात. ज्या अधिकाऱ्याकडे शासनाने पूर्ण विश्वासाने अधिकार सोपविलेले आहेत, त्यांना निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा योग्यायोग्य पूर्ण अधिकार आहेत.

निम्नतम देकार असणाऱ्या निविदांव्यतिरिक्त इतर निविदा स्वीकारण्याचा अथवा वाटाघाटीद्वारे निविदा स्वीकारण्याकरिता परिच्छेद २०८ मध्ये नमूद परिशिष्ट १३ अन्वये नियुक्त समितीस असे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

परिच्छेदातील प्रकरणी, संबंधित बोलीदार मुळातच अर्हतेच्या कसोटीच्या निकषाची पात्रता सिद्ध करू न शकल्यामुळे अपात्र ठरला आहे. अधीक्षक अभियंता यांनी देखील कंत्राटदार “क” आणि “ब” यांची वित्तीय बोली उघडल्याची चूक मान्य केलेली आहे. म्हणून कंत्राटदार “क” हे आपोआपच प्रथम निम्नतम देकार देणारे बोलीदार ठरतात.

ज्या निविदा प्रकरणात कंत्राटदार पात्र ठरतो परंतु इतर कारणास्तव त्यास निविदा मंजूर करता येऊ शकत नाही अशावेळी निविदा स्विकृतीसाठी समितीकडे जाण्याचा मार्ग राहतो. त्याचप्रमाणे तडजोडीच्या निविदा प्रकरणी देखील समितीकडे जाण्याचा मार्ग राहतो. या कामाची निविदा जाहीर प्रसिद्धीद्वारे मागविण्यात आली असल्यामुळे ही स्पर्धात्मक निविदा ठरते. अशा परिस्थितीत समितीकडे जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(९) सदरहू प्रकरणी, मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांना काम प्रदान न करता मे.प्रकाश कन्स्टोवेल, नाशिक यांना प्रदान करण्याच्या कृतीविरुद्ध श्री.किरण कुलकर्णी यांनी रिट पिटीशन क्र.५४/२००९ अन्वये याचिका दाखल केली होती. तथापि, सुनावणीनंतर उच्च न्यायालयाने सदर याचिका रद्दबातल केली.

(१०) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी कागदपत्रांची व्यवस्थित तपासणी न करता निविदा प्रक्रिया केल्याबाबत शासन पत्र क्र.बीडीजी-२०११/प्र.क्र.२४२/इमा.३ दि. १७ ऑक्टोबर २०१२ अन्वये समज देण्यात आलेली आहे. (सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

वरील अभिप्राय मान्य करून सदरहू परिच्छेद बंद करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.३.३.४ “दरसूचीमध्ये विमा प्रभाराची विवेकहिन तरतूद**

**दरसूचीमध्ये विमा प्रभाराच्या अमर्याद समावेशाचा परिणाम कंत्राटदारांना जादा प्रदान करण्यात झाला.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जुलै, २००५ च्या पत्रातील अनुदेशांनुसार विविध शासकीय विभाग, अर्धशासकीय संघटना किंवा स्वायत्त संस्था यांनी कार्यान्वित केलेल्या कामांचा विमा, विमा संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडेच उतरविला पाहिजे. विमा संचालक, मुंबई यांनी त्यांच्या मार्च, २००६ च्या परिपत्रकामध्ये पुनरुच्चार केला की, सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यान्वित केलेल्या कामांचा विमा शासकीय विमा निधीकडेच उतरविला पाहिजे. विमा संचालक यांनी असेही निर्धारित केले होते की, जर कंत्राटदाराने कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याचा पुरावा सादर केला नाही तर निविदा किंमतीच्या एक टक्का रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कापून घेऊन शासकीय विमा निधीमध्ये विमा संरक्षणाकरिता विमा प्रभार म्हणून जमा करावे.

पाच विभागातील १९ कामांचा अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत (ऑक्टोबर, २००९ ते मार्च, २०१०) असे उघडकीस आले की, कंत्राटदारांनी कामांचा विमा, विमा संचालकांकडे उतरविण्यासाठी केलेले प्रदान, अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या एक टक्के रकमेपेक्षा फारच कमी होते. कंत्राटदारानी प्रदान केलेला विमा प्रभार किंमतीच्या ०.२७ टक्के ते ०.४८ टक्के या टप्यात होता. याप्रकारे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, नागपूर यांनी दरसूची चे अंदाज/दर यात एक टक्का विमा प्रभार समाविष्ट केल्यामुळे कंत्राटदारांना रु.३६.४६ लाखांचा लाभ झाला. (परिशिष्ट ३.७)

शिवाय मुख्य अभियंता यांनी २००८-०९ मध्ये रु.३०३.८५ कोटीची ९८ कामे व २००९-१० रु.३७१.६६ कोटीची ९८ कामे मंजूर केली/ त्यांना अंतिम रुपये दिले. याचा परिणाम कंत्राटदारांना रु.३.६८ कोटीचा अयोग्य लाभ झाला. (परिशिष्ट ३.८)

हे निदर्शनास आणून दिल्यावर कार्यकारी अभियंत्यांनी नमूद केले (ऑक्टोबर, २००९ ते मार्च, २०१०) की, अंदाजपत्रकामध्ये एक टक्का विमा प्रभार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या अनुदेशाप्रमाणे जोडला गेला. मुख्य अभियंता (सार्वजनिक बांधकाम), नागपूर प्रदेश यांनी नमूद केले (ऑगस्ट, २०१०) की, अधीक्षक अभियंता, नागपूर, चंद्रपूर व गडचिरोली मंडळाकडून माहिती संग्रहीत केल्यावर तपशीलवार उत्तर देण्यात येईल.

ही बाब शासनाला जून, २०११ मध्ये कळविण्यात आली. उत्तर प्रतिक्षित होते (ऑक्टोबर, २०११)

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सविस्तर अंदाजपत्रके चालू दरसूचीवर आधारित तयार करण्यात येऊन त्यानुसार निविदा प्रपत्रातील अनूसूची “ब” मधील दिलेल्या दरांवर आमंत्रित केल्या जातात. त्यामुळे मंजूर निविदा मधील दरांप्रमाणे देयक अदा करण्यात येतात.

निविदा प्रपत्रातील अतिरिक्त अट क्र.३ प्रमाणे कंत्राटदाराने ‘विमा पॉलीसी’ संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडूनच काढणे आवश्यक आहे, तसे न केल्यास कामाच्या किंमतीच्या १ टक्का रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करणे अभिप्रेत आहे. १ टक्का ही रक्कम विमा संचालक, महाराष्ट्र शासन यांचेकडून पॉलीसी काढल्यास, त्या प्रत्यक्ष रकमेशी संबंधित नाही. संबंधित अधीक्षक अभियंता यांनी सूचित केल्यानुसार कंत्राटदाराने विमा संचालक, महाराष्ट्र शासन यांच्याकडून विमा पॉलीसी घेतली असल्यामुळे त्या कंत्राटदाराकडून कामाच्या किंमतीच्या १ टक्का प्रमाणे फरक वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कुठल्याही कामाचा विमा प्रिमियम हे विमा संचालक, महाराष्ट्र शासन निश्‍चित करतात. विमा संचालक, महाराष्ट्र शासन यांचेकडून विमा पॉलीसी न घेतल्यास कामाच्या किंमतीच्या १ टक्का रक्कम वसूल करण्यात येते.

तरी या प्रकरणामध्ये निविदेच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे. विमा संचालक, महाराष्ट्र शासन यांच्याकडून विमा पॉलीसी घेतल्यामुळे कंत्राटदाराकडून वसुली करण्यात आलेली नाही.

ब-१ प्रपत्रावर जाहीर प्रसिद्धी देऊन मागविलेल्या निविदेत बाबींचे दर नमूद असून सदरहू विमा संचालक यांच्याकडून विमा पॉलीसी काढण्याबाबत तसेच अशाप्रकारे विमा पॉलीसी न काढल्यास उचित कार्यवाहीबाबतची अट समाविष्ट करण्यात आलेली आहे. सदर अट सुस्पष्टपणे नमूद असल्यामुळे प्राप्त झालेल्या निविदा/निश्‍चितपणे स्पर्धात्मक असून या देकारांमध्ये वरील सर्व बाबी तसेच अटी/शर्तीबाबत विचार झालेला आहे. विमा प्रिमियम विमा संचालक, महाराष्ट्र शासन यांनीच निश्‍चित केलेले असल्यामुळे कंत्राटदाराला १ टक्का रक्कम किंवा फरक वा त्यांना मदत केल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तरी कृपया सदर परिच्छेद बंद करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, विम्याचे प्रिमिअम संचालक, विमा यांनी निश्‍चित करून दिले असल्याने कंत्राटदाराला त्याचा लाभ करून देण्यात आल्याचा व १ टक्का प्रिमिअमचा फरक वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

लेखापरीक्षा पथकाने संचालक, विमा यांनी निश्‍चित केलेल्या प्रिमिअमच्या रकमेबाबत आक्षेप घेतलेला नाही. परंतु लेखापरीक्षा पथकाचे म्हणणे असे आहे की, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी दरसूची/अंदाजपत्रकामध्ये विम्यासाठी १ टक्का रक्कम अधिक घेतली असून कंत्राटदाराने विम्यापोटी विमा कंपनीला प्रत्यक्षात ०.२७ टक्के ते ०.४८ टक्के रकमेचे भुगतान केले आहे. कंत्राटदारास १ टक्का रक्कम विमा रकमेपोटी मिळत असल्याने फरकाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

चालू वर्षाची दरसूची तयार करताना सर्व बाबींकरिता १ टक्का विमा पॉलीसी शुल्काची तरतूद अंतर्भूत करण्यात आलेली आहे. ही तरतूद पुढे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट झालेली आहे. कंत्राटदारला Material व Labour वरील खर्चासह विमा पॉलीसीनाही खर्च करावा लागतो. विमा पॉलीसी शुल्क अंतर्भूत केल्यामुळे अंदाजपत्रक अधिक वास्तविक तयार झालेले आहे.

१ टक्का विमा पॉलीसी शुल्काची तरतूद अंदाजपत्रकात अंतर्भूत असल्याबाबत कंत्राटदाराना निविदा भरण्यापूर्वी कल्पना असावी. खुली व स्पर्धात्मक निविदा असल्यामुळे कंत्राटदारांनी या शुल्काचे भान ठेऊन निविदा भरणे अपेक्षित आहे. जर या शुल्काचा अंतर्भाव अंदाजपत्रकात केला नसता, तर निविदा सुद्धा यापेक्षा जास्त रकमेची येऊ शकली असती.

यामुळे शासनाचे अधिक नुकसान झालेले नाही.

**साक्ष :–**

४.२ महालेखाकारांच्या सन २०१०-२०११ च्या नागरी अहवालातील उपरोक्त परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक १६ सप्टेंबर २०१५ रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग व विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

**न्यूनतम देकारांच्या विवेकहीने फेटाळण्यामुळे जादा खर्च** साक्षीच्या वेळी “न्यूनतम देकारांच्या विवेकहीने फेटाळण्यामुळे जादा खर्च” याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, वर्धा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करणे, जिल्हा चंद्रपूर या निविदा अधिक्याच्या प्रस्तावाबाबतचा सदरहू मुद्दा आहे. सदर काम केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत सन २००५-२००६ मध्ये मंजूर झाले व अर्थसंकल्पामध्ये घेतले. सदर पूलाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रुपये ६.१० कोटी इतकी आहे व तांत्रिक मान्यता ५.९४ कोटी रुपये इतकी आहे.

सन २००६ मध्ये निविदा काढल्या गेल्या होत्या. या निविदा प्रक्रियेंतर्गत तीन देकार (बीड्स) आल्या होत्या. सदर कामाच्या निविदा माहे मे, २००६ मध्ये सी फॉर्म वरील निविदेनुसार पात्र कंत्राटदाराकडून मागविल्या. निविदा किंमत ५.९४ कोटी एवढी होती. मेसर्स खरे व तारकुंडे कन्स्ट्रक्शन, नागपूर यांची निविदा ९.५७ कोटी म्हणजे ६१.११ टक्क्यांनी मूळ निविदा रकमेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. यासंदर्भात वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीने फेरनिविदा काढण्यात याव्यात, असे अभिप्राय दिले. फेरनिविदेमध्ये देखील ७ टक्क्यांनी निविदा अधिक्य रकमेची प्राप्त झाली. सदरहू निविदा तत्कलिन डीसीआर नियमावलीनुसार तुलनात्मकदृष्टया निविदा रकमेपेक्षा ३४ टक्के जास्त होती. तरी देखील वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीने हे काम मंजूर केले.

वित्त विभागाने पहिल्या निविदा रद्द करुन फेरनिविदेचे आदेश दिले. या दोन घटनांच्या अवधीमुळे प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे. फेर निविदा काढण्याचा जादा खर्चही शासनाला पेलावा लागलेला आहे. वित्त विभागाच्या चुकीमुळे हे झालेले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू निविदा दोन वेळा निविदा रकमेपेक्षा जास्त होती. पहिल्यांदाच जास्त रकमेची निविदा स्वीकारुन कामाला सुरूवात केली असती तरी देखील शासनाच्या निधीचे नुकसान झालेच असते. फेरनिविदेच्या वेळी डीएसआर मधील दर बदलामुळे व महागाई निर्देशांकामुळेच मूळ प्रकल्पाची किंमत वाढली होती. त्यानुसार नक्षलग्रस्त क्षेत्रामधील या निविदा प्रक्रियेच्या वेळी निविदाही जास्त रकमेच्या आल्या होत्या.

दोन वर्षांचा कालावधी या दोन निविदा प्रक्रियांमध्ये होता. या दोन वर्षांमध्ये निविदांच्या किंमतीत इतका फरक पडला का ? खरोखर निर्देशांक इतका वाढला होता का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी सदरहू दोन वर्षांच्या फेरनिविदा दरम्यानच्या कालावधीत ५९ टक्क्यांनी जिल्हा दर सूची वाढली होती. पहिल्या निविदेच्या वेळी तीन कंत्राटदारांनी निविदा भरल्या होत्या. फेरनिविदेच्या वेळी चार कंत्राटदारांनी निविदा भरल्या होत्या. अटी व शर्तीप्रमाणे निविदा प्रक्रियेत कमीत कमी तीन निविदाकारांनी निविदा भरणे बंधनकारक आहे. परंतु हे नक्षलग्रस्त क्षेत्र असल्यामुळे येथे कोणत्याही कामाकरिता कंत्राटदार निविदा भरुन काम करण्यास उत्सुक नसतात. या भागामध्ये चांगले काम करण्याकरिता कंत्राटदारांमध्ये स्पर्धाही नसते.

पहिल्या निविदा प्रक्रियेमध्ये तीन निविदा बोली (बीडस) आल्या होत्या. दुसऱ्या निविदा प्रक्रियेमध्ये चार कंत्राटदारांनी निविदा भरल्या गेल्या होत्या. सदरहू निविदा अधिक्य रकमेच्या होत्या. न्यूनतम देकाराच्या विवेकहीन फेटाळणीमुळे जादा खर्च झाला. शासनांकडून पहिली मागणी विवेकहीन पद्धतीने फेटाळण्याचा परिणाम पुनर्विविदेवर रुपये ३.४७ कोटी जादा खर्च होण्यात झाला. याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, "दर अवाजवी असल्यामुळे स्वीकारार्ह नाही. फेर निविदा बोलाविणे योग्य राहील", असे अभिप्राय वित्त विभागाने दिले होते. सदरहू कामासाठी जी अतिरिक्त रक्कम खर्च करावी लागणार आहे ती ३४ टक्के निविदा अधिक्याच्या १८.२८ टक्के येत आहे. त्यामुळे वास्तवात १५.७५ टक्के इतके निविदा अधिक्य होत आहे. फेर निविदा अधिक्याचा प्रस्ताव वित्त विभागाने मान्य केल्याचे दिसून येते. सबब सदर लेखा आक्षेप निर्लेखित करण्यात यावा, अशा प्रकारची विनंती विभागाच्या माध्यमातून करण्यात आली होती.

## राजकोषाला जादा खर्च

न्यूनतम निविदाकाराऐवजी दुसऱ्या कंत्राटदाराला काम देण्याचा परिणाम रु.१.१९ कोटी जादा खर्च होण्यात झाला. यासंदर्भात साक्षीच्यावेळी समितीने विचारणा केली की, विभागाने ३ निविदा उघडल्या. परंतु विभागाने तांत्रिक बाबी सक्षम नसताना निविदा कशा उघडल्या ? नियम असा आहे की, तांत्रिक निविदा उघडल्यानंतर शंका असेल तर मुख्य अभियंत्यांची मान्यता घेऊनच वित्तीय निविदा उघडली पाहिजे. मात्र तसे करण्यात आले नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अधीक्षक अभियंत्यांनी अगोदर तांत्रिक निविदा उघडल्या, नंतर वित्तीय निविदा देखील उघडल्या आणि मग त्या मुख्य अभियंत्यांना सादर केल्या. मुख्य अभियंत्यांनी ज्यावेळी छाननी केली त्यावेळी असे आढळले की, दोन निविदा पात्रच नव्हत्या. मुख्य अभियंत्यांनी अधीक्षक अभियंत्यांना विचारले की, तुम्ही असे का केले, तेव्हा अधीक्षक अभियंत्यांनी कबूल केले की, अनावधानाने चूक झाली आहे, त्यामुळे जे २ निविदाकार अपात्र आहेत, त्यांच्या निविदा ग्राह्य धरू नयेत. अधीक्षक अभियंत्याच्या झालेल्या चुकीबाबत सन २०१२ ला त्यांना समज देण्यात आली. दुर्दैवाने ते आता हयात नाहीत.

